नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

एप्रिल/मे/जून'१९८९

युगवाणी



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
केंद्रीय कार्यकारिणी
१९८९-९२

अध्यक्ष	प्रा. राम शेवाळकर
कार्याध्यक्ष	श्री. वामन तेलंग
उपाध्यक्ष	१) प्रा. भा. ल. भोळे २) प्रा. राम डोके
सरचिटणीस	श्री. मनोहर म्हैसाळकर
चिटणीस	१) श्री. केशव जोशी
	अर्थ + युगवाणी प्रबंध + संगीत व कला विभाग
	२) श्री. ह.गो. पिंपळगावकर
	३) श्री. प्रकाश एदलाबादकर
	कार्यालयीन चिटणीस
	नाट्यविभाग + आमंत्रक
कोषाध्यक्ष	श्री. अ. ल. लिमये
संपादक युगवाणी	श्रीपाद भालचंद्र जोशी
	अन्य भाषा साहित्य विभाग
आमंत्रक रंगमंदिर	श्री. योगेश बऱ्हाणपुरे
आमंत्रक श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय	श्री. चंद्रकांत कुळकर्णी
	व्याख्यानमाला + सांस्कृतिक उपक्रम + इतर स्पर्धा
संचालक परीक्षा समिती	सौ. शोभा उबगडे
प्रतिनिधी अ.भा.म. साहित्य महामंडळ	१) अध्यक्ष, २) सरचिटणीस
	३) प्रा. सुरेश द्वादशीवार
आमंत्रक प्रसिद्धी + प्रकल्प व जनसंपर्क	श्री. प्रवीण बर्दापूरकर
आमंत्रक महिला उपक्रम + नाट्यस्पर्धा	श्रीमती कमल आंबेकर
आमंत्रक संशोधन + प्रकाशन	१) डॉ. आशा सावदेकर २) डॉ. अक्षयकुमार काळे
आमंत्रक संमेलन समिती	प्रा. पंढरीनाथ मांडवगणे
आमंत्रक शाखा समन्वय समिती	१) प्रा. राजन जयस्वाल २) प्रा. चंद्रकांत जोगी
	३) म. बा. मेश्राम ४) द. सा. बोरकर

अनुक्रमणिका

संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी
प्रबंध संपादक केशव जोशी

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

वर्ष पंचेचाळीसावे अंक ४-५-६ एप्रिल-मे-जून १९८९
मूल्य-१० रु. /वार्षिक वर्गणी ३० रु.

अनुक्रम ■ ■ ■ ■

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संदर्भ सेवा चंद्रकांत कुळकर्णी, आमंत्रक श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय, वि. सा. संघ
आवरण पृष्ठ चित्र/ रेखाटने : भाऊ समर्थ /आवरण पृष्ठ निर्माण सहकार्य– संजय धोतरकर
मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी सहकार्य विलास देशपांडे, श्यामकान्त कुळकर्णी

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, वि. सा. संघ
मुद्रक : म. पां. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १२

संपादकीय पत्रव्यवहार : संपादक युगवाणी, विदर्भ साहित्य संघ झाशी राणी चौक, नागपूर–१२

जाहिरात विषयक संपर्क : संयोजक प्रकल्प विभाग, वि. सा. संघ, नागपूर

युगवाणीसारख्या नियतकालिकाचे संपादन ही आज निव्वळ आव्हान म्हणून स्वीकारण्याचीच तेवढी बाब होत चालली आहे.

सत्यकथा अथवा लोकवाङ्मय किंवा हंस अशा मासिकांचे बंद पडणे हे प्रत्येक वेळी वाङ्मयीन संस्कृतीच्या पुढील संकोचाच्या, धोक्याच्या घंटा वाजवीत घडले होते. मात्र या संबंधी बधीर झालेल्या समाजाचा आपण भाग झालो आहोत व हे जाणवूनही त्या बधीरतेची देखील कोणतीच काळजी करण्याचे फारसे गरजेचे असे वाटलेले दिसले नाही.

संदर्भ हे सत्यकथेच्याही पलीकडले पाऊल. ते टाकू इच्छिणाऱ्या नियतकालिकाचेही अल्प-जीवित्व मागोवा, तात्पर्य, राजस, निकाय, प्रमेय, मराठी संशोधन पत्रिका, समाज प्रबोधन पत्रिका, वसंत, यांची झालेली दुर्दशा, 'प्रतिष्ठान'ची वर्षभर अंकच येऊ न शकणारी अनियमितता, 'साहित्य'ची झालेली परवड, आणि 'हंस'चे ताजे ताजे बंद पडणे या साऱ्या घटना मराठी भाषिक समाजाच्या विकासाचे लक्षण मानायच्या की अवनतीच्या ?

या पार्श्वभूमीवर ललित, पूर्वा, अनुष्टुभ, अस्मितादर्श, समुचित, अक्षरवैदर्भी, कवितारती, उगवाई, संवाद ही प्रादेशिक साहित्य संस्थेतर नियतकालिके व पंचधारा, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, प्रतिष्ठान आणि युगवाणी ही प्रादेशिक साहित्य संस्थांची नियतकालिके आपले अस्तित्व आणि सातत्य अनेक प्रकारच्या संघर्षांना तोंड देत कसे कायम राखू शकली आहेत हे त्यांच्या संपादक व प्रकाशकांनाच तेवढे ठाऊक. त्यांचा हा संघर्ष जणू त्यांच्या वैयक्तिक जीवनाचा भाग असल्याचे या समाजाला वाटू लागले आहे की काय अशी परिस्थिती निर्माण होऊ पहाते आहे. इतर प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या संबंधितांना व संबधित घटकांना या संघर्षाचे कसलेच सोयरसुतक किंवा कौतुक काहीच नसावे अशा काहीशा बधीर अशा वाङ्मयीन संस्कृतीत (की असंस्कृतीत ?)हे संघर्ष व अस्तित्व टिकवून ठेवण्याचा हा झगडा सुरू आहे. या नियतकालिकांचे संपादकत्व हे जणू कुठल्यातरी वैयक्तिक लाभाचे असे एखादे स्थान असावे व त्या स्थानाशी व तत्सम स्थानांशी त्यांचे संपादक व प्रकाशक यांचे व्यतिरिक्त बाकी कुणासही त्यांच्या संपादनाचा, प्रकाशनाचा कसलाच लाभ नसावा व म्हणून ही अनास्था आहे असे वाटावे, इतका या नियतकालिकांचा संपादक व प्रकाशकवर्गच तेवढा त्यात अधिकाधिक गुंतत चाललेला, तर तितकाच इतर संबंधित सामाजिक घटक असा वर्ग अलिप्त होत चाललेला असे काहीसे चित्र स्पष्टपणे आकार घेऊ लागलेले आहे.

नेमकी या उलट परिस्थिती गल्लाभरू, बाजारू व स्वस्त–सुलभ अशा मनोरंजक, आव्हानक व उत्तेजक परंतु 'वाङ्मयदरिद्री' नियतकालिकांची आहे. अर्थात ती देखील मराठीत फार मोठ्या प्रमाणा-वर आहेत असे नव्हे; तर मराठी वाचकांवर ती इतर भाषांमधून आक्रमित होत असतात. त्यांचा वाचक असलेला मराठी भाषिक समाज आज केवळ एकभाषिक वाचक उरलेला नसून तो किमान द्विभाषिक व त्रैभाषिक अशा वाचक आहे. मराठीतील नियतकालिकांचा नववाचक हा अशा मराठीतर नियतकालिकांचाही वाचक आणि 'प्रेक्षक' झालेला आहे. त्यात त्याला दोष देण्याचे अर्थातच काही

कारण नाही. ज्या उपभोक्ता समाजाच्या निर्मितीकडे या देशातील राजकीय व अर्थव्यवस्थेने वाटचाल करण्याचे धोरण हेतुतः स्वीकारून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे केली, त्यातून निर्माण झालेल्या उपभोक्ता समाजाच्या कोणत्याही भाषिक घटकाकडून या व्यतिरिक्त काही अपेक्षा करणे, त्याने विनासायास वाङ्मय, कला, साहित्य, भाषा, संशोधन, सौंदर्य इ. संबंधातील नियतकालिकांचे वर्गणीदार अथवा वाचक व्हावे अशी आशा करणे हेच मुळात चुकीचे आहे, हेच खरे.

या संबंधाने साहित्य, भाषा, संस्कृती, कला इ. व्यवहारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थांवर फार मोठी जबाबदारी असते याबाबत दुमत असण्याचे कारण नाही.

साहित्य, कला, सौंदर्य, समीक्षा, आस्वाद, या संबंधात अनभिज्ञ असणारा अथवा त्याबाबत अतिशय प्राथमिक स्वरूपाची समज असणाऱ्या व्यक्ती व व्यक्तींच्या समूहांना साहित्याभिमुख करण्याचे व्रत साहित्य संस्थानी घ्यावयाचे असते. (घेतलेले असते अथवा नाही याबद्दल वाद संभवतात व तसे ते होतही असतातच.)

मात्र अशा सर्व परिस्थितीतही 'युगवाणी' हे आजवर तरी संपूर्णपणे सुरक्षित असलेले एक महत्त्वाचे बेट आहे. बेट पंचेचाळीस वर्षे सातत्याने समृद्ध जीवन जगलेले, सर्वात अधिक संख्येने व अधिक पृष्ठांसहित प्रकाशित होणारे व सर्वाधिक पोहच असणारे, अनेक प्रज्ञावंत, नामवंत व प्रतिभावंत पूर्वसुरींच्या संपादनाखाली प्रकाशित झालेले मराठीतील या प्रकारचे हे एकमेव नियतकालिक. ते अद्याप तरी संपूर्णपणे सुरक्षित राखल्या जाण्याचे श्रेय, कला व वाङ्मयविषयक चेतनेचे, उत्साहाचे यथास्थित व व्यवस्थित संघटन करणाऱ्या वाङ्मयीन व कलाप्रांतातील वैदर्भीय नेतृत्वास व प्रतिभेस द्यावे लागेल.

मात्र संपूर्ण देशातील सात हजार नियतकालिकांवर आत्महत्या करण्याची लाजिरवाणी वेळ आणणाऱ्या वृत्तपत्रीय कागदाच्या भाववाढीचा इतर कागदांच्याही भाववाढीवर जो दुष्ट परिणाम संभवणार आहे त्या कागदाच्या भाववाढीच्या आगीत 'युगवाणी'चीही सुरक्षितता व हे वैभव होरपळून निघणारच नाही याची कोणतीच खात्री आज कुणीच देऊ शकत नाही.

'युगवाणी' हे विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असले तरी ते निव्वळ वैदर्भीयच नव्हे तर मराठी जिथे आस्थेने वाचली जाते, जोपासली जाते अशा, साहित्यातील सर्वप्रवाही उपप्रवाही मराठी लेखक, कवी, कलावंत वाचक, संशोधक, समीक्षक, अभ्यासक व अन्यभाषिक हितचिंतक अशा समस्तांचे आपआपल्या उद्दिष्टांच्या पूर्तीचे ते एक महत्त्वाचे आशा व अपेक्षास्थान व म्हणून त्या सर्वांचे प्रातिनिधिक नियतकालिक या स्वरूपात रुजल्याचे 'युगवाणी'कडे होणाऱ्या पत्रव्यवहारावरून स्पष्ट होते. तसेच गुणवत्तेवर आधारलेल्या अभिरुचीसंपन्न समाजाची निर्मिती करण्याचे व्रत घेतलेल्या 'युगवाणी'सारख्या नियतकालिकांचे आपल्या वाचकांइतकेच शासन, समाज व जनतेशी देखील प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष परंतु निकटचे असे नाते असते. मात्र कोठलेच नाते एकतर्फी असून उपयोगाचे नाही. ते दुतर्फी होण्याकरता शासन व समाज जनधुरीणांनीही 'युगवाणी'सारख्या नियतकालिकाभिमुख होणे आवश्यक आहे, त्याशिवाय या नात्यातून वाहणारा गुणवत्ता व अभिरुचीसंपन्नतेचा प्रवाह समाज, शासन व समाजातील ज्या ज्या थरापर्यंत तो पोहचायला हवा तेथवर पोहचणे हे 'पोहचवले पाहिजे' असे म्हणण्याइतके सोपे असणार नाही. हे करण्याची ज्यांना गरजच भासत नसेल व शासन, समाज आणि सर्वसामान्य जनता यांच्या संदर्भात गुणवत्ता अथवा अभिरुचीसंपन्नता ही गरज नसलेली, 'नॉन–प्रायरिटी' अशी बाब असल्याचाच ज्यांचा सिद्धांत असेल त्यांचा प्रश्न वेगळा. त्यांच्याशी वेगळे बोलावे लागेल.

एकविसाव्या शतकाकडे चाललेल्या भारतीय समाजाचे 'माहिती समाजात' झालेले रूपांतर व या देशाला एकविसाव्या शतकात नेऊन सोडणारी पिढी घडविण्याचे व्रत स्वीकारलेल्या नव्या शैक्षणिक धोरणाने मूल्यशिक्षण, गुणवत्तावृद्धी व अभिरुचीसंपन्नता यावर दिलेला भर हे लक्षात घेता, जो नवा समाज घडविण्याचा प्रयत्न या देशात सुरू झालेला आहे त्यात 'युगवाणी' व त्यासारख्या वाङ्मयीन नियतकालिकांची असलेली भूमिका देखील पुरेपूर विशद होणे आवश्यक आहे.

सामाजिक विकास व वाङ्मयीन सांस्कृतिक विकास या संकल्पना एकमेकांपासून वेगवेगळ्या बघितल्या गेल्यास व सामाजिक विकासाच्या संकल्पनेतून वाङ्मयीन–सांस्कृतिक विकास हद्दपार केले गेल्यास सामाजिक जीवन शुष्क, रटाळ, आस्थाविहीन, मूल्यविहीन होऊन कोरडे ठणठणीत पडणार आणि अशा समाजातील आशा, आकांक्षा व महत्त्वाकांक्षांचे असांस्कृतिकतेतच रूपांतर होणार हे गृहीतच आहे. तसे ते होतेच आहे. युगवाणी व त्यासारखी इतर नियतकालिके ही निव्वळ त्या त्या संस्था, त्यांचे प्रकाशक, संपादक, लेखक यांच्या 'बायोडाटात'च भर घालणारी त्यांच्या गरजपूर्तीची साधने नसून विकासाच्या आधुनिक संकल्पनेप्रमाणे ती देखील एकूण समाजपरिवर्तन व समग्र सामाजिक विकासाचीच संदेशवहन करणारी मोलाची साधनसामग्री आहे. त्यामुळे ही साधने जेवढी प्रबळ, प्रभावी व भरभक्कम पायावर उभी असतील त्याच प्रमाणात ती ज्या समाजाची आहेत त्या समाजातील आपली भूमिका पार पाडू शकतील. त्यांच्या विकासाची जबाबदारी म्हणूनच केवळ ती ज्यांच्या कायदेशीर मालकीची आहेत त्यांचीच तेवढी नसून ज्या समाजाची ती आहेत त्या समाजाचीही आहेच.

त्यांच्या विकासार्थ म्हणूनच आवश्यक ती भरभक्कम तरतूद करण्याचे धोरण शासन, स्थानिक शासन, शासनाच्या स्वायत्त संस्था, स्थानिक स्वराज्य शासन–संस्था यांनी त्वरित न स्वीकारल्यास गुणवत्तेवर आधारित, मूल्यात्मकतेचे जतन करणाऱ्या, अभिरुचीसंपन्न समाजाचे जे स्वप्न नव्या शैक्षणिक धोरणाने साकारावयाचे ठरविलेले आहे त्यास मुळातच सुरुंग लावला जाईल.

हे भान जसे सर्वच पातळ्यांवरील नियोजन करणाऱ्यांनी व निर्णय घेणाऱ्या यंत्रणांनी बाळगायचे आहे तसेच ते 'युगवाणी'सारख्या सर्वच नियतकालिकांचे संपादक, प्रकाशक व संचालकांनीही बाळगणे आवश्यकच आहे. संस्कार, संस्कृती, मानवी मन, अभिरुची, वृत्ती, त्याचे सामूहिकतेत होणारे अवस्थांतर व त्याचा समग्र विकासप्रक्रियेवरील परिणाम या संदर्भात या नियतकालिकांची विकासप्रक्रियेतील भूमिका व स्थान पुरेसे विशद करून या नियतकालिकांच्या विकासार्थ आवश्यक त्या तरतुदी विकासाचे नियोजन करणाऱ्या सर्वच स्तरांवरील यंत्रणांकडून करवून घेण्याची आग्रही भूमिका घेतल्याशिवाय आता खरे तर या नियतकालिकांना पर्यायच नाही. त्याकरिता वाटल्यास अशा नियतकालिकांचे संपादक, प्रकाशक, संचालक यांची सामूहिकरित्या कृती करणारी एखादी आघाडी, यंत्रणा उभारण्याशिवाय 'युगवाणी' व त्यासारख्या इतर नियतकालिकांना तरणोपाय उरलेला नाही. अद्यापही हे अथवा असे काही केले नाही तर हे पुनः कधीच करावे लागणार नाही व या सर्वांचीच 'सत्यकथा' किंवा 'हंस' होण्याची वेळ उपलब्ध मराठी वाङ्मयीन संस्कृतीत फारशी दूरही नाही. संस्कृती मंडळाच्या तुटपुंज्या अनुदानावर अर्धपोटी जीवन जगत जी ही नियतकालिके स्वतःचेच पोषण करू शकत नाहीत ती या समाजाला वाङ्मयीन, सांस्कृतिक दृष्टया कशी काय परिपुष्ट करणार ?

लोकशाही यंत्रणा या देशात नाही म्हणता म्हणता बरीच विकेंद्रित होत गेली आहे. तिचा म्हणावा तसा व तितक्या प्रमाणात लाभ मात्र साहित्य संस्थानी घेतलेला नाही. प्रत्येकच प्रादेशिक साहित्य संस्थांच्या हद्दीत आज विद्यापीठे, जिल्हावार अशा जिल्हा विकास व नियोजन परिषदा, जिल्हा परिषदा, नगरपालिका, नगरपरिषदा अशा स्थानिक स्वराज्य संस्था, महाविद्यालय, शासनाची स्वायत्त मंडळे, महामंडळे व इतर यंत्रणा, ज्यांना आपले अंदाजपत्रक व आर्थिक तरतूद करण्याचे स्वातंत्र्य उपलब्ध आहे, अशा कितीतरी संस्था असतात ! यापैकी प्रादेशिक साहित्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात मोडणाऱ्या जिल्हा विकास व नियोजन परिषदा, नगरपरिषदा, व नगरपालिका, जिल्हा परिषदा व तत्सम यंत्रणा यांच्या अंदाजपत्रकातून त्यांच्या त्यांच्या प्रदेशातील प्रादेशिक साहित्य संस्थांच्या विकासावरील आर्थिक तरतूद करण्याची मागणी या संस्थानीही का करू नये अथवा त्या त्या भागातील जनप्रतिनिधींनीही ती करण्याचे टाळावे याचा अर्थ एक तर या प्रादेशिक साहित्य संस्थांना हे जनप्रतिनिधी सामाजिक विकासाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक मानावयास तयार नसले पाहिजेत असा होतो, किंवा विकास प्रक्रियेतील आपले, आपल्या नियतकालिकांचे व कार्याचे स्थान व महत्त्व त्यांना जाणवून देण्यात या प्रादेशिक साहित्य संस्थांनी कोणतेच प्रयत्न केलेले नसावेत अथवा त्यांना स्वतःलाच ते सुस्पष्ट नसावे असा तरी होतो.

साहित्याकडून, कलेकडून, समाजपरिवर्तनाचे, प्रबोधनाचेही कार्य व्हावे व साहित्य, कला, नाट्य इ. ही त्यांची माध्यमे असावीत याबाबत आज तरी या समाजातील सर्वच प्रवाह–उपप्रवाहाचे दुमत उरलेले नसताना या माध्यमाचे अस्तित्व टिकावे व अधिक समृद्ध व्हावे या करिता प्रादेशिक साहित्य संस्था, कला–चळवळी, त्यांची नियतकालिके यांचे नागरी जीवनातील साऱ्या निमशासकीय, शासकीय, स्थानिक स्वराज्य व सार्वजनिक संस्था काहीच देणे लागत नाहीत काय ?

विदर्भ साहित्य संघाच्या, विदर्भभर पसरलेल्या एकसष्ट शाखा तसेच सर्वच प्रादेशिक साहित्य संस्थांच्या महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेरीलही शाखा ही मराठीला भूषणावह असलेली अशी एक मोठी वाङ्मयीन चळवळ आहे. या चळवळीतील शाखांच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनीही 'युगवाणी' व त्या सारख्या आपआपल्या प्रादेशिक साहित्य संस्थांच्या नियतकालिकांच्या संबंधित समस्या या त्या त्या संपादक; प्रकाशकांचीच तेवढी जबाबदारी समजून ही चळवळ चालणार नाही. अशा नियतकालिकांच्या विकासार्थ त्या भागातील नागरी विकासविषयक नियोजन करणाऱ्या व त्याकरिता अंदाजपत्रकीय तरतुदी करणाऱ्या सर्वच यंत्रणांच्या वार्षिक अंदाजपत्रकात, किमान अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या घटक व संलग्न, प्रादेशिक साहित्य संस्थांच्या नियतकालिकांच्या विकासाकरिता स्थायी निधी उभारण्यावरील खर्चाची तरतूद करवून घेण्याची मागणी सर्वच प्रादेशिक साहित्य संस्था व त्यांच्या गावोगावच्या शाखांनी करावी लागेल. ही तरतूद हे मुळातच खर्च नसून समाजातील अपेक्षित गुणात्मक बदलाकरता केलेली ती 'भांडवली गुंतवणूक' आहे. अशा सर्वच यंत्रणांचे याबाबत प्रबोधन करून अशा तरतुदी करवून घेणे हा वाङ्मयीन युगातील कार्यकर्त्यांच्या कार्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून हे कार्य त्यांना आता तरी स्वीकारावेच लागेल.

मराठीच्या विकासाला बांधील असल्याचा दावा करणाऱ्या सर्वच राजकीय पक्षोपक्षांनी व पुरोगामी शासनाने देखील हे कसे करता येईल या बाबत कळकळ दाखविणे आवश्यक आहे.

मराठीचा झेंडा अटकेपार, जागतिक असा, रोवणाऱ्या राघोबादादांची मराठीला आज जेवढी गरज भासते आहे तेवढीच किंबहुना त्याहूनही काकणभर अधिकच ती इये मराठीचिये नगरी मराठीची

एकविसाव्या शतकाकडे चाललेल्या भारतीय समाजाचे 'माहिती समाजात' झालेले रूपांतर व या देशाला एकविसाव्या शतकात नेऊन सोडणारी पिढी घडविण्याचे व्रत स्वीकारलेल्या नव्या शैक्षणिक धोरणाने मूल्यशिक्षण, गुणवत्तावृद्धी व अभिरुचीसंपन्नता यावर दिलेला भर हे लक्षात घेता, जो नवा समाज घडविण्याचा प्रयत्न या देशात सुरू झालेला आहे त्यात 'युगवाणी' व त्यासारख्या वाङ्मयीन नियतकालिकांची असलेली भूमिका देखील पुरेपूर विशद होणे आवश्यक आहे.

सामाजिक विकास व वाङ्मयीन सांस्कृतिक विकास या संकल्पना एकमेकांपासून वेगवेगळ्या बघितल्या गेल्यास व सामाजिक विकासाच्या संकल्पनेतून वाङ्मयीन–सांस्कृतिक विकास हद्दपार केले गेल्यास सामाजिक जीवन शुष्क, रटाळ, आस्थाविहीन, मूल्यविहीन होऊन कोरडे ठणठणीत पडणार आणि अशा समाजातील आशा, आकांक्षा व महत्त्वाकांक्षांचे असांस्कृतिकतेतच रूपांतर होणार हे गृहीतच आहे. तसे ते होतेच आहे. युगवाणी व त्यासारखी इतर नियतकालिके ही निव्वळ त्या त्या संस्था, त्यांचे प्रकाशक, संपादक, लेखक यांच्या 'बायोडाटात'च भर घालणारी त्यांच्या गरजपूर्तीची साधने नसून विकासाच्या आधुनिक संकल्पनेप्रमाणे ती देखील एकूण समाजपरिवर्तन व समग्र सामाजिक विकासाचीच संदेशवहन करणारी मोलाची साधनसामुग्री आहे. त्यामुळे ही साधने जेवढी प्रबळ, प्रभावी व भरभक्कम पायावर उभी असतील त्याच प्रमाणात ती ज्या समाजाची आहेत त्या समाजातील आपली भूमिका पार पाडू शकतील. त्यांच्या विकासाची जबाबदारी म्हणूनच केवळ ती ज्यांच्या कायदेशीर मालकीची आहेत त्यांचीच तेवढी नसून ज्या समाजाची ती आहेत त्या समाजाचीही आहेच.

त्यांच्या विकासार्थ म्हणूनच आवश्यक ती भरभक्कम तरतूद करण्याचे धोरण शासन, स्थानिक शासन, शासनाच्या स्वायत्त संस्था, स्थानिक स्वराज्य शासन–संस्था यांनी त्वरित न स्वीकारल्यास गुणवत्तेवर आधारित, मूल्यात्मकतेचे जतन करणाऱ्या, अभिरुचीसंपन्न समाजाचे जे स्वप्न नव्या शैक्षणिक धोरणाने साकारावयाचे ठरविलेले आहे त्यास मुळातच सुरुंग लावला जाईल.

हे भान जसे सर्वच पातळ्यांवरील नियोजन करणाऱ्यांनी व निर्णय घेणाऱ्या यंत्रणांनी बाळगायचे आहे तसेच ते 'युगवाणी'सारख्या सर्वच नियतकालिकांचे संपादक, प्रकाशक व संचालकांनीही बाळगणे आवश्यकच आहे. संस्कार, संस्कृती, मानवी मन, अभिरुची, वृत्ती, त्याचे सामूहिकतेत होणारे अवस्थांतर व त्याचा समग्र विकासप्रक्रियेवरील परिणाम या संदर्भात या नियतकालिकांची विकासप्रक्रियेतील भूमिका व स्थान पुरेसे विशद करून या नियतकालिकांच्या विकासार्थ आवश्यक त्या तरतुदी विकासाचे नियोजन करणाऱ्या सर्वच स्तरांवरील यंत्रणांकडून करवून घेण्याची आग्रही भूमिका घेतल्याशिवाय आता खरे तर या नियतकालिकांना पर्यायच नाही. त्याकरिता वाटल्यास अशा नियतकालिकांचे संपादक, प्रकाशक, संचालक यांची सामूहिकरित्या कृती करणारी एखादी आघाडी, यंत्रणा उभारण्याशिवाय 'युगवाणी' व त्यासारख्या इतर नियतकालिकांना तरणोपाय उरलेला नाही. अद्यापही हे अथवा असे काही केले नाही तर हे पुनः कधीच करावे लागणार नाही व या सर्वांचीच 'सत्यकथा' किंवा 'हंस' होण्याची वेळ उपलब्ध मराठी वाङ्मयीन संस्कृतीत फारशी दूरही नाही. संस्कृती मंडळाच्या तुटपुंज्या अनुदानावर अर्धपोटी जीवन जगत जी ही नियतकालिके स्वतःचेच पोषण करू शकत नाहीत ती या समाजाला वाङ्मयीन; सांस्कृतिक दृष्टचा कशी काय परिपुष्ट करणार ?

लोकशाही यंत्रणा या देशात नाही म्हणता म्हणता बरीच विकेंद्रित होत गेली आहे. तिचा म्हणावा तसा व तितक्या प्रमाणात लाभ मात्र साहित्य संस्थांनी घेतलेला नाही. प्रत्येकच प्रादेशिक साहित्य संस्थांच्या हद्दीत आज विद्यापीठे, जिल्हावार अशा जिल्हा विकास व नियोजन परिषदा, जिल्हा परिषदा, नगरपालिका, नगरपरिषदा अशा स्थानिक स्वराज्य संस्था, महाविद्यालय, शासनाची स्वायत्त मंडळे, महामंडळे व इतर यंत्रणा, ज्यांना आपले अंदाजपत्रक व आर्थिक तरतूद करण्याचे स्वातंत्र्य उपलब्ध आहे, अशा कितीतरी संस्था असतात ! यापैकी प्रादेशिक साहित्य संस्थांच्या कार्य-क्षेत्रात मोडणाऱ्या जिल्हा विकास व नियोजन परिषदा, नगरपरिषदा, व नगरपालिका, जिल्हा परिषदा व तत्सम यंत्रणा यांच्या अंदाजपत्रकातून त्यांच्या त्यांच्या प्रदेशातील प्रादेशिक साहित्य संस्थांच्या विकासावरील आर्थिक तरतूद करण्याची मागणी या संस्थानीही कां करू नये ? अथवा त्या त्या भागातील जनप्रतिनिधींनीही ती करण्याचे टाळावे याचा अर्थ एक तर या प्रादेशिक साहित्य संस्थांना हे जनप्रतिनिधी सामाजिक विकासाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक मानावयास तयार नसले पाहिजेत असा होतो, किंवा विकास प्रक्रियेतील आपले, आपल्या नियतकालिकांचे व कार्याचे स्थान व महत्त्व त्यांना जाणवून देण्यात या प्रादेशिक साहित्य संस्थांनी कोणतेच प्रयत्न केलेले नसावेत अथवा त्यांना स्वतःलाच ते सुस्पष्ट नसावे असा तरी होतो.

साहित्याकडून, कलेकडून, समाजपरिवर्तनाचे, प्रबोधनाचेही कार्य व्हावे व साहित्य, कला, नाट्य इ. ही त्यांची माध्यमे असावीत याबाबत आज तरी या समाजातील सर्वच प्रवाह–उपप्रवाहांचे दुमत उरलेले नसताना या माध्यमाचे अस्तित्व टिकावे व अधिक समृद्ध व्हावे या करिता प्रादेशिक साहित्य संस्था, कला–चळवळी, त्यांची नियतकालिके यांचे नागरी जीवनातील साऱ्या निमशासकीय, शासकीय, स्थानिक स्वराज्य व सार्वजनिक संस्था काहीच देणे लागत नाहीत काय ?

विदर्भ साहित्य संघाच्या, विदर्भभर पसरलेल्या एकसष्ट शाखा तसेच सर्वच प्रादेशिक साहित्य संस्थांच्या महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेरीलही शाखा ही मराठीला भूषणावह असलेली अशी एक मोठी वाङ्मयीन चळवळ आहे. या चळवळीतील शाखांच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनीही 'युगवाणी' व त्या सारख्या आपआपल्या प्रादेशिक साहित्य संस्थांच्या नियतकालिकांच्या संबंधित समस्या या त्या त्या संपादक; प्रकाशकांचीच तेवढी जबाबदारी समजून ही चळवळ चालणार नाही. अशा नियतकालिकांच्या विकासार्थ त्या भागातील नागरी विकासविषयक नियोजन करणाऱ्या व त्याकरिता अंदाजपत्रकीय तरतुदी करणाऱ्या सर्वच यंत्रणांच्या वार्षिक अंदाजपत्रकात, किमान अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या घटक व संलग्न, प्रादेशिक साहित्य संस्थांच्या नियतकालिकांच्या विकासाकरिता स्थायी निधी उभारण्यावरील खर्चाची तरतूद करवून घेण्याची मागणी सर्वच प्रादेशिक साहित्य संस्था व त्यांच्या गावोगावच्या शाखांनी करावी लागेल. ही तरतूद हे मुळातच खर्च नसून समाजातील अपेक्षित गुणात्मक बदलाकरता केलेली ती 'भांडवली गुंतवणूक' आहे. अशा सर्वच यंत्रणांचे याबाबत प्रबोधन करून अशा तरतुदी करवून घेणे हा वाङ्मयीन युगातील कार्यकर्त्यांच्या कार्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून हे कार्य त्यांना आता तरी स्वीकारावेच लागेल.

मराठीच्या विकासाला बांधील असल्याचा दावा करणाऱ्या सर्वच राजकीय पक्षोपक्षांनी व पुरोगामी शासनाने देखील हे कसे करता येईल या बाबत कळकळ दाखविणे आवश्यक आहे.

मराठीचा झेंडा अटकेपार, जागतिक असा, रोवणाऱ्या राघोबादादांची मराठीला आज जेवढी गरज भासते आहे तेवढीच किंबहुना त्याहूनही काकणभर अधिकच ती इये मराठीचिये नगरी मराठीची

काळजी वाहाणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले आणि विष्णुशास्त्री चिपळुणकरांची देखील आहे, तितकीच ती मराठीच्या जागतिकतेच्या विचाराच्या अगोदर तिच्या स्थानिकतेची होणारी गळचेपी व दुर्दशा थांबवून स्वतःच्या घरचीच तिची विटंबना व अवहेलना अगोदर संपुष्टात आणा असे अकोल्याच्या साहित्य संमेलनात ठणकावून सांगून गेलेल्या गं. बा. सरदारांची आहे, मराठीचा आग्रही पुरस्कार करणाऱ्या वीर सावरकरांची आहे, डॉ. वि. भि. कोलत्यांचीही आहे, याचे मराठीच्या जागतिकतेच्या धुमधडाक्यात विस्मरण होऊ नये.

या लेखात मांडलेल्या बाबींच्या अनुषंगाने विचार जागतिक परिषदांमधून होणे अशक्यच. त्या स्थानिक बाबी असल्याने त्याकरता स्थानिकच परिषदांची गरज आहे.

'युगवाणी' व तत्सम नियतकालिकांच्या विकासार्थ त्यामुळेच एक 'नियतकालिक विकास परिषद' स्थापून, त्यात सर्व संबंधितांना उचित सहभाग देऊन, त्यांच्या समस्यांकडे गंभीरपणे व अभ्यासपूर्वक बघता येणे व त्यावर आधारित उपाययोजनांची अंमलबजावणीही इच्छा असल्यास करता येणे महाराष्ट्रासारख्या प्रागतिक राज्यातील शासन, नेतृत्व व समाजधुरीणांना फारसे कठीण व अशक्य नाही.

मात्र जगण्याचा हा संघर्ष या नियतकालिकांनी स्वीकारण्यापेक्षा स्वेच्छा मरण पत्करलेले बरे असा सिद्धान्त जर कुणी मांडणार असेल तर पुनः प्रश्न अलाहिदा. जी जी यंत्रणा असे विकाससहाय्य उपलब्ध करून देईल तिच्या असे सहाय्य करण्याच्या नियम अटीतच जणू आपण त्या यंत्रणेचे, धोरणांचे मिंधे व्हावे असे कलम असल्यासारखे ते सहाय्य स्वीकारले की आपण मिंधे झालो किंवा होतोच असा सिद्धांत मांडणारा वर्गही आपल्यात आहे.

ही मानसिकता 'शासन' म्हणजे लोकशाही यंत्रणा नसून एखादी 'व्यक्ती' किंवा 'व्यक्ती-समूह', 'पक्ष' वा 'गट' यांचे स्वगृह असल्यासारखे गृहीत धरून व्यवहार साधणारी मानसिकता आहे.

मिंधे होणे ही ज्यांची विशिष्ट वेळेची वैयक्तिक गरज असते त्या त्या वेळी ते ते स्वतःच स्वतःला मिंधे करवून घेत असतातच. त्याकरता सहाय्य करणाऱ्यांचेच मिंधे असण्याची गरज नसते. तसे न होता त्यावद्दलची आवश्यक ती 'किंमत मोजण्याचे' धोरण स्वीकारल्यास मिंधेपण टाळता येते. परंतु ते टाळण्यापेक्षा स्वीकारणे हाच मुळी धोरणाचा भाग झालेला असतो. परकीय पैशांवर मराठीच्या विकासाच्या चळवळी चालविणे हे देखील अशा स्वकीय यंत्रणांचे सहकार्य मिळविण्यापेक्षा अनेकदा सोपे व प्रतिष्ठेचे समजल्या जात असल्याने तो पर्याय स्वीकारण्यात आपल्याला काहीच गैर वाटत नाही. स्वकीयांच्या प्रबोधनात वेळ घालवून आयुष्य वेचण्यापेक्षा सहज, सुलभ व प्रतिष्ठेची समजल्या जाऊ शकणारी परकीय मदत स्वीकारून जीवन समृद्ध करण्याचा शहाणपणा सुचण्याच्या कालखंडात आपलाही भाषिक समाज वावरतो आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर वाढती अभिरुचीशून्यता व भ्रामक समृद्धीच्या संकल्पनेपोटी सांस्कृतिक-दृष्ट्या विकसित होण्याऐवजी मागासलेले होत जाण्याची अवस्था ही विस्तार पावण्याच्याच शक्यतेत उभी ठाकलेली आहे. सामाजिक विकास व सामाजिक परिवर्तन ही मुळातच सामूहिक पातळीवरील प्रक्रिया नव्हे. अथवा समाजातील इतस्ततः पडलेले दगड, विटा, माती, सिमेंट, लोखंड एकत्रित करून उभारलेल्या गोंडस इमारतीत माणसांना कोंबण्यात, वाढणाऱ्या वेतनांच्या श्रेणीत किंवा प्रेक्षकाच्या भूमिकेतून बघितलेल्या प्रगतीच्या सरकणाऱ्या चित्रांतील कर्तृत्वावरही ते मोजले जात नसते.

तर त्यामागील व्यक्तींच्या मनांची जडणघडण व तिच्या गुणात्मक दर्जावरच ते व त्याचा दर्जा अवलंबून असतो. 'युगवाणी' व तत्सम इतर नियतकालिके ही या परिवर्तनाच्या विकासाच्या मागे असणाऱ्या व्यक्तींच्या मनाचे गुणात्मक व्यवस्थापन करणारी संवादसाधने असल्याने ही साधने किती आहेत यापेक्षा जी आहेत ती कशी व कोणत्या अवस्थेत आहेत यावरच त्या त्या समाजाचा गुणात्मक सामाजिक विकास व परिवर्तनाचा गुणात्मक दर्जा कसा व कशा प्रकारचा आहे हे ठरत असते. त्या त्या समाजात असणारे विचारवंतांचे, कलावंतांचे, साहित्यिकांचे, अस्तित्वमूल्यही त्यावरूनच प्रकट होते.

ते तसे प्रकट होत रहावे व या साधनांना एकूणच विकासप्रक्रियेत असणारा त्यांचा वाटा सुयोग्यपणे उचलता यावा याकरिता मराठी भाषिक समाजाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये असलेली 'युगवाणी' व इतर प्रादेशिक साहित्य संस्थांची नियतकालिके व तत्सम इतर नियतकालिके 'जगविणे' व ती आपल्या जगण्याचीच व अस्तित्वाचीच तेवढी धडपड करण्यात गुंतून पडणार नाहीत याची स्थायी स्वरूपाची काळजी घेणे ही मराठीभाषिक समाजाची, त्याच्या वतीने मराठी शासनाची, सर्व स्तरावरील विकास व नियोजन यंत्रणांची व त्या त्या प्रदेशातील जनप्रतिनिधींची अग्रक्रमाची जबाबदारी समजल्या जाणे आवश्यक आहे. तशी ती समजून घेण्याचे मनावर घेतले गेल्यास व तत्संबंधी धोरणात्मक असे काही निर्णय घेतले गेल्यास पुढचे काम फारसे कठीण नाही.

महाराष्ट्राला सध्या स्व. यशवंतराव चव्हाणांच्या अभिरुचीसंपन्न संस्कृतीत वाढलेले मा. शरद पवारांसारखे मराठीप्रेमी व मराठीविकासक असे मुख्यमंत्री व त्याच संस्कृतीचे मा. सुशीलकुमार शिंदे यांच्यासारखे वाङ्मय–कलाप्रेमी अर्थमंत्री लाभलेले आहेत.

प्रादेशिक साहित्य संस्थांच्या नियतकालिकांच्या विकासार्थ पुढाकार घेऊन त्यांच्या नियतकालिकाच्या सध्याच्या असलेल्या वार्षिक खर्चाची तरतूद होऊ शकेल इतके व्याज देणाऱ्या रकमेचा स्थायी निधी महाराष्ट्रातील प्रादेशिक साहित्य संस्था व महाराष्ट्राबाहेरील अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या संलग्न संस्थाना उपलब्ध करवून देता येणे फक्त या मंत्रीद्वयांनी देखील मनावर घेतल्यास सहज शक्य आहे. महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अशा सर्व प्रादेशिक साहित्य संस्थांना मिळून लागणारी ही तरतूद मुख्यमंत्री निधीतूनही सहज करता येऊ शकते. सारे मिळून जेमतेम पन्नास लाख रुपयाची रकम हा स्थायी निधी तयार करण्यास लागेल.

'युगवाणी'सारख्या नियतकालिकांचा वार्षिक उत्पादन खर्च लेखकांना मानधन न देताही आज सुमारे सव्वा लाख रुपयाच्या घरात जात असतो या सव्वा लाख रुपयाच्या खर्चामागे संस्कृती मंडळाचे (कालपर्यंतचे दहा व आता) बारा हजाराचे तुटपुंजे अनुदान या अवाढव्य खर्चाने फाटणाऱ्या आभाळाला कुठे कुठे ठिगळ लावू शकणार आहे?

युगवाणी, प्रतिष्ठान, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पंचधारा यासारख्या प्रादेशिक साहित्य संस्थांच्या नियतकालिकाच्या विकासार्थ प्रत्येकी दहा ते पंधरा लाख रुपयांची मुख्यमंत्र्याच्या निधीतून या नियतकालिकांचा स्थायी निधी उभारण्याकरिता तरतूद करता आल्यास या नियतकालिकांना त्याचे व्याजावरच आपल्या नियमित प्रकाशित होण्याबाबतची असलेली प्राथमिक विवंचना दूर सारण्यास मदत होईल, मराठीच्या विकासार्थ स्थायी स्वरूपाचे एक मोलाचे कार्य पार पाडल्याचे समाधानही उपभोगता येईल; व या नियतकालिकांची एका दुष्टचक्रातून सोडवणूकच नव्हे तर त्यांचे संभाव्य अपमृत्यू टाळता येऊन मराठी वाङ्मयीन संस्कृतीचा संभवणारा ऱ्हासही वेळीच थोपविता येईल.

वाङ्मय, वाङ्मयीन व्यक्तित्त्व, निर्मिती, सौंदर्य, भाषा, साहित्य, संस्कृती, कलाविषयक प्रश्न, कलेतील वाद, संशोधन, अध्ययन-अध्यापन, आकलन, आस्वाद, इ. साऱ्यांचीच संपादकीय चर्चा त्यामुळे यानंतरही यथास्थित करता येईलच. प्रथम अग्रक्रमाने असलेली समस्या ही मराठी नियतकालिकांचे एकापाठोपाठ एक होत चाललेले अपमृत्यु, त्यांची अनियमितता, व त्यातून उद्भवणाऱ्या पुढील समस्या आणि 'युगवाणी'लाही संभवू शकणारा त्यांचा संसर्ग टाळण्याची आहे.

या पार्श्वभूमीवर 'युगवाणी'च्या संपादनाची जबाबदारी ज्या विश्वासाने माझ्यासारख्या पोरसवदा संपादकावर सोपविण्यात आली आहे तो विश्वास अधिक दृढ करणारे युगवाणीचे या कार्यकाळातील अस्तित्व युगवाणीचे प्रबंध संपादक, हितचिंतक, लेखक परिवार, वाचक, वर्गणीदार, प्रकाशक, मुद्रक जाहिरातदार, कार्यालयीन कर्मचारी व मित्र आणि इतर सहकारी आणि संभाव्य संपादक मंडळ व विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष, पदाधिकारी तसेच कार्यकारिणीचे सदस्य यांचे सहकार्य, मार्गदर्शन, सल्ला व सूचना यांच्या आधारावरच साकारता येणार आहे.

श्रीपाद भालचंद्र जोशी

रायनर मारिया रिल्के

६७ सालची गोष्ट आहे

तू उतरला स्वर्गातून माझ्या डहाळीवर गरुडासारखा
सोवत एक कोदंडधारी आणि चार यक्ष
आणि मी जणु सोबत बसलेला एक चिमणा
तूं जोपासत राहिलास तुझा आशयसंपन्न एकांत
गेला नंतर उडून अथांग अंतराळात स्थळकाळमुक्त
एक " पवित्र ताटातूट " आपुल्यास उगवून......
ताटातुटीने या मी अधिकच निकट येत गेलो
तुझ्या लेखणीच्या छायेत वावरतांना
केली जवळीक तुझ्या शब्दब्रह्माशी
नंतर अपभ्रंश केले मी तुझ्या स्वर्गीय कवितांचे
आता मांडतो हिशेब नंतरच्या काळाचा......
डिकन्सचे बोट धरून हळूच लंडनच्या
धुक्यात मारला एक फेरफटका जीव मुठीत घेऊन
बॅल्झॅकच्या पुतळ्याचे हात भंगून
त्याला पूर्णत्वाला नेणारा मनस्वी रोंदा पाहिला
साधी पण चित्तवेधक मोझार्टची " वसंततद्रा "
परिपक्व भरघोस दु:ख गाणारा मेहदी हसन
आणि दु:खाविषयी गाणारा आनंदवर्धक गुलामअली ऐकले
आपल्या पदविन्यासात हृदयाची स्पंदने
कुरवाळणारी सुगंधी नर्तकी पाहिली
भोगले सर्व काही उन्मनात उकळताना
स्वत:च्या " रक्त " चंदनात निर्धास्त......
मी आता एक पांथस्थ म्हणून तुझे स्मरण करतो
वाचतो तुझ्या समाधीवरील आशयाने झुकलेले शब्द
" गुलाब, ओहो निखालस विसंगता आनंद
कोणाचीच झोप नसलेल्या इतक्या पापण्यांच्या तळी "......
बुक ऑफ अवर्सपासून शेवटच्या न लिहिलेल्या कवितेपर्यंत
भळभळतो जखम भोगणाऱ्या तुझ्या उत्तुंग प्रतिमेला मी नमस्कारतो
कारण की मधुर यातनेला शब्दातून पारखून घेणारा
तू ईश्वराचा आणि मरणाचा शेवटचा प्रकाशमय राजदूत !

मनोहर
चिंतामणि
वझे

अनुक्रमणिका

हळूच कोणीतरी कुजबुजले. साहित्य आणि कलेला आता विचारतोय् कोण ! वीस वर्षां-आधी एका (मागसच्या) साहित्य मेळाव्यात ही चिंता व्यक्त केलो गेली होती, की वाचकवृद्धीचे काय ? नाही म्हणायला फडके, खांडेकर, अत्रे यांच्या काळात वाचकवर्ग मोठा होता. सामान्य माणूस मासिक घेत होता. वाचत होता. प्रत्येक मराठी घरात एखादा दिवाळी अंक तरी दिसायचाच. वृद्ध, तरुण, स्त्रिया हे सकस साहित्य वाचायच्या. त्या काळात माणसामाणसातील संबंधात संवेदनशीलता, आस्था आणि आतिथ्य प्रकर्षाने दिसून येत होते. आता स्टॉलवर बघतो, तो साहित्यविषयक प्रकाशने दिसतच नाहीत. किर्लोस्कर, स्त्री, मनोहर ही तशी व्यापाऱ्याची मासिके असूनही त्यांना साहित्याचा वारसा होता. आता तर त्याचेही "किस्त्रीम" सँडविच झालेले आहे. किर्लोस्कर कंपनीची मासिके सुद्धा आता साहित्यापेक्षा बाजारू उद्दिष्टे गाठायला लागलो आहेत. काही संस्था, काही तीनचार प्राध्यापक मंडळी, रडत-पडत मासिक तरु सोडाच द्वैमासिक, त्रैमासिक, वार्षिक साहित्यप्रेमापोटी काढत असते. आणि त्यांचा वाचकवर्ग म्हणजे जेमतेम युनिव्हर्सिटीत साहित्य, भाषा हे विषय शिकणारे-शिकवणारे, काही लेखक, आणि साहित्यात आपलीही दखल घ्यावी असे वाटणारे, यांच्याच घरात ही प्रकाशने वावरत असतात. वाचल्याही जातात.

नव्या पिढीच्या, तरुण ऊर्जेच्या, जीवनाला वळण देणाऱ्या साहसी हेतूने परंतु कमकुवत पडल्याने 'लिटिल मॅगझीन'चा लाट आली आणि गेली. कानोसा घेऊनही आता कुठे त्याबावत-काही ऐकायला येत नाही. सत्यकथा, हंस सारखी साहित्यविषयक मासिके बंद पडली. अनेक मासि-कांनी वाजारबसव्यांचे रूप धारण केलेलं आहे. भोग, बलात्कार, रहस्य, भय, क्रूर, थरथराट, हिंसात्मक, राजकीय डावपेचांचे, खेळांचे आणि स्त्री देह सजावटीचे अशा विषयांवरील प्रकाशने स्टॉलवर दिसतात. तेथे चांगला गुळगुळीत कागद, चांगली छपाई व स्त्री-देहाचे प्रदर्शनाचा मसाला असतो पण साहित्य नसते. ही मासिके न्हाव्याच्या दुकानात किंवा श्रीमंतांच्या दिवाणखान्यातील मेजावर दिसतात. शुभंकरोती वळणाच्या घराघरात लपून नव्हे तर उघडउघड कामुक मासिके आज वाचल्या जातात. लैंगिक ज्ञान वाईट नाही, परंतु स्वस्त कामोत्तेजना करणारी आणि लैंगिक अपराध घडविण्यास प्रवृत्त करणाऱ्या मासिकांचा तर पूरच आलेला आहे. गर्द, गांजा, अफीम, दारू यांच्या सारखाच या मासिकांचा सुळसुळाट झालेला आहे. स्टेजवर सुद्धा काम-प्रधान नाटकांचा पूर आला आणि गेला; तसा चालूही आहे.

जीवनातून साहित्यच संपले आहे की काय याची चिंता वाटत असताना दैनिक वर्तमान-पत्रांच्या रविवारीय अंकात काही लोकांकरता विरंगुळा म्हणून साहित्य डोकावते. पाहता पाहता ही दैनिके जी लोकांसाठी होती, ती आता त्यांच्या मालक घराण्याच्या राजकारणासाठी आणि सत्ता हपापण्यासाठी चाललेली आहेत. याही क्षेत्रात साहित्य पळूनच चाललेले आहे. हिंदीत तर ठेके-दारीवर चाललेल्या कवी संमेलनांमधून साहित्या-पेक्षा छचोर भावभावनांचे उद्दीपन करणारे काहीतरी चाललेले असते. खिशात पैसे असलेल्यांचे ते त्यांना गुदगुल्या करणारे मनोरंजन असते; नाही म्हणायला तोंडी लावायला असावे इतके साहित्य त्यात डोकावून जातेच. कलेचीही तीच परिस्थिती आहे. तीन वर्षाआधी दिल्लीच्या एका अखिल भारतीय चित्रकला प्रदर्श-नाला एका आठवड्यात परीक्षक धरून फक्त २९ लोकांनीच भेट दिली होती. स्टेजवर देह प्रदर्शन करणारा उत्तेजक ध्वनीच्या गडागडाटातील 'ऑर्केस्ट्रा' सुरू आहे, नृत्यकला तर नृत्याचा फक्त इतिहासच जोपासते आहे, देहाचे निरीक्षण करता यावे असे कॅबरे, महानगरात आणि नगरात, शहरात, गावात सुद्धा पसरले आहेत.

ललित साहित्याने किंवा पांढरपेशा साहित्याने घरे, आंगण, प्रेम, निराशा, माहेर अशा विषयांना स्पर्श करत स्त्री-मुक्तीच्या व तत्सम विविध अंगांची चाहूल घेत, जीवनातील दारिद्र्याचा वापर, साहित्यात, ओरबडून टाकण्यापेक्षा स्वस्त भावनांच्या उद्दीपनासाठी केला. हे नाही म्हणायला वाईट नाही. दलित साहित्याचा जन्म होऊन त्याने उंच झेप घेतली, मात्र आक्रो-

शाच्या ऐतिहासिक पातळीवर ते स्थगित झालेले आहे. स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेला दलित आज किमान चाळीस–बेचाळीस वर्षांचा आहे. ऐतिहासिक दारिद्र्याचा त्यांना स्पर्शच नसल्यामुळे त्याचे क्रंदनही वेगडी वाटते. कारण अनुभवजन्यता नाही. परंतु साहित्यिक गत्यात्मकता म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्षही होत नाही. काही वेळ वाटून गेलं की दलित साहित्य साहित्याचं इंजिन ठरेल.

हे काय चाललेलं आहे ! कला आणि साहित्यामुळे मानवामानवातील मृदुसंवेदनशीलता संपल्याचं तर हे लक्षण नाही ! खरे आहे ! आज माणसाचा केंद्रबिंदू पैसा झालेला आहे. मैत्रीतही पैशाची बीजगणिते असतात. विवाह जुळवणुकीतही धन आणि इस्टेट याच बाबी केंद्रस्थानी आहेत. नवराबायकोमध्ये असणाऱ्या प्रेम–संबंधाचे धागे आता पैशात अडकलेले दिसतात. कुठल्यातरी षडयंत्रात आम्ही सारेच सापडलेलो आहोत. भरकटल्या जात आहोत. जे नको ते आमच्यावर साहित्य म्हणून लादल्या जाते. जे नको त्या बाबींचा साहित्य आणि कलेच्या नावाखाली केवळ रुचीपालट नाही तर रंजनाचीही एक विकृत सवय लागत आहे. एवढ्या लोकसंख्येचा देश कला आणि साहित्याकडे पाठ कशी फिरवेल. जनजीवनात सार्थक आंदोलने नसल्यामुळे कला आणि साहित्यासाठी आंदोलने स्थगित झालेली आहे. आणि त्याच त्या पणाचा उबग नाहीसा करण्यासाठी विदेशातील साहित्य आणि कलेच्या वेगडी आंदोलनांची उभारणी काही लोकांनी करून पाहिली. ते तर बुडबुड्यांचं जीवन ठरले. देशातल्या आणि मराठी साहित्यही, वाचणाऱ्यांना झोप कशी येते याचे नवल आहे ! कोणीतरी सामान्य जनतेला वेंडव्यात कोंडून ठेवलेले आहे. ‘तरुण’ हा शब्द जरा प्रतिष्ठित वाटतो म्हणून ‘वेंडवा’ म्हटलेले आहे. श्वास गुदमरतो आहे. २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर सुद्धा २० व्या शतकाचा शेवट कसा होईल याचंही स्वप्न तरळल्या जात नाही. याचा शोध कुठे घ्यायचा ? इतिहास आणि राजकारणाकडे डोकावून पाह्यला नको ?

साहित्याची गोष्ट

: भाऊ समर्थ

माणसाच्या प्रत्येक श्वास–उच्छ्वासाचा संबंध राजकारणाशी आहे. राजकारण आणि जीवन यांची फारकत कधीच होत नसते. बाकीचं सगळं बोला पण राजकारण सांगू नका ही टूम सुद्धा एक राजकारणच आहे.

ब्रिटिशाचं शासन होते; साम्राज्यवाद नांदला होता, जागीरदाऱ्या, सामंतवाड्या, मालगुजारी घराणीवाद हे त्यांत समाविष्ट होतेच. इतिहासातल्या घटनांची लय प्रकृती धरून चालत असते. हे संपणारच होतं. भगतसिंग, सुभाषचंद्र बोस, लोहिया, आंबेडकर, सावरकर ही संघर्षशील रेषा, गांधी–नेहरू चळवळ ही दुसरी रेषा, स्थित्यंतरासाठी लढल्यात. इंग्रज तसाच निघून गेला. पदरात पडलं त्याला स्वातंत्र्य म्हटलं. भारतीय पुंजीवादाचा बोका ब्रिटीशांच्या हातातलं लोणी पटकवायला तयारच होता. अन् तो त्यांनी पटकावला. भारतीय पुंजीवादानीच नेते दिलेत. साम्राज्यवादाच्या नोकरशाहीत काही फरक झाला नाही. ते तसेच पुंजीवाद वाहून न्यायला मदत करता आहेत. पुंजीवादी आणि शासक वर्गाच्या हिताचे रक्षण करणारे विद्वान ख्यातनाम होऊन गेलेत आणि सामान्यजनाच्या हिताचा विचार करणारे चिखलात दडपल्या गेले. ४२ वर्षाचे स्वातंत्र्य भारतातल्या शेवटच्या नागरिकाला प्यायचे शुद्ध निर्जंतुक पाणी सुद्धा देऊ शकत नाही.

दोन: तीन: पाच या प्रमाणाचा विस्तार वीस: तीस : पन्नास, प्रमाण तेच. दहा पटीने विकास झाल्याचा भ्रम सादर करतात. भारतातल्या दोन कोटी लोकांनाच स्वातंत्र्याची मधुर फळे मिळतात.

खऱ्या अर्थाने भारताचे दोन कोटीच नागरिक बाकीच्यांना प्राण्यागत लेखल्या जाते. या दोन कोटी लोकांसाठी रंजन, कला, साहित्य आणि दोन कोटी लोकांना त्रास होणार नाही असे भ्रमजाल निर्माण करणारे काही घडवता येणे असं साहित्य साहित्याच्या सिंहासनावर या पुंजीवादी संस्कृतीचे रक्षक संपादक म्हणून बसले आहेत.

प्रकृती स्थिर नाही. तिच्यात सतत बदल होत असतात, साहित्य आणि कलेबद्दल आज वाटणारी निराशेची स्थिती हे कायम सत्य नव्हे. राजकारण असो नाहीतर साहित्यकला असो. प्रकृती नव युवाचेतनेच्या माध्यमाने प्रगती करत संस्कृतीची वाटचाल करते. या युवा चेतनेला भ्रमित करण्याचे सारे उपाय योजल्या जातात. काही झाले तरी इतिहासातील घटनांच्या द्वंद्वात्मक भावात भेसळ होत नसते. महात्मा गांधी खेड्यात चला म्हणून आमच्या गतकालीन जीवनाची लोभस आठवण करून देत होते. तर दलितांनो खेड्यात नको शहरात चला म्हणणारे डॉ. आंबेडकर हे जास्त शास्त्रीय अग्रणी ठरत होते. गांधीची वैष्णव-भक्ती, उदारवाद, आमच्याकडील, ब्रह्मसमाज, आर्यसमाज, थिआसॉफिकल समाज, विवेकानंद अरविंद, रविंद्रनाथ ठाकूर आणि महात्मा गांधी सुद्धा जुन्याचंच नवजागरण करू इच्छित होते. पुर्नस्थापनावादातून जुन्याला नवा उजाळा देण्याचे कार्य ते करू इच्छित होते. विज्ञान, तंत्र, आणि अण्वस्त्र निर्मितीच्या माध्यमाने जागतिक संस्कृती गतिशील झाली होती. जगात मजूरांची राज्य आलीत, तर एकीकडे महायुद्धाच्या भयानकतेने आत्मघाती हिप्पीवादही आणला. नशा, निराशा आणि मृत्यू-वादाची सवय सुद्धा पश्चिमेकडल्या लोकांना तिथल्या भांडवलदारी शासनं सत्तेने लावली. कारण युवा चेतनेने सत्तेचे हरण करू नये म्हणून. आमच्याकडे असा विचार झालाच नाही असे नाही. सिनेमाने घेतलेले वळण आणि टी. व्ही. वर नशेची ओळख करून देणारी सिरीज पहा. हा तर नशावादाचाच प्रचार आहे. तर दुसरीकडे समाजवादाची राष्ट्रे निर्माण झाली पृथ्वीमध्ये अशी दोन तट पडलेली आहेत. आम्ही ती दोन तट कायम ठेवली. महात्मा गांधींनी पुंजीपतींना ट्रस्टी बनवले आणि बाकीच्यांना दरिद्रीनारायण. गांधीवादाला विरोध करणाऱ्या लोकांनीच पुढे एक गांधीवादी समाजवाद काढला. नाही म्हटलं तरी भारताचा नवा युवक शासन कर्त्यांच्या षडयंत्राला हूल देऊन विचार करू लागला आहे. शास्त्रीय विचार करू लागला आहे. अंधविश्वासाला लाथ मारू लागला आहे. धर्माचे आचरण करणारे कमीच. कारण अंधविश्वासाला गेलेला तडा.आणि विषमतेच्या पायावर उभी असलेली लोकशाही श्रेष्ठ वर्णीयांनाच मधुर फळे देत असते. हे सिद्ध झालेले आहे. भारतात समाजवाद फक्त घोषणा आहे. व्यवस्थेच्या रूपांतरणाची कुठेही चाहूल दिसत नाही. प्रेक्षागारात भारतीय जनता आहे तर नाट्यमंचावर विविध पक्षांचे नेते पात्र बनून भांडवलशाहीच्या दिग्दर्शनाखाली नाट्य निर्माण करत आहेत. धर्मनिरपेक्षता; नुसती लोकशाही, नुसता समाजवाद अलग अलग बोलून वेगवेगळ्या भागात यांची आंदोलनें केली तर वर्गवादाला फळे देतात. पण हीच आंदोलने एका साखळीत गुंफून केली तर ती जनहिताच्या सार्थकी जातात. शास्त्रीयतेने नागरिक जागरूक करण्याच्या इराद्याने कला आणि साहित्याच्या पुजाऱ्यांनी साधना केली. तर जनहिताच्या चळवळी उभ्या राहतील. आणि ७५ कोटी भारतीय जनतेला खरं स्वातंत्र्य लाभण्यासाठी कला आणि साहित्य मदत करतील येवढा ध्येयवाद तूर्त मला दिसतो आहे. संस्कृती शासनकर्त्यांच्या खांद्यावर चालत नसते. अपना उत्सव ऐतिहासिक परंपरेचा उजाळा आहे. ते नवजागरण नव्हे. तो शासन करतो. कलावंत साहित्यिकांपुढे आजच्या इतके असे सारे प्रश्न आणि समस्या कधीच नव्हत्या. खरा साहित्यिक आणि कलावंत ठरविण्यासाठी हे पोषक आहे. राजकीय संस्था, राजकीय नेते, धर्मनेते यांच्यावरील जनतेचा विश्वास उडत चालला आहे. तेव्हा खरे शास्त्रज्ञ साहित्यिक आणि कलावंत यांच्याकडे सामान्यजनता आस लावून उभी आहे. काल्पनिक अनुभवापेक्षा, मोहवादापेक्षा, अनुभवाची शास्त्रीय मांडणी नव

साहित्याला जन्म देऊ पाहत आहे. अण्वस्त्राच्या स्फोटासारखे एकदम साहित्य नवउजाळा घेईल असाही मी आशावादी आहे. तर आता साहित्यिकांनी लेखण्या उंचावल्याच पाहिजेत. ■

टेकडी लाईन, सीतावर्डी
नागपूर, ४४००१२

' युगवाणी ' मिळत नाही !

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्त्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही बरेच अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. आपणाकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या तीन महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, **प्रथम** आपल्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा—लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- **अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.**
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया काळजी घ्यावी. शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा. संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- आपली वर्गणी संपलेली नाही ना ? आपले नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या नोंदीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद / वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

चोरघडे, प्रा. वामन कृष्ण : एक आलेख

जन्म : १६·७·१९१४ नरखेड (विदर्भ) एम ए. (मराठी) एम. ए. (अर्थशास्त्र) बी. टी. काही काळ वर्धा येथील महाविद्यालयात अध्यापन आणि नागपूर येथील जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड इकॉनॉमिक्स येथे अध्यापन व उपप्राचार्य. संपादक, युगवाणी : १९५०–५१. अध्यक्ष : वि. सा. संघ. १९६५ ते १९६८, अध्यक्ष : वि. सा. संमेलन १९६४ पुसद, संचालक : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळाचे १९६६–७० नागपूर विद्यापीठाच्या विद्यासभा, कार्यकारिणी इ. वीस समित्यांवर. गांधीवादाचा प्रभाव. १९४२ च्या लढ्यात सहभाग. त्यानिमित्ताने कारावास. १९३२ पासून ५० वर्षे लेखन. लोकसाहित्याचा व्यासंग. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद (१९७९)

पत्ता– राजीव, धरमपेठ विस्तार, नागपूर–१०.
(दूरध्वनी निवास ३१७७४)

लेखन

आत्मचरित्र :

जडण घडण, कॉंटिनेन्टल, पुणे १९८१.

कथा व लोककथा संग्रह :

अबोली महाराष्ट्र, अमरावती १९६४
ओला दिवस
ओंजळ
कहाणी ऐका कहाणी / पुणे १९६४
कहाणी ऐका काऊची
ख्याल / कॉंटिनेन्टल, पुणे १९७३
चोरघडे यांची कथा / कॉंटिनेन्टल, पुणे १९६०
चंपाराणी / के. भि. ढवळे, मुंबई १९४४
नागवेल / कॉंटिनेन्टल, पुणे १९५७
पाथेय / व. गो. गर्गे, नागपूर १९४६
प्रदीप / वीणा, नागपूर १९५४
प्रभावती / वीणा, नागपूर १९५५
प्रस्थान / के. भि. ढवळे, मुंबई १९४५
बेला / सन् पब्लि, पुणे १९८५ (१९६४–भारतीय ग्रंथ भवन, मुंबई)
भागवती / विदर्भ मराठवाडा बुक कं, पुणे १९६६
मजल / कॉंटिनेन्टल, पुणे १९६३
यौवन / वीणा, नागपूर १९५४
साद / सन् पब्लि, पुणे १९८४
सुषमा / ह. वि. मोटे, मुंबई १९३६
संपूर्ण चोरघडे / विदर्भ मराठवाडा बुक कं., पुणे १९६६
संस्कार / देशमुख आणि कं., पुणे १९५०
संस्कार कथा. ३ लहान पोर. रोही, पुणे १९७८
हवन.

प्रबंध

अध्यापक व अध्यापन
काळ बदलला आहे.
कुटिर उद्योग आणि जीवन संघटन / नागपूर प्रका. नागपूर.
प्रमुख संघटित उद्योग.
मराठी हिंदुस्तानी कोश / रंजन आणि बोध.
वाङ्मय आणि वाङ्मय सेवक.
साहित्याचे मूलधन / साहित्य प्रसार केंद्र, नागपूर १९७७

(१९३८–कर्नाटक पब्लि. हाऊस. मुंबई) सहलेखन
सुंदर जीवन / उषा, पारडी. १९५६

चरित्रे :

आचार्य काकासाहेब कालेलकर : जीवन दर्शन / वीणा, नागपूर १९४६
धनयोगी / नागपूर विद्यापीठ, नागपूर १९६७.
नरकेसरी अभ्यंकर.
साने गुरुजी. अप्पासाहेब पंत, औंध. १९४६

अनुवाद :

अहिंसा विवेचन / शं. वा. कुळकर्णी, मुंबई १९४९
अहिंसेची साधना.
आमच्या देशाचे दर्शन.
गांधीप्रणीत अर्थयोजना.
पूर्ण विराम / नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली १९८१ (मुळ लेखक : पद्मनाभन नील)
पूर्वपश्चिमेच्या संत महिला / नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली. १९६७
भक्ति–कुसुमे.
माझे घर
मातीचा माणूस / डायमंड बुक स्टॉल, सांगली. १९६२
(मूळ लेखक पाणीग्रही)
लाटांचे तांडव / महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई १९४५
वटवृक्ष.

संपादन :

आमची मायबोली खंड १ ते ५ / अशोक, नागपूर १९५८
कथावली / अशोक, नागपूर १९५४.
क्रांतिनिष्ठा.
जीवनदृष्टी
पाषाण पूरा / कॉंटिनेन्टल, पुणे १९७५
वि. स. खांडेकरांच्या कथा
बावनकशी
भाषाबोधिनी खंड १ ते ४
लोकजीवन
वनशोभा
साहित्य सुवर्ण भाग १ व २
हिंदु मुस्लिम

संदर्भ व इतर :

आदर्श लेखन वही भाग १–२
नागपूर व परिसर
स्वातंत्र्याचे योगदान
प्राथमिक अर्थशास्त्र / अशोक, नागपूर १९६७

आलेख : चोरघडयांच्या कथालेखनाचा

	कथासंग्रह	प्रकाशकाचे व प्रकाशनाचे नाव	प्रकाशन काळ
१	सुषमा	हरिभाऊ मोटे, प्रतिभा कचेरी, मुंबई	२०–४–१९३६
२	हवन	सौ. वनिता चोरघडे, सरिता प्रकाशन, वर्धा	१६–७–१९३८
३	यौवन	व. श्री. सातवळेकर उषा प्रकाशन, सातारा.	डिसेंबर १९४१
४	प्रस्थान	के. भि. ढवळे, ढवळे प्रकाशन, मुंबई.	१९४५
५	पाथेय	ब. गो. गर्गे, वीणा प्रकाशन, नागपूर.	ऑक्टोबर १९४६
६	संस्कार	रा. ज. देशमुख, देशमुख आणि कं., पुणे.	१९५०
७	प्रदीप	ब. गो. गर्गे, वीणा प्रकाशन, नागपूर.	१९५४
८	नागवेल	अ. अं. कुळकर्णी, कॉन्टिनेन्टल प्र., पुणे	१९५७
९	मजल	अ. अं. कुळकर्णी, कॉन्टिनेन्टल प्र., पुणे.	१९६३
१०	बेला	ग. बा. नेवाळकर; भारतीय ग्रंथभवन, मुंबई.	डिसेंबर १९६४
११	ख्याल	अ. अं. कुळकर्णी, कॉन्टिनेन्टल प्र., पुणे	१९७३
१२	साद	सन पब्लिकेशन, पुणे	१९८४

[कथालेखनाचा आलेख डॉ. श्रीधर शनवारे यांच्या सौजन्याने त्यांच्या प्रबंधातून]

श्री. वामन कृष्ण ऊर्फ बापूसाहेब चोरघडे हे मराठी कथाविश्वातील अग्रगण्य लेखक. मराठी कथेला त्यांनी निश्चित असे वळण दिले. भावनात्मकता, काव्यात्मता आणि कलात्मकता यांच्या जोडीला अस्सल भारतीय परंपरेचा कस त्यांच्या कथेने आपलासा केला आहे. विदर्भाच्या खेड्यांमधील बाळपण, स्वातंत्र्याच्या चळवळीमधील तारुण्य आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लौकिक यशाचा अमाप लाभ या साऱ्यामुळे त्यांचे व्यक्तिगत जीवन अनुभवसंपन्न आणि समृद्ध झाले. तसेच एक कथाकार म्हणूनही त्यांची प्रतिभा श्रीमंत होत गेली. १६ जुलै १९८९ या दिवशी त्यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने खास युगवाणीकरिता डॉ. दमयंती पांढरीपांडे यांनी घेतलेली त्यांची ही मुलाखत.

" राजीव " मधील बापूसाहेबांच्या खोलीत प्रवेश केला. ' मी येऊ का ?' असे विचारताच, ठरलेल्या वेळेस मीच असणार हे जाणून त्यांनी हसून स्वागत केले. 'वक्तशीरपणा' हा बापूसाहेबांच्या व्यक्तित्वाचा एक अविभाज्य भाग आहे हे मला ठाऊक होते. नंतरच्या भेटींमध्येही त्याचे मला प्रत्यंतर आले. मी त्यांची मुलाखत घ्यायला आले होते. माझी भूमिका मी त्यांना सुरुवातीला विशद केली आणि आमची बातचीत एखाद्या प्रवाहा-सारखी सुरू झाली.

मी : वाचक ज्या साहित्यिकाचे साहित्य वाचतो – मग तो कादंबरीकार असो की कथाकार असो; नाटककार असो की कवी – त्या साहित्यिकाविषयी त्याच्या मनात एक कुतूहल निर्माण होते. तो जसजसा लेखकाचे साहित्य वाचीत जातो तसतसे त्याचे ते कुतूहल वाढत जाते. ललित साहित्यात व्यक्त झालेल्या भावजीवनासोबत लेखकाचे स्वतःचे भावजीवन आपल्याला समजावे अशी जिज्ञासा वाचकाच्या मनात निर्माण होत जाते. आपल्यासारखा साहित्यिक सातत्याने कथालेखन करीत आला आणि ज्याने यशस्वी जीवन जगून अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले त्याच्या अंतरंगाचे जवळून दर्शन व्हावे असे रसिक वाचकाला वाटले तर नवल नाही.
लेखकाला देखील आपल्या साहित्यजीवनाचे सिंहावलोकन करावे असे वाटत असणार या दृष्टीने मी आपल्याशी मनमोकळेपणाने बोलणार आहे.

बापूसाहेब : अवश्य, मलाही आपल्याशी बोलायला आवडेल.

मी : मराठी साहित्याच्या कथाविश्वामध्ये तुमची कथा रसिकमान्य झाली आहे, ती विपुल आहे, आणि मराठी कथेला आकार देणारी, वळण देणारी आहे. तिच्यात सातत्यही आहे. तेव्हा या सर्व कथाविश्वाची सुरुवात केव्हा झाली ? कशी झाली ? हे मला सुरुवातीला जाणून घ्यायला आवडेल. १९३२ साली ' अम्मा " ही कथा तुम्ही लिहिली ती तुमची पहिली कथा ना ?

बापूसाहेब : "अम्मा ' ही माझी पहिली कथा नाही. ती प्रकाशित झालेली पहिली कथा आहे. १९३२ साली लिहिली मी ती. नागपूरहून प्रकाशित होणाऱ्या "मुलांचे मासिक "मध्ये ती छापून आली. तसे "चेतना "ने मला प्रथम लेखक बनविले. नागपूरच्या पटवर्धन हायस्कूलमध्ये मी नववीमध्ये शिकत होतो. आम्ही चार मित्रमंडळी मिळून "चेतना" नावाने एक हस्तलिखित मासिक सुरू केले. त्यात लिहिण्याची जबाबदारी माझी होती. चरित्र, कथा, निबंध, कविता हे सर्वच प्रकार मी लिहीत असे.

मी : म्हणजे सुरुवातीला तुम्ही ललित साहित्याचे सर्वच प्रकार हाताळले. तुम्ही तुमच्या "जडणघडण" या आत्मचरित्रात याचा उल्लेख केला आहे. त्यात तुम्ही म्हटले आहे की, "चेतने "त वेगवेगळ्या नावाखाली तुम्हीच लिहीत असा ! वाचनही तुम्ही बरेच केले. पण कवितेच्या वाटेला मात्र तुम्ही गेला नाही. रेव्ह. ना. वा. टिळक, माधव ज्यूलियन, कवी

यशवंत, गडकरी, गिरीश, कवी माधव, काणेकर यांच्या कविता तुम्ही मुखपाठ केल्या. पण कवितेची "कला" काही तुम्हाला जमली नाही. म्हणजे लेखक या नात्याने तुमचे स्वत्व कशात आहे याची जाणीव तुम्हाला सुरुवातीलाच झाली.

बापूसाहेब : खरे आहे ते. आजही माझी ऐंशीच्या घरात ग्रंथसंख्या जाते. त्यात वैविध्यही आहे. कथांच्या १६ संग्रहांखेरीज लोककथा, प्रबंध, चरित्रे आणि काही अनुवाद असे काही लिखाण माझ्या नावे जमा आहे. काही अभ्यासक्रमातील पुस्तकांची संपादनेही मी केली आहेत आणि तरी माझी identity– माझे स्वत्व 'कथाकार' या बिरुदामध्येच आहे.

माझ्या सुरुवातीच्या "अम्मा" आणि "सव्वा पाच आणे" या दोन्ही कथा "मुलांचे मासिक" मध्ये छापून आल्या आणि नंतर मी लिहीतच गेलो.

मी : तुमच्या या सुरुवातीच्या कथांमध्ये, तुमच्या कथेचा जो एक स्वभाव आहे त्याचे दर्शन घडते. गरिबांविषयी जिव्हाळा, कणव आणि आत्मीयता यांचे दर्शन तुमच्या कथेत वारंवार घडते. तुमच्या सुरुवातीच्या कथादेखील याच कणवेमधून स्फुरल्या असे वाटते.

बापूसाहेब : गरिबांविषयी कणव असे तुम्ही म्हणालात. खरे तर माझे लहानपणच गरिबीचे जीवन जगण्यात गेले. एका बाजूला गरिबी आणि दुसऱ्या बाजूला चोरघडे घराण्याचा आब कायम ठेवण्याची धडपड अशा ताणातच मी लहानाचा मोठा झालो. गरिबीतही स्वाभिमान कायम ठेवण्याचा मी प्रयत्न करीत होतो. १९२० ते १९३६ हा माझ्या आयुष्यातला

वामन कृष्ण चोरघडे

[मुलाखत]



प्रयास आणि प्रवास : एका प्रेरणेचे

[खास युगवाणीकरिता डॉ. दमयंती पांढरीपांडे यांनी घेतलेली मुलाखत]

अनुक्रमणिका

सुरुवातीचा काळ. ज्या वयात माणूस घडतो असा हा काळ. माझ्या लहाणपणापासून तर ऐन उमेदीच्या काळातल्या काही आठवणी मी तुम्हाला सांगतो, म्हणजे तुमच्या लक्षात येईल की मी किती सहन केलं आहे !

लहान होतो मी तेव्हा. ६–७ वर्षाचा असेन. खेड्यातली शाळा. आम्हाला रामजी मास्तर शिकवायचे. ते अनेकदा मुलांना गणित देण्याचे काम माझ्यावर सोपवायचे, आणि खुशाल घोरायचे. आम्ही मुले त्या वेळामध्ये खिशात भरून आणलेला खाऊ खात असू. त्या दिवशी खिशातले लोणचे काढून सर्व मुले खात होतो. खिशात लोणचे आणायला घरची गरिबीच कारणीभूत होती. पण मी सहनशीलतेविषयी सांगत होतो. आमच्या तोंडाच्या आवाजाने मास्तर जागे झाले आणि माझ्या बोलण्याचा राग येऊन त्यांनी मला खूप बदडून काढले. [पायात काटा, जीवाला व्यथा यात ही घटना सविस्तर आली आहे] इतके मारले की मला ताप भरला. दुसऱ्या दिवशीही ताप होताच. पण मी " रामजी मास्तरांनी मारले " असे काही घरी सांगितले नाही. नंतर रामजी मास्तर घरी आले. त्यांनीच स्वतः ही हकीकत डोळे पुशीत सांगितली.

आमचे चोरघडे घराणे श्रीमंत, प्रतिष्ठित घराणें म्हणून प्रसिद्ध. आमचे वंशज म्हणजे साडेतीन शहाण्यांपैकी एक. आम्ही देवाजीपंतांचे वंशज. परंतु भाऊबंदकीमुळे आम्ही भिकेला लागलो. " बडा घर पोकळ वासा " अशी आमची स्थिती झाली. मुलतापीच्या धर्माधिकाऱ्यांकडेही काही दिवस राह्यलो. पण घराण्याचा आब कायम ठेवला. एकदा तर मला आठवतंय, दोन दिवस आम्ही कोहळं खाऊन राह्यलो. पण बाहेर कुणाला कळले नाही. तेही दिवस आम्ही " मिशीवर ताव देऊनच " साजरे केले.

(या आठवणी सांगताना बापूसाहेब जणू त्या काळातच गेले होते. सारे कसे नुकतेच घडून गेल्यासारखे त्यांना आठवत होते. त्यांचे अनुभव वाचताना आपण तल्लीन होतो. पण त्यांच्या तोंडून त्या घटना ऐकताना लेखकाच्या अनुभव घेण्याच्या क्षमतेचा अस्सलपणा जाणवत होता. आज ज्याला लेखनगर्भ आत्मनिष्ठा असे म्हटले जाते ती निर्माण होण्यासाठी लेखनपूर्व आत्मनिष्ठाही असावी लागते. त्या निष्ठेचा प्रत्यय मला त्या आठवणी ऐकताना येत होता.)

एकदा वडिलांना मिळालेले २ रुपये खिशातून पडले, आणि मोठ्या भावाला सदरा हवा होता. घरात चादरी होत्या. " त्याचा सदरा भैयाला करून दे " असे मीच आईला सुचवले. तसा तो शिवला आणि भावाला दिला.

मला आणि माझ्या वडिलांना दोघानाही प्लेग झाला होता, तेव्हांची आठवण तर हृदयावर कोरली गेली आहे. आम्ही झोपडीवर राह्यला गेलो होतो. वडील म्हणजे घरचा कर्ता पुरुष. आई त्यांच्याजवळच होती. मी बाजूला होतो आपला. त्रास असह्य होता. एकटे वाटत होते. तसाच खुरडत खुरडत शेतात गेलो, शेतातले फण लागले. रक्त आले. रक्त पुसून टाकले. खुरडत झोपडीत आलो आणि असह्य झाल्यामुळे तोंडून " आई पाणी गं " असे उद्‌गार निघाले. तोवर आईला जणू माझा विसरच पडला होता. ती माझ्याजवळ आली. म्हणाली, " बापू माझं कुंकूच धोक्यात आलं. म्हणून तुझ्याकडे लक्षच दिलं नाही..." माझ्या सहनशीलतेची कसोटी होती ती.

मी : यात तुमच्या सहनशीलतेची कसोटी होती हे तर खरेच. पण यासोबतच तुम्ही अतिशय संवेदनाशील होते असाही निष्कर्ष यातून निघतो.

बापूसाहेब : संवेदनाशील असे तुम्ही कोणत्या अर्थाने म्हणता ? मी हळवा होतो असे म्हणायचे असेल तर मला ते मान्य नाही. उलट जीवनात ज्या ज्या गोष्टी सोसाव्या लागल्या त्या मी सहन-

शीलतेनेच सोसल्या. माझ्या बायकोचे प्रेत वर्कावर ठेवलेले मी बघितले. ज्या पत्नीवर मी प्रेम केले तिचे प्रेत. मी जिना उतरून खाली आलो आणि "पानाचा डबा" मागितला.

शिक्षकांचा मार सहन केला, आईच्या मनाची अवस्था जाणून तिने माझ्याकडे दुर्लक्ष केले ते सहन केले, पत्नीचा मृत्यू – तोही सहन केला – गरिबी सहन केली – तेव्हा सहनशीलता हा माझा स्वभाव होता.

मो : तुमच्या सहनशीलतेविषयी वाद नाही. पण तो तुमचा स्वभाव झाला. एक कलावंत या नात्याने तुमची अनुभव घेण्याची जी रीत आहे त्यात मला तरी संवेदनशीलता (Sensitivity) दिसते. जीवन जसे आहे तसे उत्कटतेने समजून घेण्याचे कसब कलावंत या नात्याने तुमच्या वृत्तीतच दिसून येते.

बापूसाहेब : असे तुम्हाला म्हणायचे असेल तर त्याला माझी ना नाही. माझ्या जन्मकुंडलीतच ही Sensitivity आहे. मेष राशीचा माणूस जिद्दी असतो. त्याच्या जोडीला बुध आहे. आणि म्हणून मी लिहिले. तुम्ही Sensitivity असा शब्द वापरला त्यावरून मला एकदोन गोष्टी आठवल्या. लहानपणी मला पोहायला फार आवडायचे. अगदी पाणी दिसले की उडी मारावीशी वाटायची. एकदा मी असाच एक मोठी विहीर पाहून मोहात पडलो आणि काठावरून धप्पदिशी उडी मारली. आणि माझ्या मनात एक विचार उचंबळून आला, "पाण्याला आपण उडी मारल्यामुळे लागले का ?"– मी कळवळलो. एकदा पऱ्हाटीचे फूल मी खुडले आणि चाकूने त्याला चिरा दिला. लाल लाल पाणी आले. मी कळवळलो. वाटले, पऱ्हाटीला दुःख झाले असेल का ?... असे अनुभव मला येत असत.

एकदा पऱ्हाटीचे फूल मी खुडले आणि चाकूने त्याचा चिरा दिला. लाल लाल पाणी आले. मी कळवळलो, वाटले पऱ्हाटीला दुःख झाले असेल का ?

मो : तुमच्या संवेदनशील वृत्तीला प्रतिभेची जोड होती म्हणून तुम्ही इतक्या चांगल्या आणि विपुल कथा लिहू शकलात.

बापूसाहेब : हे जे काही "प्रतिभा" वगैरे म्हणतात ते मी मानीत नाही. जीवनात आपल्याला जे अनुभव येतात त्यातच कित्येकदा कथाबीजे दडलेली असतात. दैनंदिन अनुभव, काही प्रसंग, सहली या सर्वांमधून आपल्याला अनुभव मिळत असतात. एकदा आम्ही काही लेखक मंडळी– त्यात के. ज. पुरोहित होते, पु. भा. भावे होते, माडगूळकर होते, अरविंद गोखले होते, काही स्त्रियाही होत्या. दक्षिणेकडे गेलो होतो. आम्ही सर्व भेंडचा खेळलो. गोष्टी सांगितल्या. सापाच्या गोष्टी सुरू झाल्या. प्रत्येकाने आपापले अनुभव सांगायला सुरवात केली. भुताच्या गोष्टी देखील आम्ही केल्या. प्रत्येकाला काही ना काही अनुभव आलेला असतो. दुसऱ्यासारखेच काहीतरी घडलेले पाहिलेले असते. एकाचे ऐकून दुसऱ्यालाही स्फुरण होते. कलावंतांच्या कलाकृतीबाबतही असेच घडत असते. म्हणून मी प्रतिभा मानीत नाही. मात्र वातावरणात प्रेरणा असतात, व त्या आपल्यापर्यंत पोहोचत असतात असे मी मानतो. प्रेरणा अव्यक्तामधून येतात असे विनोबाही मानतात. त्या प्रेरणांचा एकावर एक परिणाम होतो, दुसऱ्यावर निराळा होतो. महायुद्धाचे जगभर उमटलेले पडसाद हेही या प्रेरणांच्याच परिणामाचे रूप आहे. तर अशा या प्रेरणा लेखकापर्यंत पोचतात. यातून स्फूर्ती निर्माण होते. म्हणून अनुभव घेण्याच्या साधनेनंतर

स्फुरण असा क्रम मी मानतो. कलावंताने एक मात्र सांभाळायला हवे. ते म्हणजे, आपली कला. बाल गंधर्वांनी जर आपला आवाज सांभाळला नसता तर ते बालगंधर्व झालेच नसते.

माझी पहिली कथा "अम्मा" प्रसिद्ध झाली आणि मला वाटू लागले की आपण खूप वाचले पाहिजे. त्यानंतर मी खरोखरच खूप वाचले. १५–१६ हजार कथा मी आजवर वाचल्या आहेत. इंग्रजी, मराठी, गुजराथी आणि बंगाली – बंगाली कथांचे हिंदी अनुवाद मी वाचले – अशा अनेक भाषांमधील कथा मी वाचल्या. ऑस्कर वाइल्ड तर मी जवळजवळ पूर्ण पाठ केला होता. तो पाठ केला मी भाषेसाठी. कारण साधनेत भाषेच्या समृद्धीलाही फार महत्त्व आहे.

शरच्चंद्र मी पूर्ण वाचला. कितीतरी पाठ केला. त्याची तुम्हाला गंमत सांगतो. मी आणि पु. भा. भावे आम्ही दोघेजण कितीदा तरी आलटून पालटून देवदासमधील [बंगलचा बरे का] पार्वती व देवदास व्हायचो आणि संवाद धडाधड म्हणायचो.

मी : तुमचे पाठांतर आजही चांगले आहे. कितीतरी कविता, श्लोक, वाक्ये तुम्ही आताही उद्धृत करता. तेव्हा ही तुमची साधना तुम्हाला आजही साथ देते नाही ?

बापूसाहेब : तुम्ही विचारलेत म्हणून सांगतो. यात आत्मप्रौढी नाही. मी लहानपणापासून पाठांतराला जी सुरूवात केली ती आजही कायम आहे. स्वतःशीच भेंड्या खेळणे, उतारे म्हणून पाहणे हा माझा छंद होता. रामदासांनी, पाठ करण्यावर भर दिला ते उगीच नव्हे. अनुभवाने सांगतो, मला त्याचा फार उपयोग झाला. विनोबा म्हणत, "मनुष्याचे वय वाढते तशी त्याची स्मरणशक्ती वाढली पाहिजे..." मी आजही नित्यनेमाने एखाद्या सुवचनाचा जप करीत असतो.

[बापूसाहेबांनी एकदोन वह्या काढून दाखवल्या. सुंदर अक्षर, नीटनेटकेपणा आणि काळजीपूर्वक केलेल्या नोंदी बघून मन स्तंभित झाले. त्यात १–६–८६ पासून ३१–५–८९ पर्यंत वचनांचा लिखित जप होता. "श्रीराम जयराम जयजयराम "आपदामपहर्तारम्...", "गजेंद्राचिचा आकांतासि...", "ऐसा तू माझा दातार..." ही चार वचने चार वर्षांसाठी त्यांनी निवडली होती.]

स्मरणशक्ती आणि चिंतनप्रवणता या दोहोंना याचा फायदा होतो.

वाचन हा साधनेचाच एक भाग झाला. मात्र ग्लियोनियो फॅपिनी (इटालियन)ने म्हटल्याप्रमाणे; "कथा सुचत नसेल तर लेखकाने बाजारात चक्कर टाकावा" हे मत मला मान्य नाही. इतक्या सवंग बघण्यातून कथा आकार घेत नाही.

आणखी एक असे की लेखक जे जे अनुभव घेतो ते सर्वच्या सर्व सार्वजनिक असतात असे नाही.

मी : सार्वजनिक यापेक्षा साधारणीकरण हा शब्द अधिक बरा ना ?

बापूसाहेब : मी त्याच अर्थाने सार्वजनिक हा शब्द वापरला. म्हणजे कथेतला अनुभव वाचकाला आपला अनुभव वाटला पाहिजे. एक सार्वत्रिकता त्या अनुभवाला असेल तरच त्यातून कथा निर्माण होऊ शकते. एरवी नव्हे. अक्षर वाङ्मयाची वैशिष्टये सांगताना, ना. सी. फडके नाही का म्हणत की, प्रेमकथा याच नेहमी टिकणाऱ्या कथा आहेत. – याचे कारण प्रेम नेहमीच राहणार. काल ते होते. आज आहे. उद्याही राहणार. म्हणून प्रेमकथाही नेहमीच निर्माण होणार. आणि त्यांना अक्षर वाङ्मयाचे स्थान मिळणार.

तर या म्हणण्यात तथ्य आहे हे तुम्ही लक्षात घ्या. म्हणून मी म्हणतो की अनुभव हे "सर्वसाधारण" असले पाहिजेत. ते सर्वसंवेदनाक्षम असले पाहिजेत.

प्रथम अनुभव हवा. आणि जोडीला साधना हवी; वाचन हवे. शब्दांच्याबाबत देखील साधना हवी. त्यात विसंवाद असता कामा नये. केव्हा कोणता शब्द वापरायचा याची जाण कलावंताला असली पाहिजे. शब्द अर्थपूर्ण असले पाहिजेत. भैरवी म्हणजे भैरवीचे शब्द नव्हेत तर शब्दातील, सुरातील व्याकुळता गळयातून बाहेर यायला हवी. तसेच शब्दांचे आहे.

नुसती घटना असून चालत नाही. त्या घटनेकडे बघण्याची दृष्टी लेखकाजवळ असायला हवी. डोळे महत्त्वाचे नाहीत; दृष्टी महत्त्वाची आहे. ही दृष्टी आहे म्हणून सृष्टी आहे. एरवी या सृष्टीला काही अर्थ नाही.

मी कैदेत असताना, अनंतराव शेवडे, भवानीप्रसाद मिश्र, महेश मिश्र हेही माझ्या सोबत होते. तिथे असतांना भवानीप्रसादांनी एक कविता रचली. ती कशी कशी शब्दबद्ध झाली हे मला अजून आठवते. त्यातील काही ओळी मला अजून आठवतात.

"बुँद टपकी एक नभसे-जैसे किसीने
झुकझरोकेसे हँस दिया हो।
पहले झलका पानी जैसे आकाशवानी"
—आकाशातून पडणारा पाण्याचा एक थेंब-जणू
कोणी खुदकन हसले आहे. आणि नंतर-
"बिजली महलपे गिरके दिलमे समा गयी रे"

ही ओळ होती. ती ओळ म्हणजे खरे काव्य होते. यातील शब्दाशब्दात एक दृष्टी आहे. ती मला महत्त्वाची वाटते.

अनुभवामधला 'मी' जेव्हा निघून जातो तेव्हा त्या अनुभवासाठी वापरलेल्या शब्दांना मंत्राचे रूप येते...

अनुभवामधला 'मी' जेव्हा निघून जातो तेव्हा त्या अनुभवासाठी वापरलेल्या शब्दांना मंत्राचे रूप येते. ऑस्कर वाइल्डने म्हटले आहे ना, 'The experience is an instinct.' असे या अनुभवाचे आणि कलेचे रूप आहे.

मी : तुम्ही कलेच्या स्वरूपासंबंधी तुमची मते मांडली. आता याच संदर्भात आणखी एक सांगा. तुमच्या मते ललित कलेचे ध्येय कोणते ?

बापूसाहेब : आनंद ! आनंदासाठी आनंद
[आणि आपल्याशीच पुटपुटले, आनन्दम् ब्रह्मेति व्यजानात्]

मी : अलिकडच्या साहित्याविषयी तुमची काय प्रतिक्रिया आहे ?

बापूसाहेब : एकच सांगतो, अलिकडच्या साहित्याविषयी मी निराश नाही. पण असे वाटते कधी कधी की, आजचे साहित्य उचंबळून बाहेर येत नाही. अनुभूतीची सखोलता त्यात नाही, अशी शंका येते.

लेखकांनी साधनाही करायला हवी हे मी सांगितलेच होते. शिवाय आपल्या आधी लेखनाची एक परंपरा असते. समजा आम्ही आमच्या पूर्वसूरींच्या खांद्यावर उभे आहोत तर आजची पिढी आमच्या खांद्यावर उभी आहे. याचे भान या पिढीने ठेवले पाहिजे. मागीलांच्या खांद्यावर उभे राहून वर बघता आले पाहिजे. खाली नव्हे !

बरे ! प्रयोगशीलतेविषयी म्हणावे तर नेहमीच ते प्रयोग होत असतात. माझी "भावना"

ही कथा वषा ! कथानक, विषय असे काहीही न घेता लिहिलेली ती कथा आहे. असे प्रयोग करायला हरकत नाही, मात्र त्यात अनुभूतीचा सच्चेपणा हवा.

मी : बापूसाहेब, लेखकाचे लेखन कसे आहे हे ठरविण्याचा अधिकार समीक्षकाला द्यायला काही हरकत आहे का ?

बापूसाहेब : तुम्ही असा प्रश्न विचारलात . . . . ! मी समीक्षेच्या काही विरोधात नाही. मात्र ती आस्वादसमीक्षा असावी. आपल्या स्वतःच्या मापदंडाच्या चौकटीत कलाकृतीला बसविण्याचा खटाटोप समीक्षकाने करू नये.

मी : तुमच्या स्वतःच्या कथांबाबत, तिच्या विकासाबाबत तुमचे काय मत आहे ? ... म्हणजे ती काळानुसार बदलली का ? विकसित झाली का ?

बापूसाहेब : कथेची सुरुवातीची जी प्रेरणा होती तीच शेवटपर्यंत आहे असे मला वाटते. मात्र अनुभवाशोबत चिंतनशीलता वाढत जाते. तिचे प्रतिबिंब तुम्हाला माझ्या कथांमध्ये दिसत असेल.

मी : बापूसाहेब, मी आता तुमच्या किशोरवयाच्या, स्वातंत्र्याकांक्षेने मंतरलेल्या काळाकडे वळते. तुमचा संवेदनशील स्वभाव आणि वृत्ती लक्षात घेता तुम्ही स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरणे स्वाभाविकच होते; पण ती प्रेरणा तुम्हाला कशी झाली ?...एखादी आठवण ?

बापूसाहेब : एकच का अनेक आठवणी आहेत . . . त्या तुम्ही माझ्या पुस्तकांमधून वाचू शकता. पण एक प्रसंग सांगतो. ...नागपुरातील तीन पुढाऱ्यांनी माझ्यावर मोहिनी घातली होती. त्यापैकी एक नरकेसरी अभ्यंकर, दुसरे दांडेकर आणि तिसऱ्या पुढाऱ्याचे नाव होते मंचरशा आवारी, रुस्तमजी आवारी–पारशी होते ते, यांच्यामुळे "मी देशाचे काही देणे लागतो" हे मला कळले. १९३० साल होते. मी पंधरा–सोळा वर्षाचा होतो. मला 'वानरसेनेत' दाखल व्हायचे होते. स्वयंसेवकांच्या यादीत नाव नोंदवायला गेलो. मी लहान म्हणून मला कोणी घेईना. पाया पडलो. अखेरीस वानरसेनेत सामील झालो. अभ्यास संपला की उरलेला सारा वेळ पोस्टातून डाक आणणे, बुलेटिन चोरून वाटणे, अशी कामे करू लागलो. मनात एक ऊर्मी असायची. नागपूरचा गढवाल दिन आला. पोलिसांनी अडवलेल्या मिरवणुकीत सामील झालो होतो. लाठीमार झाला. एका पोलिसाने माझी तंगडी धरली आणि महालमधील टाऊन हॉलपासून कोतवालीपर्यंत सुमारे अर्धा फर्लांग फरफटत नेले. पाठ, खांदे खरचटून गेले. नंतर आम्हाला मोटारीत कोंबले आणि नागपूरपासून सोनेगावपल्याड खापरीच्या रस्त्यावर रात्री दोन अडीच वाजता आमच्यापैकी काहींना मोटारीतून ढकलून दिले. मोटार निघून गेली. तिथून पायी रखडत रखडत सकाळी सहा वाजता मी जो घरी आलो तो खूप शहाणा झालो होतो. मी कुस्त्यांच्या दंगलीत भाग घेत होतो. पण पोलिसांनी जेव्हा पाठीची सालटे निघेपर्यंत फरफटत नेले तेव्हा शरीरबलाचे काही चालले नाही हे समजले. एक उद्वेग निर्माण झाला. जणू माझा पुनर्जन्म झाला. मी अभ्यास सोडला. आणि क्रांतिकारकांकडे ओढला गेलो.

जतीन्द्रनाथ ज्या दिवशी हुतात्मा झाला त्या दिवशी मी उपास केला होता. नंतर मला काय स्फूर्ती मिळाली कुणास ठाऊक. पण मी क्रांतिकारकांची चरित्रे गोळा केली आणि 'चेतने'चा हस्तलिखित 'शहीद विशेषांक' काढला.

मी : म्हणजे तुमच्यातल्या लेखकाला जागे करण्याचे काम क्रांतिकारकांनी केले. नंतर मात्र चरित्र-कार किंवा कादंबरीकार म्हणून तुमच्या लेखणीने प्रवास केला नाही.

बापूसाहेब : एकदा नववीत शिकत असतांना मावशीकडे रहायला गेलो होतो. निवांत वेळ होता. तिथे असताना मी विष्णुसहस्रनाम म्हणत असे, स्वतःशीच भेंड्या खेळत असे आणि त्याच काळात मी एक कादंबरीही लिहून टाकली होती. पण मी ती नंतर फाडून टाकली.

मी : एक कादंबरी तुम्ही फाडून टाकली ? ती असती तर ...

बापूसाहेब : छे ! छे ! मला न आवडलेले माझे कुठलेही साहित्य मी कधी जपून ठेवले नाही. माझ्या कथादेखील ! मला सुचतील तशी कथाबीजे मी लिहून ठेवीत असे. कधी कधी त्या कथाबीजातून कथा जन्माला येण्यास वर्ष दीड वर्ष लागत असे. कथा लिहून झाली की मी ते कथाबीज फाडून टाकीत असे. आणि कथादेखील जमली नाही तर ती ठेवण्याचा मला कधी मोह झाला नाही.

मी : तुम्ही आता शहीद विशेषांकाचा उल्लेख केलात. तो आहे का अजून.

बापूसाहेब : त्याला एक इतिहास आहे. क्रांतिकारकांच्या चरित्राचे हस्तलिखित लिहून झाले. आमचे त्या वेळचे मुख्याध्यापक ना. के. बेहेरे यांनी ते वाचले आणि मला घरी बोलावले. "लेखणीसाठी तू तुरुंगात जावे हे मला आवडणार नाही." असे म्हणून चेतनेचा तो अंक प्रकाशित न करण्याची त्यांनी मला सूचना केली. जरी मला मुख्याध्यापकांचे सांगणे पूर्णपणे समजले नव्हते तरी मी ते कां कुणास ठाऊक मानले आणि अंक स्वतःच जप्त केला. अजूनही तो अंक मी वडिलांच्या अस्थी ज्या भावनेने जपून ठेवल्या होत्या त्या भावनेने जपून ठेवला आहे. [सध्या तो पुणे येथील जयकर ग्रंथालयात आहे]

मी : आपण क्रांतिकारकांच्या काळातल्या आठवणींवरून पुन्हा तुमच्या लेखनाकडे वळलो. पुन्हा मागचा धागा पकडून मी तुम्हाला विचारते, तुमच्या आयुष्यात क्रांतिकारकांचे सान्निध्य आणि काम, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशीही काही काळ संबंध आणि नंतर गांधी-विनोबा यांचेही सान्निध्य असा प्रवास दिसतो. त्याविषयी थोडे सांगाल का ?

क्रांतीकारक असोत की राष्ट्रीय स्वयंसेवक असोत ते देशाचेच काम करीत आहेत ही आम्हा मुलांची श्रद्धा होती.

बापूसाहेब : मी क्रांतिकारकांच्या प्रभावाखाली होतो हे खरे आहे, माझे किशोरवय त्यांनीच चेतविले. नंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघातही मी तन-मन-धनाने सामील झालो होतो. क्रांतिकारक असोत की राष्ट्रीय स्वयंसेवक असोत ते देशाचेच काम करीत आहेत ही आम्हा मुलांची श्रद्धा होती. नंतर मात्र कुस्ती, दांडपट्टा या अत्यंत चिर आणि उपयुक्त अशा गोष्टींवरून माझे लक्ष उडाले आणि मी डॉ. हेडगेवार यांच्या चरणी डोके ठेवून व त्यांच्या अनुमतीने संघ सोडला. नंतर एकदा गांधींचा जो मार्ग धरला तो मात्र कायमचा. १२ ऑगस्ट १९४२ रोजी मी पकडला गेलो. मी देशासाठी तुरुंगात गेलो.

तुरुंगात माझ्यासोबत खुद्द विनोबा होते. आचार्य दादा धर्माधिकारी, वामनराव वारलिंगे, किशोरीलाल मश्रुवाला यांच्यासारखी फार मोठी माणसे होती. तुरुंगात मला विनोबांनी ज्ञानेश्वरी शिकविली. दादा (धर्माधिकारी) विनोबांना म्हणाले होते "तुमचे श्रम वाया जातील. हा माझ्या आत्याचा मुलगा. लहानपणापासून मी त्याला ओळखतो." तरीही विनोबांनी मला शिकविले. एकूण नऊशे तास त्यांच्याकडून मी ज्ञानेश्वरी शिकलो. सकाळी ७॥ ते ११ आणि दुपारी ३ ते ६ इतका काळ ते मला शिकवीत. संध्याकाळी मी थकून जात असे. एक दिवस माझे 'सुषमा' हे पुस्तक विनोबांनी वाचले. 'हवन'ही वाचले. त्यांना त्यातील गोष्टी आवडल्या. थोडक्यात लिहिण्याचे माझे कसब त्यांना आवडले. तिथे आम्ही शेरही म्हणत होतो. त्यातल्या शब्दांचे आमचे चुकीचे उच्चारही त्यांनी सुधारून दिले. तुरुंगातल्या साऱ्या आठवणी अजूनही ताज्या आहेत. त्या "जडण घडण"मध्ये आल्या आहेतच.

विनोबांचा जेवढा सहवास मला लाभला तेवढा गांधींचा नाही लाभला. पण जो लाभला त्या आणि ज्या काळात मी जगलो त्या आठवणींनी मला अजून कालवते.

कुणातरी पुढाऱ्याचे पत्र होते. गांधीजींना द्यायचे होते. त्याचे उत्तर त्या पुढाऱ्याला हवेहोते. मला गांधींना जवळून बघण्याची इच्छा होती. मी वर्ध्येस गेलो. गांधीजी फिरायला गेले होते. वाटेत लोक त्यांना भेटत; बोलत. मी ते सारे बघत होतो. मीही महादेवभाईंजवळ गेलो, त्याना पत्र दिले. ते म्हणाले, " सायंकाळी याल तेव्हा पत्राचे उत्तर घेऊन जा."

माझ्याजवळ सायकल होती. ती बाजूला ठेवून महादेवभाईच्या आदेशानुसार त्यांच्या मागोमाग जाणाऱ्या मिरवणूकीत सामील झालो. गांधीजींचे फिरून झाले. आम्ही आश्रमात आलो. प्रार्थनेअगोदर महादेवभाईंसोबत गांधींकडे गेलो. त्यांनी विचारले, "मघाशी सायकलवरून आलेला तूच का ?". "हो, " मी ताडकन् उत्तरलो.

गांधीजी निर्मळ हसले, माझा उद्वेग विरघळला. आणि त्या महात्म्याने मला म्हटले, "तू तगडा जवान, शिकलेला. तू सायकल वापरलीस, त्यात काही विशेष नाही. पण अनेक गरीब लोकांना मला भेटायची इच्छा असेल पण पायी गेलो तर आपले दारिद्र्य चव्हाट्यावर येईल असे त्यांना वाटले तर त्यांची माझी भेटही व्हायची नाही...बघ मी या वयात वर्धेला पायी जातो. तुझा तू विचार करून बघ."

गांधीचे ते बोल अजून जसेच्या तसे आठवतात. माझ्या अंतरात्म्याच्या जागृतीची शिदोरी अजून मला पुरते आहे.

मी : बापूसाहेब, तुमचे अहोभाग्य की तुम्हाला गांधींसारख्या युगपुरुषाचे आणि विनोबांसारख्या ब्रह्मर्षीचे इतके सान्निध्य लाभले. नुसते सान्निध्यच लाभले असे नाही तर त्यांच्याशी बोलणे झाले. विनोबांकडून तर तुम्ही ज्ञानेश्वरी शिकलात. असे असल्यामुळे लोक तुम्हाला गांधीवादी असे बिरुद बहाल करतात. पण त्याच बरोबर तुमच्यावर असा एक आक्षेपही घेतात की, तुम्ही जो काळ बघितला त्याचे वर्णन तुमच्या कथांमध्ये नाही. त्या काळातील घटनांचे तुमच्या कथांमध्ये काही प्रतिबिंब नाही. एका प्रतिभासंपन्न लेखकाच्या कथांमध्ये ते सारे जिवंत होऊ नये याचे लोकांना आश्चर्य वाटते.

बापूसाहेब : हे बघा मी लघुकथा लिहिल्या आणि त्याच मला लिहायच्या होत्या. मला राजकीय इतिहास लिहायचा नव्हता. मी जे प्रस्तुत आहे तेच लिहिले. प्रस्तुताच्या पलीकडे लिहिले नाही. माझ्या लिखाणाशी मी पूर्णपणे प्रामाणिक आहे. अगदी एकनिष्ठ आहे. "लिहिल्यावाचून राहवले नाही म्हणून मी लिहिले आणि जे लिहिले त्याची अगदी निर्मम रीतीने परीक्षा केल्यावाचून ते प्रसिद्ध होऊ दिले नाही."

मी : याच भूमिकेमधून तुम्ही कथा प्रकाराखेरीज अन्य वाङ्मय प्रकार हाती घेतले नाही. खरे नां ?

बापूसाहेब : होय. मी माझ्या कथेशी एकनिष्ठ राहण्याचा प्रयत्न केला. पतिव्रतेच्या निष्ठेला पुण्य मिळते. तसे एकच माध्यम प्रगटीकरणास वापरले तर मिळते, असा माझा विश्वास होता. आणि मला ते मिळाले असे वाटते.

मी : म्हणजे तुम्ही लेखनाबाबत संतुष्ट आहात ? आणखी लिहावे असे नाही वाटत तुम्हाला ?

बापूसाहेब : आता खरे सांगतो, एखादा प्रश्न मांडण्यापेक्षा तो सोडवण्यात शक्ती वेचावी असे वाटते. वेदनेला वाचा फोडण्यापेक्षा ती दूर करण्याचीच आंतरिक ऊर्मी जास्त असते.

मी : मला वाटते, तुमच्या मूळ प्रेरणांचीच ही परिणती असावी. अर्थात तुम्ही म्हणता की तुमची लेखणी आता चालवावी असे तुम्हाला पूर्वीसारखे वाटत नाही. पण लेखकाची लेखणी कधी थांबत नसते. आणि तुम्ही लिहावे असेच वाचकांना वाटते. आता तुम्ही जे म्हणालात की प्रश्न मांडण्यापेक्षा तो सोडवण्याची प्रेरणा असते त्यासंबंधी मला असे वाटते की गांधीवादामुळे...

बापूसाहेब : गांधीवाद हा शब्द मला मान्य नाही. गांधींचा काही वाद आहे असेही मला वाटत नाही, गांधी विचार असे म्हणा हवे तर ...! गांधींनी स्वतंत्र विचार मांडण्यापेक्षा पूर्वसूरींचे सद्-विचारच कृतीत आणले आहेत आणि त्या कृतीचे अनुभव निर्भयपणे व्यक्त केले आहेत.

मी : मला देखील गांधीविचारच अभिप्रेत आहे. तर त्या विचारातच कृतिप्रवणतेची बीजे आहेत. हा विचार रचनेकडे–कृतीकडे अपरिहार्यपणे जातो असे मला वाटते ... तरीही एक प्रश्न राहतोच की गांधींचा व गांधी विचाराचा तुमच्यावर इतका प्रभाव असून देखील तुमच्या कथांमध्ये त्याचे चित्र नाही.

बापूसाहेब : मी पुन्हा पुन्हा सांगितले आहे की मला एखाद्या काळाचा राजकीय इतिहास लिहायचा नव्हता; कथा लिहायची होती.

मी : मला असे वाटते की या प्रश्नाचा थोडा वेगळ्या पद्धतीने विचार करावा. अनेकदा अनेक कवी आणि ललित लेखकांवर असलेच आरोप केले जातात. मला वाटते, ललित लेखकाचा–प्रतिभावंताचा एकेक कलापिंड असतो. त्याला अनुकूल तेवढे तो काळामधून, घटनांमधून, समकालीन वातावरणामधून टिपून घेत असतो. म्हणून या परिणामाचे स्वरूप ढोबळ आणि स्थूल नसून ते सूक्ष्म आणि तरल असते. अशा स्वरूपाच्या परिणामाला कवी अनिलांनी एक चांगला शब्द वापरला आहे. तो आहे "अभिसंभवात्मक परिणाम." मला वाटते, गांधीविचाराचा व त्या काळातील घटनांचा तुमच्यावर असा अभिसंभवात्मक परिणाम झालेला आहे.

...मी लघुकथा लिहिल्या आणि त्याच मला लिहायच्या होत्या ...मला राजकीय इतिहास लिहायचा नव्हता. मी जे प्रस्तुत आहे तेच लिहिले. प्रस्तुताच्या पलीकडे लिहिले नाही.

बापूसाहेब : असे तुम्ही म्हणता ते मान्य करायला माझी हरकत नाही. माझ्या कथेचे उदाहरण घेऊन तुम्ही स्पष्ट करता का ?

मी : तुमची 'ज्योतिर्मयी' ही कथा घ्या. त्यात १९४२ चा संदेश खेड्याखेड्यात पोचवणारा नायक आहे. सदाफुली आणि तुळशीला; नंतर जनावरांनाही विहिरीतले पाणी देणारी "अंतःकरण उजळून निघालेली" निरामय सुंदर तरुणी आहे. तृषार्ताला पाणी पाजावे ही तिची अस्सल भारतीय सांस्कृतिक वारशाला साजेल अशी इच्छा आहे आणि तृषार्त वाटसरूची बुभुक्षित नजर व "ज्योतिर्मयी"च्या तेजाला श्रद्धेने साद घालणाऱ्या तरुणाची नजर यातील फरक ओळखणारी भारतीय स्त्रीही आहे.

बुभूक्षित वाटसरूला, "तू जा, अधर्माने धर्माला जिंकण्याचा तुझा प्रयत्न फळणार नाही . . . तुझ्यासारखे वाटसरू . . . पाणी मागतील. विहिरीतले पाणी विहिरीत राहील. हातचा पोहरा हाती. आणि प्रवाशाला जीवन मिळणार नाही. कुणी कुणाशी बोलणार नाही." . . . असा शाप देण्याचे सामर्थ्य त्या स्त्रीमध्ये आहे.

गांधींच्या सत्याग्रहाचे हे वैशिष्टय आहे की त्यात सर्व स्त्री–पुरुष सामील तर झालेच पण सामील झालेल्यांची अस्मिताही जागृत झाली. "ज्योतिर्मयी" हे अशा जागृत तेजस्वी स्त्रीचे प्रातिनिधिक चित्र आहे.

तुमच्या "संस्कार", "न बदलणारे वातावरण", "समुद्राचे पाणी" या सारख्या कितीतरी कथांचे असे रसग्रहण करता येईल. इंदुमती शेवडे आणि वि. स. खांडेकर या दोघांनीही कमी-अधिक फरकाने तुमच्यावरील गांधी विचाराच्या परिणामाचे स्वरूप वर्णन केले आहे.

अनुक्रमणिका

बापूसाहेब : पण गांधींनी पूर्वसूरींचाच मार्ग स्वीकारला. त्याच परंपरेचे अनुसरण गांधींनीं केले असे मी मानतो.

[बापूसाहेबांनी ज्ञानेश्वरीमधील सोळाव्या अध्यायातील दैवीगुणाच्या अपैशुन्यावरील १३ ओव्या धडधड म्हणून दाखवल्या.

" वरी कोणे एके उपाये
पडिले ते उभे होये
तेचि कीजे परी द्याये
नेदावे वर्मी "

ही ओवी त्यांनी दोनदा म्हणून दाखवली]

यात जे सांगितले आहे तेच गांधींनी सांगितले. दुसरे काही नाही.

गांधीमार्गाचे ऋण तर मी मान्यच करतो पण ललित लेखक उपदेशासाठी किंवा जग जसे आहे तसे दाखविण्यासाठी लिहीत नाही. तो त्याचे स्वतःचे विश्व उभवितो. त्या विश्वाचा जगाशी पडताळा करण्याचे काम तो वाचकावर सोपवतो. मी माझ्या लेखनाकडे या दृष्टीने बघतो.

मी : तुमचे जीवन एक कथाकार या नात्याने जसे संपन्न आणि यशस्वी आहे तसेच लौकिक जीवनही आहे. कृतार्थ आणि तृप्त असे तुम्हाला वाटत असेल !

बापूसाहेब : मी खरोखरच तृप्तीने जीवन जगलो. 'सुंदर जीवन' हीही माझी आंतरिक आकांक्षा होती, मी असे मानतो की ' Life is a gift of nature, and beautiful living is the gift of wisdom.' आणि यासाठी एक कौशल्य लागते. ' Art of living in plenty is great art.' ते कौशल्य आत्मसात करावे लागते. लहानपणापासून ही वाक्ये मला आवडत होती. त्यानुसार जगण्याचा मी प्रयत्न केला.

–बोलता बोलता बापूसाहेब स्तब्ध झाले. स्वतःच्याच विचारात मग्न असल्यासारखे, स्तब्ध !

एका कथाकाराचे संपन्न भावविश्व, संपन्न व्यक्तित्व आणि जीवनदृष्टी यांचे दर्शन घडले असे मलाही वाटले. आणि वाटले, अशा तृप्त व अनुभवसंपन्न लेखकाचे आशीर्वाद नवागत लेखकांना आणि लहानांना हवेत.

तेवढ्यात बापूसाहेब म्हणाले, " आता थकवा येत चालला. पूर्वी १८-१८ तास काम करीत असे. आता तासा-दोन तासात थकून जातो.

मी : तुम्हाला निरामय शंभर वर्षाचे आयुष्य मिळावे अशी . . .

बापूसाहेब : अहो, इच्छा असेल पण जगावे मला लागेल ना . . ; [ते काहीसे हसत म्हणाले.]

मी : तरीही बापूसाहेब . . . आमची इच्छा . . . " जीवेत शरदः शतम् " ! ■

प्रा. श्री. वामनराव चोरघडे यांच्या अमृतमहोत्सवी जीवनाला
युगवाणीचे विनम्र सादर प्रणाम !

युगवाणीला खालील विषयांवर टिपणे हवी आहेत. या व्यतिरिक्तही. इतर विषयांवर देखील.

---

१. अलौकिकतावाद, लौकिकता आणि रस-व्यवस्था
२. वाङ्मयीन अनास्थेची सामाजिक-राजकीय मीमांसा
३. शासन, साहित्यिक आणि बांधीलकी
४. सफदर हाश्मी
५. पथनाटयाचे माध्यम स्वरूप
६. मराठी नियतकालिकांची अस्तंगतता
७. निखळ वाङ्मयीन नियतकालिके
८. लिटिल मॅगझीन : भूमिका, कार्य आणि भविष्य
९. विजय तेंडुलकर
१०. साहित्यातील प्रचार आणि प्रचार-साहित्यातील साहित्य
११. महेश एलकुंचवार
१२. सौ. जयश्री थत्ते-भट
१३. सत्यदेव दुबे
१४. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रातील संवाद-संकल्पना
१५. साहित्यातील संवादाचे संवादशास्त्रीय स्वरूप
१६. कलाप्रकारांचे परस्परसंबंध
१७. हुसेन
१८. हेब्बर
१९. रझा
२०. अमृता शेरगिल
२१. स्ट्रक्चरॅलिझम
२२. बिहेविअर स्कूल
२३. मराठी साहित्याचे जागतिक संदर्भातील थिटेपण आणि मोठेपण
२४. अनुवादित मराठी साहित्य
२५. मराठी कवितेची संख्यात्मकता आणि गुणवत्ता
२६. लोकशाहीचा वाङ्मयीन-कलाविषयक अभिरुचीवरील परिणाम
२७. गजल : मराठी आणि मराठी व्यतिरिक्तची
२८. सुरेश भटांची गजल
२९. ग्रंथालय चळवळीचा वाङ्मय-कला विषयक अभिरुची वृद्धीवरील परि-णाम : शक्यता आणि वस्तुस्थिती
३०. ग्रंथाली, ग्रंथलालसा व ग्रंथव्यवहार
३१. ॲन रँड
३२. वर्ड प्रोसेसर आणि भारतीय लेखक
३३. भारतीय लेखक संघटना
३४. वाङ्मयीन पारितोषके : नकार की स्वीकार
३५. प्रस्तावना : प्रयोजन आणि आन्हिक
३६. मराठी नियतकालिकांचे धोरणहीनत्व
३७. शांताराम
३८. उत्तरकर्तव्योन्मुखतेतील कलाव्यवहार्यता
३९. कविता : स्त्रियांची
४०. क्रांतिकाव्याची भाषा
४१. कलावंताच्या सांस्कृतिक नात्याचे निर्मितीवरील परिणामाचे स्वरूप
४२. ?टर पोएट्री आणि मराठी
४३. कथेतील कथा
४४. आनंद जातेगावकरांची कथा
४५. उद्धव शेळक्यांची कादंबरी
४६. शाहीर अमरशेख
४७. अण्णाभाऊ साठे
४८. बाबूराव बागूल
४९. डॉ. आनंद यादव
५०. प्रभाकर उर्ध्वरेषे
५१. ना. के. बेहेरे
५२. अस्मितादर्श
५३. अक्षर वैदर्भी
५४. समुचित
५५. उगवाई
५६. निकाय आणि दलित साहित्याला वाहिलेल्या इतर नियतकालिकांची वस्तुस्थिती

भावना

■

■

■

श्रीक्षेत्र काशी.
झुंझुरका पहाटेला धावपळ करीत
सुचेल त्या रस्त्याने निघालो.
गंगेचे अथांग पाणी
दिसताक्षणी स्तब्ध होऊन उभा राहिलो.
देहभान हरपल्यासारखे झाले.
या हरपण्यात अध्यात्मिक असे काहीच नव्हते.
देह शिणला होता.
डोळे झोपेविना दुखू लागले होते.
हा असा शीण, हे असे दुखणे
विसरले गेले, एवढेच खरे !
दुखणाऱ्या डोळ्यांना अधिक दृष्टी लाभल्यागत ते
भुकावून गेले.
बघत रहा, बघून घे.
ही वेळ परत यायची नाही.
असे सतत, अविरत मला सांगू लागले

□

माझ्या गंगा मातेला हे माझे पहिले वंदन नव्हते.
पूर्वी आलो तो आतुरतेने;
आईच्या मांडीवर डोके ठेवण्याच्या आशेने !
आजचे हे येणे तसे निरूद्देशच होते.
आईला वंदन करावे.
तीरीचे पादप पोखीत
पाप स्वतःच्या पोटात घालून देहशुद्धी करणारे,
जळणाऱ्या हृदयाचे सिंचन करणारे ते पवित्र,
पावन जल–
त्या जळात डुंबून विश्वेश्वराच्या दर्शनाला जावे,
एवढ्यासाठीच मी आलो होतो !

पण का ?
कशाला ?
कशासाठी ?
हे प्रश्न विचारण्याइतके मनच हरवून बसलो.
हे हरविणे कशापायी ?
याचे भान राहिले नव्हते !

□

माझ्या आईचे नाव गंगा.
हे नाव शंभर वर्षांपूर्वी ठेवलेले.
त्या अगोदर कित्येकदा गंगा नाव घेतले गेले असेल
ठेवले गेले असेल.
कोणाची मुलगी
कोणाची आई.
कोणाची पत्नी.
आणखी अशा किती तरी
गंगा, गंगा !

□

जगातला सर्वात प्राचीन ग्रंथ ऋग्वेद.
त्यात दोनदा गंगेचा उल्लेख.
तेव्हापासून आजपर्यंत
नाव ठेवायचे ते गंगा.
उच्चारायचे ते गंगा.
हाक मारायची–गंगा !

□

गीतेतील कृष्णाचे विभूतिमत्त्व.
श्रोतसां अस्मि जान्हवी
म्हणजे गंगाच !
कोट्यानुकोटी वर्षांपासून
गंगा आणि गंगा !
'गंगा'वर पुटे चढली असतील ती किती ?
शक्ती वाढली असेल ती किती ?
तसेच रामाचे.
तसेच विष्णूचे.
तसेच शंकराचे.
पुटावर पुटे, पुटेच पुटे.
शक्तीच शक्ती
अधिकाधिक शक्ती !

□

माझ्या आईचे नाव गंगा.
तसा हिशेब पाहिला तर—
जन्म कोटयानुकोटीची माझी आई हीच !
आणि तिच्या असंख्य असंख्य लेकरांपैकी मी एक !
विपरीत कल्पना यावी तरी कशी ?
जेव्हा नुसते दर्शन,
नुसता दीदार थक्क करून सोडतो,
तेव्हा काय होते ?
ही निःस्तब्धता शब्दित तरी कशी करायची ?

□

गंगामातेच्या भूगोलाची मला पर्वा नव्हती.
इतिहास माझ्या पाठीशी होता
ही मोठयात मोठी आई माझी
लहानाहून लहानगे लेकरू मी तिचे !
आमच्या भेटीबद्दल हा माझ्या पाठीवर उमटलेला
इतिहास मला काय—काय सुचवितो ?

□

ईक्ष्वाकु कुलातला महाभिष राजा आठवला.
एकदा सगळे देव ब्रह्मदेवाकडे गेले होते.
गंगाही गेली होती.
महाभिष राजा त्यांच्याबरोबर होता.
गंगेचे वस्त्र वाऱ्याने उडविले.
सर्व देवांनी माना खाली घालून नजरा लवविल्या !
महाभिष राजाच फक्त तिचा अनावृत्त देह,
अनिमिष नेत्रांनी बघू लागला.
ब्रह्मदेवाने शाप दिला की—
"हे महाभिष राजा !
तू मृत्युलोकी जन्म घेशील.
गंगा तुझी पत्नी होईल.
तुला अप्रिय अशाच गोष्टी करील !"

□

हा शाप होता की उःशाप कोण जाणे !
महाभिष राजा शंतनू म्हणून इहलोकात आला.
गंगा गंगाच राहिली.
शंतनूची ती पत्नी होऊन
गांगेय भीष्माचा जन्म झाला.
तिथूनच भारतीय संस्कृतीचे,
रूपरंग आकारा आले.

□

समुद्राला भेटण्याच्या एकमेव
उद्देशाने
वरून संथ, शांत आणि
अंतरातून अती वेगाने
जाणारी ही गंगामाता
हजारो वर्षे, आसमंत शांत,
समृद्ध करीत वहाते आहे !
हिने तारलेले
हिने मारलेले
किती आणि कितीक !
यांची गणना कोणी करायची ?

□

दर्शनाने पावन झालेल्या;
अगणित आर्तातून
गणितात बसण्याजोगीच माणसें
मोजली गेली आहेत.
तीही अशीच स्तब्ध झाली असतील काय ?
काहीतरी उद्गार तोंडून निघण्याइतके भान,
त्यांना राहिले असेल काय ?

□

वाल्मीकी ऋषींच्या नावावर एक स्तोत्र आहे.
त्या स्तोत्रात गंगेचे पाणी कसे वहात होते ?
गंधर्व—देव—सिद्ध—किन्नर वधूंच्या
उत्तुंग स्तनांना टकरा देत वहात होते !
आद्य शंकराचार्यांच्या नावावर 'गंगाष्टक' आहे.
गंगेचे पाणी कसे ?
सिद्धांगनांच्या स्नान करतेवेळीच्या अवस्थेत
कुचयुगलावरून ओघळणाऱ्या केशराने
रक्तिम झालेले !
असा गंगाजलाचा महिमा साक्षात्कारी शंकराचार्य
वर्णन करतात !
वाल्मीकीचे वर्णन समजू शकते
शंकराचार्यांना हा दृष्टांत सुचावा
हे कसे ?
पृथ्वीची पादस्पर्शासाठी
क्षमा मागताना
तिला समुद्राचे वस्त्र नेसवले आहे
तिच्यावरील पर्वत म्हणजे तिची स्तनमंडले !
स्त्रीच्या सगुणरूपाला

याच कल्पना वैशिष्ट्याने
का वापराव्यात ?

□

या अशा कल्पनांनी
भानावर आलो.
पाप धुवायचे आहे.
ताप फेडायचा आहे.
हे आठवले.
गंगेत शिरायचे ते कुठून ?
शोधू लागलो.

□

सूर्य किती वर येऊ लागलेला.
आसमंताचे आंधळेपण दूर होऊ लागलेले.
श्रियेची राऊळे, पुण्याची देऊळे दिसू लागलेली.
या सर्वांना
आपल्यात सामावून धारेला लागण्याचे
गंगेचे व्रत
सुरू होऊ घातलेले !

□

शब्द आला कुठूनसा
शब्द कसला ?
ललकारीच !
"आइये, नहाइये !"
त्या दिशेला वळलो.
एक असाच,
स्वतः कपाळभर चंदन चर्चिलेला,
चंदनाची वाटी हाती धरून
मजकडे येत असलेला एक माणूस !
व्यवहाराचे मला भान नव्हते.
उतरू लागलो गंगाकाठ
तसा तो धावत येऊन
म्हणतो कसा–
'बाबूजी, बाबूजी–
यहाँ नहीं, यहाँ खतरा है !
उस घाटपर चलिये'
"गंगाजी में डुबकी ले शुद्ध हूजिये
विश्वेश्वरजी की घंटी शुरू हो गयी है
लाइये कपडे, सँभालता हूँ मैं !"

□

भारावल्यागत
मागून त्याच्या, लागलो चालू.
ध्यान होते आईच्या भरभरून ओसंडत
गाव मायेकडे !

□

'आईये'च्या इशाऱ्याबरोबर
लागलो त्याच्यामागे चालू
ध्यान लागलेलेच
मातेचे मायेचे !
अंगावरचे एकेक चिरगुट
काढलं दिले त्याच्या हाती
ठेवून तेवढे चीर कमरेचे
'यह रहा घाट बाबूजी
बढा कदम नहा लीजिये'
ध्यान विरले, जाग आली
'कदम उठाइये' उचलले.
ठेवणार मी पाण्यात पाय,
तोच दिसले काय, पाहिले काय !
गंगेच्या गुडघ्यावर पाण्यात काठोकाठी
करीत होत्या जलक्रीडा
सचैल पण विचैल होऊन
बाला अंगना पुरंध्री
अर्घ्य घेऊन हातोहाती
हर गंगे भागीरथी !
माझा वेध त्याच्याकडे
त्यांचा कुठे, मी न जाणे !
कुचयुगल
तुंगस्तन
स्तनमंडल
परी किती ! प्रकार किती !
सर्वसामान्य स्त्रिया
त्यांचे सर्वसामान्य अनुभव
घेतलेले
शेकलेले !
त्यातून ती म्हण–
चारे बोरे बहु गोड
आंब लिंबे फजीतखोर
गाभुळलेली सावळी चारे
सान टपोर लाल बोरे
पाडा आलेले आंबे

तोडू वाटावी लिंबे !
दोन डोळे टक एक !
एक एक
दोन दोन
गुच्छ गुच्छ.
पिकून पिवळ्या झालेल्या बेलफळांनी
लहडलेला बिल्वतरू.
वाऱ्या–वादळाला सोशीत
पिकून पाडाला आलेल्या आम्रवृक्षाच्या
घोसचे घोस मिरवणाऱ्या
डहाळ्या डहाळ्या, फांद्या फांद्या !
तरू हे, डहाळ्या ह्या.
आल्या होत्या स्नानाला काय ?
पल्याडचे ध्यान गंगेचे
अल्याडचे ध्यान–मीच माझे !
पाय उचलत नव्हता
का उचलत नव्हता हे कळत नव्हते !
लवलवलेली दीठ माझी
ढळत नव्हती, हलत नव्हती !
"इयं सुस्तनी मस्तकन्यस्तकुंभा"
कुचयुगल
तुंगस्तन
स्तनमंडल !

□

"बाबूजी बेखट के उतर जाइये,
ये सब अपनी माँ बहिने हैं !
छोरी छुकडियाँ हैं
कदम बढाते बढाते
गंगाजीमें उतर गई हैं !
शुद्ध हो तर्पण कर रहीं हैं
यहाँ लाज नहीं, हया नहीं
संकोच नहीं कुछ नहीं
उतर जाइये
एक डुबकी लगाने पर
आपके मन में जो कुछ है,
सब कुछ घुल जायेगा, बह जायेगा !"

□

माझ्या पाठीवर लिहिलेला
तो इतिहास हे बोलत होता काय ?
ओझे हलके होत होते काय ?
इतिहासाला फुटलेले बोल होते कुणाचे ?
कोण बोलत होते ?
रामाला रूप देणारे वाल्मीकी ?
मंडन मिश्रांना हार देणारे अद्वैती आचार्य ?
माझी ज्ञानेश्वर माउली ?
की आणिक कुणी ?
माझे ओझे वहाणारे मन ?
की भानावर आलेला मीच ?

□

भान सावरले
बाण सुटावा धनुष्यातून
तसे माझे सुटले तीर !
जाऊ लागलो तरंगत पुढे
पुढेच पुढे, आणखी पुढे

□

आईच्या मायेने देह न्हाला
चेहऱ्यावर कुरवाळ जाणवला
वर्षानुवर्षापासून मनी साचलेले वेग आवेग
आईच्या ओलीने ठिसूळे होऊन फुटू लागले.

□

प्रयास सोडून तरंगण्याचा
मी पुढे जाऊ लागलो
वाहू लागलो.
धारेला लागलो तसा–
माझ्या पुढे, माझ्या मागे,
उजवी डावी चोहीकडे,
वहात पोहत मज बरोबर
येत होते–
तेच बिल्वफळांचे
गाभुळलेल्या आम्रफळांचे
घोसचे घोस
झुमकेच्या झुमके
वरवर उसळ्या मारीत
कधी हासत कधी नाचत
कधी दृष्य, कधी अदृष्य
ते धारेला, मीही धारेला !

□

" बाबूजी, निकल आइये
सब कुछ गंगार्पण हो गया !
शुद्ध हो गया
चंदन चढा लीजिये !
" तिलक देत रघुवीर "
शुद्ध झाले हे खरे
पण वर यायचे हे देखील खरे ?
" अयुक्तास नसे बुद्धी
त्यामुळे भावना नसे "
चित्त निवाले
भान परतले
गती गती अन्
स्थिती स्थिती
जय गंगे ! हर गंगे !
घंटा वाजली
आता दर्शन श्री विश्वेश्वराचे ! ■

वामन चोरघडे
'राजीव' खरे टाऊन
धर्मपेठ, नागपूर, ४४००१०

: लेखन काल
१९८५

[प्रा. वामन कृ. चोरघडे यांच्या १९३५ पासूनच्या पन्नास वर्षांच्या प्रदीर्घ लेखनकाळातील त्यांच्याच दृष्टीने वेगळा असा लेखनप्रयोग. वामन कृ. चोरघडे यांनीच या अंकाकरिता त्यांच्या कथालेखनातून निवड करून दिलेली कथा.]

[पूर्व प्रकाशन : रविवार सकाळ, कोल्हापूर, दिवाळी पुरवणी / १९८६]



अनुक्रमणिका

उतरत्या उन्हाचा मंद सौम्यसा प्रकाश त्या छोटयाशा खोलीभर पसरला होता. देव्हा-रातल्या निरंजनासारखा. एक वृद्ध गृहस्थ खोलीत बसलेले. बापूसाहेब त्यांना कसले तरी विडयाच्या पानांच्या देठांचे आयुर्वेदिक औषध सांगत होते. गंमत वाटली.

मी म्हणाले [तशी श्रीपाद भालचंद्र जोशींनी ही कल्पना त्यांना दिलेलीच होती] की युगवाणी तर्फ......निमित्त...मी आपल्याशी काही संवाद साधावा, काही गप्पा करता याव्या म्हणून आलेय्' आपल्या आणि माझ्यात एका पूर्ण पिढीचं अंतर आहे. आपला अनुभवही सखोल, चौफेर नि मोठा' या गप्पांचं स्वरूपही; माझा प्रश्न आणि आपलं उत्तर असं नसावं.

'मुलाखत' शब्दही मला नकोच होता. पण मनात मात्र खूप प्रश्न होते कथांबद्दलचे. त्यांच्या समकालीनांच्या कथांचे...भावे, प्रभाकर पाध्ये; विनोबा, अत्रे, दुर्गाबाई भागवत इ. लोक त्यांच्या मित्रपरिवारातले. त्यांचा काळही आमच्या दृष्टीने आकाशातील दूरच्या दैदिप्यमान ताऱ्यांसारखा लोभस, हवासा आणि तितकाच अप्राप्यही. ती नवकथेची सुरुवात. वि. स. खांडेकरांनी पाच कथाकारांत दिवाकर कृष्ण, कुसुमावतीबाई यांच्यासह बापूसाहेबांना मानाचे स्थान दिलेले. त्यांच्या कथेची, काहीशी कथेच्या नवीनतेलाच छेद देऊ पाहणारी तरल काव्यात्मकता. तरीही त्यातून माणसाच्या मानसिक व्यामिश्रतेचा घेत-लेला अचूक वेध. त्यांच्या 'संस्कार'ला वि. स. खांडेकरांनी दिलेली विश्लेषक प्रस्तावना. 'प्रतिभा' ह्या साक्षेपी मासिकाचा काळ. त्यात हळूहळू स्थिर झालेले बापूसाहेबांचे लेख व त्यांच्या काही कथा अभ्यासक्रमात होत्या, म्हणून वाचलेल्या. आणि नंतर अभ्यास बाजूला ठेवून रसिक वाचक म्हणूनच वाचाव्याशा वाटलेल्या.

हे सगळे मनात उचंबळून आले. प्रवाहाबरोबर तर क्वचित् प्रवाहाविरुद्धही जाताना आलेले अनुभव किंवा आता या विशिष्ट जागी, विशिष्ट उंचीवर मागे वळून बघताना संपूर्ण मराठी साहित्याबद्दलच, निदान मराठी कथेबद्दल तरी बापूसाहेबांना जिव्हाळयानं बोलावसं वाटेल का? तेही माझ्यासारखीशी, अशी थोडी धाकधूक होतीच. मनात दोन टप्पे ठरवले होते. एक, त्यांचा काळ—त्यांचे लेखन. आणि साठ साला-नंतरचा काळ नि त्यानंतर आताचा, ज्यात मीही स्वतः वेडेवाकडे लिहितेच आहे. या दोन टप्प्यात काही जोडून ठेवणारा क्षीणसा तरी धागा आहे का? हा प्रश्नही. 'प्रश्न' टाळायचा होता तरी मनात आलाच. 'बापूसाहेबांचा काळ नवकथेच्या जडणघडणीचा. नवकथेची तशी सुरुवात त्यांच्या-पासून झाली, असेही म्हटले जाते. ती कथा नवी होती, ती त्यात मनोविश्लेषण आले म्हणून फक्त की आणखी काही? मग नवकथेचे शिल्पकार म्हणून अरविंद गोखले, भावेंचे नाव आहे. मला तर आता दि. बा. मोकाशींची कथा जितकी नवी, जितकी ताजी, जितकी नित्यनूतन वाटते तितकी एक पु. भा. भावे सोडले तर कुणाचीही वाटत नाही. काळाचे पाणी ओघळून गेल्यावरही ती कथा अम्लान राहिली आणि बापूसाहेबांनी लिहिले की कथा नवीन वगैरे नसते. ती जुनी नवी वगैरे असते हे मी मानत नाही. मी प्रवाहाचे सातत्य मानणारा आहे. कथा 'लघुकथा' असते. नवी जुनी नाही.

हा सगळा कोलाहल डोक्यात होता. पुन्हा सारखे वाटत आले होते की कुठल्याही साहित्य प्रकारात त्याच्या मोडतोडीचा नि पुन्हा नव्याने घडण्याचाही एक काळ असतो. त्या काळात कथा नवी भासते. पण त्यानंतर ओहोटीसारखी त्याला शिथिलता येते. सध्याच्या कथा—वाङ्मया-बद्दलही खूप ओरड आहे की, लेखन सवंग, सोपे करून टाकलेले आहे. भारत सासणेंची प्रदीर्घ कथा हे त्याला काहीसे उत्तर आहे का? की कुणालाही अनुकरण करता न आलेली जी. ए. ची कथा. दीर्घकथा हा फक्त आता एक दीपस्तंभच होऊन राहणार आहे का? मग दिसायला सोपी पण आत शिरले तर भोवऱ्यात सापडल्यागत होणाऱ्या मोकाशींच्या, भाव्यांच्या कथांचे काय? हे सगळे उलट सुलट विचार मनात घोळवत बापूसाहेबांसमोर बसले होते.

बापूसाहेबांनी क्षणभर माझ्याकडे पाहिले. मग समोर बघत ते म्हणाले,

तूं कोण आहेस?

[वामन चोरघडे यांचे कथाबीजाचे एक टिपण]

आज पुन: एकदा दिसलीस - तसेच
दिसलीस. मला कितीदां वाटलं, तुझं नांव
विचारावं!
तूं दिसलीस की, माझे मन सतारतारांनी
झंकारतं!
तूं सुंदर नाहीस पण —
टपोरें मोगऱ्याचें फूल जर सुंदर असेल
तर जगांत तूं सगळ्यांत सुंदर आहेस
सर्व मर्यादा संभाळून,
तुलाहि नकळत,
तुझें रूप, गंध, मी मनसोक्त लुटला आहे
तूं कुणी का असेनास, सुरवी [illegible]
तुला कधी कांहीहि होऊं नये.
अशीच दिसलीस तर पुन: एकदा
असाच वेध लावून पुन: डोळेभरून
बघून घेईन —
जसें चांदण्याकडे बघावें!
चांदण्याला काय मागतात लोक?
तिचे तेज, तिचा धवलिमा!
येवढेच!
तूं सुरवी होस!

७.४.१९५२
रात्री १०.३० वा.

[लिहून झालेल्या कथेचे कथाबीज]

20. 3. 67

नर्मदा.
धिरे धिरे आइ बदरिया.
Some such tunes
नर्मदेचें नांव तिच्या आईबापांनी ठेवलें
तें कां?
तिचें यौवन, ध्यान केलें तर दिसेल.
पिकलें केळें, नारिंग. (संध्याचे पाय)
"गाणं म्हटलं नाहीस? रागावलीस?"
"नाही रे, कसं समजलं?"

दोन कथाकार : एक भेट

: वामन चोरघडे /आशा वगे

'मी संवाद वगैरे मानत नाही. तू म्हणतेस ते पिढीचं अंतरही मला अभिप्रेत नाही. एक निर्मितीक्षम कलावंत दुसऱ्या कलावंताची भेट घेतोय, असं म्हणू या !'

मी मनोमन थरथरले बापूसाहेबांनी माझा केवढा तरी सन्मान करून टाकला. मला ते पटलेलं बघून ते हसले नि हळूहळू ओघ सुरू झाला. तो ओघ गंगौघ होता. ते मला बापूसाहेब बोलायचे थांबले तेव्हा कळलं. गंगा कुठून कुठून वाहते, काय बरोबर नेते नि काय गाळासारखे तटावर टाकते, सगळा प्रवाह आपल्याबरोबर घेऊन पुढे पुढे वाहते, तसे ते बापूसाहेबांचे बोलणे.

त्यांना 'तुमचा अनुभव मोठा' असे मी प्रथम म्हणाले–ते पटले नाही. म्हणाले, की 'ऑस्कर वाईल्ड म्हणतो की आपल्या चुकांना माणूस अनुभव म्हणून गौरवतो ते खरं आहे' कुणी म्हटलं की अंधारात जाण्याचा तुम्हाला अनुभव नाही की मला राग येतो. अनुभव हा शब्द आम्ही लेखकांनी खूपच गुळगुळीत करून टाकला.'

मला जाणवले की मला अनुभवाचा हा नवा अर्थ खूपच भावला आहे.

'तुम्ही म्हणता ते पिढीचं अंतरही मला पटत नाही.' ते म्हणाले, Man is a Product of time असं एक प्रवाह मानतो. तर आपल्याकडे 'राजा कालस्य कारणम्' असं ठामपणे सांगितलं गेलंय्. खरी गोष्ट अशी की आपण आधीच्या लोकांच्या खांद्यावर उभे असतो. तिथून आपल्याला अधिक उंच बघायचे असते. विनोबा म्हणायचे की एखादी गोष्ट तिच्या अनेक अंगांनी समोर येते, कळत जाते जसा जसा काळप्रवाह पुढे सरकतो. तसतशी. काळ जाणवतो तो असा. इथेच. शब्दही असाच समजून घ्यावा लागतो. सखोल, नि त्याच्या अनेक कळांसह भिडावा लागतो. 'साद' या त्यांच्या पुस्तकातील 'अक्षरी विलसलेले रूप' या लेखाबद्दल ते बरंच बोलले. 'निष्ठा' हा शब्द त्यांना कसा हळूहळू स्थिरपणे समजत गेला हे त्या लेखात सांगितले आहे. कथा सुचते कशी ? कथेची कहाणी कशी ? कोणती ? याबद्दल त्यांनी, इतरत्र बरेच लिहिलेय्. आताही बोलले. काही लेखी टिपणेही दिलीत...

सुचलेली कथा कल्पना लिहून ठेवण्याची सुंदर कल्पना हे तर मूर्तिमंत काव्यच. मग आठवलं की अरविंद गोखलेंनीही एकदा स्वतःच्या कथाबीजांबद्दल लिहून ठेवताना अशीच काही टिपणं लिहून ठेवलीत. कधी कधी मीही काही सूचक खुणा, ज्या माझ्या मलाच समजतील, अशा नोंद करून ठेवत असते. कुठंतरी बरं वाटलं.

ते म्हणाले,"तसा तर प्रत्येकजणच आतून लेखक असतो. प्रत्येकाजवळ इतरांना दुसऱ्यांना सांगण्यासारखे काही तरी असतेच. पण कलावंत, लेखक ह्या सर्वसामान्य निवेदकापासून वेगळा होतो, जेव्हा एखादी गोष्ट तो आपल्या दृष्टीने बघतो. एकदा एक मुलगी आली. माना वेळावत म्हणाली, "मी एक कथा लिहून आणली आहे. सत्य घटनेवर आहे. मी ती घटना ह्या डोळ्यांनी बघितली आहे." इ. इ. मी ती कथा वाचली. तिला सांगितले की तू चांगलं लिहिलेलं नाहीस. हे लिहिणं काही खरं नाही. ती घटना तू पाहिली आहेस ह्यालाही काही अर्थ नाही. दृष्टी नि डोळा ह्यांचा संवाद व्हायला हवा. तो झाला म्हणूनच व्यास, वाल्मिकी झाले. तुझं हे लिखाण प्रसिद्ध जरूर होईल. पण ते त्या तोलाचं नाही."

दीर्घकथा बापूसाहेबांना भावत नाही. कथा म्हणजे लघुकथाच त्यांना अभिप्रेत आहे. दीड पानी कथाही त्यांनी लिहिल्या. सूक्ष्मतेत अनुभवाचे (हा शब्दही त्यांना नको. पण इलाज नाही.) आकाश तोलणारी कथा त्यांना हवी आहे. इथे आठवून जाते ओ हेन्री, चेकॉव, गोपासा यांची कथा. आणि पुन्हा मोकाशांची 'बालगंधर्व'

'मयसभा' आदिकथा या कथा मोपासांच्या 'ट्रॅप' या कथेबद्दल बापूसाहेब खुलून बोलले. या कथातील अखेरची चमत्कृती ही फक्त कथा चटपटीत करण्यापुरती नाही. तर त्यात या चमत्कृतीने संपूर्ण मानवी जीवनाचा वेध तोलून धरलेला आहे. इथे फक्त माणूसच उरतो. देशकालाचे भान वगळून मूलभूत माणूस. पण ते विसरून नुसते चमत्कृतीपूर्णच लेखन, त्या त्या कालापुरती असलेली ती पोकळ चमत्कृती, तो काळाचा कस संपला की भुसा व्हावी असे निःसत्त्व होऊन जाते... बापूसाहेबांच्या बोलण्यात जिव्हाळा, कळकळ होती.

आज माणसाचा माणसाला विश्वास उरला नाही. एक माणूस दुसऱ्याशी जोडून आहे. त्यांना एकमेकांची गरज आहे असेही वाटत नाही. या काळाची एक सर्वंग मूल्यहीनता तशी संपूर्ण मराठी साहित्यालाच भोवली. पण तशी कथेच्या सूक्ष्मतेमुळे नि लवचिकतेमुळे ती कथेलाच अधिक भोवली का? असं विचारलं तर म्हणाले की; "कथेपेक्षाही ती जास्त मराठी समीक्षेलाच भोवली. आजकाल कुणी कुणाचं काही वाचूनच घेत नाही. आमचा काळ वेगळा नि सोपा होता. वाचणारे, समजून वाचणारे होते. कुणाकरता लिहायचं?' असा जीवघेणा प्रश्न नव्हता समोर. चांगली जाणती मासिकं होती. ती संख्येनी कमी होती हे महत्त्वाचे म्हणून मासिकांना साक्षेपी राहता आले. धडपड करावीशी वाटायची. वाचावे खूप नि लिहावे खूप अशी उमेद होती. आजकाल लोकांना वाचणे नको. व्यासंग नको. टी. व्ही. नेच हे झाले असे मी मानत नाही. काळच वेगळा आला आहे. कुठल्या गोष्टीसाठी काही किंमत द्यावी लागते. त्या त्या गोष्टीची ती ती मागणी असते, हेच मुळी पटत नाही."

दलित कथा व ग्रामीण कथेमध्ये मात्र त्यांच्या मते एकसुरीपणा आलेला आहे. 'सोसणे' हेच फक्त उत्तम साहित्याचे भांडवल होऊ शकत नाही. त्या तुलनेत मध्यमवर्गीय कथाच आता थोडी जीवनस्पर्शी व भेदक व्हायला लागली आहे.

आत्मचरित्र कां लिहावंसं वाटलं? असं विचारलं तर म्हणाले की, "आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली की आत्मचरित्र लिहावंसं वाटतं. पण माझं आत्मचरित्र एका वेगळ्याच गरजेतून लिहिल्या गेलंय्."

पण आत्मसमर्थन आत्मचरित्रात नको ना? असं विचारलं तर त्यावर ते नुसते हसलेत.

गेल्या दशकातल्या कथालेखकाबद्दल आणि सध्या लिहित असलेल्या लेखकांच्याबद्दल विषय निघाला तर म्हणाले की, "ते कसं लिहितात, हे काळच ठरवील." माझ्या "मनात रुजलेल्या घरासारखी" भारत सासण्यांची कथा, दीर्घकथा मात्र बापूसाहेबांनी वयामुळे फारशी वाचली नाही. त्यांना म्हणाले तर ते 'अजूनही वाचायला आवडेल' असे म्हणाले. कधी तरी मला खास आवडलेल्या कथा त्यांना वाचायला देऊन किंवा वाचून दाखवून त्याबद्दल, खूप माणसं, त्यांच्या खास दृष्टीने पहिलेल्या बापूसाहेबांशी, बोलायला मला फार आवडेल. नवीन म्हणून ज्यांना लेबलं चिकटवली आहेत ते सर्व विषय त्यांनी हाताळले आहेत. अजूनही लिहायची असलेली, राहून गेलेली, वयामुळे किंवा तशीही राहिलेली कथाबीजं त्यांच्याजवळ पडलेली आहेत. लेखकाच्या Creativity वरचा त्यांचा विश्वास अभंग आहे. तो संपतच नाही. 'आता सुचत नाही लिहायला' म्हणणारे लेखक त्यांना पटतच नाहीत. सर्जनाची क्रिया ही अव्याहत असतेच असते. आता वयानुसार त्यांना लिहिता येत नाही. काहीही करता येत नाही. बाह्यतः लेखक म्हणून त्यांनी निरोप घेऊन टाकलेला आहे. पण त्यांची आतली Creativity तशीच आहे. वाचनही मंदपणे तेवणाऱ्या वातीसारखे सुरू आहेच. अजूनही त्यांना कथाबीजे सुचतच असतात. कुणी लिहून देणारं, मनातलं उतरवून घेणारं माणूस मात्र हवं; कारण विचार पूर्वीसारखे सुसूत्र शब्दांनी उमटत नाहीत. आतल्या आत मात्र एक अखंड गंगौघच आहे. ते थांबले.

मद्याचे उतरते ऊन संपले होते. बाहेर संध्याप्रकाश पसरला होता. ती संध्याकाळ खोलीभर झाली होती. त्या सांजसुरात त्यांनी आपली 'भावना' ही कथा वाचून दाखविली. कथा त्यांना हवी तशी लघुतम, लहानशी कथा होती.

"गंगेचं दर्शन घेणारा, गंगास्नान करणारा एक इच्छुक. तेही पहिल्यांदा नव्हे. गंगा ही स्त्रीरूपिणी, कालिदासाचं तर राहो पण गंगाष्टक लिहिताना शंकराचार्यांनीही तिच्या स्तनमंडलाचंच सौंदर्य दाखविलं. स्त्रीला फक्त असंच बघणारा, दाखविणारा इतिहास मनात जपलेला माणूस जेव्हा हे गंगादर्शन घेतो, तेव्हा त्या साऱ्या कल्पना धुवून निघतात."

त्यांची ही छोटीशी कथा. लताबाई तीन मिनिटांच्या गाण्यात सुरांच्या सागराचे दर्शन घडवितात तसं हे जीवनदर्शन. क्षितिजाला दूर टेकलेला वाटलेला आता संध्याकाळचा सागर. नि मी किनाऱ्यावर उभी. मी हळूच उठले; पुटपुटले, 'निघते.'

'काही हाती सापडलं का ?' ते म्हणाले. मी हसले. माझे प्रश्नं, मी ठरविलेले टप्पे, त्यांची मनाशीच मी ठरविलेली काहीशी आग्रही उत्तरं. हे सगळं कुठं होतं ? भरतीचे पाणी वाहून गेल्या॰ वरच्या सरकत्या वाळूत मी उभी होते. बापूसाहेब म्हणाले होते तसं खरंच एक निर्मितीक्षम कलावंत दुसऱ्या एका कलावंताला भेटला होता. पण हा दुसरा कलावंत सर्वात खालच्या पायरीवर होता. सर्वात वरच्या पायरीवर बापूसाहेब होते. मधल्या पायऱ्या मी चढलेल्या राहतील असे कधी होईल ? शेवटी अगदी निघताना ते म्हणाले,

"माझं सांगणं म्हणून असं लिही की, "आपण एकमेकांच्या खांद्यावर उभे असतो. मराठी कथा शंभर वर्षांची घरली, तर ही पिढी सहाजणांच्याही वर उभी आहे. पण दुर्दैव हे की तुम्ही लोक वर बघत नाही, खालीच बघता. म्हणून ही पाळी येतेय्."

आले तेव्हा ऊन उतरत होतं. बाहेर पडले तेव्हा चंद्राची कोर आकाशात दिसली. मधल्या वेळात मात्र १९३२ सालापासून बापूसाहेब लिहित होते तेव्हापासून तो आतापर्यंतचा काळ... गंगौघासारखा...खळाळत होता. ■

'सुगंध' धरमपेठ, नागपूर, १०

वामन कृष्ण चोरघडे यांची कथासूक्ते

: प्रभाकर पुराणिक

गेली पंचाहत्तर वर्षे भावसंपन्न आणि शब्दसंपन्न असे आयुष्य सुप्रसिद्ध कथाकार वामन कृष्ण चोरघडे जगत आहेत. मुळातच माणसामध्ये भाव-भावनांची समृद्धी असणे हा एक योग आणि अशाना शब्दांची ऊर्जा प्राप्त होणे हा दुसरा योग. हे दोन्ही योग एखाद्या ललित लेखकाला किती प्रमाणात प्राप्त झाले आहेत; हे त्याच्या एकूण लेखनसंपदेवरून कळते. ते बघता, वामन कृष्ण चोरघडे हे उभय दृष्टीने संदीप्त असे व्यक्तिमत्व आहे. शब्दांनी आणि भावनांनी, विचारांनी आणि वैपुल्यानी सतत उजळलेले असे ते लेखक आहेत.

मराठी भाषेच्या कथा क्षेत्रात त्यांनी क्रांती केली असल्याचे समीक्षक म्हणत असतात. त्यांच्या या शब्दक्रांतीचे समर्थनही केले जाते. समीक्षक आणि अभ्यासक यांच्या दृष्टीने ते योग्य असेलही. परंतु रूढ अर्थाने त्याला क्रांती म्हटले जाते तशी ती क्रांती नव्हे. जगद्व्यापी उत्क्रांतीमधील एक आनुषंगिक घटना घडली की फार मोठी क्रांती झाल्याचा आपल्यांला भास होतो. वास्तविक, ती क्रांती हा उत्क्रांतीचाच एक अनिवार्य भाग असतो. वामन कृष्ण चोरघडे यांनी आविष्कृत केलेली मराठी कथा म्हणजे मराठी भाषेच्या उत्क्रांतीमधील एक सुसंस्कृत घटना आहे. या घटनेला समीक्षक क्रांती म्हणत असतील असे वाटते.

मराठी भाषेचा गेल्या आठशे-हजार वर्षाचा विकासपट आपल्या नजरेसमोर आहेच. साहित्य रचनेच्या उत्क्रांतीत अशा सुसंस्कृत घटना घडलेल्या आहेत. त्या प्रत्येक घटनेला स्वतःचे महत्त्व आहे. योगयोगेश्वर ज्ञानेश्वरांपासून ते थेट ज्ञानपीठ पारितोषिक प्राप्त कुसुमाग्रजांपर्यंत अशा घटना घडल्या आहेत.

अलिकडे क्रांती हा शब्द अनेक क्षेत्रात फार सवंगपणे वापरला जातो. त्यामुळे क्रांती या शब्दाला कौर्याची कळा आली आहे. क्रांती या शब्दातून आक्रस्ताळेपणा व्यक्त होतो आहे. शब्दातून अफाट क्रंदन केले. म्हणजे क्रांती झाली असे समजण्याची आपल्याला एक सवय झाली आहे.

वामन कृष्ण चोरघडे यांच्या ललित लेखना-बद्दल कधी कधी असेही बोलले जाते की, त्यांनी ज्या काळात लेखन केले, तो काळ जागतिक क्रांतीचा होता. महायुद्धाचा काळ होता, सामाजिक उलथापालथीचा काळ होता व सगळे जग असे उशा-पायथ्याशी धडधडत असताना वामन कृष्ण चोरघडे यांनी आपल्या ललित लेखनातून त्याचा वेध घेतला नाही. त्या अर्थाने त्यांचा लेखन व्यवहार क्रांतीचा नाही. परंतु क्रांतीच्या अन्तिम उद्देशाचा मात्र आहे. प्रत्येक क्रांतीची घटना ही कुठल्या तरी शांतीच्या दिशेने वाहत असते. शांती हे उद्दिष्ट असते. वामन कृष्ण चोरघडे यांच्या या कथा उद्दिष्टाप्रत पोचलेल्या आहेत. स्त्री-पुरुषांच्या आयुष्यात सुखाची व्यवस्था कशी असावी हे सांगणाऱ्या त्यांच्या कथा आहेत.

अशा कथांमधून क्रांतीचा दैनंदिन तपशील सांगण्याची गरज नसते. तसे केले तर तो एक वृत्तपत्रीय अहवाल होतो. वामन कृष्ण चोरघडे यांच्या कथा तपशिलात रमणाऱ्या नाहीत, तर तात्पर्याची हळुवार उकल करून दाखवणाऱ्या आहेत. तात्पर्य हे नेहमीच नेटक्या शब्दात व परिणामकारक रीतीने सांगितले जाते.

जीवनातला नेमकेपणा शोधून सांगायचा म्हणजे संपूर्ण जीवन तर वाचावेच लागते, बघावेच लागते अनुभवावेच लागते. त्याशिवाय नेमकेपणा कसा शोधता येणार ? चार ओळीमध्ये जेव्हा एखादे तात्पर्य सांगितले जाते तेव्हा त्या चार ओळी कमवण्यासाठी, अनुभवण्यासाठी कितीतरी तप-शील वाया घालावा लागतो. शिवाय एखाद्या व्यक्तीला तपशील सांगण्यात रस नसतो,

त्यांचे कथावाङ्मय हे माणसाच्या जगण्याचे, मानवी संबंधाचे, मनुष्य आणि समाज यांच्या व्यवहाराचे, तात्पर्य सांगणारे आहे.

वामन कृष्ण चोरघडे यांच्या कथा या नुसत्या कथा नाहीत. ती कथासूक्ते आहेत. ते कथासूक्त एकदा मनात रुजले की मनोमन अनेक कथांना जन्म दिला जातो. इतर आपल्यात्र मनातल्या कथा मनातल्या मनात निर्माण होत जातात. हेच कथासूक्ताचे सामर्थ्य आहे.

निगद म्हणजे एक प्रकारचे आख्यान, जे मुखोद्गत करायला सरळ आणि सोपे असते. काही मंत्र असतात पण ते छंदोबद्ध नसतात, असे निगद. त्याच्या शैलीत नेटकेपणा आणि नेमकेपणा असतो. वामन कृष्ण चोरघडे यांच्या कथा अशाच अल्प अक्षरांच्या आणि सारवान आहेत. त्यांच्या कथांना कथा म्हणण्यापेक्षा कथासूक्ते म्हणणे म्हणूनच उचित ठरेल.

'वडसावित्रीचा सतत तीन दिवस कडकडीत उपवास करून नवऱ्याला मात्र रोज चारी ठाव स्वयंपाक रांधून वाढणारी स्त्री' असा त्यांच्या एका कथेत उल्लेख आहे. त्यांच्या कथांना सूक्ताचे रूप कशाने आले ते यावरून कळते. स्त्रीमधील मातृत्वाचे, त्यागाचे, संयमाचे, दातृत्वाचे सगळे सार त्या वाक्यात आले आहे. त्यांच्या कथासूक्तातून अशी अनेक अवतरणे देता येतील.

या सूक्तकथा सुलभ आणि सोपारी आहेत. त्यात कुठलेही भाव-भावनांचे राजकारण नाही कथेतल्या प्रत्येक पात्राने आपापल्या भावना अंतरात्म्याला साक्षी ठेवून सरळ सरळ सांगितलेल्या आहेत. प्रेम आणि पावित्र्य, शक्ती आणि संयम, गती आणि नियमन यासह विणलेली वामन कृष्ण चोरघडे यांची कथा आणि इतर वाङ्मय वाचणे हा एक निर्मळ व निरामय अनुभव आहे. ■

सरोज टॉकीज मार्ग
धरमपेठ, नागपूर, १०

गेल्या बीतलेल्या तीस–तीस वर्षापूर्वीच्या आठवणी याव्यात की येऊ नयेत ? आल्या तर त्या जोजवाव्यात की नयेत ? ज्या आठवणी येतात त्या मूळ रूप घेऊन येतात की नंतरच्या कालावधीत त्यांचे रूप बदलते ?

आणखी एक त्रास ! " जुने जाऊ द्या मरणालागुनी " ! असे करता येते का ? हे जुने, जाळून किंवा पुरून टाकता येते काय ? सगळेच अर्धवट ! पूर्वजन्म, पुनर्जन्म मानला, आजचे गणित आणि विज्ञान मान्य केले तर हे गाडणे, पुरणे कुठेच बसत नाही ! कधी तरी घडलेले कर्म कुठेतरी उगवतेच. कर्त्याला ते लिप्त करीत नाही. कुठेतरी असतेच. स्मृती हेही कर्मच की ! " रिकामपणची कामगिरी "–असे म्हणतात. कामगिरी म्हटली तर रिकामपण कुठले ? कर्म केल्यावाचून एक क्षणही घालविता येत नाही, सारे प्रकृतीच्या गुणानी बांधले असतात; हे ईश्वराचेच वाक्य आहे. काही न करण्याचे ठरविणे हे देखील योजनापूर्वक कर्मच होऊन बसते ! संकल्पाला म्हणूनच मानसिक कर्म म्हटले असेल का ?

ईशावास्य आदेश देते की, इथें कर्म करीतच एक नव्हे शंभर वर्षे जगायचे आहे. रिकामपणाला वाव नाही. ते शक्यही नाही. ईशावास्यात कर्त्याला वाव दिला आहे. ज्ञानाची वाट दाखवली आहे. योजनेचे दिग्दर्शन केले आहे. गीतेत तर स्पष्टच 'तू केले नाहीस तर तुझी प्रकृती करील. त्यापेक्षा तिच्या अधीन न होता आपणच करावे,' असे खडसावून सांगितले आहे.

'जडणघडण' या आत्मचरित्राच्या महाराष्ट्र टाईम्समधील परीक्षणात कु. द. दीक्षितांनी 'घरगुती बाबी, घराणे इ. संबंधातील जडणघडणदेखील त्यात यायला हवी' असे सुचविले होते.

'जडणघडण'च्या पहिल्या आवृत्तीत नसलेली ही 'जडणघडण' प्रा. वामनराव चोरघडे यांनी या अंकाकरिता उपलब्ध करून दिली. ती वाचकांना उपलब्ध करून देत आहोत.

प्रकृतिवश जर स्वस्थ होता येत नाही अन् ज्याला आपण काम म्हणतो ते करता येत नाही, तेव्हा आपण अगतिक होतो; पण प्रकृती बळावते. आत्मनाश इथूनच होत असावा. आपण करतो ते काम म्हणजे कर्म. आपल्याऐवजी प्रकृतीला जे करावे लागते तेही कर्मच म्हणजे नशीब. प्रकृतीने केले तरी भोगावे आपल्यालाच लागते. तोच कर्मभोग असेल काय ? " हासत कर्म करावे, भोगावे रडत तेचि परिणामी " असे मोरोपंत कधीचे सांगून गेले. पूर्वीचे कवी शास्त्रविद् होते. त्यांच्या शब्दांचा कीस आपल्या थिटया किसणीवर काढायचा तर तोही अपराधच ! त्यात विद्वता दिसेल; अर्थाचा मात्र लोप होईल. मोरोपंत सांगून गेलेही ! पण मला मात्र त्या ओळी गेली साठ वर्षे विसरता आल्या नाहीत. हे काव्य कशाचे ? जीवनाचे की मृत्यूचे की जाळण्यापुरण्याच्या अगतिकतेचे ?

सगळेच कसे आधे अधुरे होऊन गेले आहे !

आठवणी येतात; मनातून बाहेर येतात; त्या तरी का ? येतात तेव्हा पंचेंद्रियांपैकी कशातून ? डोळयातून की कानातून की स्पर्शातून की अवकाशातून की मन झाकून ठेवणाऱ्या मातीतून ? स्मृती जेव्हा समोर येऊन बसते तेव्हा तिची विचारपूस केली नाही तर ती त्रास मात्र देते. का आलीस ? कशासाठी आलीस ? असे सावर धरुन तिला विचारावे तर ती उत्तर देत नाही. एका ठिकाणी हवेचा दाब कमी आला तर इतर ठिकाणची हवाच ती पोकळी भरून काढतात. " तच्चेतसा स्मरति " ! पण का ?

आठवणींचा त्रास झाला तरी त्या त्रस्ततेत दुःखच असते असे नाही. एके काळी जे प्रिय असते किंवा अप्रिय असते तेच समोर येते तेव्हा सुखावून जाते एवढे खरे !

हा सगळा अट्टाहास एका काही तासाच्या छोट्या आठवणीपायी ! डोळ्यांना जणू दुर्बीण लागली आणि त्यातूनच ती स्मृती मोठी झाली.

तारीख आठवत नाही. सन आठवत नाही. व्यक्तीही नीटशी समोर येत नाही. रूप दिसते; परंतु त्याचे वर्णन करता येत नाही. नावाचीही गल्लत होईल. पण नामरूपाच्या पलिकडली देखील एखादी आठवण येऊ शकते हेही खरेच !

१९४९ ते १९५२ या दरम्यानचा तो काळ असावा. बहुधा ५१-५२ च ! भारत नुकताच कुठे स्वतंत्र झाला होता. काही तरी करावे अन् ते दाखवावे अशी उमेद आणि अहंकारही माझ्यात होता. आपल्या एकेका कृती उक्तीतूनच आपला देश मोठा व्हावयाचा आहे अशी एक व्यक्तिनिष्ठ विचित्र भावना मनाने अंगिकारली होती. पूर्वी जे पाहिले ते वेगळे दिसू लागले होते. ते सुंदर नसेल तर ते सुंदर करून दाखवण्याचे आपले कर्तव्य वाटत होते. यच्चयावत् सृष्टीला नवा अर्थ आल्याचा भास होत होता. सुख वाटत होते. आपल्यासारखाच कोणी सायीसहभागी मिळाला तर हवाच अशी हाव होती. कुरूपालाही सुरूप आले होते. काहीकाही, कसेकसे, वेगळे वेगळे दिसू लागले होते. आपत्तीतही जिद्द वाटत होती. 'ओ विंड, इफ् विंटर कम्स, कॅन स्प्रिंग बी फार बिहाइंड ?' अशी ललकारी

एक रात्र-किरणमयी !

: वामन चोरघडे

१७-३-८२

ओठी येत होती. दृष्टी दिपवणारा तो काल होता. अंधारालाही तिरीप होती. इथे अंधार आहे, हेही कळू लागले होते. असे दिपणे कधी हसविते, कधी फसविते !

आठवण अगदी साधी आहे. विषय क्षुल्लक, आशयही तसाच. पण तीस वर्षांच्या अवकाशात मोठा वाटू लागला आहे. खरे की वरे ठाऊक कुणाला ? एक सामान्य सरकारी हुद्देदार, जुन्या मध्यप्रदेशातली कागदपत्रे मिळाली तर नाव, गाव, रूप, काल यांचे दिग्दर्शन होईल. पण ते फारसे महत्त्वाचे नाही. त्यावेळी माझे एक मित्र होते, डॉ. प्रताप भांबल. मित्र म्हणून फार चांगले. त्यांना मी शिकवले की त्यांनी मला याबद्दल मतभेद आहेत. हा मित्र परदेशी, नायजेरियात उमेदीच्या वयामध्ये (१९६५) मला सोडून गेला. पण त्याच्या व माझ्या सख्ा तपाच्या मैत्रीला उधाणच आले होते. हा मित्र मला एक दुसऱ्या मित्राची ओळख करून द्यायला अकोल्याला घेऊन गेला. नव्या मित्राचे नाव मि. पॅट्रिक आलफ्रेड टोबिन. टोबिनबद्दल नीट व्यावहारिक माहिती मजजवळ नाही. दैनंदिनीत तर फक्त प्रसंग आहे. बाकी सर्व आपोआप आठवेल या भरवशावर सोडून दिले असावे. जे उघड आहे, सहजसाध्य आहे, ते डायरीत टिपून ठेवलेले दिसत नाही. एखादा शब्द, त्याचा अर्थ आपट्यांच्या संस्कृत कोशात आहे हे ठाऊक झाले; की शब्द उतरवून न घेता आपण कोश आपल्याजवळ ठेवतो. एखादा विद्वान स्नेही काही अर्थ शोधण्याचा आव आणून ताबडतोब परत करण्याच्या बोलीने कोश नेतो. शंभर टक्के, कोश परत येत नाही. कोणी नेला हे खूप आठवणीत ठेवण्याचा प्रयत्न

केल्यामुळे आपण विसरतो. असेच इथे झाले. एक तर कधी काळी टोबिन अनावरपणे माझ्या मनात येईल असे त्यावेळी वाटले नव्हते. वाटेल तेव्हा भांबलला विचारता येईल हा भरवसा. भांबल पुढे नायजेरियाला गेले. त्या वेळची माझी मित्रमंडळी अधिकारी वर्गात होती. पुढे ती नव्या मध्य-प्रदेशात गेली. १९६५ मध्ये ज्यांच्यावर माझी सगळी दरमदार होती ते डॉ. प्रताप भांबल गेले. मीही आपला मार्ग शोधत-शोधत या मंडळींच्या दूर-दूर गेलो. सगळेच विसरले गेले. विसरावे लागले आणि म्हणून एकेक असे आठवतात. अगदी साथीसवंगडयांसारखे ! कृषि-सचिव असलेले रामचंद्र मुराब आठवतात. त्यांचा सहवास आठवतो. रात्रीबेरात्री मोटार काढून शंभर-ऐंशी मैल फिरून आल्याची धुंदी जागी होते. अतिरिक्त सहायक आयुक्त (इ. ए. सी.) टोबिन आठवतात. त्यांच्याबरोबर घालविलेली रात्र आठवते. त्यांची आकृती दिसते. त्यांची घरवाली, त्यांची बछडीही समोर येतात. त्यांचे शब्दही आठवतात. फक्त स्थल, काल आणि व्यावहारिक बाजू आठवत नाही. त्यावेळी त्याची गरज वाटली नाही. आणि आता गरजही राहिली नाही.

या आठवणीला सगुण रूप द्यायला मी आता अकोला हे गाव धरून चालतो. अकोला हे जिल्ह्याचे गाव आणि श्री. टोबिन हे अतिरिक्त सहायक आयुक्ताचे नाव. प्रसंग घरगुती. ऐन दुपारी मी आणि प्रताप भांबल टोबिनच्या कचेरीत गेलो. साहेब आपल्या खुर्चीवर बसले होते. देखणा पण हरवलेला चेहरा. गोरा रंग. दिसेल भरेल अशी चमक असणारे डोळे. रेखीव अवयव. हस्तांदोलना-साठी ते उभे राहिले. उंची माझ्याएवढी !

"अरे टोबिनसाहब. मेरे इस अजीज दोस्त को यूंही मुलाकात के लिए लाया हूं। फक्कड आदमी है। ये कुछ फाईल्स देखना चाहते हैं। बडे आदमी हैं।"

टोबिनसाहेब उभे राहिले. अगदी औपचारिक हसले. त्यांनी हे ऐकले की नाही कोणास ठाऊक. आम्ही दोघे परस्परांकडे पहात राहिलो आणि भांबल आम्हा दोघांकडे.

कचेरीत जे काय बघायचे ते बघून झाले. मला खरे जे हवे होते ते मी भांबललाही सांगितले नव्हते. १९४७ च्या अगोदर त्यावेळच्या सरकारने आमच्यापैकी किती तरी लोकांची नावे काळचा यादीत टाकली होती. ती नावे अजून आहेत काय हे बघण्याचा उद्योग त्यावेळी आरंभला होता. पाहिलेल्या दफ्तींमध्ये मला ही यादी मिळाली नाही आणि मी जायला उठलो. फाईल्स बघेपर्यंत टोबिनसाहेब मजकडे बघतच होते आणि आपल्या सहकाऱ्याशी काहीतरी बोलत होते.

निरोप घ्यायला मी उभा राहिलो, तसा माझा हात धरून ते भांबलला म्हणाले,

"इथे आलात कधी ? दुपारचं जेवण कुठं झालं ? आज संध्याकाळी मुक्काम इथंच की जाणार ? राहणार असाल तर आजची संध्याकाळ माझ्याबरोबर हे तुझे मित्र घालवू शकतील काय ? मला फार वरं वाटेल."

"बाबा रे, तुझी संध्याकाळ मला ठाऊक आहे. ती रात्री साडेआठला सुरू होते आणि पहाटे दोन-अडीचला संपते. त्यांनाच विचार, मला काय विचारतोस ?"

सगळे संभाषणच इंग्रजीत होते. मराठीची ठेव माझी. उपचार संपला. मी निमंत्रण स्वीकारले. कै. प्रताप भांबलच्या स्नेहाने असले "संध्याकाल" मला परिचित होते. आणि त्यावेळी जे शिकता येईल ते मनात ठेवण्याची सवय झाली होती. अशाच त्या एका रात्रीचीच ही आठवण, तीच राहिली. बाकी विसरले गेले I

दुपारचे काम संपले. मुक्कामी गेलो. टोबिनसाहेबाशी बोलता येईल इतपत माहिती मी भांबल-कडून काढून घेतली. ख्रिश्चन मंडळींचे रीतीरिवाज मला ठाऊक होते. बुजरेपणा जाणवू नये, जाणवणार नाही ही खात्री होती.

सायंकाळी सहालाच मुक्कामावरून निघालो. क्लबवर जाऊन गप्पासप्पा, औपचारिक ओळखी-

पाळखी झाल्या. आणि दिलेल्या वेळेच्या अगोदर अर्धा तास आम्ही टोबिनसाहेबांच्या बंगलीच्या फाटकात उभे राहिलो.

अँग्लोइंडियन हा माणूस. कुत्रा असलाच पाहिजे. असल्या बऱ्याच मंडळींची रीत निदान भारतात तरी कुत्र्यांना माणसासारखे आणि माणसांना कुत्र्यासारखे वागविण्याची होती. दादाभाई नौरोजीं पासून तो थेट सुभाषबाबूपर्यंत सगळ्यांना ठाऊक होती.

टोबिनकडे कुत्रा नव्हता. एकटी बंगली. आम्ही हाळी दिली. तसे साहेबच बाहेर आले. अंगात काळा आखुड बनियनसारखा सदरा ! खाली पँट, पायात चप्पल. उंचापुरा देह. एक उडी मारून यावे तसे ते आले. आणि आमच्या दोघांच्या खांद्यावर हात ठेवीत आत घेऊन गेले. इकडच्या तिकडच्या गप्पा सुरू झाल्या. गृहस्थ अघळपघळ बोलत होते. आठवणीही छान होत्या. शिवनीच्या, मंडल्याच्या, झाडाझुडांच्या ! गप्पात कसलाही विखार नव्हता. बोलण्यात संकोच नव्हता. वक्त्याने काय बोलायचे ते ठरवून, तशी बोलण्याची ढब होती. बोलताना डोळे चमचमत. पण सगळे जसे मोजले मापलेले. अगदी पूर्वनियोजित. मधूनमधून दिवालीच्या घड्याळाकडे गृहस्थ बघायचा.

"अहो, तुमचं नाव विसरलो. अजून काही माझ्या तोंडी बसलं नाही. मला एकदा लिहून द्या आणि उच्चार दोन–तीन वेळा करवून घ्या."

"अरे मारो गोली ! असल्या संध्याकाळी हे नावाचं लफडं बंद ! अरे, नामसे तुमको क्या करना है ? हम इनको मास्टरजी कहते हैं। तुम भी कहो। और ए मास्टरजी, ये हमारा लालसाहब है। हम काले हैं; ख्रिश्चन होकर भी ! ये साहब ठेट गोरा है, और हमारा लालसाहब है।"

"हां, अब ठीक हुआ। बडी गडबड हुई जा रही थी, यार। ऐसा लग रहा था, की चाहत को मुश्कील में पडकर भूल न जाऊँ।"

लालसाहेब आता कुठे खरे मोकळे झाले आणि आम्ही दोघांनी औपचारिकपणाचे कपडे काढून टाकले.

पण इतके असून देखील लालसाहेबाचे लक्ष भिंतीवरील घड्याळाकडेच. बरोबर साडेआठचा ठोका पडला आणि गडी जागचा हलला. आत गेला. एक चटईसारखे खालच्या सतरंजीवर अंथरायला घेऊन आला. आम्हा दोघांना मोकळेपणी खाली बसायला सांगून पुन्हा आत ! तीन पेले घेऊन आला. तीन फडकी ! पेले मांडले गेले ! परत आत. अन् एक झबल्यातल्या इटुकल्या मुलीएवढी एक घिटुकली बाटली ! वरचे झाकण तेवढे चकाकत होते.

इतर सर्व वस्तू व्यवस्थित आल्या. लालसाहेब लगबग संपवून येऊन बसला. सरावाने मी बाटलीला हात घातला, तसे,

"आज तुम्ही माझे पाहुणे. मी स्वतः सगळं करायचं. रीत अशीच आहे. आनंद जागवायचा असेल तर उपचार सगळे व्हायला नको का ?"

मी जरा चमकून समोर बघितले. प्रताप भांबलची मला केलेली खूण जाणवली. हात आवरला मी. चार–पाच मिनिटे अशीच गेली अन् लालसाहेबांनी हळुवार गोऱ्या हाताने झग्यासहित ती घिटुकली तोलून धरली. अलगद तिचे तोंड उघडले. आणि खुणा बघुन बघून तीन पेल्यात सावकाश वानगीदाखल नमुना दाखवितात तेवढे मद्य ओतले. त्यांच्या सावकाशीने माझी उतावळी वाढली. मग तिन्ही पेले भरपूर पाण्याने भरले. तिघांच्या हाती आले. उपचार, सदिच्छा आणि पेले ओठाशी आले ! एकाच झपाट्यात माझा पेला अर्धा झाला. ते बघून पुन्हा–

"आपल्याजवळ खूप वेळ आहे. तो सगळा आनंदात घालवायचा आहे. एवढा पेला अजून अर्धातास पुरवायचा आहे."

मी हबकलोच. काहीतरी बोलायला तोंड उघडणार, एवढ्यात टोबिनने अगदी औपचारिक कुशलवार्ता सहज सांगावी तशा गोष्टी सुरू केल्या. आम्हा दोघांनाही त्यात काहीच भाग घेता येईना. कशीतरी वेळ मारून नेत होतो. मनात विचार आला, नभोवाणीवर पंधरा मिनिटांत भाषण संपवावे लागते. तेवढ्यात वहीची तेरा–चौदा पाने भरतील एवढे माणूस बोलतो. आणि इथे तर अर्ध्या तासाची नोटीस मिळाली आहे. आपणच बोलावे. कुठून सुरुवात करावी बुवा !

शेवटी दुसऱ्यांदा पेले भरले गेले. पहिल्या घोटातच बोलण्याची माझी खुमखुमी मला आवरेना झाली. मी भांबलच्या मांडीवर उगीचच थाप मारली. लालसाहेबांशी काही बोलतो तोच त्यांनी आपल्या खिशातून कागदाची घडी काढली.

" हे काय ?"

"काही नाही. नेहमीचंच आहे. आता इथून आपणा तिघांनाही बोलावंसं वाटेल. सगळ्यांनाच वाटतं. माझी तर ही रोजचीच सवय आहे. चार मंडळी आपल्याबरोबर आपण बोलावतो. कशाला ? आनंद सगळ्यांमधे वाटून घ्यायला. या वाटणीत आपल्याला दुप्पट, चौपट आनंद लुटायला हवा. माझा स्वतःचा अनुभव जरा वेगळा आहे म्हणूनही असेल कदाचित. पण मी चार–चौघे जमवून क्वचितच मद्य घेतो."

" अनुभव कोणता तुमचा ? सांगा की ! तेवढीच बोलायला सुरुवात होईल."

" या सुरुवातीसाठीच मी हा कागद काढला. पुष्कळदा काय होतं, प्रत्येक घोटाबरोबर माणूस जरा सैल होतो. सैलपण चाखायला तो स्वतःबद्दल बोलायला लागतो. पुष्कळदा खऱ्याखोट्या बढाया मारतो. इतरही त्यात सामील होतात. बळी पडतात. मग जमलेले सोडून इतरांच्या उखाळ्या–पाखाळ्या, त्यांच्या कुटुंबातील भानगडी, स्त्री–पुरुष संबंध; तारुण्य, जवानीच्या लांबलांब गप्पा सुरू होतात. बोलण्यावरून बोलणे वाढते. आवाज चढतात आणि ज्या आनंदासाठी आपण जगतो तोच विझून जातो, बुडून जातो असे म्हणा पाहिजे तर ! पुष्कळदा तर नाचण्या–गाण्यापर्यंत हैदोस होतो. मला चार–दोन बैठकांतच अशा प्रकाराची भीती वाटायला लागली. म्हणून मग–"

"म्हणजे तुमची भीती घालवायला तुम्ही आम्हाला बोलावलंत ? तुमच्या आनंदासाठी ना ?"

" आनंदासाठी तर खरंच ! पण माझ्या अन् तुमच्याही. गैरसमज करून घेऊ नका. तालतोल सुटला तर आनंदही सुटतो. संभाळला तर खरंच मजा वाटते. आपण शिकलेली माणसं. बहकलो तरी त्याच्यामागे काहीतरी संगती आपण शोधतो. विज्ञानाच्या जगात प्रत्येक गोष्ट विज्ञानाची जाण ठेवूनच करायला नको का ?" "मग काय आता विज्ञानाचे धडे सुरू होणार ?"

" नाही हो. असं काय अगदी चढल्यासारखे बोलता ? मी पहिल्याप्रथमच तुम्हाला घाई करू नका म्हणून सांगितलं. हे बघा, दुपारी मी तुम्हाला आमंत्रण दिलं. तुम्ही ते स्वीकारलं, लगेच मी तुमच्याबद्दल जुजबी माहिती काढली. तुमच्या आवडीचे विषय कोणते; ते जाणून घेतले आणि आपल्याला मिळणाऱ्या दोन-तीन तासाच्या आनंदात काय बोलायचं, काय जाणून घ्यायचं, हे ठरवून घरी येताच तासभर बसून मी हे टिपण तयार केलं. थोड्या इतर गोष्टींनंतर तुम्ही तुरुंगात गेला होतात त्या गोष्टी, नंतर अर्थशास्त्र, समाजशास्त्र, थोडंसं बायबल, थोडीशी गीता, असं या टिपणाचं स्वरूप आहे. हं, आता बोला ! तुरुंगात असताना आम्हा सरकारी अधिकाऱ्यांवर तुमचा खूप राग होता ना ?"

मी उत्तर दिले नाही. मला पटकन हसू फुटले. देवाला आळवायचे तर त्याच्या आवाहनाचे मंत्र, संकल्प जसे 'श्री सदाशिव प्रीत्यर्थे शिवकवच स्तोत्र जपे विनियोगः' असे सर्वत्र केले जाते. त्या सगळ्या गोष्टींची मला आठवण झाली. प्रात:संध्येला प्राणायामाला सुरुवात करायची तर 'प्राणायामे विनियोगः' असे म्हणावे लागते. पाणी प्यायचे तेही पाणी पितो असे सांगून. पाणी

सोडायचे तेही पाणी सोडण्याचा संकल्प करून. सगळी गंमतच! म्हणून काव्य! खरतर कर्मालाही काव्याने सुरुवात. हे विज्ञानात बसते? याची गरज आहे? आहेही अन् नाहीदेखील!

"अहो, हसायला काय झालं. सांगा ना? की दुसरं काहीतरी विचारू?"

"काही विचारू नका. मीच सांगतो. अशी संकल्पपूर्वक विचारणा-सवय नाही म्हणून हसू आलं. आता नागपूरला गेलो की विद्यार्थ्यांना प्रत्येक तासाला मी 'माझ्या प्रिय विद्यार्थ्यांनो, मी तुम्हाला आता अर्थशास्त्र शिकवणार आहे. सावधान चित्ताने ऐका.' असं म्हणून शिकवणार. तुमची आठवण आली आणि तिथे मी हसायला लागलो तर ती जबाबदारी विद्यार्थी नक्की घेतील. एखाद्यानं फार जिज्ञासा दाखवली आणि मी तुमची आठवण सांगितली तर हरकत नाही ना?"

तणाव एकदम कमी झाला. काय विचारू आणि काय सांगू इतका सैलपणा आला. गोष्टीवरून गोष्टी निघाल्या. टिपणातील मुद्दे तर एका तासातच संपले आणि पुढील तास-दीडतासात एकमेकाला विसरून एकमेकाशी बोलत राहिलो. स्वर्ग म्हणजे काय? आनंद का? डे आव् जजमेंट, कयामत, चित्रगुप्त...! संगमरवरी स्वच्छ फरशीवरून मोती घरंगळावे, जळात मीठ विरावे, दुधात साखर विरघळावी आणि दुरूनदुरून कुठून तरी सुवास यावा अन् तो कुठून येतो ही जिज्ञासाही विरून विरघळून जावी तसे-तसेच काहीसे-! या सगळ्या "विसरविजण्यात" एक जिज्ञासा राहिली होती. ती तृप्त करून घेण्याचा धिवसा उपजला. कशातही तळला, कशातही घोळला तरी माणूस स्वार्थी हेच खरे. ज्याचा जसा मगदूर त्याच लांबीरुंदीची त्याची जिज्ञासा हेही खरे!

श्री. प्रताप भांबल यांनी मला जेव्हा श्री. टोबिन यांच्याकडे नेले तेव्हाचा माझा अंतरीचा उद्देश वेगळाच होता. भांबलना उघडउघड विचारण्याचे मनात नव्हते. पण श्री. टोबिन यांच्याबद्दल वृत्तपत्रात काहीसे आलेले मी वाचले होते. संदर्भ आठवत नव्हता. वृत्तपत्राचा रोखही कळला नव्हता. पण टोबिन हे नाव लक्षात होते आणि ही व्यक्ती भेटली तर बरे असेही वाटत होते. खरे-खोटे ठाऊक नव्हते. पण या नावाच्या एका माणसाने एका छत्तीसगडी बाईशी लग्न केल्याचे स्मरण होते. टोबिनला पाहिल्यानंतर त्या बाईला पाहण्याची इच्छा होती. पण ती व्यक्त करणे बरे दिसणार नाही ही जाण होती. आज बुवा दिसला; पण बाई - जिज्ञासा ओबडधोबडच!

शेवटी विचारलेच.

"टोबिनसाहेब, तुम्ही एकटेच राहता इथं?"

"का हो?"

उत्तर काय द्यायचे? खोटेच बोललो. "नाही. मनात कल्पना आली मी सपत्नीक इथं आलो असतो तर-"

"अहो सफाई कशाला द्यायची? वृत्तपत्रांनी माझं नाव तर सर्वत्र पोचवलंच आहे. इथे आम्ही सगळेच राहतो. मी, माझी घरवाली, मुले. तुम्ही सपत्नीक आला असतात आणि त्यांना हिन्दी बोलता आलं असतं तर त्यांची गैरसोय झाली नसती. पण त्यासाठी तुम्ही मला विचारलं नाहीत!"

"खरं आहे. क्षमा करा. पण मुत्सद्देगिरीत मी हरलो. जिज्ञासा अशी की तुम्ही त्या बाईंना घरदार दिलं. तुमची किंवा तिची फसवणूक केली नाही. लोकांनी जे काय म्हणून घेतलं त्याची पर्वा केली नाही. मी खुश आहे. पण पुढे काय?"

"पुढे म्हणजे?"

"तरुण वयात माणूस वेगळाच विचार करतो. पुढच्या सर्व गोष्टींचे त्याला भान असतेच असे नाही. तारुण्यातील कृती ही उद्रेकच. पुढे परिणाम काय याची दखल घेत नाही आपण. काही वर्षे सुखात जातात. मनुष्याच्या वृत्ती स्थिर होतात. मुलेबाळे, पत्नी, सगे-सोयरे यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न मनात येतो. एक गंमत म्हणून सांगतो. मी मॉरिस कॉलेजात शिकत होतो. आमचे काही विषयांचे तास जवळच्या ॲनेक्स बिल्डिंगमध्ये होत असत. मुख्य इमारतीतून तिकडे जाताना रस्त्यावरच टेकडी-

समोर एक इंग्रज कुटुंब रहात होते. एक दिवस सहज जिज्ञासेनं पाणी पिण्याचं निमित्त करून मी घरात गेलो. एक आईसारखी दिसणारी बाई समोर आली. तिनं मला आत बोलावून आनंदानं पाणी प्यायला दिलं. पुढे वर्ष-सहा महिन्यात जरा अधिक ओळख झाली आणि एक दिवस मी विचारून बसलो की "बाई, तुम्ही अशा मला नेहमीच घरी दिसता. संध्याकाळी तुम्ही कुठे बाहेर वगैरे जात नाही का? तुमच्या समाजात तुम्ही मिसळत नाही का?" त्या बाईनं मला प्रांजळपणं सांगितलं, त्यांचे यजमान लष्करात होते आणि त्यांचा कलत्र वेगळा होता. स्थानिक समारंभामध्ये त्यांची माणसं त्यांना क्वचितच बोलावीत. ते ऐकून मला वाईट वाटलं. असा समाज उडत गेला, असं म्हणण्याइतपत मी लहान होतो. पण पुढे वाटू लागलं की त्या बाई मला जे सांगून गेल्या तेव्हा त्यांच्या बोलण्यात विषाद नक्कीच होता. समजा, तुमच्याही बाबतीत असंच काही घडलं तर-"

"पहिल्यापासूनच हा विचार माझ्या मनात होता. विधुर होतो. पण तरुण होतो. अधिकार, संधी भरपूर होती. पण उच्छृंखल वासना कशातरी पूर्ण करून घेणं मला तेव्हाही जमत नव्हतं. ह्याला एकनिष्ठ वगैरे म्हणण्याइतकी शक्ती माझ्यात नव्हती. मी सामान्य माणूस. कुणापुढे घडा ठेवावा अशी जबाबदारी माझ्यावर नव्हती. सुधारणा इ. मी जाणत नव्हतो. पण त्यावेळच्या सुखासाठी काही किंमत द्यावी लागेल आणि ती जबर असेल हे दिसत होतं. ती किंमत देण्याची धमक माझ्यात होती. मी धार्मिक नाही. पण माझ्यातला धर्म मला हे सांगत होता. हे मी तुमच्याजवळ कबूल करतो.

"मी निवृत्त झाल्यावर कदाचित मला असा त्रास होईल अन् माझ्या मुलांच्या आईला अधिक होईल. ती शिकलेली नाही. आकर्षकही नाही. समाजात मिसळायला जे काही हवं असतं ते तिच्यात नाही. संध्याकाळी माझ्याबरोबर फिरायला नेण्यात मला आणि येण्यात तिलाही संकोच वाटतो, हेही मी कबूल करतो."

"ते खरंच! पुढं?"

"पण खरं सांगू का? इतरांना जे दिसत नाही ते तिच्यात मला दिसलं आणि दिसतंही. तिच्याइतकी एकनिष्ठ आणि इमान जागं ठेवणारी व्यक्ती मला मिळाली असती असं मला आजही वाटत नाही. तुम्ही माझ्या दृष्टीतून तिला बघता म्हणून मी किंमत दिली हे तुम्हाला सुचतं. पण तिलाही काही किंमत द्यावी लागलीच असेल, असा विचार करून बघा. समाजाला मी सोडलं. कदाचित खरं असेल. पण तिनेही माझ्यासाठी तिचा समाज, तिची माणसे सोडली ना? कोणता समाज चांगला आणि कोणता नाही याचा कितीही विचार केला तरी आपापल्या परी जी किंमत मोजावी लागते तिच्यात तारतम्य भाव नसतोच. आकारात फरक असेल पण प्रकारात नसतोच. असे जेव्हा माझ्या मनात विचार येतात-"

"आता विचार येऊच देऊ नका. दुसरं काहीतरी बोलू."

"दुसरं काही तरी कशाला? हेच बोलू की. मलाही बरं वाटेल. एक क्षणभर थांबा. तुमचा पेला संपवा हवा तर! हा मी आलोच."

टोबिनसाहेब उठून आत गेले. एक धाकुली सानुली डुगडुगत आमच्यापर्यंत आली आणि तशीच लाजून आत पळाली. लालसाहेब आले ते काही कागद हाती घेऊन.

"आता संपवूच हा विषय. माणसानेच स्वतःच्या संकल्पावर फार विसंबून राहू नये. हे कागद बघा, मुदतबंद ठेवींची ही सर्टिफिकेट्स आहेत. मी असेन तिथवर माझी मुले, त्यांची आई यांना मी संभाळीन असं आज वाटतं आहे. मी नसलो तर हे कागद त्यांच्या उपयोगी पडतील. समाजाने खोटी सहानुभूती दाखवून त्यांच्याकडे बोट दाखवू नये इतपत तरतूद या कागदात आहे. तिच्या एकनिष्ठेला मी आजवर प्रतिसाद दिला आणि सामाजिक प्रतिष्ठेला ज्या दिवशी आम्ही दोघे एकत्र आलो त्या दिवशीच आम्ही दोघांनीही एकमेकांना कळेल अशा भाषेत तिलांजली दिली."

संभाषण वेगळ्या तऱ्हेत सुरू झाले होते. पण संपले तेव्हाची भैरवी–तिचे शब्द त्या कागदातल्या अक्षरावरच मला दिसले बैठक संपली. तिघेही उठलो. ज्याक्षणी खूप बोलावेसे वाटले त्यावेळेलाच बोलणे संपले हेच कदाचित संभाषणाच्या आरंभीचे विज्ञान असावे !

मैफिल जमवून मद्याचा आस्वाद घेतानाही संकल्पपूर्वक नियोजन करणारा हा माणूस जीवनाच्या विनियोजनात गाफील नव्हताच तर ! कुठल्यातरी तारुण्यसुलभ वासनेचे आपण बळी व्हायचे की ती वासनाच अशा मुलखावेगळ्या संकल्पांनी उन्नत करावयाची ? प्रश्नउपप्रश्नांचे मोहोळ आवरीत आम्ही दोघेही मुक्कामी आलो. रात्र डोळे उघडे ठेवून झोपण्यात गेली.

सकाळ झाली. इतरांची. आम्ही जागेच होतो. आत कुठे तरी काही तरी शोधत होतो, "जैसे डोळेयां अंजन भेटे" या अंजनाची चुरचुर बंद झाली की त्याला निरंजन म्हणतात का ? "माझा संकल्प"– "मी संभाळीन". पोषण नव्हे संभाळ. पोपणात अन्न, संभाळण्यात अन्न नि अन्नूही !

श्रेयोहि ज्ञानमभ्यासात् याचा अर्थ काय ? अभ्यासात् ही पंचमी न घेता तृतीया घेतली व विनोबांसारखे 'अभ्यासे लाभते ज्ञान' असे घेतले तर . . . तर कसे बरे वरे वाटते. टोबिनच्या वायबलात देखील संकल्पाआधी अन् नंतर असे बांधलेले वाक्य असेलच की !

खरे म्हणजे त्या दिवशीचे कर्मफल डोळ्यापुढे काजवे चमचमण्याचे ! पण चमचम काजव्याची नव्हती – रात्रीला उजळून टाकणारे निळे निळे किरणच ! त्या किरणातच एका आगळ्या टोबिनचे दर्शन !

पुढे भेट नाही, बोल अबोलही नाही !

परवा जुन्या जाणत्यांकडे चौकशी केली. कळले की आम्हाला दिसलेले, भेटलेले आमचे लालसाहेब १९५३ मध्ये मेयो हॉस्पिटलमध्ये महिना दीड महिन्यांचा आजार काढून गेले !

सर्वांसाठी सतत रावता झालेला तो पूर्वनियोजित मार्ग आरंभापासून ज्याला दिसतो तो ज्ञानी ! दिसत आहे हे ठाऊक असूनही जो बघण्याचे टाळतो तो कोण ? तो मीच ! ■

[नागपूर, १८–४–८२ शुद्ध प्रत २८–४–८२ लेखिका चि. अंजू राजे.]

अनुवादकांकरिता–

वाङ्मय अनुवाद म्हणजे खरे तर संस्कृतींचेच भाषांतर.

युगवाणीतून विभिन्न संस्कृतींची ओळख अनुवादित वाङ्मयातून होणे युगवाणीस हवे आहे.

विभिन्न भाषेतील महत्त्वाच्या लेखनाचे अनुवाद मूळ लेखकाच्या परवानगी-सहित पाठवावेत. अनुवादकविषयक लिखाणही.

अनुक्रमणिका

तत्कालीन राजकीय व्यक्तींचा, घटनांचा व घडामोडींचा उल्लेख चोरघडोंच्या कथातून अनेक तऱ्हांनी येतो. पैकी एक तऱ्हा अशी की, ते त्यांच्या अलंकारांमध्ये उपमानांसारखा वा दाखल्यांसारखा या सर्व गोष्टींचा वापर करतात.

'महायात्रा' या कथेत एके ठिकाणी असा उल्लेख आहे "मँचेस्टरचे व्यापारी जितक्या शिताफीने हिंदुस्थानची माणसे त्यांच्या धंद्यासकट गट्ट करीत आणि तोंडावरचे अवघे रक्त संभावितपणे पुसून टाकीत त्याचप्रमाणे देवीलाही करावे लागत असे" यातील उपहासगर्भ दाखला तत्कालीन राजकीय परिस्थितीतून स्फुरला हे उघड आहे. मँचेस्टरच्या कापडगिरण्यांची भरभराट व्हावी आणि भारतातल्या कापडगिरण्यांनी माना टाकाव्या यासाठी इंग्रज सरकारने ज्या अन्याय्य जकाती बसविल्या होत्या त्याचा व त्यातील कोडग्या नि लाजरेपणाचा येथे कथालेखकाने निसटता पण धारदार वापर केलेला आहे.

'त्याग' या कथेत आगगाडी एका स्टेशनवर थांबते. थर्डक्लासच्या डब्यात आधीच भयानक गर्दी असते. त्यातच गाडी थांबल्यावरोबर काही दाणगट माणसे आपल्या जाडजूड सामानासह आत शिरतात व सारा डबा आपल्या मवालीपणाने विस्कटून टाकतात. या घटनेचे वर्णन करताना चोरघडे एक वाक्य असे लिहितात–"त्यांनी आपल्या कर्तबगारीने डब्यातील वाचनालयाची १९४२ सालासारखी मोडतोड करून टाकली." आपापल्या वाचनात मग्न असलेल्या त्या डब्याची मवाल्यांनी केलेली दुर्दशा वर्णन करतानाच चोरघड्यांनी या दाखल्यातून बेचाळीसच्या स्वातंत्र्यचळवळीतले सरकारचे दडपणशाहीचे धोरणही मार्मिकपणे प्रकट केले आहे. १९४२ च्या चळवळीत चोरघड्यांनी सक्रीय भाग घेतला होता इतकेच नव्हे तर ते कारावासातही गेले होते, याचा उल्लेख एका प्रकरणात आलेला आहेच, याचे स्मरण द्यावेसे वाटते.

स्वातंत्र्यपूर्व काळातल्या घटनांप्रमाणे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या घटनाही चोरघड्यांच्या कथात अलंकरणासाठी उपयोजिलेल्या आढळतात. त्यांच्या 'क्रव्याद' या कथेत एक दाखला असा आहे– "म्हशीची जात कधीच कसल्या प्रकारची दखल घेत नाही म्हणतात. कोट्यावधी बायकामुलांची हत्या होत असता वक्तव्य काढीत स्वस्थ बसणाऱ्या पुढाऱ्यांप्रमाणे म्हैस आपल्या पुढ्यातला चारा खात असते." चोरघडे यांनी ही कथा १५–९–१९४७ साली लिहिलेली आहे. म्हणजे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बरोबर एक महिन्याने. भारताची फाळणी झाली होती. ब्रिटिश मुत्सद्यांनी द्विराष्ट्रवादाचा किडा बॅ. जिनांच्या डोक्यात घुसवून दिल्याचा तो परिणाम होता. त्यानुसार शेवटी हिंदुस्थान खंडित अवस्थेत स्वतंत्र झाला. पण एवढ्यानेही निभावले नाही. हिंदु–मुसलमानांच्या भयानक दंगलींनी व कत्तलींनी सारे स्वातंत्र्य रक्तलांछित होऊन गेले. त्यावेळी एक गांधीजी सोडले तर इतर सारे नेते स्वातंत्र्याचा आनंदोत्सव साजरा करीत होते. आपण फारच बेपर्वा झालोत असे वाटू नये म्हणून शब्दघेवडी वक्तव्ये काढत होते. 'आगळी माणसे' या आपल्या अगदी अलीकडच्या ग्रंथात प्रभाकर पाध्ये त्या दिवसांसंबंधी लिहितात–

"गांधीजींच्या जीवनाचा मी जेव्हा विचार करू लागतो, त्यांच्या जीवनातली एक घटना मला अत्यंत आकर्षक आणि अत्यंत अर्थपूर्ण वाटते. गांधीजींच्या समग्र जीवनाचे सार त्या एका घटनेने व्यक्त झाले असे वाटते.

"१५ ऑगस्ट १९४७ रोजी सारा देश स्वातंत्र्य संपादनाच्या सोहळ्यात दंग होता. नेहरूंसारखे पुढारी सत्तासंक्रमणाच्या दरबारी समारंभात निमग्न होऊन गेलेले होते. तेव्हा गांधीजी काय करीत होते ? तर कलकत्त्याच्या एका दंगलग्रस्त विभागात एका चंद्रमौळी झोपडीत तपश्चर्या करीत होते.

"आपण या देशात राम, बुद्ध इत्यादींच्या सत्तात्यागाच्या, वनवास स्वीकाराच्या, तपःसाधनेच्या गोष्टी वाचतो. पुष्कळदा त्यांचे मर्मग्रहण आपण साहित्यिक अगर धार्मिक भूमिकेवरून करतो. असे काही प्रत्यक्षात घडले होते काय, हा प्रश्न आपण कळत न कळत खुंटीलाच टांगून ठेवतो. Active suspension of disbelief – म्हणजे काय याचा प्रत्यय येथे येतो. विचार करणे

चोरघड्यांच्या कथांमधील तत्कालीन राजकारणांचे संदर्भ

: डॉ. श्रीधर शनवारे

[या अंकाकरिता डॉ. श्रीधर शनवारे यांनी त्यांच्या "श्री. वामन चोरघडे यांच्या संपूर्ण कथासाहित्याचा अनेकांगी विवेचनात्मक अभ्यास" या प्रबंधातून उपलब्ध करून दिलेला लेख.]

भागच पडले तर या कथा म्हणजे पूर्व मानवाच्या कल्पनाविलासाचा उल्लास होय, असे भाष्य करून आपण मोकळे होतो. पण १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्याला रामाचे अगर वुद्धाचे प्रत्यक्ष दर्शन घडले. माझ्या दृष्टीने ही घटना म्हणजे गांधीजींच्या जीवनातली सर्वात रम्याद्भुत अशी घटना आहे, आणि जितकी रम्याद्भुत तितकीच तत्त्वार्थपरिपूर्ण !"

गांधीजींविषयी अपार निष्ठा असणाऱ्या चोरघड्यांना गांधीजींच्या पार्श्वभूमीवर इतर नेत्यांचे वागणे किती किळसवाणे वाटले असेल ! त्या नेत्यांविषयीचा सारा तिटकारा त्यांच्यावर उल्लेखिलेल्या उदाहरणात उमटलेला आहे.

चोरघड्यांना काँग्रेसभक्त मानण्यात येते. हे मानणे तसे चुकीचे नाही. तथापि, काँग्रेसमधल्या अपप्रकारांवर आपल्या वाङ्मयातून टीका करायला चोरघडे कधी 'हिचकिचले' नाही., हे लक्षात घेतले पाहिजे. 'सत्याअसत्याची मन केले ग्वाही' हा दंडक वाङ्मयपूजक या नात्याने त्यांनी जोपासला. याची उदाहरणे त्यांच्या लेखनात इतरत्रही सहज व विपुल सापडतात.

असो. या आनुषंगिक विवेचनानंतर त्यांच्या कथांमध्ये येणारे तत्कालीन राजकीय संदर्भ आपण परत पाहू. सध्या अलंकरणाच्या स्वरूपात येणाऱ्या उल्लेखांचा विचार आपण करीत आहोत.

'रीतभात' या कथेत आगगाडीच्या प्रवासात लतिकाबाई मोकळ्या झालेल्या जागेवर झटकन् आपले गोरे पाय पसरवतात त्याचे काहीसे गमतीने वर्णन करताना चोरघडे लिहितात– "आणि पाय पसरण्याची व्यवस्था निजामावरील पोलीस कारवाईसारखी चटकन अमलात आली." स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री श्री. वल्लभभाई पटेल यांनी निजामाविरुद्ध केलेल्या पोलीस कारवाईतला वेग येथे चोरघड्यांनी मजेदार पद्धतीने वापरून घेतला आहे.

'औषधी जाह्नवीतोयम्' या कथेत विठी तिच्या नवऱ्यासाठी जे स्वेटर तयार करीत होती त्याचे वर्णन चोरघडे असे करतात – "मागच्या हिवाळ्यात विणावयास घेतलेला स्वेटर काश्मीरच्या प्रश्नासारखा टाक्याटाक्यांनी व गाठीगाठींनी विणला जात होता." काश्मीरचा प्रश्न सोडवायला लागत असलेला उगीचचा उशीर चोरघड्यांनी येथे नोंदवून टाकला आहे. लेखकाच्या लिखाणात तत्कालीन राजकीय संदर्भ येतात हे तर खरेच, पण त्यावरचे लेखकाचे मतही त्यातून सूचित होऊन जाते. किंबहुना, लेखक तो संदर्भ स्वतःच्या व्यक्तित्वाची डूब देऊन कसा वापरतो हेच खरोखर महत्त्वाचे असते. "he has his own parts and his own temperament, so that he sees things in a manner peculiar to himself...!" या मॉमच्या म्हणण्याचा मथितार्थ हाच होय. काश्मीरचा उल्लेख जो तो तिथल्या अलौकिक निसर्गरम्यतेसाठीच करताना आढळतो. अशा 'पृथ्वीवरच्या नंदनवनाचा' चोरघड्यांचा आठव मात्र काहीसा उदासीनतेने झाकोळलेला आहे. तत्कालीन राजकारणातला (व आजच्याही राजकारणातला) हा कुरपत राहिलेला प्रश्न एका हलक्याफुलक्या साम्य–दिग्दर्शनाखातर जरी कागदावर उतरल्यासारखा भासत असला तरी हृदयातली त्याची सल सुचवून गेल्याशिवाय राहत नाही.

'मजल' या कथेत खाजगी मोटार कंपनीच्या बसमधील प्रवासाचे चित्रण आहे. बसमध्ये चार

दहीवाल्या बाया समोरभागी आपली रिकामी मडकी सीटवर ठेवून खालीच बसल्या होत्या. त्यांच्या आवाजी गप्पांचे वर्णन करताना चोरघडे लिहितात– "मोजून चारजणी, पण नेहरूंच्या सभेला जमलेल्या श्रोत्यांसारख्या कलकल करीत होत्या." या उपमेतून बसमधल्या एका भागाचे वातावरण तर स्पष्ट होतेच, पण नेहरू–सभेच्या स्मृतीही वाचकांच्या मनःचक्षूंसमोर तरळू लागतात नेहरूंची ती लोकप्रियता, त्यांचे भाषण ऐकायला होणारी अफाट गर्दी, त्या गर्दीचा कोलाहल या साऱ्यांची आठवण जागी होते. 'नेहरू म्हणजे अलोट गर्दी' या आचार्य अत्र्यांनी मांडलेल्या समीकरणाचे स्मरण होते. वाचकाच्या मनाच्या घंटेतून एका टोलाबरोबर असे ध्वनि-तरंग उभे करण्याची क्षमता असलेले उपमान निःसंशय राजकीय वातावरणातले असूनही वाङ्मयीन दृष्टया श्रेष्ठ समजले पाहिजे. अर्थात, घंटेतून निर्माण होणाऱ्या नादलहरी ती घंटा कशाची वनलेली आहे यावरही अवलंबून असतात हे खरे आहे. खेड्यातील गाईच्या गळ्यातले लाकडाचे घाटरूही वाद देते; आणि मंदिरातील काशाची घंटाही वाद देते. पण त्यात केवढा फरक असतो! त्याप्रमाणे रसिकाची संवेदनक्षमता कुठल्या कोटीची वा प्रतीची आहे यावरून लेखकाच्या लेखनाला मिळणारा प्रतिसाद अवलंबून असतो. अर्थात, जेव्हा आपण एखादा वाङ्मय-विषयक मुद्दा मांडत असतो तेव्हा किमान रसिक वाचकाला डोळ्यांसमोर ठेवूनच मांडत असतो, हेही काही खोटे नाही.

चोरघड्यांच्या कथाविश्वात तत्कालीन राज-कीय वातावरण अलंकाराच्या रूपात कसे अवतरते याची काही उदाहरणे वर उद्धृत झाली. चोरघड्यांच्या आयुष्यातले पहिले वेड साहित्य-कारण व 'दुसरे वेड' राजकारण आहे. त्यामुळे भोवतालच्या राजकारणाचे पडसाद त्यांच्या साहित्यात उमटणे केवळ अपरिहार्यच आहे. मागे म्हटल्याप्रमाणे हे पडसाद तत्कालीन राजकारणाचे अनुकूल व प्रतिकूलही स्वरूप विशद करतात. एखाद्या राजकीय पक्षाची बांधिलकी स्वीकारून त्याच्या सर्व धोरणांची एकांगी तारीफ करीत राहण्याची कलाकार चोरघड्यांची भूमिका नाही, याचे प्रत्यंतर आपल्याला मागील विवेचनात आले व ते पुढेही अनेकदा येणार आहे. एखाद्या निर्मळ जलाशयात जसे काठावरील पर्णसज्ज व पर्णरहित अशा दोन्ही प्रकारच्या वृक्षांचे वा वृक्षराजींचे प्रतिबिंब पडते, तसे भोवतीच्या चांगल्या आणि माहात्म्य वाईट अशा दोन्ही प्रकारच्या राज-कारणाचे प्रतिबिंब लेखकाच्या लेखन–जलाशयात पडत असते. ते पडत असते ही गोष्ट महत्त्वाची. लेखनात कल्पनाविलासाचे कितीही महत्त्व आणि आपण मान्य केले तरी त्यामुळे वास्तवाधाराचे मोल अजिबात कमी होत नाही हेच खरे. T. G. William यांनी म्हटल्याप्रमाणे– "The pressure of social forces which has so profoundly altered our values in politics and economics has affected the arts as well. It would not be strange if it so, since art (and Literature especially) never has been an activity carried on the seclusion of the ivory tower."

तत्कालीन राजकारणाचा परिणाम : आणखी काही प्रकार :

तत्कालीन राजकारणाचा चोरघडे यांच्या कथावाङ्मयावरील हा परिणाम केवळ अलंकरणा-पुरताच मर्यादित नाही. इतर प्रकारांनीही तो ध्वनित होतो वा दिसतो. त्याचे स्वरूप कशा तऱ्हेचे आहे याचा आता विचार करावयाचा आहे.

'गोरी बायको' ही कथा चोरघड्यांनी १९४७ साली लिहिली. या कथेतील वातावरणही साधा-रणपणे याच काळातले आहे. दुसरे महायुद्ध नुकतेच संपले होते. पण 'शिमगा' संपला तरी त्यातले 'कवित्व' अजूनही टंचाईच्या व कंट्रोलच्या रूपात शिल्लक उरले होते. इंग्रज लोक एक पाय परतीच्या बोटीवर ठेवून सामानाची आवरसावर देशी मजुरांकरवी करवून घेत होते. भारताला दीडशे वर्षे भरपूर लुबाडून घेतल्यावर जाता जाता मजुराच्या हातावर दहा रुपयांची नोट ठेवणे त्यांना काही जड जात नव्हते. पण थोड्याशा कामाचे भरपूर पैसे मिळाल्यामुळे हिंदी

मजूर मात्र पाऱ्हावून जात होते. या साऱ्या तत्कालीन राजकीय वातावरणाचे चित्रण 'गोरी बायको' मध्ये पुढीलप्रमाणे आले आहे– "...कंट्रोल सुरू झाला होता. आणि तो तिला (सखूला) पोरांची आणि नवऱ्याची कामे लगबगीने करवीत होता. धान्य आणायचे. शिवाय आज काही कपडा मिळाला तिच्या कार्डावर तर तिला हवाच होता. दुपारच्या स्वयंपाकात आज मूळ वापरणेही भागच होते. डोमाची भाकर पोचवायची होती ती वेगळीच. कारण परवापासून त्याला पळभर फुरसत मिळाली नव्हती. एका गोऱ्या साहेबाची नोकरी संपल्यामुळे त्याच्या सामानाची विल्हेवाट लावावयाची होती. अंग मोडून काम करणाऱ्या डोमाला त्या साहेबाने दोन दिवसांच्या राबणीचे दहा रुपये देऊन टाकले होते. अगदी सहज रीतीने, कामाचे तास न मोजता! डोमाच्या हाती जणू जपान्यांप्रमाणे सिंगापूर आले होते! आणि आज सामान स्टेशनवर पोचविल्यानंतरही डोमाला पैसे मिळणारच होते. खरे म्हणजे तो साहेब मुलखावेगळाच. म्हणूनच हिंदुस्थान सोडून जाण्याची पाळी आली त्याच्यावर!"

आणि स्वातंत्र्य मिळून दोन वर्षे झाल्यानंतरची, म्हणजे १९४९ साली लिहिलेली चोरघडयांची 'ही काय माणसे आहेत?' या नावाची कथा वाचावी तर देशाचे करुणा–चित्र आणखीच काळवंडलेले आढळते. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा असे वाटले होते– "यापुढे या देशातील चिटपाखरू देखील जागे होणार! कणकण शक्तिमान होईल. कुणी कुणाला नाडणार नाही. कुणी कुणाला फसविणार नाही. कजाग बायका नवऱ्यांजवळ नांदतील. मध्यमवर्गाचे खर्च उत्पन्नाशी मिळतील. गरिबांचा पैसा चहा चिवडयात जाणार नाही. प्रेतांना पुरेसे इंधन मिळेल. कुणी म्हणता कुणी पाप करणार नाही. करील त्याला प्रायश्चित्त भोगावे लागेल. पुण्यवंतांना पुण्याचे फळ मिळेल. नळांना भरपूर पाणी येईल. गरीब आणि मुले श्रीमंतांच्या मोटारीखाली सापडणार नाहीत. तरुण सुवासिनी भरल्या घागरी डोक्यावरून आणतील. त्यांच्या कपाळावरील घामाचे बिंदू श्रमांनी व उत्साहाने सुंदर दिसतील..." पण ही सारी स्वप्ने तुटून–फुटून गेली. वाटले होते त्यातले काहीच घडले नाही. गरिबांच्या हालाला कुत्रा स्पर्शेनासा झाला– "देश स्वतंत्र झाला म्हणून काय झाले? देशाचे पंतप्रधान देखणे असले म्हणून काय झाले? हे लोक, याचे कपडे, यांची खपाटी गेलेली पोटे... हे सर्व काही अजून नाहीसे झाले नाही.

"हे पाहतात म्हणूनच यांना डोळे आहेत म्हणायचे, श्वास घेतात म्हणून चेहऱ्याला दोन छिद्रे आहेत म्हणायचे आणि आपल्या गरजा न बोलता दाबून ठेवतात म्हणून तोंडावर दोन फळयांचे दार आहे असे म्हणायचे."

चोरघडयांचा खरा पक्ष हा 'साहित्य–पक्ष' आणि खरा वाद हा मानवतावाद!

चोरघडयांचा राजकीय पक्ष कोणता, चोरघडयांचा साहित्यातील 'वाद' कोणता या प्रश्नांची उत्तरे इथे मिळतात. चोरघडयांचा पक्ष 'साहित्य–पक्ष' व चोरघडयांचा वाद 'मानवतावाद' हे त्याचे उत्तर आहे. कोणताही खरा कलावंत कोणत्याही वादाची व व्यक्तीची कड घ्यायला जन्माला आलेला नसतो. तो कड घेतो फक्त माणुसकीची. माणसाची अवदसा झालेली पाहिली की तो व्यथित होतो. 'What man has made of man!' या भावनेपायी त्याला उद्विग्नता येते. मानवतेचे हे दुःख मुखर करण्यासाठी तो कथा लिहितो. आपल्या वाटण्यात इतरांना सहभागी करून घेण्यासाठी तो शब्दांचे हाकारे देतो. 'माझिये जातीचा मज मिळो कोणी' असे मनोमन हुंकारत तो भोवताली पाहत असतो. अशा वेळी त्याचेवर कोणी अमक्यातमक्या वादाचा शिक्का मारला तर त्याचे त्याला वाईट वाटते; आणि मनाच्या शांतवनासाठी मग तो भवभूतीचा 'ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां जानन्ति किमपि तान्प्रति नैष यत्नः। उत्पस्यते स्ति मम को पि समानधर्मा कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी।' हा हवाला आधाराला घेतो! असो.

चोरघडयांच्या कथेत असे राजकीय संदर्भ, माणसाचे अन् त्याच्या श्वासोच्छ्वासाचे जे नाते

असते, त्या नात्याने येतात. आपल्या काळाशी कलात्मक समरसता त्यांना साधली असल्याचे ते लक्षण आहे. त्यांच्या कथेतील राजकीय संदर्भ म्हणजे काही अंगावर बाहेरून घातलेला शर्ट नव्हे, तर अंगावरची त्वचाच होय. ही अतूटता व अविभाज्यता त्यांच्या कथाविश्वाशी त्यांच्या काळच्या राजकारणाची आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या राजकारणापेक्षाही स्वातंत्र्यप्राप्तिपूर्व काळातील राजकारणाशी त्यांचे अधिक जिव्हाळ्याचे संबंध होते. आणि म्हणून त्यांच्या कथात १९४७ पूर्वीचे राजकीय संदर्भ अधिक गडद स्वरूपात आलेले आपल्याला आढळतात.

'न बदलणारे वातावरण' या कथेत स्वातंत्र्याच्या चळवळीचा काळ चित्रित झाला आहे. महात्मा गांधी, सत्याग्रह, त्यासाठी ६ एप्रिल १९३० ला त्यांनी आश्रमातून बाहेर पडणे, हिंदुस्थानच्या राजकारणातल्या त्या क्रांतिक्षणाकडे साऱ्यांचे लक्ष लागलेले असणे–असे ते वातावरण आणि त्याचवेळी कॉलेजात शिकत असलेल्या काही विद्यार्थ्यांचे 'This so called patriotism is nothing but a wornout sentiment fed by fools and exploited by hepocrityes.' असले मतप्रदर्शन या छाया–प्रकाशात्मक वातावरणात ही कथा रूप घेते; तत्कालीन राजकारणातील परस्परांना छेद देणाऱ्या वृत्ती चितारते.

'एक अनावश्यक गोष्ट' ही कथा विश्वास रानडे या क्रांतीकारकाच्या जीवनावरची शब्द-रेखाटने आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या शुभकार्यात गुंतलेल्या साठ–सत्तर लोकांचे जीव वाचविण्यासाठी स्वतःच्या मागे मुद्दाम पोलिस लावून घेणाऱ्या देशभक्ताचे चित्र चोरघड्यांनी या कथेत काढलेले आहे. ही स्वातंत्र्यसेवा साधता यावी यासाठी हा क्रांतीकारक आपल्या गर्भवती प्रेयसीला मागे सोडून भर जंगलातून, अंधारातून पावसातून, वादळातून चाललेल्या आगगाडीतून खाली उडी घेतो आणि प्रेयसी त्याला आशीर्वादाशिवाय निरोप देते. प्रियकराच्या जीवाला काही बरेवाईट झालेच तर त्याचे कार्य व त्याचा वंश वाढविण्याचे कार्य स्वतःकडे घेते.

स्वातंत्र्यासाठी पेटविण्यात आलेल्या धडधडत्या होमकुंडात पडलेल्या दोन समिधांची ही कहाणी म्हणजे तत्कालीन राजकारणाच्या एका अंगाचा जणू वाङ्मयालेखच होय, उद्या भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास लिहिला जाईल. इतिहासाचे अभ्यासक तो वाचतील. पण तेवढ्याने त्यांचा अभ्यास पूर्ण व्हायचा नाही. तो पूर्ण करण्यासाठी त्यांना अशा कथाही वाचाव्या लागतील. कारण इतिहासाच्या खडकाखालचे जिवंत झरे शेवटी शारदोपासकच दाखवीत असतात ! इतिहासात सन आणि नावे या खेरीज काही खरे नसते. उलट साहित्यात सन आणि नावे याखेरीज सर्व गोष्टी खऱ्या असतात, अशा अर्थाचे विधान केले जाते त्यातील मर्म हेच होय.

'अग्निदिव्य' या कथेत स्वातंत्र्याची चळवळ लढवीत असताना पत्करावा लागलेला तुरुंगवास चित्रित झाला आहे, हा तुरुंगवास आपखुषीने स्वीकारलेला असल्याने तसे त्याचे दुःख मानण्याचे काही कारण नाही. उच्च–उदात्त हेतूने तो पदरी बांधून घेतल्याने उलट त्याबद्दल मनात अभिमानाची भावना आहे. पण हे सारे तत्त्वज्ञान खरे असूनही रक्ता–मासाच्या संबंधाची ओढ त्याहून खरी असल्याचा आपल्याला प्रत्यय येतो. हा प्रत्यय शब्दबद्ध करणारी ही कथा आहे. तुरुंगातले राजबंदी दिवसभर तिथले कष्ट उपसतात. सायंकाळी पाखरे परतल्यावर थाळीत पडेल ते खाऊन ते आपल्या जागी जाऊन पडतात. तुरुंगाची भयावह भिंताडे बाहेर खबरदार उभी असतात. दाराचे मजबूत गज व भली मोठी कुलुपे सतर्कपणे पहारा करीत असतात. दुरून कुत्र्याचे भुंकणे कानावर पडत असते, आणि एका दिवटीच्या अपुऱ्या प्रकाशात झोपण्यासाठी धडपडणाऱ्या साऱ्यांच्या भावना घरच्या आठवाने भडभडून येतात. सारे व्याकुळचित्त होऊन जातात !

कठोर दगडी पार्श्वभूमीवर झालेले ते कोमल भावाविष्करण वाचले म्हणजे ख्रिस्ती मंदिरातली पहाडाच्या गर्दीत उभी असलेली करुणसुंदर मेरीची मूर्ती आठवते.

तत्कालीन राजकीय वातावरणाचे फिके-गहिरे संदर्भ स्वीकारून लिहिलेल्या चोरघडयांच्या अशा आणखी अनेक कथा आहेत, त्या तशा असणे स्वाभाविकच आहे. लोकमान्य टिळक एकदा म्हणाले होते, 'राजकारणाशी काही एक संबंध न येता साहित्यसेवेबद्दल सांगितले पाहिजे अशी अट घालणे म्हणजे भाजीत तिखट व मीठ हे पदार्थ घालण्याची मात्र मनाई करून ती भाजी चांगली चवदार झाली पाहिजे असे सांगण्याप्रमाणेच आहे. टिळकांचे हे मत 'एका राजकारण्याचे मत' म्हणून बाजूला करावे असे नाही. कारण त्याला साहित्यिकांच्या वाङ्मयकृतींचा आणि साहित्य-समीक्षकांच्या व्यासंगी विवेचनाचा विपुल आधार आहे, हे आपण पूर्वी पाहिलेच आहे.

समकालीन राजकीय संदर्भ हे वाङ्मयीन मूल्य मात्र नव्हे

एक मात्र खरे की, समकालीन राजकीय घटनांचा व घडामोडींचा वापर होणे याचा त्या वाङ्मयकृतीच्या कलात्मकतेशी काही संबंध असतो चोरघडयांनी त्यांच्या काळच्या राजकारणात सक्रीय भाग घेतला, त्यापायी ते तुरुंगात गेले, गांधी-विनोबादी राजकारणी नेत्यांच्या ते निकट संपर्कात राहिले आणि या साऱ्यांचा त्यांच्या कथा-लेखनावर स्पष्टास्पष्ट संस्कार झाला हे खरे आहे. पण ही काही त्यांच्या कथेची वाङ्मयीन वैशिष्टये ठरत नाहीत. फक्त वैशिष्टये ठरतात.

राजकीय संदर्भांना वाङ्मयीन गुणवत्ता कशी व कधी प्राप्त होते ?

त्यांच्या कथेतील या वैशिष्टयाला वाङ्मयीन पातळी लाभली की नाही हा स्वतंत्र प्रश्न आहे. आणि त्याचे स्वतंत्र उत्तर असे आहे की, त्यांच्या अशा प्रकारच्या कथा ह्या वाङ्मयदृष्टीने श्रेष्ठ आहेत. त्या श्रेष्ठ ठरल्या याची काही कारणे आहेत. एक कारण असे की, त्या काळच्या राज-कीय वातावरणात चोरघडे अक्षरशः विरून गेले होते. वाङ्मयकृतीच्या यशाला जे तादात्म्य लागते ते त्यांना या कथा लिहिताना सहजपणे लाभले. चोरघडयांच्या कथा नीट वाचल्या तर असे लक्षात येते की १९४२ साली गांधी तुरुंगात गेल्यानंतर तुरुंगाबाहेरच्या भारतात जो हलकल्लोळ माजला त्याचे चित्रण चोरघडयांच्या कथेत कुठेच येत नाही. कारण त्याकाळी चोरघडे हा 'उद्यम' पाहायला बाहेर नव्हते; तुरुंगात होते. याची खंत चोरघडे यांनी एक ठिकाणी स्वतःच व्यक्त केलेली आढळते. 'ललित' मासिकाच्या १९७२ च्या दिवाळी अंकात चोरघडे यांनी 'सुखिया झालो' या शीर्षकाचा एक आत्म-कथनपर लेख लिहिलेला आहे. त्यात ते म्हणतात, "त्यावेळी मी तुरुंगात होतो. आरंभीच ११ ऑगस्ट १९४२ ला मला सुरक्षित जागी म्हणजे तुरुंगात आणून ठेवल्यामुळे बाहेरच्या स्वातंत्र्य-लढयाचे करालविकराल रूप मला बघायला मिळाले नाही. उभ्या आयुष्यात ही एक उणीव राहून गेली. चोरघडयांचे हे अवतरण उद्धृत करण्याचे कारण असे की, जो अनुभव आपण घेतलेला नाही तो निव्वळ कल्पनेच्या भरवशावर चित्रित करण्याचा खटाटोप ते करीत नाहीत हे स्पष्ट व्हावे म्हणजेच असे की, जे त्यांनी अनुभवले त्यालाच त्यांनी शब्दाविष्काराच्या स्वाधीन केले. परिणामतः तादात्म्यातून सिद्ध होणारा कलागुण सहजपणे त्यांच्या कथेच्या पदरात पडला.

शिवाय असे की, राजकीय संदर्भ लाभलेल्या कथा ह्या त्यातील राजकारणामुळे श्रेष्ठ ठरत असून त्या कथेतील सजीव पात्रांमुळे श्रेष्ठ ठरत असतात. चोरघडयांच्या 'एक अनावश्यक गोष्ट'-मध्ये विश्वास रानडे, रजनी आणि अविनाश ही ही चैतन्यमय पात्रे आहेत म्हणून ती कथा आपल्या मनाचा ठाव घेते. त्यांच्या 'अग्निदिव्य'मधली पात्रे नुसतीच 'राजबंदी' नसून "माझी आई माझ्या स्वप्नात आली होती. तिने मला कुरवाळलं" अशा गोष्टी एकमेकांना सांगणारी ती 'माणसे' आहेत म्हणून आपण त्या कथेच्या प्रेमात पडतो. खाडिलकरांचे 'कीचकवध' हे नाटक श्रेष्ठ ठरते. पण 'द्रौपदी' तसे ठरत नाही याचे कारण काय ? त्या दोन्ही नाटकांना तसे त्या त्या काळच्या राजकारणाचे सविस्तर संदर्भ प्राप्त होते. पण 'कीचकवधा'तील पात्रांची सजीवता 'द्रौपदी'तील पात्रांना लाभली नाही, हे उघड आहे. डिसालीच्या 'सिविल' वगैरे

कादंबऱ्या कोणी उघडूनही पाहात नाही, आणि टॉलस्टॉयची 'वॉर अँण्ड पीस' ही कादंबरी मात्र तिच्यातील नटाशा, पायर, अँड्री या रसरशीत पात्रामुळे आजमितीस लोकादरास पात्र ठरून आहे, हे विसरता येत नाही. चोरघडयांच्या राजकीय वातावरणातील कथांना त्यातील हृदयस्पर्शी माणसांमुळे व त्या माणसातील त्याहून हृदयस्पर्शी भावसंबंधामुळे मोल आलेले आहे, असाच त्यातून निष्कर्ष निघतो.

आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे चोरघडयांमधला लेखक कुठेही गेला तरी कथेचे सकल बीज शोधीत असतो. ते त्याला कुठेही सापडू शकते, तसे ते कधी भोवतालच्या राजकीय वातावरणातही सापडते. 'बिजाईच्या गव्हा-प्रमाणे पेरते' अनुभव व ते व्यक्त करणारे शब्द यांच्या शोधात असलेल्या चोरघडयांनी अमुक अनुभव राजकारणातला आहे म्हणून स्वीकारला नाही, तर त्या अनुभवात कथा बनण्याची क्षमता आहे म्हणून स्वीकारलेला आहे असे आपल्या लक्षात येईल. चोरघडयांच्या वाङ्मयातील उस्तवारीच्या काळात (१९३६ साली) त्यांचे परममित्र पु. भा. भावे यांनी चोरघडयांना एका पत्रात असा उपदेश केला होता की, "आयुष्याच्या प्रत्येक घटनेची गोष्ट झाली पाहिजे," पण चोरघडयांनी हा उपदेश शहाणपणाने नाकारलेला दिसतो. तात्पर्य, चोरघडयांच्या कथेत तत्कालीन राजकारणाचे साद-पडसाद कुठे कुठे उमटलेले असले तरी त्यांच्या कथेची खरी कमाई ती नसून त्यातील वाङ्मयीन सौंदर्य ही आहे; व हे वाङ्मयीन सौंदर्य साहित्यात अपेक्षित असलेल्या उपरोक्त गुणविशेषांत आहे. ■

'राघेय'
गोकुलपेठ, नागपूर-१०

वामन चोरघडे यांची कथा

: डॉ. वसंत वऱ्हाडपांडे

वामनराव चोरघडे यांच्या कथालेखनाला प्रारंभ होऊन आता जवळ जवळ साडेचार तपे झाली आहेत. या दीर्घ कालावधीच्या मानाने पाहिले तर त्यांच्या कथालेखनाचा वेग तसा मंदच म्हटला पाहिजे. मराठी कथालेखन करणाऱ्या अन्य लेखकांच्या कथानिर्मितीचा वेग पाहिला की वामनराव हे मंदगती वाटतात. परंतु. आरंभीच्या तीव्रगतीने प्रेक्षकांचे मन वेधून घेऊन नंतर येणाऱ्या शक्तिहीनत्वामुळे शून्यगती होणाऱ्या खेळाडूपेक्षा, आरंभापासूनच अंतिम स्थानाकडे दृढनिश्चयाने व खंबीर गतीने पावले टाकून यशस्वी 'धाव' घेणाऱ्या खेळाडूचे श्रेष्ठत्व जसे निर्विवाद असते, तसाच प्रकार वामनरावांच्या बाबतीत झालेला दिसून येतो. पावसाळ्यातील जलधारांनी उन्मत्त होऊन खळाळणारी नदी उन्हाळ्यात सूत्राकार झाली म्हणजे जसे तिचे रूप केविलवाणे दिसते, तसाच प्रकार आपल्या काही प्रतिभावंतांचा दिसतो. चोरघड्यांच्या नंतरच्या पिढीतील काही कथाकारांनी कथावाङ्मयात मोलाची भर घातली, कथेचा अधिक विकास केला हे सर्व खरे ! – नवनवीन प्रयोगांनी कथासुंदरीचे कोडकौतुक करताना त्यांनी आपल्या सर्व सामर्थ्याचा उपयोग केला हेही मान्य !–परंतु, यांच्या कथालेखनाची गती मंदावताच या कथालेखकांच्या अस्तित्वाबद्दलच कुणीही शंका घ्यावी असा प्रकार घडल्याचा भास झाल्याशिवाय राहत नाही. वामनराव चोरघडे कथालेखक म्हणून 'संपले' असे उद्गार मध्यंतरी कानावर पडत. परंतु, कथाक्षेत्रातील हा 'पदयात्री' आपली खंबीर पावले टाकीत मंदगतीने जाणकारांचे लक्ष वेधून घेत अजूनही वाटचाल करीतच असल्याचे दृश्य दिसून येते. एखादा नंदादीप मंदिराच्या गाभाऱ्यात शांतपणे तेवत राहावा, त्याच शांतपणे वामनरावांची लेखनतपश्चर्या १९३२ पासून अखंड चालू आहे.

वामनरावांच्या कथालेखनाला नकळत नंदादीपाची उपमा यथार्थही आहे. त्यांच्या 'सुषमा' (१९३६) या पहिल्या कथासंग्रहापासून 'साद' (१९८४) या संग्रहापर्यंतच्या सर्व कथासंग्रहांचे वाचन केले तर त्या कथांतून एका प्रसन्न व सुसंस्कारित अशाच व्यक्तित्वाचा आविष्कार झालेला दिसून येईल. कलाकार हा त्याच्या कलाकृतीतून अभिव्यक्त होत असतो, हे विधान वामनरावांच्या बाबतीत शंभर टक्के खरे वाटते. आणि संपन्न व्यक्तित्वाच्या रसायनात मुरलेल्या त्यांच्या कथाही आरंभापासून आजपर्यंत तशाच प्रांजळ, सद्भावपोषक आणि मानवी जीवनमूल्यांचे दर्शन घडविणाऱ्या असल्याचा प्रत्यय येतो.

याचे कारण आहे. वामनरावांच्या लेखनावर त्यांच्या ज्या व्यक्तित्वाचा ठसा उमटला आहे त्या व्यक्तित्वाची घडण करणारे वातावरण त्यांच्या कथालेखनाचे स्वरूप निश्चित करण्यास कारणीभूत ठरले आहे. आपल्या कथालेखनाविषयी लिहिताना स्वतः वामनरावांनीच हे प्रगट केले आहे. महात्मा गांधीजींच्या वास्तव्याने व कार्याने ज्या नगराला विश्वविख्यात केले त्या वर्धा नगरीत वामनरावांचा बराच काळ गेला. महात्माजींच्या प्रत्यक्ष सहवासाने त्यांच्या मनाला आकार मिळाला. मानवी मूल्यांवरील प्रबळ श्रद्धा त्यांच्या मनात दृढमूल झाल्या. दुर्गुणापेक्षा सद्गुणांकडे धाव घेताना त्यांच्या मनाला बरे वाटू लागले.– ह्या भाववृत्तीमुळे त्यांच्या कथांतील पात्रे सद्गुणानुरागी झाली आहेत. मानवी वासना प्रबल असल्या आणि स्त्री–पुरुषातील शारीरिक आकर्षण बलवत्तर असले तरी अशा आकर्षणात व अशा वासनांच्या मिठीत सापडलेली वामनरावांची पात्रे आपला तोल मोठ्या निग्रहाने सांभाळताना दिसून येतात. असे त्यांच्या आरंभीच्याच कथांतून आढळते असे नाही. तर अलीकडच्या 'मजल' 'साद'

इत्यादी कथासंग्रहातूनही हाच प्रत्यय येतो. या दृष्टीने 'मजल' ह्या संग्रहातील 'योगिनी', 'सुमती' ह्या गोष्टी वाचाव्यात. जिथं हा तोल सांभाळणे स्त्री-पुरुषांपैकी एखाद्याला जमत नाही, तिथं दुसरी व्यक्ती स्वतःला सांभाळतांना दुसरीलाही नकळत सांभाळत असलेली दिसून येते!—स्त्री-पुरुषांच्या संबंधाचे उघडेवाघडे चित्रण करण्याच्या, मानवी वासना चवीष्टपणे कुरवाळण्याच्या आजच्या काळातही वामनरावांची ही 'तोलरक्षी' व्यक्तिचित्रे यशस्वीपणे वावरतात... इतकंच नाही तर ढळू पाहणाऱ्या मूल्यांना सावरतात...आधार देतात! —वामनरावांच्या श्रद्धाळू व्यक्तित्वाचाच हा परिणाम आहे. वामनरावांचे साहित्य वाचताना म्हणूनच बरेचदा साने गुरुजींची आठवण होते.

याचा असा अर्थ नव्हे की जीवनमूल्यांची व श्रद्धांची जोपासना करताना ते कलात्मकतेकडे पाठ फिरवतात!—कथा हा एक कलाप्रकार आहे व त्यांची कलात्मकता राखण्यातच त्या प्रकाराचे श्रेष्ठपण आहे हे ते जाणतात. यातच त्यांचे मोठेपण आहे!—कथाकार या नात्याने वामनरावांना जे अग्रपद मिळाले, ते त्यांच्या साहित्यातील कलागुणामुळे! आशय सांभाळताना अभिव्यक्तीकडे दुर्लक्ष ते कधीच करीत नाहीत किंबहुना आपल्या आशयाची परिणामकारकता साधण्यासाठी त्याचा कलात्मक आविष्कार करताना ते अत्यंत दक्षता बाळगतात. कथेच्या कलारूपाची हानी होणार नाही याची इतक्या डोळसपणे दक्षता घेणारा कथाकार, मला वाटते, दुसरा नसावा!—प्रत्येक शब्द, प्रत्येक वाक्य आणि कथेतील प्रत्येक पात्र योजताना ते कधीच उधळेपणा करीत नाहीत.—त्यांची ही सावधता कधी कधी इतकी वाढते की कथेला एकप्रकारची अस्पष्टता...गूढता येते!—कवितेचा स्पष्टार्थ लावताना जसा बरेचदा अध्याहृत शब्दांचा आधार घ्यावा लागतो, तसे वामनरावांच्या कथा वाचतानाही करावे लागते. त्यांच्या कथा आटोपशीर आणि काव्यात्मक वाटतात त्या याचमुळे!—त्या खरोखरीच 'लघुकथा' वाटतात. 'जीवनमूल्ये' व 'कलामूल्ये' यांचा वाद त्यांच्या लिखाणात जाणवत नाही, तर या दोन्ही मूल्यांची हातमिळवणी कुशलतेने करण्यात आल्याचेच प्रत्ययास येते. 'पाथेय' या संग्रहातील 'अतिथि देवो भव' या त्यांच्या प्रसिद्ध कथेचे उदाहरण या संदर्भात द्यावेसे वाटते. पैकू पोळ्याच्या दिवशी बैलांना सजवून डॉक्टरांकडे नेतो. डॉक्टरांची पत्नी घरी असते. पैकू तिला म्हणतो,

"बाई, दारी देव आणले आहेत. पूजा करा."

त्यावर 'देवांना' पाहताच डॉक्टरीणबाईंनी काढलेल्या उद्गारांनी पाश्चात्य शिक्षणपद्धतीने परंपरागत रूढ भारतीय जीवनमूल्यांना कसा तडा गेला आहे याचे विदारक दर्शन घडते. त्या म्हणतात, "कशाला रे ही पूजा? त्या जनावरांना त्यात काही कळते तरी? अशिक्षितांचे हे खेळ आणि ह्या समजुती. आम्हाला यात विश्वास नाही..."

—कोणत्याही प्रकारची कलात्मकतेला बाधक ठरेल अशी व्याख्यानबाजी न करताही वामनरावांनी स्वतःला बुद्धिवादी समजणाऱ्या सुशिक्षित समाजातील ढासळणाऱ्या मूल्यांचे सुस्पष्ट दर्शन घडविले आहे. आणि त्यामुळेच ते अधिक प्रभावी ठरले आहे.

भारतीय मन हे तत्त्वज्ञानाच्या पाण्यावर पोसले आहे. जीवनाकडे पाहताना भारतीय माणूस — आधुनिकतेच्या आहारी न गेलेला भारतीय माणूस — तत्त्वचिंतकाच्या भूमिकेवरूनच पाहात असतो. वामनरावांच्या ठिकाणीही ही तत्त्वचिंतन करण्याची वृत्ती भरपूर आहे. आणि ह्या वृत्तीला वाव मिळेल अशीच प्रथमपुरुषी निवेदनपद्धती त्यांनी सामान्यतः स्वीकारलेली आहे. त्यांच्या अनेक कथांतून 'मी' हेच प्रमुख पात्र असते. 'मी' चा अनुभव सांगणे हाच त्यांच्या कथांचाही हेतू असतो. प्रभाकर पाध्यांनी 'आपल्या अनुभवाला अर्थदर्शनाचे अस्तर जोडण्याची सवय चोरघड्यांना आहे व त्यामुळेच अनेक कथांतून त्यांनी निवेदकाची भूमिका स्वीकारलेली आहे.' असे विधान केले आहे. ह्या विधानात पाध्यांच्या प्रांजळ वृत्तीचे दर्शन घडते असे मानले तर हे विधान स्वीकारायला हरकत नाही!—मात्र ते स्वीकारताना अधिक डोळस होणे आवश्यक आहे. अनुभव आणि अर्थदर्शन हे मूळ वस्त्र आणि

अस्तर यांच्या इतके भिन्न असल्याचे चोरघड्यांच्या कथा वाचताना वाटत नाही. तर त्यांचे अभिन्नत्व असल्याचाच प्रत्यय येतो. 'जीवनशुद्धि' ही ४१ साली लिहिलेली त्यांची कथा उदाहरणार्थ पहावी. तेलंखेडीच्या तलावाच्या काठावर राहून कपडे धुणारी स्त्री हा अनुभव चित्रित करताना सहजच त्यांना वाटून जाते-" कसे विचित्र ! 'कपडे' स्वच्छ व्हावेत म्हणून ते 'जीवनां'त बुडवायचे. पुन: त्यातले 'जीवन' घासून, पिळून, सुकवून घडी घालून नाहीसे करावयाचे-अशाने 'वस्त्र' स्वच्छ होते.

आणि हा मनाचा मळ धुवायला काढला तर ? पण तो बुडवायचा कशात ? आणि सुकवायचा कशाने ?"

मला वाटते, वामनरावांना झालेले 'अर्थ-दर्शन' आणि त्याचा 'अनुभव' हे या ठिकाणी अविभाज्य वाटतात व यामुळेच वाचकांच्या हृदयाची तार आपल्या कलात्मकतेने छेडूनही त्यांच्या कथा वाचकांच्या अंतर्मनाला जागृत करतात-त्याला चालना देतात. मनुष्याला अंतर्मुख करणे हे कलेचे उद्दिष्ट असेल तर ते उद्दिष्ट वामनरावांच्या कथांनी साध्य केले आहे !

त्यांच्या कथेचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे ती केवळ पांढरपेशांच्या सुखदु:खाच्या रिंगणातच फिरत नाही. दु:खी आणि दुर्दैवी जीवांबद्दलचा अथांग कळवळा त्यांच्या कथांतून दिसतो. तद्वतच ग्रामीण जीवनाचेही चित्रण करताना तो दिसते. ग्रामीण कथा ही आज एक टूम झालेली आहे. या कथांतून ग्रामीण 'जीवना'पेक्षा ग्रामजीवनात आढळणारा (तसा तो कोणत्या जीवनात आढळत नाही ?) तऱ्हेवाईकपणा रंगविण्याचीच धडपड उघडपणे आढळून येते. 'जीवन-दर्शना'पेक्षा 'किस्से'कथनांचेच स्वरूप या तथाकथित कथांना प्राप्त होते.-ग्रामीण जीवनाचे सुरक्षित अंतरावरून प्रेक्षकाच्या भूमिकेतून दर्शन घेऊन केलेले-कधी-कधी स्वप्नरंजनात्मकही-चित्रण म्हणून 'ओले' न वाटता 'कोरडे'च वाटते. वामनरावांच्या ग्रामीण कथा ह्या अशा नकली नसून असली आहेत. यापूर्वी उल्लेखिलेली 'अतिथि देवो भव' ही कथा किंवा 'मजल' संग्रहातील 'लागेबांधे' किंवा 'वह्याड' ह्या कथा वाचताना ग्रामजीवन जिवंतपणे दृष्टीपुढे उभे ठाकते ! 'अतिथि देवो भव' मध्ये तर ग्रामीण (वेडवळ) भाषेचाही वापर केलेला नाही आणि तरीहि पैकू-वायजेच्या माध्यमातून कास्तकारी संसाराचे, त्यांच्या आशा आकांक्षेचे, त्यांच्या भावभावनांचे रेखाटलेले चित्रण जितके वास्तव वाटते, तितके वास्तव मुद्दाम 'ग्रामीण' भाषेत भिजवून काढलेल्या अन्य लेखकांच्या कथांतूनही आढळत नाही. ग्रामीण कथेचे मोल हे त्या कथेच्या भाषेवर नसून तिच्याद्वारे प्रगट होणाऱ्या ग्रामजीवनाच्या जिवंतपणावर असते ही गोष्ट वामनरावांच्या कथा वाचताच स्पष्ट होते. 'लागेबांधे' आणि 'वह्याड' ह्या कथांतून निवेदनाला फाटाच दिला आहे व केवळ संवादातून कथा फुलविली आहे. विशेषत: 'वह्याड' ह्या कथेत तर निवेदन मुळीच नाही. तरीही त्या कथेतील संवादाने ग्रामजीवनातील पतिपत्नीच्या मुग्ध प्रीतीचे जे दर्शन घडते ते मोठें मनोज्ञ वाटते-निरागस वाटते. कथानायक सरावन अन् त्याची पत्नी सगुना यांच्या जीवनातील निकोप प्रीतीचे क्षण त्यांनी रंगविले आहेत आणि ते रंगविताना त्यांनी कुठेही शृंगाराची मर्यादा ओलांडली नाही. आजच्या एखाद्या 'प्रथितयश' कथाकाराने तरुण पतिपत्नीच्या एकांत समयाचे हेच चित्र रंगविण्याचे ठरविले तर ?-

संयम हा चोरघड्यांच्या अनेक पात्रांचा स्थायीभाव आहे. सूचकतेचा आश्रय घेऊन अर्थाची वलये निर्माण करण्याची हातोटी त्यांना साधलेली आहे. हा संसार जगताना सतत 'तोल' सांभाळण्याचे कौशल्य मनुष्याला अवगत असले पाहिजे, असेच जणू त्यांची पात्रे सुचवितात. आणि जिथे क्वचित हा तोल ढळतो, तिथे त्या ढळण्याचे शल्य त्यांच्या पात्रांना सतत बोचत राहते. 'मजल' संग्रहातील 'लाथ' ही अशीच एक 'बोच' चित्रित करणारी कथा-स्त्री आणि पुरुष यांचे सान्निध्य हा वामनरावांच्या अनेक कथांचा विषय. पण ह्या सान्निध्याची परिणती 'विपरीता'त झाल्याचे कुठेच दिसत नाही ! ह्या सान्निध्यातही कधीकधी 'नको' ते घडते-म्हणजे; पुरुषाच्या मनात सन्निध स्त्रीविषयी वासना

निर्माण होते--आणि अशा वेळी त्याला सावध करण्याचे, स्वतःच त्या पुरुषालाही सावरण्याचे कार्य स्त्रीला करावे लागते. किळस, सुमती, योगिनी इत्यादि कथांतून हेच आढळते. मूल्य-रक्षणाची दक्षता वामनरावांच्या सर्वच स्त्री–चित्रांनी दाखविली आहे, आपल्या दमेकरी पतीच्या सोयीस्कर संरक्षणाखाली परपुरुषाशी संबंध राखणारी ' सुभी ' (हिशेब चुकता) या कथाविश्वात नाही, असे नाही. पण हा अपसंबंध केवळ ' गरिबी 'च्या आपद्धर्मातून निर्माण झालेला आहे–तो तिचा मनोधर्म नव्हे ! -सुभीच्या तोंडून तिचा मुलगा हा तिच्या नवऱ्याच्या बीजाचा नसून दुसऱ्याच्या बीजाचा आहे हे ऐकूनही तिच्या-बद्दल घृणा वाटत नाही. उलट, तिच्याशी, तिच्या नवऱ्याच्या ह्यातीत नवऱ्याच्या थुंकीठशे भरलेल्या गोधडीवर रमणाऱ्या रावजीला, नवरा मरताच तिने उघडपणे स्वतःला घरी घेण्याची सूचना केली असता त्याने ती ' बायल्यासारखी ' नाका-रली हे वाचून त्याचीच चीड येते. जबाबदारीला टाळून फक्त ' मौज ' लुटू इच्छिणाऱ्या रावजीच्या रूपाने वामनरावांनी ' पुरुषी ' मनोवृत्तीचे भेदक चित्रण केले आहे. सुभीच्याच भाषेत बोलावयाचे तर, ' जेव्हा मर्दासारखं वागण्याची पाळी येते तेव्हा माणूस लुगड्याच्या आड दडतो ' हे त्यांनी इथे दाखवून दिले आहे. ' सुभी ' म्हणूनच प्रामा-णिक वाटते. सच्छील वाटते. मनाचा मोठेपणा आकर्षक वाटल्यामुळेच बाह्यतः कुरूप वाटणाऱ्या भीमाकाकीच्या एकनिष्ठ पतिप्रेमाचे (रंजन) आणि काळ्या–गावरानी खरजुल्या कुत्र्यासारखे ध्यान असणाऱ्या भैरवाच्या (डाग) जगावेगळ्या वागण्याचे वर्णन करताना त्यांच्या प्रतिभेला फुलोर येतो.

वामनरावांच्या कथेचे स्थूल स्वरूप शोधण्याचा हा प्रयत्न आहे. सविस्तर विश्लेषण करण्याचे हे स्थळ नव्हे व ही वेळही नव्हे !–मराठी कथेला कथानकाच्या काचातून मुक्त करण्याचे मुख्य श्रेय वामनरावांना आधुनिक मराठी वाङ्मयाचे इतिहासकार देतात ते अगदी योग्यच आहे. त्यांच्या आरंभीच्या कथांतून उदात्त...भव्य... दिव्य अशा ध्येयाला कवटाळणाऱ्या काही व्यक्तींची चित्रे उमटली होती. आज वामन-रावांची कथा अधिक वास्तववादी झाली आहे. म्हणूनच अधिक व्यापक झाली आहे. जीवनस्पर्शी झाली आहे. सखी, ऋव्याद, संस्कार, धार इत्यादी त्यांच्या कथा मराठी कथासाहित्यात चिरंजीव ठरतील अशा योग्यतेच्या आहेत !–हिंदु-मुसलमानाच्या प्रश्नाचा सूचक उपयोग करून मानवातील विषमतेचे जे प्रत्ययकारी चित्र त्यांनी ' हादरा ' या कथेतून रंगविले आहे, ते अप्रतिम आहे. आणि विशेष म्हणजे मानव्यात्तरील...श्रेष्ठ जीवनमूल्यांवरील आपली अविचल श्रद्धा ढळू न देताही कलात्मकतेची वूज राखण्याची अवघड कामगिरी त्यांनी मोठ्या कुशलतेने पार पाडली आहे ! वि. स. खांडेकरांच्या जीवनवादी दृष्टीने त्यांच्यातील कलावंतावर मात केली असल्याचा आरोप काही टीकाकार करतात. वामनरावांवर असा आरोप करताना टीकाकाराला विचारच करावा लागेल. कारण जीवन आणि कला यांचा मनोहर समन्वय करण्यात त्यांनी पूर्णतः यश मिळविलेले आहे.

वामनरावांच्या भाषेबद्दलही थोडेसे लिहिले पाहिजे. ते कमालीचे संयमी आहेत, हे यापूर्वी लिहिलेच. भाषेच्या संबंधात देखील त्यांचा हा संयम दिसून येतो. पूर्ण क्रियापदांचा उपयोग करून भाषेचा पसारा मांडण्यापेक्षा आवश्यक तेवढ्या शब्दांचाच उपयोग ते करतात. कमीतकमी शब्दात जास्तीत जास्त आशय पकडण्याची त्यांची धडपड असते. लोककथांच्या अध्ययनाने साधी व प्रवाही भाषा लिहिण्याचे कसब त्यांना अवगत झाले आहे. ग्रामीण कथांतून अनेक अर्थवाही ग्रामीण शब्द त्यांनी साहित्यिक मराठीच्या ओटीत टाकले आहेत. ' चांदण्यात कवड्या चमकाव्या तसा भैरव भकास हसला ',–' ताकात मीठ घालावे तसे जीवनात सहज रीतीने चिमुटभर जिव्हाळा ओतून त्याची चव घ्यायची '–' प्रेम कधी, कुठं, कुणावर कसं जडतं हे कळत नाही. ही प्रेमाची गोजिरवाणी पाखरं आपल्या पाचूच्या चोचीत अमृतबिंदू घेऊन उडतात. या स्निग्ध मधुर बिंदूंचा अवसेक ज्या कुणावर होईल त्यांचं प्रेम जमतं.'–या सारखी अनेक चमकदार वाक्यं ते सहज लिहून जातात.–

'त्या दिवशीही असाच एका फुलझाडाचे पंख कापीत होतो' —अशा सारख्या वाक्यांनी सभ्यतेच्या विकृत कल्पनापायी निसर्गरमणीयतेला आपण कसे मुकत आहोत हे टीकाटिप्पणी न करता, ते सांगून टाकतात.

चोरघड्यांची कथा ही अशी आहे. सहज-सुंदर निकोप वृत्तीची. मानवी जीवनमूल्यांवर श्रद्धा ठेवताना कलात्मकतेलाही वंचित न करणारी... प्रांजळ आणि रोखठोक. जीवनातील दंभाला झिडकारून मानवी जीवनाचे वास्तव स्वरूप चित्रित करणारी कथा वामनरावांनी आजवर लिहिली आणि मराठी कथावाङ्मय समृद्ध केले, वामनरावांचे हे देणे अतिशय महत्त्वाचे असल्यानेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या चंद्रपूर अधिवेशनाचे अध्यक्षपद (१९७९) त्यांना मिळाले. आज वामनरावांचे कथालेखन जवळजवळ थांबले आहे. 'जडणघडण' (१९८१) हे आत्मवृत्तात्मक पुस्तक लिहून त्यांनी आपल्या व्यक्तित्वाचा विकास कसकसा झाला हे स्पष्ट केल्याने त्यांच्या कथासाहित्याचा अधिक मूलगामी अभ्यास करण्यास आता विशेष मदत झाली आहे. कथालेखनाखेरीज लोकसाहित्याचे, लोककथांचे, शब्दकोशाचे संपादन त्यांनी केले असले व 'चंपाराणी' सारख्या काही लोककथा लिहून मराठी साहित्याचे हेही दालन समृद्ध करण्यास हातभार लावला असला तरी मराठी साहित्याच्या इतिहासात एक श्रेष्ठ कथाकार म्हणूनच ते ओळखले जातात व नेहमीसाठीच ओळखले जातील. ■

['युगवाणी', डिसेंबर १९३४ च्या अंकात प्रकाशित झालेल्या मूळ लेखाचे, आवश्यक त्या संपादनासह, पुनर्मुद्रण]

वामनरावांचे बालवाङ्मय

: कमलाकर धारप

वामन कृष्ण चोरघडे हे नाव मराठी साहित्यात स्वतःचे वेगळेपण जपणारे आहे. ते 'कथाकार चोरघडे' म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'कथा' ह्या खऱ्या अर्थाने कथा आहेत आणि जीवनाशी ईमान राखणाऱ्या आहेत. संस्कृत वाङ्मय, संत वाङ्मय आणि लोकसाहित्य या तिन्हींचा प्रभाव त्यांच्या लेखनात आढळतो. त्यामुळेच त्यांची कथा ही अस्सल मराठी वळणाची परकी प्रभावापासून मुक्त असणारी वाटते.

लोकसाहित्याविषयी वाटणाऱ्या जिव्हाळयातून त्यांनी खेडोपाडी हिंडून लोककथा, लोकगीते यांचा संग्रह केला. त्यांच्या वाङ्मयात मराठी मन आणि विशेषत: वऱ्हाडी मन डोकावत असते. त्यामुळे त्यांच्या लेखनाची भाषा सुटसुटीत आणि वाक्प्रचारांनी फुललेली आहे. 'तालेवार बापाची नवसाची लेक, अन् मुठी मुठी भरून गुलाल फेक', 'अरबटाशी बोलणं, अन् नाकानं कांदा सोलणं', 'जिवाचा होतो पिळा तरी म्हणे गिळा', 'आई आठवली चालली माहेरा, दाल्ला पाहिजे पळाली सासरा, डोळा दाखवयाची ना नवऱ्यास उजागरी, अन बोट दाखवायची नाही सासूस राहाजोरी', अशी लहान लहान वाक्यं ते बोली भाषेतून टिपतात आणि त्याची आपल्या साहित्यातून पखरण करतात.

लोकगीतातून अनेक कथा गुंफलेल्या आढळतात. त्या कथांना एक प्रकारची तालबद्धता असते. 'झाडाझुडाचे लगीन' हे असेच एक तालकाव्य आहे. त्यात झाडा–झुडाचं लगीन लावलेलं आहे. फणस, आंबा, पिंपळ हे वर तर राइ, डाळींबी, रोहिणी या वधू. मग या लग्नाचे हार गुंफायला शेवंती आणि मोगरा येतात. राजगिरा हा ब्राम्हण होतो. केस पुसायला शिकेकाई येते. एरंड रांगोळया काढतो, तुळशी लोणचं वाढते, अशा तऱ्हेने या तालकाव्यात नित्याच्या परिचयाच्या अनेक झाडांची नावं गुंफलेली आहेत.

'राणी घरी जाईन, मी शेवईच खाईन' हेही वामनरावांचे एक तालकाव्य आहे. त्यांचे हे काव्य अत्यंत आवडते आहे. एकदा मामासाहेब गंधे यांच्या निवासस्थानी साहित्यिकांची एक मैफल जमली होती. प्रत्येकानं काहीतरी कथा–काव्य अनुभव सांगावे असं ठरलं. तेव्हा वामनरावांनी 'राणी घरी जाईन मी शेवईच खाईन' हे तालकाव्य म्हटलं होतं. एक कावळा राणीच्या घरी जाऊन शेवई खायची इच्छा धरतो. पण राणी त्याला तोंड धुवून यायला सांगते. मग तो नदीकडे जातो. तिला म्हणतो.

'नदी नदी पाणी दे
पाणी घेईन
तोंड धुवीन
राणीघरी जाईन
मी शेवईच खाईन'

नदी त्याला गाडगं आणायला सांगते, मग तो गाडगं आणण्यासाठी कुंभाराकडे जातो. कुंभार त्याला माती आणायला सांगतो. माती त्याला माती खणण्यासाठी शिंग आणायला सांगते. मग तो शिंगासाठी हरणाकडे जातो. हरीण त्याला दूध प्यायला मागते. मग तो गाईकडे जातो. गाय त्याला गवत मागते. गवत त्याला कोयता आणायला सांगते. मग कोयता आणायला तो लोहाराकडे जातो. अखेर त्याला कोयता मिळतो. त्याने गवत कापून तो गायीला देतो. गाय दूध देते. ते दूध तो हरणाला देतो. हरिण त्याला शिंग देते. शिंगाने तो माती खणतो, माती घेऊन कुंभार त्यास मडके देतो. मडक्याने पाणी घेऊन कावळा पाणी आणतो. पाण्याने तोंड धुतो तेव्हा राणी त्याला शेवई देते अखेर,

खाऊ खातो शेवई, आम्ही खातो खाऊ
कहाणी आमची संपली, चला घरी जाऊ

असा या कथेचा शेवट होतो.

आपल्या 'प्रभावती' या दीर्घ कथेला लिहिलेल्या प्रस्तावनेत वामनराव चोरघडे यांनी लोककथा कशा तयार होतात याचे मार्मिक विवेचन केलेले आहे. "समाजाचे शिक्षण आणि 'संस्कार या दोघांची जबाबदारी लोकसाहित्य आपल्यावर घेते म्हणून लोकरंजनाबरोबरच जीवनाचे यथार्थ व शुभदर्शन ते घडविते", असे वामनरावांनी सांगितले आहे.

वामनरावांचे बालवाङ्मय हे असे लोकगीतातून, लोककथातून जन्माला आले आहे व त्यामुळेच ते आपल्या जनजीवनाशी बांधिलकी सांगत असते. त्यात कथाकथनातील रसाळपणा स्वाभाविकपणेच आला आहे. त्यामुळे त्याच्या वाचनापेक्षा त्याचे कथन अधिक प्रभावी होत असते. लहान सुटसुटीत वाक्ये हा त्या कथांचा आत्मा आहे आणि सुभाषिते ही त्या कथांचे अलंकार आहेत. ही सुभाषिते अगदी सहजपणे कथेत येतात आणि त्या कथांचे वैभव वाढवतात वामनरावांनी आपल्या बालकथांनी आणि तालकाव्याने मराठी बालवाङ्मय समृद्ध केले आहे. ■

४७ 'प्रसाद' रामदासपेठ, नागपूर-१०



सौभाग्य महिमा

: दादा धर्माधिकारी

तारीख ४ जुलैला चि. श्रीच्या (डॉ. श्रीकांत चोरघडे) 'वेल बेबी–क्लिनिक'च्या उद्घाटनाला गेलो, त्याच वेळी त्याच्या आईची आठवण झाली. त्यानंतर तारीख १५ जुलैला चि. बापू चोरघडे याच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्याने होमहवन केले, त्या प्रसंगी त्याने कडोसरीला सुपारी खोचली आणि तारीख १६ ला बापूच्या एकसष्ठाव्या वाढदिवसानिमित्त विदर्भ साहित्य संघात अप्पा देशपांडेच्या अध्यक्षतेखाली त्याचे जाहीर अभीष्टचिंतन झाले. या तिन्ही प्रसंगी कै. सौ. ताईची (डॉ. वनिता चोरघडे) अनुपस्थिती अतिशय तीव्रतेने जाणवली. काळजाला पीळ पडला.

बापू मोठा कर्तबगार, चिकाटीचा आणि बाणेदार. त्याचे जीवन एकंदरीत मोठे जिकिरीचे व ओढगस्तीचे. पण ताईशी लग्न झाल्यानंतर त्याचे पांग फिटण्याची लक्षणे दिसू लागली. याचे कारण बापूच्या जीवनात ती मोठे डबोले घेऊन आली हे नव्हे. पण तिने जो ऐवज आणला, तो काही आगळाच होता. तिने आणिलेल्या या अगदी वेगळ्याच प्रकारच्या दौलतीमुळे बापूच्या जीवनाला ओप येण्याची लक्षणे दिसू लागली. ताई मोठी दमदार, करारी व कर्तृत्वसंपन्न स्त्री होती. बापूच्या जीवनात ती आल्यापासून त्याचे जीवन सर्वच दृष्टींनी समृद्ध व संपन्न झाले. विद्यार्थी असतानाच बापू गोष्टी लिहू लागला होता. थोडक्यात पण सूचक व रोचक शब्दात निवेदन करण्याची कला त्याला साधलेली आहे. जीवनाची खडतर चढण तो पर्वतारोहणाच्या रोमहर्षक हिरीरीने व उत्साहाने चढला. त्या आरोहणाच्या योगाने त्याच्या जीवनातील कलात्मकता व सौंदर्याभिरुची अधिकच मनोज्ञ रूपात व्यक्त होऊ लागली. साहजिकच त्याच्या विवाहातही 'रोमान्स' होता. वेणूताई (सौ. वनिता) व बापू (वामन) यांचा विवाह पूर्णपणे परंपरानुसार नव्हता. तो सोहळा मला आठवतो. त्याचे आईवडील परंपराप्रिय असल्यामुळे उपस्थित नव्हते. गीताबाई साने विवाहनोंदणीच्या वेळी साक्षीदार म्हणून सही करायला उपस्थित होत्या. स्त्री–जीवनातील क्रांतीची हकीगत लिहिताना गीता

[वामन कृ. चोरघडे यांच्या पत्नीच्या स्मरणार्थ खाजगी वितरणासाठी १९७५ साली प्रकाशित 'स्मृती अक्षरे' या प्रकाशनातून]

सानेंचा उल्लेख एक संकेत म्हणून करावा लागेल. गीता साने व अंबिका बेहेरे.

पण बापूची आई, माझी आत्या ती. स्व. गंगूबहिणा आणि त्याचे वडील ती. स्व. अप्पाजी, यांचा जिव्हाळा व वात्सल्य मात्र यत्किंचितही कमी झाले नाही. सौ. ताईबद्दल त्यांना भूषण व ममता वाटत असे. ती जशी डॉक्टर म्हणून निष्णात होती तशीच गृहिणी म्हणूनही दक्ष होती. तिच्या कामसूपणाला व कष्टाळूपणाला सीमाच नव्हती. 'सावधपण सर्वं विषयी' हा तिचा आत्मीय गुण होता. जशी दक्ष तशीच चोखंदळ.

तिच्या आयुष्याची शेवटची निदान तीन वर्षे दुर्धर व असाध्य अशा आजारपणातच गेली. मी तिच्याकडे मधून मधून खेपा टाकायचा. तिचा चेहरा कधीच मलूल, म्लान दिसला नाही. तशाही स्थितीत ती स्वयंपाकापासून इतर कामे जमतील तशी पण नीटनेटकी करायची. तिच्या दुर्दम्य जीवननिष्ठेवर व्याधीची छाया उमटलेली कधीच दिसली नाही. सौ. ताई शेवटच्या क्षणापर्यंत नामोहरम झालीच नाही. बापू व ताई यांनी एकमेकांच्या जीवनातील कस व रस वाढविला. या दृष्टीने वनिता-वामनांची ही जोडगोळी मला मोठी विलोभनीय वाटे, दोन पाणीदार मोती एकत्र गुंफलेली !

तारीख १ फेब्रुवारी १९७४ रोजी सकाळी मी मुंबईहून नागपूरला आलो. त्याच दिवशी ताईच्या स्मशानयात्रेला हजर राहण्याची पाळी मजवर आली. ताई-बापूच्या लग्नालाही मी हजर होतो. १ फेब्रुवारीला तिच्या अंत्यविधीलाही हजर राहावे लागले. त्या आठवणीने हृदय व्यथित होते. विधुर झालेल्या बापूच्या जीवनात ताई त्याचा निरोप घेताना आपल्या व्यक्तित्वाचे सत्त्व व कांती ठेवून गेली. तीच तिची वास्तविक दौलत होती.

श्रीचे 'वेल बेबी क्लिनिक', बापूचा 'राजीव' बंगला, त्याच्या जीवनातील वैभव व यश या साऱ्यांचे मुख्य श्रेय सौ. ताईच्या कर्तृत्वाला, दक्षतेला व निःसीम प्रेमालाच द्यावे लागेल. भक्ताने भगवती जगदंबेविषयी म्हटले आहे, 'यदस्यैश्वर्यंस्तव जननि, सौभाग्य महिमा !' ■

संचालक, वामनराव

: शरच्चंद्र टोंगो

सुमारे तीस वर्षांपूर्वी यवतमाळात शासनाचं पहिलं बालवाङ्मय निर्मिती शिबिर झालं. या शिबिराचे संचालक होते, प्रा. वामनराव चोरघडे. वामनरावांचा नि माझा परिचय बराच जुना असला, तरी बरोबर काम करण्याची ही माझ्या वाटचाला पहिलीच संधी लाभली.

या संदर्भात एक मुद्दा स्पष्ट करणं आवश्यक आहे. लेखक घडवता येतो का ? अभिजात लेखक हा जन्मावा लागतो, हेच खरं. असंही असलं, तरी ज्यांना लेखन-उर्मी आहे, अशा लेखकांना लिहितं करून, मार्गदर्शन करून घडवता येतं. असलं लेखन मौलिक नसेलही; पण वाचनीय खासच असतं.

लिटररी वर्कशॉप ही संकल्पना पाश्चात्य देशातील आहे. शिबिर मात्र अस्सल भारतीय आहे. या शिबिराचं उद्‌घाटन झालं; तेव्हा वामनरावांनी या दोन संकल्पनातील भेद स्पष्ट केला : 'वर्कशॉपमध्ये फक्त काम असतं. केवळ इष्ट कामावर जोर असतो. शिबिरात काम तर असतंच; त्याच्या जोडीला पावित्र्य नि शिस्त असते.'

या यवतमाळच्या बाल वाङ्मय निर्मिती शिबिरात अनेक व्याख्यानं झाली. चर्चा झाली. शिबिरार्थींनी लेखन केलं. माझा संबंध व्याख्यानं नि चर्चा यांच्याशी आला नाही. कारण, मी शिबिरार्थी नव्हतो. वामनरावांचा स्नेही या नात्यानं मी रोज जायचो. लिहून आलेलं साहित्य आम्ही दोघंही मिळून वाचायचो. लेखनाच्या संदर्भात आम्ही लेखकाशी चर्चा करायचो.

या लेखनातील मोजकं लेखन चांगलं असायचं. त्याला वामनराव चांगलंच म्हणायचे. पुष्कळशा लेखनात निव्वळ बोधवाद असायचा. शब्दांच्या निवडीबाबत गफलत झालेली असायची. काही वेळा तपशील चुकत; तर काही वेळा लेखकांचे विषयही चुकत. अशा वेळी लेखकाच्या अस्मितेला कुठंही धक्का न पोचवता त्यानं केलेल्या चुकांकडे अंगुलीनिर्देश करून त्याला पुनर्लेखनाला वामनराव प्रवृत्त करीत.

लेखक-लेखिकांशी त्यांच्या लेखनाबद्दल चर्चा करताना वामनरावांचा साहित्याच्या मूलधनाचा, म्हणजे लोककथा, लोकगीतं, म्हणी नि वाक्प्रचारांचा सूक्ष्म अभ्यास प्रत्ययास येई. या शिबिरात प्रत्यक्ष लेखन झालं असेल वा नसेल पण, संचालक या नात्यानं, निरोप देताना वामनरावांनी सगळ्या शिबिरार्थींना जीवनमूल्यांची नि लेखनमूल्यांची सकस शिदोरी बांधून दिली होता यात संशय नाही. ■

१९, बाजोरियानगर, यवतमाळ

धर्माचं नातं

: गिरिजा कीर

वणीचं सोनाली-संमेलन. विदर्भातली झाडून सगळी लेखकमंडळी आली आहेत. पुण्या-मुंबईकडची आम्ही काही मोजकीच. प्रा. नरहर कुरुंदकरांच्या अध्यक्षतेखाली संमेलनाला धूमधडाक्यात सुरवात झाली आहे.

आता कथासत्र चालू आहे. कथाकथन करणारी आम्ही मोजकीच मंडळी व्यासपीठावर आहोत. भारतीय बैठक. लोडाला टेकून झब्बा-लेंगा या साध्या पोषाखात कुणीतरी जुन्या पिढीतले लेखक बसले आहेत. पोषाख साधा असला तरी व्यक्तिमत्त्व मोठं विलोभनीय आहे. उंचसर, मजबूत देहयष्टी रुंद खांदे, तीक्ष्ण नजर, आणि चेहऱ्यावर प्रचंड आत्मविश्वास. कोण असतील? माझ्या नजरेसमोर अनेक नावं तरळून जातात. आणि परिचय करून दिला जातो-

कथाकार "वामनराव चोरघडे" मी आणखीच सावरून बसते. नेमक्या आणि मोजक्या शब्दात. अटकर बांध्याची कथा लिहून वीस-पंचवीस वर्षं मराठी वाचकांना आपल्या शब्दकळेनं मोहिनी घालणारा लेखक! प्रासादयुक्त भाषा आणि आशयघन कथानक. लेखकानं साठी ओलांडली तरी लेखन चिरतरुणच आहे.

खरं तर वाटतं, या लेखकाशी परिचय व्हावा. पण ते स्वभावात नाही; कुणाच्या पुढं-पुढं करणं, मुद्दाम ओळख काढणं, वगैरे. त्यामुळं मी बसल्या जागेवरून लेखक पहाते. संमेलनाच्या दोन दिवसात समोरासमोर असा परिचय होतच नाही. ओळख होते ती व्यासपीठापुरती.

आणि मग मी मुंबईला परतल्यावर पंधरा दिवसांनी वळणदार अक्षरातलं पत्र येतं. आशय असा की- मी तुझं कथाकथन ऐकलं. तुला पाहिलं. इतर चारजणींपेक्षा तू वेगळी आहेस, तुझ्या वृत्तीत स्थिरता आहे. साधेपणा आहे. कथा सांगण्याची सुंदर शैली आहे. तू मला मुलीसारखीच. म्हणून एकेरी संबोधलं. या कार्यक्रमानं मला साहित्यात एक मुलगी मिळाली असं मी समजतो. तूही मला "बाबा" म्हणावंस असं वाटतं. तुला हे नातं मान्य असेल तर पत्र पाठव.

हे आशीर्वादात्मक पत्र खूप काही बोलून गेलं. पहिली चारसहा पत्रं तर अशीच भावनेनं ओथंबलेली. मला तर हातात आभाळ गवसल्यागत झालं. आणि मग आणखी एक नवल घडलं.

१ फेब्रुवारी १९७५ ला कै. सौ. वनिता चोरघडे यांचा पहिला स्मृतिदिन साजरा व्हायचा होता. बाबांची पत्रातून हाक आली-

"तुझ्या आईची ही पहिली पुण्यतिथी. आईचं नातं तू ओळखू शकतेस. या समारंभाला प्रमुख पाहुणी म्हणून आणि माझी लेक म्हणून तू यावंस, भाषण करावंस अशी माझी इच्छा आहे. या घरची म्हणून तू येणार आहेस. माहेरी बोलवल्यावर येण्याजाण्याचा खर्च बापानं करायचा असतो. तो मी करीन. बाकी व्यवहार नाही. मला उमाळ्यान् बोलणारं माणूस हवं आहे. नुसती मोठ्या नावाची माणसं नकोत-"

आणि मी नागपूरला गेले. चोरघडे कुटुंबाचा आणि माझा तो पहिला परिचय. नागपूर स्टेशनवर पहाटे पावणेसहा वाजता बापा आणि सगळे कुटुंबीय मला न्यायला आले होते. मी पुढे झाले आणि बाबांच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. आता ते घर मला स्वीकारणार आहे की नाही हा प्रश्न होता. सकाळपासूनचा वेळ परिचयातच गेला. संध्याकाळी सर्वजण मातृ सेवा संघात गेलो. न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी अध्यक्ष म्हणून आले होते.

मी काय बोलले आणि कसं बोलले हे मला शब्दात सांगता येणार नाही, पण डॉ. श्रीकांत, सुमाताई, माझ्या समोर बसली होती. ती सगळीच (मॅच्युअर) माणसं अक्षरशः रडत होती. माझ्या शब्दानं की त्या मागच्या आत्मीयतेनं कोण जाणे,

पण आम्ही सगळी एकमेकांची झालो. त्या सगळ्या भावंडांची मी 'ताई' झाले. न्यायमूर्ती आपल्या कठोर आणि खणखणीत आवाजात म्हणाले; 'गिरिजाबाई, तुमचं हे मानलेलं नातं टिकवणं फार कठीण असतं. ही जबाबदारी जन्मभराची असते हे लक्षात ठेवा.' मी सौम्य आवाजात म्हणाले; 'होय, पण ती उभयपक्षी.'

त्यानंतर आजवर, म्हणजे जवळ जवळ गेली पंधरा वर्षं माझं त्या घराशी नातं आहे. या पंधरा वर्षांत बाबांच्या स्वभावातले अनेकविध पैलू मला जवळून पहायला मिळाले. ज्याला आपलं मानलं त्याला जिवानिशी आपलं म्हणायचं अशी त्यांची उत्कट वृत्ती. त्या उत्कटपणामुळंच कधीकधी ते आपला अधिकारही गाजवतात. इतका की, समोरच्या माणसाला आपलं वय विसरून लहान मुलाप्रमाणं खाली मुंडी घालून उभं रहावं लागतं. माझ्या हे वृत्तीत नाही. अतिशय भावनाशील असूनही मी वाहवून जात नाही. गेली पंचवीस वर्षं मी साहित्यात असल्यामुळं अनेक माणसं अशी धर्मानं जोडली गेली आहेत. त्यांना मला तोडता येत नाही. बाबांच्या वृत्तीत हे बसत नाही. पित्याच्या नात्यानं ते सार्वभौम अधिकार चालवतात आणि मग अनेक वेळा बाबांचे आणि माझे खटके उडतात. कठोर शब्दांची देवाण-घेवाण होते. पण काठीनं दुभंगलेलं हे पाणी पुन्हा सारखं होतंच.

बाबा ज्यावेळी एकटे भेटतात त्यावेळी त्यांचं बोलणं ऐकणं ही आनंद-पर्वणी असते. अतिशय उत्कटतेनं, आपल्या जीवनातल्या जुन्या जुन्या हळुवार आठवणी त्यांनी मोठ्या तन्मयतेनं मला सांगितल्या आहेत. त्यांची आणि ती. कै. आईंची (प्रेम) पत्रं मला वाचायला दिलीयत आणि विचारलंय, 'ही छापावीत असं तुला वाटतं का ? माझी शपथ आहे तुला, मला खरं उत्तर दे.'

बाबांची शपथ मोठी देखणी असते. त्या शपथेमधे हक्क असतो, आग्रह असतो आणि अंतरीचा एखादा अश्रू देखील. असं किती वेळा घडलंय की शपथ घालून बाबांनी आयुष्यातल्या अनेक गोष्टी मला सांगितल्यायत आणि डोळ्याची पापणीही न हलवता मी भान हरपून ऐकत राहिलेय.

बाबांच्या लेखणीइतकीच त्यांची वाणीही तेज आहे. अनेक वेळा त्यांच्या खोलीत त्यांच्या समोरच्या खुर्चीवर बसून, त्यांच्या ओजस्वी वाणीतले शब्द मी मनभर ऐकले आहेत. यातला एकही शब्द मी हव्यासापोटी अथवा कृत्रिमपणं वापरला नाही.

पूज्य विनोबांच्या सहवासातल्या त्यांच्या आठवणी मला नेहमीच एका वेगळ्या जगात घेऊन जातात, तर महात्माजींबद्दल "तो कर्मठ म्हातारा"—असं अतिशय प्रेमानं संबोधून, बाबा जेव्हा एकेक आठवण उलगडत जातात तेव्हा अंगा-वर रोमांच उभे राहातात. बापूजींच्या सहवासात वेचलेले अमृताचे क्षण मनाच्या संपुटातून काढून बाबा माझ्यासमोर ठेवतात तेव्हा मला ते किती तरी मोठे वाटतात. बाबांचा तो "राजीव" बंगला, त्यांची मोटर, त्यांचा नावलौकिक या कशाचीही मला कधी भुरळ पडलेली नाही, पण त्यांच्या आयुष्यातल्या बापूजींच्या या आठवणी ऐकताना मात्र वाटून गेलंय, या आठवणी अशाच्या अशा चोराव्यात आणि रेशमी रुमालात गुंडाळून मनाच्या चोरकप्प्यात लपवून ठेवाव्यात. केवढं मोठं ऐश्वर्य !

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बाबांनी केलेलं भाषण हा वक्तृत्वाचा उत्कृष्ट नमुना होताच, पण त्याही-पेक्षा त्यांच्या परिपक्व आणि ठाम विचारांचा तो प्रत्ययकारी आविष्कार होता. त्यांना जे म्हणायचं होतं, ते त्यांनी अतिशय ठाम भूमिकेतून व्यक्त केलं. रायपूरच्या साहित्य संमेलनाच्या समारोपाच्या वेळचं त्याचं भाषण हा त्यांच्या लालित्यपूर्ण शैलीचा एक उत्कृष्ट नमुना होता. बाबांच्या बुद्धीचं हे वैभव जसं थक्क करणारं आहे, तसाच त्यातला एक कोपरा तितकाच बालिशही आहे.

मला आठवतं, एकदा मी नागपूरला गेले असता माझे स्नेही श्री. (व सौ.) डॉ. सुनील सुभेदार यांच्याकडे जेवायला गेले होते. सुभेदारांना मी आधीच सांगितलं होतं, मला बरोबर पावणे-नऊला मोकळी करा. सुभेदार आपल्या नेहमीच्या

स्वभावाप्रमाणं म्हणाले, ' जालश्री ! ही मुंबई आहे थोडीच ? आमच्याकडे, नऊला येणार असं म्हटलं, म्हणजे दहाला निघायची हालचाल करायची असते.'

' पण, मला फार नाही थांबता येणार; बाबांनी सांगितलंय, बरोबर नऊला घरी परत ये.'

सुभेदार मिस्किल हसले. म्हणाले, ' नाही पोचलात नऊला तर काय तुमचे बाबा तुम्हाला शिक्षा करतील ? शाळेतल्या मुलीसारख्या बोलता.'

' बाबांच्या लेखी मी शाळेतली मुलगीच आहे.' त्यावर सर्वजण हसले. जेवता जेवता गप्पा रंगल्या, घड्याळावर नजर ठेवूनच मी जेवत होते. आणि सुभेदार घड्याळाकडे पाठ करून बसले होते. जेवल्यावर ते पान लावायला बसले. माझी चुळबूळ सुरू झाली; कारण नऊला पाच मिनिटं कमी होती. नऊ वाजून दोन मिनिटं झाली आणि फोन घणघणला. बाबांचा आवाज—

' जेवलीस ?'

' हो '

' किती वाजले ? रात्री उशीरापर्यंत लोकांकडे बसू नये '...

' मी निघतेच बाबा. ' सुभेदारांनी कपाळावर हात मारून घेतला.

तर असा हा बाबांचा स्वभाव. त्यांनी आजपर्यंत अनेक वेळा माझ्याशी भांडण केलंय. ' तू जे बोलतेस ते मी लक्षात ठेवेन ' अशी धमकी पण दिली आहे. पण मला बरं नाही असं कळल्यावर आपल्या लेकाला सांगून सगळ्या डॉक्टरी तपासण्याही करवल्या आहेत. मुंबईला मी हॉस्पिटलमधे असताना दर चौथ्या दिवशी, त्यांचं ममतेनं ओतप्रोत भरलेलं पत्र यायचं. डॉक्टरांपासून सर्वजण ते वाचायचे.

मागे एकदा मी बाबांची मुलाखत घेतली होती. मला म्हणाले, ' नीट लिही. ज़बाबदारीनं लिही. वेडंवाकडं लिहिलंस तर मारून टाकेन तुला.'

मी पण बोलले, ' मीही लेखिका आहे. माझ्या लेखणीची जबाबदारी मला कळते. तुमचा जर माझ्यावर विश्वास नसेल तर मी लिहीत नाही.' मुलाखतीच्या सुरवातीला असं गरमा-गरम संभाषण होऊनही पुढचे दोन तास बाबा पोट तिडिकीनं बोलले दोन तासांपूर्वी आपण हिला काय बोललो होतो हे त्यांच्या लक्षातही राहिलं नाही.

बाबांचा राग आणि लोभ असा श्रावणातल्या ऊन पावसासारखा आहे. असा पाऊस अंगावर घ्यायलाही आवडतो आणि अशा स्वच्छ उन्हात स्वच्छंदानं वागडायलाही आवडतं.

बाबा कधी कधी तात्या पंतोजीची भूमिकाही करतात. माझं वक्तृत्व किंवा लेखन याचं त्यांना अपार कौतुक आहे. एका कार्यक्रमात अध्यक्षपदावरून माझ्या विषयी बोलताना ते म्हणाले, ' या पोरीनं नुसतं " गाभाऱ्यातली माणसं " हे एक पुस्तक लिहून लेखणी खाली ठेवली असती तरी तिचं नाव मराठी साहित्यातून पुसलं गेलं नसतं; इतकी ही व्यक्तिचित्रणं जीवंत आणि रसरशीत आहेत.' अशी भरघोस पावती देणारे बाबा कधी कधी माझी कानउघाडणी करतात. पत्रातून सल्ला देतात—

॥ श्री ॥

चि. सौ. गिक्की ऊर्फ सासूबाई यास,
अनेक आशीर्वाद

तू रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेले ' कथाकथन हे तुझे पुस्तक काल दि. २४-७ रोजी पोचले. चि. माधवी आणि श्री यांचेसाठी पाठवलेले पुस्तक त्यांना दिले व माझे पुस्तक लगेच वाचायला घेतले. अर्ध्यापर्यंत वाचत राहिलो. गोष्टी चांगल्या आहेत, पण त्या गिरिजा कीरने लिहिल्या हे जाणवते. आपल्या लेखनापासून लेखक जेव्हा अलिप्त होतो तेव्हाच त्याच्या शब्दाला मंत्रासारखी सर्वमान्यता लाभते. तुझी प्रत्यक्ष भेट झाली तर हा विचार समजावून देईन.

तूर्ततरी तुझ्या पत्राची आणि तुझ्या भावनांची पोच देत आहे.

दि. १६-७-८५ ला मला ७२ वे वर्ष सुरू झाले. पूर्वीचा जोष, जल्लोष आता आनंद देत नाही. बुद्धी शाबूत आहे आणि नवे नवे काही करीत राहावयाची इच्छा व संधी आल्यामुळे बरे वाटते. गेली तीन चार वर्षे लेखन बंदच केले होते.

पण गेल्या महिन्यापासून ईश्वराच्या कृपेने; बोललेले उतरवून घ्यायला एक मुलगी मिळाली आहे. आतडयाचे नाते निर्माण झाल्यावर काहीतरी आगळेवेगळे लिहिण्याची ओढ वाटू लागली आहे. केवळ तिच्यासाठी काहीतरी चांगले चुंगले लिहावे असे वाटू लागणे ही मी देवाची कृपाच समजतो. एवढयात "अज खुर्दा खता", "लय", "जाणीव" ह्या तीन कथा लिहून झाल्या आणि "भावना" ही चौथी कथा चार आठ दिवसात पूर्ण होईल. अर्थात् या कथां-मध्ये भडकपणा, प्रेम, चटोरपणा नसल्यामुळे कुठे प्रसिद्धीला पाठवायच्या हा विचार आहेच. पूर्वीसारखी दर्जेदार मासिकेही राहिली नाहीत आणि तिन्ही कथा नेहमीप्रमाणे दीडपानी असल्या मुळे दिवाळी अंकातही (आजकालच्या) त्यांना स्थान मिळणार नाही. शिवाय "साद" या माझ्या शेवटच्या कथासंग्रहात "अक्षरी विलसले रूप" ही प्रस्तावना लिहून वाचकांचा निरोप घेतला आहे. बघायचे काय होते ते !

इकडे सर्व कुशल आहे. तुझ्या कथाकथनामध्ये तुझा फोटो तर झकास छापला आहे. त्यातले केस ५२ वर्षाचे आणि डोळे १६, १७ वर्षाचे दिसले. बये ! आता तू सासू झाली आहेस. हे बरे नाही !

चि. अमितला इथल्याच मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला आहे. आता लौकरच त्याची टोचाटोची सुरू होणार आणि आमची बहात्तरी सुरू. ठेविले अनंते तैसेचि राहावे हेच खरे.

कळावे. चि. उमाकान्त, मुले आणि हिम्मत असल्यास नवीन माणसाला माझे आशीर्वाद कळवावे. तू इतक्यात इकडे येणार काय ?

तुझा
बाबा

शब्दांकडं आणि वाचेकडं सृजनशील नजरेनं बघणारे बाबा जीवनाकडेही बघताना, ते परमे-श्वराचं सृजन आहे याच मनोधारणेनं बघतात. त्यामुळं साहित्यातले "वामनराव चोरघडे" आणि जीवनात "बाबा" या दोन व्यक्ती भिन्न नाहीत. त्यांच्या या अकृत्रिम विचारधारणेमुळंच त्यांचं आणि माझं नातं टिकून राहिलं आहे. ■

५, 'झपूर्झा' साहित्य सहवास, वांद्रे (पूर्व),
मुंबई, ४०००५१

माय वर्क
लव्ह इट
ऑर लिव्ह इट !

■
■
■

शेफाल सरोवर

आत्ता आत्ता कुठे त्याला
ते जमू लागले होते.
आधी त्याला वाटायचे की
आपण बोलतो ते किंवा
विचार करतो ते तसेच
प्रत्यक्षात जगायचेच असते.
त्याला असेही वाटायचे
की सारी आत्मचरित्रे ही
त्यामुळे अस्सल असे
एकमेव इतिहासकथन असते.
चरित्रांपेक्षाही आत्मचरित्रांवर
त्याचा अधिक विश्वास होता.
आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार
मानायचा की इतिहासलेखन
आणि इतिवृत्त मानायचे
की वृत्तांतलेखन असे
समीक्षेला भेडसावणारे
भीषण महत्वाचे प्रश्न
त्याच्यासमोर कधी नव्हतेच.
त्याला प्रश्न पडायचे.
मात्र प्रश्न पडायला लागले
की पटापट त्यांच्यातूनच
त्याची उत्तरेही पडायला लागायची
"प्रश्नापासून उत्तर हे कधीच
वेगळे नसते,
प्रश्न पडणे हीच
उत्तरप्राप्तीची सुरवात होय"
असे त्याचे हे म्हणणे असायचे.
त्याचे हे म्हणणे एम. ए. च्या
चवथ्या पेपरच्या
डेझर्टेशनकरता काम
करणाऱ्यांनी कितीदा तरी
त्यावर पेपर सबमिट करून
चोथा करून झालेले होते.
त्याच्या बाबतीत एक
अजून घडायचे ते असे
की त्याने वेगवेगळ्या कल्पना
शोधून काढायच्या, त्या मांडायच्या
त्या मांडतांना लोकांनी
त्याच्याकडे, त्याच्या कार्याकडे,
त्याच्या कल्पनांकडे अत्यंत
तुच्छतेने, हिणकसपणे
बघून दुर्लक्ष केल्यासारखे
करायचे.
त्याने मात्र आपल्याच कल्पनेने
भारावून जाऊन
त्यावेळी त्याच्या आयुष्यातील
जे काही सर्वोच्च महत्त्वाचे
असे सुरू असेल त्याकडे
पाठ फिरवायची
आणि कल्पनेच्या साकारण्याकडे
चालू लागायचे.
चालता चालता सोबत
येणारे, नवे-जुने, सोबतीला
घ्यायचे.
त्यातले काही लोकांनी
फितवायचे
काही स्वतःच फितायचे.
काही थकायचे

कुजायचे
गळायचे
काही तरीही ताठ
चालायचा प्रयत्न करायचे.
काही वाकायचे
झुकायचे
काही त्याला मुकायचे
काहींना तो.
तो करायचा
बोलायचा
करायला लावायचा
करवून घ्यायचा. ते
होईलच असे बघायचा.
त्यातले कुणाला
त्याने ते करायला
नको असायचे.
कुणाला ते त्या वेळी
करायला नको असे वाटायचे.
कुणाला त्याने ते
करूच नये असे वाटायचे.
कुणाला वाटायचे याने काय
वाट्टेल ते करावे
पण आपल्याला हवे
ते व तशा पद्धतीनेच
ते व्हावे.
कुणाला त्याने बोलूच नये
असे वाटायचे.
कुणाला वाटायचे, त्याने
करावे.
पण त्यानेच करावे
आपल्याला त्यात गोवू नये.
करायला लावू नये
करवून घेऊ नये.
मात्र काहींना, त्याने
आपल्याला गोवावे
असेही वाटे.
फक्त
त्यातले आपला काही
भोवावे असे होऊ नये
म्हणून ते सतत सावध
असायचे.
तो तसा बेसावधच.
चालायचा.
चालतच रहायचा.
फार पुढे पुढे निघून
गेल्यावर त्याच्या लक्षात यायचे
की आपल्याला थोडे
थांबले पाहिजे.
विचारपूस, चर्चा करून,
काही ठरवूनच नंतर
पुढे जायला हवे.
अशा प्रत्येक वेळी तो
वळून बघायचा
तेव्हा त्याच्या मागे तो
आणि तोच.
त्याच्याशिवाय जे काही
त्याच्या मागे असायचे
ते मागे,
म्हणजे पाठीला चिकटलेले
खुपसलेले, खोचलेले, टांगलेले.

त्याचे एक असायचे.
त्याला काहीही लागले,
खुपसले, खुपले, टोचले
तरी त्याच्या जखमा
होत नसत.
"जखम ही होणारी बाब
नसून करून घेतल्या
जाणारी वास्तविकता
असते. ती होत नसते.

जखम हे मूलभूत
वास्तव नसून ती
वास्तवाचे योग्य
आकलन न झाल्याने
अस्तित्वात आलेली
वास्तवाची अवास्तव खूण
होय,"
असे त्याने प्रतिपादित केलेले होते.
कुठल्याशा विद्यापीठाने त्याला
त्याबाबत सन्माननीय
डी. लिट. देण्याचा प्रस्तावदेखील
विद्वतसभेत मांडलेला होता.
मात्र, " विद्वत्‌सभेतील जन
हे विद्वत्‌जन असण्याची तरतूद
ही निव्वळ कायदेशीर असते.
वास्तवात ही विद्वत्‌सभा हीच मुळात
विद्यापीठांना झालेली एक
जखम होय व जखम
ही होणारी बाब नसून
करून घेतल्या जाणारी
वास्तविकता असते आणि
वास्तवाची ती अवास्तव
खूण असते," असे
म्हणून त्याने विद्यापीठाचा
तो प्रस्ताव त्यांचेकडे
साभार परत केलेला होता.
परत आलेल्या प्रस्तावावर त्या
विद्यापीठाने, त्याने प्रस्ताव परत
करतांना पाठविलेल्या पत्रातील
तो उतारा दगडी पुस्तकाच्या
स्वरूपातील एका कलाकृतीवर
खोदून घेऊन विद्यापीठासमोरील
चौकात ते शिल्प उभारण्याचा
कुलपतींकडे प्रस्ताव मांडला होता.
कुलपतींकडे तो
प्रस्ताव जाऊन त्यावर
शासनाच्या कायदा व सुव्यवस्था
मंत्रालयाने त्या शिल्पावरील
नियोजित मजकूर हा
शासन अथवा विद्यापीठाचे
प्रशासन यांची बदनामी
करणारा नसून त्याने
कायदा व सुव्यस्थेस
कोणतीच बाधा उत्पन्न
होणार नाही असे
कळविल्यावर त्यास
कुलपतींची मंजुरीही
मिळाली होती.
मात्र विद्वत्‌जनांचा अधिक्षेप
करणारे विधान त्यात असल्याने
विद्वत्‌सभेत खरोखरच
विद्वत्‌जन असल्यास काय
याची तपासणी करावी किंवा
विद्वत्‌जनांचा अधिक्षेप होणे
हा शासकीय धोरणाचा
भाग होऊ शकत असल्यास
बघावे अशी पुस्तीही
मंत्रालयाने त्यात जोडली होती.
विद्यापीठाच्या आवारातच
हे शिल्प पुढे बसविण्यात
आले होते.
त्याचे कारण पुढे स्पष्ट
झाले ते असे की
विद्वत्‌सभेत पुढे निवडून
येऊन कुलगुरु पदाकडे
वाटचाल करावयाची
असलेल्या एका
उमेदवारास विद्वत्‌सभेची
निवडणूक जिंकायची होती.
विद्वत्‌सभेत अँटी–विद्वानांचीच

मते भरपूर होती
व विद्वत्सभेबाबतचे विदारक
वास्तव चौरस्त्यावर मांडणाऱ्या
शिल्पाचे अनावरण त्या
उमेदवारास करायचे होते.
मुळात जखमेबाबत
असलेल्या त्याच्या विधानांतून पुढे
उद्भवले ते हे की
कुलपतींच्या प्रमुख उपस्थितीत
एका खासदाराच्या अध्यक्षतेखाली व
एका आमदाराच्या मार्गदर्शनाखाली
एका कारपोरेटरच्या विनंतीवरून
त्या शिल्पाचे अनावरण झाले.
कालांतराने त्या शिल्पाचे
व्हायचे तेच झाले.
सध्या त्याचे मेंटेनन्स,
जखमांवरील मलम तयार
करणाऱ्या एका कंपनीने
स्पाँसर केलेले आहे.
आणि अनावरण ज्याने
केले होते तो उमेदवार
कुलगुरू झालेला असून
मेंटेनन्स करणाऱ्या कंपनीत
त्याची सत्तर टक्के पार्टनरशिपही
आहे.

तर, त्याला काहीही लागलं, खुपलं
खुपसलं, टोचल तरी
त्याच्या जखमा होत नसत.
तो वळून बघायचा
तेव्हा मागे पाठीला हात
लावायचा आणि
ठिकठिकाणी खुपसल्या गेलेले
सुरे, टोचलेले काटे आणि
त्याला लावलेली विविध
लेबल्स पाठीतून काढून
पोटात घालायचा.

एवढ्या प्रवासात हे साऱ्यांनी
दिलेलं सारं आपल्या
पोटातच कसं ठेवायचं
हे सरावानं त्याला आता
ठाऊक झालं होतं.
त्याच्याच बापानं त्याच्याच आईवरून
त्याला दिलेल्या शिव्यांपासून,
तो कालपरवाच त्याचे
तथाकथित प्रतिष्ठा असलेले प्रमुख असे
एक पद हिरावून घेण्याकरता
त्याला त्या पदावर नेमण्याऱ्यांनीच
घातलेला घाट……
सारं त्यानं पोटात साठवून ठेवलं होतं.

त्याला काही स्वीकारण्यापेक्षा
ते नाकारण्यातच अधिक
आनंद असायचा.
मात्र त्याचा स्वीकार करण्याइतपत
परिस्थिती निर्माण करणं
आवश्यकच असायचं.
ती तो करायचा.
ती निर्माण झाली की तिच्यापासून
जे काही उत्पन्न होणार असेल
ते उत्पन्नच तो नाकारायचा
आणि पुन: तशीच वा
त्याहून अधिक काही
उत्पन्न करवणारी परिस्थिती
निर्माण करण्यात स्वत:ला
गुंतवून घ्यायचा.
त्यातून उत्पन्न होणारंही नाकारायचाच.
तो स्वीकारायचा तो केवळ
अधिकाधिक नाकारता येणारं

असं काहीतरी निर्माण करण्याची
प्रक्रिया.
" उत्पन्न स्वीकारण्या अथवा
नाकारण्यातून
उत्पन्नाचा विनियोगच तेवढा
स्वीकारला जातो परंतु हे उत्पन्न
उत्पन्न करण्याच्या प्रक्रियेत
उत्पन्न होणारे जे काही
स्वीकारल्या जाते ते व्युत्पन्न "
अशी त्याची त्याच्या
व्युत्पन्नत्वाबाबतची धारणा
झालेली होती.
त्यातूनच त्याचं वेगळपण त्यालाही
जाणवत असावं.
खरं तर साऱ्यांनी त्याला
तसं वाळीतच टाकलेलं असल्यासारखं
होतं.
त्याच्याबद्दल वाटायचा तो
भितीयुक्त दरारा.
तोच काहींना आदर म्हणून
वाटायचा. काहींना
भीती म्हणून.
त्याच्याविषयी सांगण्यासारखं
खूप असायचं.
त्याला स्वतःला मात्र ते
सांगायला सवडच
नसायची. तो हारतो की जिंकतो
हे त्याच्या शत्रूंनाच काय
मित्रांनाही कळत नव्हतं.
त्याच्याबद्दल काळजी करणारं
असं फारसं कुणी नसायचच.
त्याची त्यालाही काळजी नसायची.
त्याची डेव्हलपमेंट ही
'व्हर्टिकल' व्हायला पाहिजे,
ती 'हॉरिझाँटल' होते
असे त्याचे कागदोपत्री
असावे लागणारे मार्गदर्शक
तो त्यांच्या नावांचे कुंकू
लावून घेऊन संशोधन
करीत असे त्यावेळेला त्याच्या
काही मित्रांना सांगत असत
असे मात्र कागदोपत्री नमूद झालेले
आहे.
तसे कागदोपत्री त्याच्याबद्दल
नमूद असणारे सारेच तसेच
होते असे मानता यायला
जागा नाही.
अनेक ठिकाणचे त्याच्याबद्दलचे
रेकॉर्डस् एकत्र केले तर
अंधश्रद्धेवर हल्ला चढवणारा
तो स्वतः किती अंधश्रद्ध
होता हे सहज सिद्ध
करता येऊ शकते.
त्याचे धर्मातीतत्त्व व
नास्तिक्य त्यानेच स्वाक्षरी
करून भरलेल्या अनेक
अर्जांवरूनच खोटे ठरविता
येऊन त्याला भोंदू म्हणून
निकालात काढता येणे
फारसे अशक्य नव्हते. तो अनेक
प्रसंगी खोटेच बोलला असल्याचेही
सिद्ध करता येत असे
मात्र तरीही तो जे आहे
ते नाकारणेही कुणालाही शक्य
होत नसे.
आता तर त्याने पेरलेले
सारेच उगवून आले आहे.
ज्यांनी ज्यांनी म्हणून
त्याच्या करण्याकडे तुच्छतेने,
हिणकसपणे, बघितले असेल

त्यांचे डोळे एकतरं
पूर्णपणे गेलेले आहेत
आणि तोंड मिटलेले.
किंवा ज्यांचे हे सारे अवयव
आणि त्यांची स्थानके शाबूत
आहेत
त्यांनी मधल्या काळात तो जे
करायचा म्हणून त्याला
हाकलून लावायचे तेच करुन
ती टिकवून धरली
आहेत.
अद्यापही ते हे कबूल
करत नव्हते इतकेच.
त्यांनी ते कबूल करणे ही
त्याची तर गरज नसायचीच.
त्याचे नांव पुसून आपल्या
नांवाची लेबले त्याच्या कृतींवर
अनेकांनी लावलेली होती.
ती लावण्याच्या प्रयत्नात त्यांच्या
आपसातच लढाया देखील
झाल्या. पुढे तह देखील.
तो या साऱ्याच लढाया
आणि तहांपासून अलिप्त
असायचा.
त्याच्या साऱ्याच कृतींवरचे
त्याचे नावही आता ठसठशीतपणे
सर्वत्र उमटलेले होते.

त्याचे प्राथमिक नागरिकत्वच रद्द
करण्याचा झालेला ठराव आणि
त्या ठरावाला तो सोडून
साऱ्यांनी केलेला विरोध
त्याच्या गावातील संबंधित
दप्तरात आजही उपलब्ध आहे.
काचेच्या एका पेटीत तो ठराव
स्पष्टपणे
वाचता येईल असा ठेवून
ती पेटी भरवस्तीतील
चौकातील इमारतीच्या दर्शनी भागात
ठेवावी असा एक प्रस्तावही
त्या संबंधात नुकताच मंजूर
झालेला आहे.
त्याच्या अंगावर मात्र अजून
तोच झब्बा आहे.
तो अजूनही तसाच स्पष्टपणे
वाचता येतो.
त्याच्यावर त्यानेच लिहिलेले
" माय वर्क
लव्ह इट ऑर लिव्ह इट !" ■

अनुक्रमणिका

ध्यास

■

■

■

तो आता गाडीतून उतरतो तेव्हा सकाळचे साडे-सात वाजलेले असतात. कालपासून झालेल्या दगदगीमुळे त्याचे सर्व शरीर गलितगात्र झालेले असते आणि तिच्या बहिणीच्या त्या पत्रामुळे तर मनही पार उस्कटून गेलेले असते. मानसिक आणि शारीरिक ताण त्याला आता असह्य झालेला असतो. फलाटावरल्या गर्दीतून मार्ग काढून घोड-दौडीने पळण्याचा त्राण शरीरात उरला नसल्याचे त्याला जाणवते. एरव्ही असे कधी होत नसते. अवेळी असे खचलेपण जाणवू लागते. वयाची अजून तिशीही ओलांडलेली नसूनही साठीच्या म्हाताऱ्यागत स्थिती झाली असल्याचे त्याला वाटू लागते.

तो गर्दी ओसरू देतो. परंतु फलाटावर तसे उभे राहणेही त्याला जड जाते. तो तेथील खांबाला टेकून क्षणभर उभा राहतो. खिशातून सिगारेट काढून पेटवितो आणि विमनस्कपणे भसाभसा धूर सोडू लागतो. सूटकेस हाती घेऊन उभा असलेला हमाल त्याच्या या मनःस्थितीचा अंदाज घेतो. म्हणतो–

"चला साहेब, गर्दी कमी झाली आता!" तो त्या हमालाकडे बघून किंचित्सं हसतो आणि त्याच्या मागोमाग कोलमडल्यागत चालू लागतो.

स्टेशनातल्या गर्दीतून मार्ग काढून तो बाहेर यतो तेव्हा पावसाची बारीक भुरभुरी सुरू झालेली असते. तो स्टेशनच्या शेडमध्येच उभा राहतो. हमालाच्या हातावर पैसे टाकून सूटकेस हाती घेतो आणि जवळच असलेल्या कोणाच्या तरी लाकडी मोठ्या खोक्यावर बूड टेकवितो. तास–दोन तासांच्या विश्रांतीची आपणाला खूपच आवश्यकता असल्याचे त्याला जाणवते.

तिच्या बहिणीच्या तातडीच्या पत्राने तो काल दुपारीच चिखलदऱ्याहून निघालेला असतो. सर्वत्र मुसळधार पाऊस कोसळत असतो तरी!

आता ती दुसऱ्यांदा आजारी पडली असते. गेल्यावर्षीच्या आजाराने तिची परिक्षा बुडाली होती आणि तिचे ते वर्षही वाया गेले होते. प्रकृती बरी झाल्यावर ती धामणगावला आपल्या घरी निघून गेली होती. पूर्वीच्या तिच्या सौष्ठवात आजारामुळे फार फरक पडला होता. तिची प्रकृती अतिशय ढासळल्यामुळे तिच्या अंगावरचे मास झडले होते आणि आजारांत तिच्या डोकीवरील घनदाट केस आता खूपच विरळ झाले होते. त्या वर्षी 'ड्रॉप' घेऊन धामणगावी परतल्यावर तिने भरपूर विश्रांती घेतली होती. नंतर जरा बरे वाटल्यावर तेथील एका शाळेत तात्पुरती शिक्षिकेची नोकरी पत्करली होती. त्याच बरोबर आपला मागे पडलेला अभ्यासही ती थोडा थोडा करू लागली होती.

तिने त्याला सविस्तरपणे हे सारे कळविले होते तेव्हा त्याला मनोमन खूप आनंद झाला होता आणि काहीसा निश्चितही झाला होता. त्यानंतर तिची किती तरी पत्रे आली होती. काही पत्रे दीर्घ होती तर काही अगदीच त्रोटक. परंतु तिच्या प्रत्येक पत्राने तो भारावून जात होता, तिची मनःस्थिती कळून अस्वस्थ होत होता. तिच्या आणि त्याच्या वास्तव्यातही बरेच अंतर होते. तिला वारंवार भेटताही येत नव्हते. प्राप्त परिस्थितीत आपण हतबल झाल्याने तो दरवेळी अधिकाधिक दुःखी मात्र होत होता. परिस्थितीचा एक भोवरा निर्माण झाला होता आणि त्या भोवऱ्यात तो अडकला होता. भोवऱ्यात गोलगोल फिरून आपण बुडून जाऊ असे त्याला वाटत होते. नाकातोंडात पाणी गेल्यामुळे जसे व्हावे तसे त्याचे झाले होते. नीति–अनीतीचा, सामाजिक बंधनाचा, कायद्याच्या कटकटीचा, सौ. सुषमा व दोन वर्षाच्या गोड लीनाचा विचार, कारण नसताना होणाऱ्या चिडचिडीतून त्यांच्यावर होणारा अन्याय आणि आपल्या ध्यासापायी स्वतःची तब्येत न सांभाळणारी ती, तिच्यावरील तिच्या आई वडिलांचे दडपण – या साऱ्या–साऱ्यांचा विचार

करून त्याचे डोके बधीर होऊन जात होते आणि मग काय करावे अन् काय करू नये याचा निश्चित निर्णय घेणे त्याला कधी जमलेच नव्हते. विचारा-विचारांनी तो थकून जात होता. आणि सारी बंधने तोडून पूर्वीसारखे स्वच्छंदी राहण्याजोगी परिस्थितीही राहिली नव्हती. तो या साऱ्या बंधनात जखडला गेला होता की आता त्याची सुटका होण्याची सुतराम शक्यता नव्हती. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी परिस्थिती! आपण परिस्थितीच्या हातातले एक बाहुले आहोत या पलिकडे तो स्वतःच्या व्यक्तित्वाला फारसे वेगळे समजेनासा झाला होता. जसे होईल तसे होवू द्यावे; जो प्रसंग येईल त्या प्रसंगाला निमूटपणे तोंड द्यावे असे न ठरविताही ठरविल्या गेले. परंतु कोणत्याही किमतीवर तिला अंतर द्यायचे नाही. तिच्यावरील प्रेमाची मोडतोड करण्याची कल्पनाही त्याला प्रलयंकारी वाटत होती. तिच्या प्रेमाच्या संदर्भात त्याच्या मनाने इतकी साद दिल्यानंतरही तिचा तो पत्नी म्हणून स्वीकार करू शकत नव्हता...कायद्याच्या अनंत कटकटी होत्या. सामाजिक बंधने होती. आणि या कोंडीतून मात्र त्याची कधीच सुटका होऊ शकली नव्हती. ती केवळ आपली एक प्रिय विद्यार्थिनी...बोलघेवडी.. नेहमी चिव्‌चिव् करणारी ... हरहुन्नरी ... चित्र काढणारी ... कविता लिहिणारी...नाटकातून सहजपणे अभिनय करणारी...बघता बघता त्याच्यासारख्या उमद्या कलावंताच्या प्रेमात पडली त्याच्याच चित्रांनी तिला प्रेरणा दिली होती...अभिनयाचे धडे त्यानेच गिरविले होते आणि कविता कशी असावी हेही त्यानेच तिला शिकविले होते. एका विद्यार्थिनीचे रूप पालटून ती आता त्याची प्रेयसी झाली होती. त्याच्यावर जीव टाकीत होती...त्याच्या ध्यासापायी आजारी पडली होती.

तिच्या पत्राने त्याला कळले होते की ती पुन्हा कॉलेजच्या शिक्षणासाठी नागपूरला गेली आहे आणि काल आलेल्या तिच्या बहिणीच्या पत्राने तो तर पुरता हादरूनच गेला होता. तिच्या बहिणीने त्याला पाठविलेले हे पहिलेच पत्र! यापूर्वी तर ती स्वतःही, त्याच्या आणि आपल्या बहिणीच्या या प्रेमसंबंधावर नाक उडवीत होती...तिचा आणि त्याचा दुस्वास करीत होती. तिच्या आईवडिलांनीही त्यांच्या या संबंधावर तोंडसुख घेतले होते....घरातल्या घरात तिचा मानसिक छळ केला होता....तिला अगदी नकोनकोसं करून सोडलं होतं...ती वडील-आई-बहिणी-भाऊ यांच्या गराड्यात असूनही एकटी पडली होती. मनातल्या मनात कुढत होती. त्याचा परिणाम शरीरावर झालाच. ती हळूहळू खंगू लागली होती अबोल झाली होती. यावेळी तिची बहिण तिच्या सोबतीला शिक्षणासाठी म्हणून नागपूरला आली होती. तिच्या कालच्या पत्राने त्याला कळले होते की ती पुन्हा आजारी पडली आहे म्हणून! तसा तो पंधरा-वीस दिवसापूर्वीच नागपूरला सरकारी कामानिमित्त आला असताना प्रयत्न करूनही तो तिला भेटू शकला नव्हता. सरकारी काम आटोपल्यानंतर लगेच त्याला चिखलदऱ्याला परतायचे असल्यामुळे त्याला फार काळ नागपुरात थांबताही आले नव्हते आणि तेवढ्या थोड्या अवधीतही त्याने तिला भेटण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता. परंतु होस्टेलच्या मूर्ख आणि अल्लड पोरींनी त्याची फोनवरूनच फिरकी घेतली होती व शेवटी 'रॉंग नंबर' म्हणून फोन आदळून ठेवून दिला होता. तो या साऱ्या प्रकाराने कावून गेला होता. तिच्या भेटी शिवाय दुःखी-कष्टी मनाने परतला होता. नागपुरात येऊनही तिची भेट न झाल्याने तो खूप व्यथित झाला होता व परततांना मणामणाच्या ओझ्याने जडावून गेला होता. तातडीने निघून जावे लागल्यामुळे तो स्वतःच्या नोकरीवरही चरफडला होता आणि चिखलदऱ्याला परतल्यावर त्याने तिला एक दीर्घ पत्र लिहून मन मोकळे केले होते. त्या पत्रामुळे त्याचे थोडे दुःख कमी झाले होते. त्या पत्रावर खरे म्हणजे तो तिच्या पत्राची आतुरतेने वाट बघत होता. परंतु काल हाती पडले ते-तिच्या बहिणीचे, लिफाफा डिसुझाचे पत्र...ज्या पत्राने तो हादरून गेला होता. तिच्या बहिणीने त्याला पत्रातून बरेच काही लिहिले होते...त्या पत्रातला काही भाग आता त्याला आठवतो-

"...तुम्ही ग्लोरियाला लिहिलेले पत्र तिला मिळाले. ते तिनेच मला वाचायला दिले! तुमचे पत्र येण्याचे अगोदरच तिला इथल्या सरकारी इस्पितळात कॉलेजतर्फे भरती केले होते. तुम्ही इथे येऊनही घडल्याप्रकारामुळे तिला भेटू शकले नाही याचे तिला फार फार दुःख झाले आणि ती हमसाहमशी रडू लागली होती. तिची ती स्थिती मला बघवत नव्हती. ती सारखी रडत होती...रात्र रात्र जागून काढीत होती. त्याचा व्हावा तोच परिणाम झाला. तिला पुनश्च इस्पितळात भरती करावे लागले. तशा स्थितीतही तिने मला विश्वासात घेऊन सारे सारे सांगितले.... तिचे तुमचे असलेले अशारीरिक प्रेम! अर्थात् यावेळी मी सारे समजू शकले! (आता माझी समज पूर्वीपेक्षा वाढली आहे म्हणूनही कदाचित असेल आई-वडील मात्र आपल्याच जागेवर अडून आहेत. जीवनाचा एवढा अनुभव गाठीशी असूनही व ख्रिश्चन जमातीत जन्म घेऊनही ते अद्याप पुरातनमतवादी आहेत....आमचे दुर्भाग्य आणखी काय? मागे माझा जो तुम्हा-दोघांविषयी गैरसमज झाला होता, त्याबद्दल मला मनस्वी दुःख होतेय्. I am very sorry! तुम्ही नागपुरात येऊनही तुम्हाला ग्लोरियाला भेटता आले नाही याचे मलाही दुःख झाले! तुम्हा दोघांच्या प्रेमसिद्धीसाठी मी प्रभू येशूकडे याचना केली की प्रभू या दोघांना सुखी ठेव...एवढे दुःख त्यांच्या पदरात टाकू नकोस. चर्चमधून परतताना मला हुंदका आला परंतु प्रभू येशूवर माझी अपार भक्ती असल्यामुळे तो तुम्हा दोघांना सुखी ठेवेल या विश्वासाने माझे मनही लगेच हलके झाले! तुम्ही इथे आलात तेव्हा तिला इस्पितळात भरती केले असल्याचे माहित नव्हते...नाही तर तुम्ही तिथे नक्कीच आला असता. या साऱ्या प्रकारामुळे मला आमच्या होस्टेलच्या मुलींचा खूप राग आला आणि त्या मार्गारेटला तर मी खूप ताड्ताड् बोलले. फक्त तिच्या मुस्काटात मारले नाही, एवढेच! वात्रट मेली! या चार पाच मुलींचा ग्रूप होस्टेलमध्ये खूपच वात्रट आणि चावट आहे...प्रभू त्यांना शिक्षा देईलच! मेल्यांना जेव्हा तेव्हा विनोदच सुचतो. ज्या दिवशी तुम्ही नागपुरात होता त्यादिवशी का कुणास ठाऊक ती सतत तुमची वाट बघत होती. वारंवार मला म्हणत होती- "लीझा, बघ तरी आलेत का ते?" रिक्षाची चाहूल लागली की ती मला कुणाची रिक्षा आहे ते बघायला पिटाळीत होती. खरे म्हणजे हा योगायोगच होताना! ती आजारी असतांना तुम्ही इथं असणं आणि तरीही तुम्हा दोघांची भेट न होणं म्हणजे दैवदुर्विलास! मेली मार्गारेटच याला कारणीभूत आहे. गॉड वुईल नॉट फरगिव्ह हर! प्रभू येशू तिला कधीच क्षमा करणार नाही. तिच्या चेष्टेमुळे ग्लोरियावर खूपच परिणाम झाला. गेल्या आठ दिवसात ती औषधं देखील जीवावर आल्यासारखी घेतेय्. खाण्याची गोष्ट तर दूरच! आणि तुम्ही येणार किंवा नाही हे माहित नसूनही ती दरक्षणाला तुमची वाट बघतेय्...तिला कसला आजार झालाय् ते कळत नाहीय्. वैद्यकीय शास्त्रातलं मला फारसं कळत नाहीय् परंतु मला एक निश्चित वाटतं, तुम्ही भेटलात तर तिला फार बरं वाटेल! खरं म्हणजे तिने तुमचाच ध्यास घेतलेला आहे. ताई, अलिकडे म्हणजे या आजारात खूपच कृश झालेली आहे. वर्षापूर्वी ती खूपच सुंदर होती, एखाद्या परीसारखी दिसत होती हे सांगूनही कुणाला खरं वाटणार नाही. या आजारात तिचे केस कापल्यामुळे ती पंख कापलेल्या पाखरासारखी फडफड करतेय्...सदोदित आरशात बघून रडतेय्...आपल्या शरीरातली किती हाडे दिसतेय् ते ती चाचपडून बघतेय्. छांदिष्टासारखी! मिस्टर आनंद देशमुख, आता तुमच्या-तिच्या भेटीची खूपच आवश्यकता आहे. खरे म्हणजे आता जर तुम्ही तिला भेटला नाहीत तर ती खचित्च वेडी होईल. पत्र पाहताच निघून या!"

लीझाचे ते पत्र पोष्टात टाकल्यानंतर दहा दिवसानंतर काल मिळाले होते. पोष्टाच्या या दिरंगाईवर तो मनातल्या मनात चरफडला होता. पण त्याशिवाय काही करता येण्यासारखे नव्हते. पत्र वाचून होताच. तासाभरात त्याने निघण्याची तयारी केली. सुदैवाने अमरावतीला जाणारी बस मिळाली. बसमध्ये बसल्यानंतर

पावसाने सुरुवात केली होती आणि नंतर पावसाचा वेग खूपच वाढला होता. सायंकाळी आठ वाजता तो अमरावतीला पोचला. पोटात भूकेचा डोंब उसळला होता तरी त्याने काहीच खाल्ले नाही. फक्त दोनदा चहा घेतला आणि वरचेवर सिगारेटस् ओढून मनाची अस्वस्थता घालविण्याचा निरर्थक प्रयत्न करू लागला. गाडीला किती तरी अवकाश असूनही तो फलाटावरच थांबला ... तिच्या विषयी विचार करीत. आणि दरक्षणाला तो आणखी अस्वस्थ होऊ लागला. केव्हा एकदा नागपूरकडे जाणारी गाडी येते असे त्याला वाटायला लागले होते.

रात्री ११-३५ च्या पॅसेंजरने तो निघाला तेव्हा त्याचे शरीर अगदी थकून गेले होते आणि डोके जड झाले होते. कदाचित् लालही झाले असावेत. डोळ्यांची आग होत होती. कोणी जराही ढकलले असते तरी तो कोलमडून पडला असता, इतका तो गलितगात्र झाला होता. आणि गाडीतही गर्दी इतकी की केवळ अंग आखडून बसण्यापलिकडे तो काहीच करू शकला नव्हता. आणि डोक्यात तिच्या विषयीचे विचार इतके थैमान घालीत होते की डोळे जड पडूनही मिटायला राजी नव्हते. सारी रात्र अशी तगमग सुरू होती आणि मनाला जीवघेण्या वेदना होत होत्या. ... आणि आता तो एका खोक्यावर नुसता टेकून उभा असतो. शिष्टाचाराची पर्वा न करता.

पाऊस बारीक कणाकणाने भुरभूरतच असतो. कालपासून सुरू असलेल्या या पावसाचाही त्याला कंटाळा येतो. मनातून रागही येतो. तो सूटकेस-मधून प्लॅस्टिकचा रेनकोट-टोपी काढतो...अंगावर चढवितो. ताठपणे उभे राहून सिगारेट पेटवितो. अस्वस्थपणे धूर सोडून शोधक नजरेने बघतो. त्याचा नजरेचा अंदाज घेऊन एक रिक्षावाला त्याच्याजवळ येतो. विचारतो-

"कहाँ जाना है साहाब ?"

प्रथम कुठे जावे हेच त्याला समजेनासे होते. त्याचा अवतार त्याला स्वतःलाच मोठा विचित्र भासतो. कुठे तरी जाऊन थोडे थांबावे...हात तोंड धुवावे...थोडी विश्रांती घ्यावी आणि मग ताजे-तवाने होऊन त्या हॉस्पिटलमध्ये जाऊन तिला भेटावे असे एकीकडे त्याला वाटते तर दुसरे मन म्हणते...अस्साच्या अस्सा तिच्या भेटीला जा ! परंतु हा उतावीळपणा त्याला आवडत नाही. शिवाय अशा अवतारात...अशा वाईट मनः-स्थितीत गेल्यावर आपणाला बघून तिला काय वाटेल ? तिच्या ऐवजी आपणच आजारी आहोत म्हणून ! त्याचा तिच्यावर विपरीत परिणाम होईल. खरे म्हणजे आपण खूप आनंदीत...उत्साहीत दिसावं की ज्यामुळे तिचं स्वतःचंच दुःख कमी होईल. तिच्या मनावरचा ताण कमी होऊन ती आपण आल्याच्या आनंदाने हसू लागेल.

तो काहीच बोलत नाहीसे बघून तो रिक्षावाला जाऊ लागतो तसा तो म्हणतो-

"अरे भाई रुको..."

"कहाँ जाना है साहाब ?"

"रिक्षा कहा है ?"

"ओ उधर-" तो दिशा दाखवितो.

"चलो !"

रिक्षावाला त्याची सूटकेस उचलतो. चालू लागतो. तो त्याच्या मागोमाग कोलमडल्यागत जातो.

रिक्षापाशी आल्यावर तीत सूटकेस ठेवून रिक्षावाला म्हणतो-

"बैठो साब !"

तो बसल्यावर रिक्षावाला आपल्या सीटवर बसून मागे वळून त्याच्याकडे बघत विचारतो-

"कहाँ दौडाऊ रिक्षा ?"

"वर्धी के तरफ चलो-"

रिक्षावाला रिक्षा ओढू लागतो.

तो शून्यपणे बाहेर बघतो. त्याला वाटते; एखाद्या लॉजमध्ये उतरावे. पण लगेच त्याला त्याच्या एका मित्राची आठवण होते. तो त्या मित्राकडेच जायचे ठरवितो. लोखंडी पुलाजवळ आल्यावर तो रिक्षावाल्याला म्हणतो-

"इधर धंतोलीमें चलना"

"कौनसी धंतोली ? बडी या छोटी ?"

"छोटी धंतोली !"

"वहा कहा ?"

"तुम रिक्षा चलाओ, मैं बराबर बता दूंगा!"

" अच्छा साहाब् !"

तो रिक्षावाल्याला हव्या त्या ठिकाणी थांबवितो, विचारतो–

" कितना पैसा ?"

" पाच रुपये देना साहाब् !" पावसाने भिजल्यामुळे तो कुडकुडत असतो.

तो त्यावर काहीच बोलत नाही. खिशातली दहाची नोट काढून देतो.

" साहाब् पाच रुपये छुट्टे नहीं !"

" कितने हैं ?" तो उतरताना विचारतो.

" दो–एक रुपये होंगे !"

" उतनेही दो !"

रिक्षावाला खूष होतो. दोन रुपयाची चुरगळलेली नोट देतो व सलाम ठोकतो. अदबीने रिक्षातली सूटकेस घेऊन त्याच्या मागोमाग येतो.

तो फाटक उघडून त्या बंगल्यात शिरतो. बंद दाराशी उभा राहतो व ' कॉलबेल 'चे बटन दाबून दार उघडण्याची वाट बघतो.

शेजारच्या खोलीतली एक तरुणी त्याच्या रुबाबदार व्यक्तिमत्वाकडे कुतूहलाने बघते आणि न बघितल्यासारखे भासवून कुठल्या तरी चित्रपटातल्या गाण्याची किनरी लकेर छेडून घरात दडते.

तो गालातल्या गालात हसतो.

' कॉलबेल ' वाजवूनही अपेक्षित वेळेत दार उघडत नाही म्हणून तो दारावर टक् टक् करतो. थोड्या वेळातच दार उघडते. दारात त्याचा मित्र कमरेला टॉवेल गुंडाळलेल्या अवस्थेत उभा असतो.

" अरे आनंदा, तू ?"

" हॅल्लो अरविंदा ?"

दोन्ही हात पसरून त्याचा मित्र त्याला आपल्या बाहूत घेतो. दोन्ही हाताने घट्ट दाबून त्याला थोडे वर उचलून धरतो.

" अरे पुरे ... या धवडग्यात तुझ्या कमरेभोवतीचा टॉवेल सुटेल."

" पर्वा नाही. घरात कुणी स्त्री नाही. आम्ही आपले ब्रह्मचारी...साऱ्या ब्रह्माचे आचारी ..."

" साहेब, सूटकेस कुठे ठेवू ?"

" ठेव इथे !"

" चलतो साहेब–" रिक्षावाला पुन्हा एकवार झुकून नमस्कार करतो व निघून जातो तो अंगातला रेनकोट काढून ठेवतो.

दोघेही कोचावर बसतात. तो हसून विचारतो–

" वहिनी कधी आणणार आहेस ?"

" तिचा अजून जन्म व्हायचा आहे !"

" म्हणजे ?"

" अरे एकाचेच पोट भरणे मुश्कील ! नोकरीचा पगार तरी किती मिळतोय् ? संसाराला पुरेल इतका पगार नाही माझा ! वहिनी ... मग तिला होणारी पिल्लावळ–नको–"

" म्हणजे अजून किती दिवस असा वाण्या राहणार आहेस ?"

" फक्त थोडे दिवस ! एक पोरगी प्रेमात पडू पाहतेय्–"

" शेजारची कां ?"

" तुला कोणी सांगितलं ?"

" तिच्या डोळ्यांनी !"

" जाने दो ... पण आनंदा, तू असा का वाळलास ? दिसतोस कसा तू ? वाळलेल्या झाडासारखा !"

तो फक्त कडवटपणे हसतो. मग म्हणतो–

" खूप थकलोय् मी !"

" एवढ्यातच ? वहिनी काय म्हणते ? पूर्वीसारखी भांडते किनई तुझ्याशी ?"

" भांडते ना ! घरात भांड्याला भांडं लागलं की भांडण होतंच !"

" आणि तुमची लीना ?"

" अगदी मजेत आहे !"

" त्यानंतर ?"

" पंचवार्षिक योजना आहे आमची ! बरं मला एक सांग, या घरात स्वयंपाक वगैरे कोण करतं ?"

" मीच आचारी आहे !"

" तो फिर दो अच्छी कडक मिठ्ठी चाय् लाव् !"

" अच्छा साब अभ्भी लाता ... देढ रुपयेवाली !"

तो स्टोव्हवर चहा करतो. एक पेला त्याच्या हाती देत त्याला विचारतो–

" काय झालंय् एवढं थकायला ? आँ ?"

त्यावर तो काहीच बोलत नाही. नुसता मुकाटचाने चहा संपवितो व किंचित् हसून म्हणतो–

" रात्रभर जागरण झालं प्रवासात, म्हणून !"

" आय् सी !"

" आणि माझं ऐकतोस काय ?"

" काय ऐकू सांग !"

" मला अगदी शांतपणे पडू दे ! Please. मग सांगतो सारं !"

" काय सांगणार आहेस ?"

" मला तुला पुष्कळच काही सांगायचं आहे... अगदी खाजगी अन् तू कायद्याचा अभ्यास करतो आहेस ना, तेव्हा मला थोडा शहाणपणाचा सल्ला दे ! मार्ग सांग !"

" कशाबद्दल सल्ला ? कसला मार्ग ?"

" प्रथम एकदम आराम...आगे का पर्देपर देखिये !"

त्याचा मित्र विचित्र हातवारे करतो.

" अरविंदा, आज तू सुटी काढ माझ्यासाठी ! - मग मी तुला सारं काही सांगतो आणि काही दाखवितो. ओक्के ?"

" ठीक आहे. काढतो सुटी. तू आराम कर. तोवर मी फस्क्लास स्वयंपाक करतो. बैंगनका भरता और रोटी !"

" छान ! झोपू मी आता ?"

" झोप !"

तो कपडे बदलून खाटेवर झोपतो. दोन अडीच तास नुसता झोपून राहतो.

अरविंदाचे सारे आटोपले असते. सकाळच्या कॉलेजलाही तो जात नाही आणि आता ऑफिसलाही जाणे शक्य नसते. तो फक्त आनंद उठण्याचीच वाट पहात असतो. त्याला नुसते तसे बसून राहण्याचाही कंटाळा येतो, आणि आता भुकेने पोटातली आतडी तोडू लागतात. तरीही तो नुसता जांभया देत बसून राहतो.

तो एकदम दचकून जागा होतो. डोळे सताड उघडतो आणि नंतर गप्पकन् ते मिटवून थोडा वेळ तसाच राहतो.

" दचकलास कां ?" अरविंद विचारतो.

तो डोळे उघडतो. म्हणतो —

" भल्या गृहस्था, उठवायचं नव्हतंस एव्हाना ?"

" तूच म्हणाला होतास ना, शांतपणे पडू दे म्हणून !"

" अरे पण मला तिच्या भेटीला जायचं होतं ना ? आणि मी इथे नुसता झोपत काय पडलोय् ?"

" कोण ती ? कोणाच्या भेटीला तुला जायचंय् ?" तो तुटून पडल्यासारखा विचारतो.

तो क्षणभर काही बोलतच नाही. मनाशी विचार करतो–

अरविंदाला आपले हे प्रकरण सविस्तर सांगावे कां ? तो एक मनस्वी मित्र आहे. अगदी सरळमार्गी. त्याला हे कळले तर त्याची प्रतिक्रिया काय राहील ? त्याच्या मनातून आपण उतरून जाऊ. तो आपली निर्भर्त्सना करील. काय करावे ?

त्याचे डोके सुन्न होऊन जाते. तिच्या संदर्भात आपण उगीच काही बोललो याचा त्याला खेद होतो.

" अरे काही बोलशील की मुखजडासारखा बसून राहशील ?"

तो गालातल्या गालात हसतो म्हणतो–

" सांगतो ! थोडा धीर धर !"

" त्याला एवढी प्रस्तावना कशाला ?"

" माझ्यावर विश्वास ठेव आणि कृपा करून माझ्याविषयी गैरसमज करून घेऊ नकोस !"

" तुझ्यावर माझा विश्वास आहे आणि म्हणूनच मी कोणताही गैरसमज करून घेणार नाहीय् ! आता बोल–"

" ती माझी प्रेयसी आहे. पूर्वी विद्यार्थिनी होती. धामणगावला मी उच्च माध्यमिक शाळेत अध्यापक असताना ! तिचं नाव आहे कुमारी ग्लोरिया डिसूझा म्हणजे ती ख्रिश्चन ! अतिशय गोड आणि लाघवी पोरगी ! तिचं व्यक्तिमत्त्व मी घडविलं. तिला चित्रकलेचे–अभिनयाचे आणि कवितेचे धडे मी दिलेत्. आणि बघता बघता ती माझ्या प्रेमात पडली. मी विवाहित आहे व मला एक मुलगी आहे हे तिला माहित आहे. ती धामणगावला माझ्या घरी वारंवार यायची. सौ. सुषमा आणि लीनाशी तिचं मेतकूट जमायचं.

साऱ्या घरभर ती हुंदडायची. 'सर्' 'सर्' म्हणून मला भंडावून सोडायची. मला सरकारी नोकरी लागली. एक अधिकारी म्हणून. मी अध्यापकाची नोकरी सोडली. तिथून चिखलदऱ्याला जाण्यासाठी तयार झालो. शाळेतर्फे मला निरोप समारंभ झाला. त्यात तीही बोलली आणि शेवटी हमसून हमसून रडली. इतरांनी तिला सावरलं, मी तिला छातीशी धरून थोपटलं. ती तिथून तडक घरी निघून गेली. घरी एका खोलीत तिने स्वतःला कोंडून घेतले. मी निघून जाईपर्यंत ती मला भेटली नाही. मी चिखलदऱ्याला माझ्या पदावर रुजू झाल्यावर पंधरा दिवसाने तिचे पत्र आले. तिने ती शाळा सोडली व नागपूरला शिक्षणाकरिता आली. एकदा मी सरकारी बैठकीसाठी नागपूरला आलो. तिच्या होस्टेलमध्ये जाऊन तिची भेट घेतली. नातेवाईक आलेत म्हणून तिने एक दिवसाची सुटी घेतली. तिची अनेक पत्रे येत होती. ती पत्रे सौ. सुषमाही वाचीत होती. तिला माझा संशय आला आणि त्या संशयाने ती पछाडली. माझ्याशी तुटक वागू लागली. प्रसंगी भांडू लागली. सरकारी दौऱ्यावर निघालो की मी तिला भेटण्यासाठीच जातोय् ही तिची धारणा झाली. मी ग्लोरियाला कधी भेटायचो...तर कधी नाही. त्यामुळे तिच्या अभ्यासात व्यत्यय आला. तिची प्रकृती बिघडली आणि ती परिक्षेला न बसता घरी परतली. तब्येत बरी झाल्यावर ती व तिची वहिण लीझा दोघीही पुनश्च नागपूरला शिक्षणासाठी आल्यात आणि काल तिच्या वहिणीचे अतिशय उशिरा पत्र हाती आले...ती खूप आजारी आहे म्हणून! मी धावत पळत इथे आलो सरळ तुझ्याकडे. आता बोल मी काय करूं?"

"चटकन् तयार हो. मी तुझ्याबरोबर येतो. काही घाबरू नकोस, थोडेसे काही खाऊन घे. आणि चल्!" दोघेही थोडे थोडे खाऊन घराबाहेर पडतात. "पत्ता आहे ना तिचा?"

"डॉ. म्हसकरांच्या 'क्लिनिक्'मध्ये तिला 'अॅडमिट' केलंय् होस्टेल प्रमुखांनी!"

"आय् सी!"

आनंद तिला बघायला अतिशय उत्सुक असतो. चौकशी करण्यासाठी तिथे असलेल्या एका सिस्टरला तो विचारतो–

"एक्स्क्यूज् मी! इथे लेडिज होस्टेलची एक विद्यार्थिनी मिस् ग्लोरिया डिसूझा पेशंट म्हणून 'अॅडमिट' झाली आहे ना, तिला भेटायचंय्!"

ती त्याच्याकडं निरखून बघते. मग विचारते–

"आपण आनंद काय?"

"होय, मी तिचा शिक्षक होतो धामणगावला."

"आय् सी!"

"पण तुम्हाला माझं नाव कसं माहित?"

"ती ग्लानीत सारखी 'आनंद' 'आनंद'च करीत होती!"

"काय झालंय् तिला?"

"'सायकीएट्रीक'! मानसिक रोग! तुमच्या शिवाय ती दुसरा काही विचारच करीत नव्हती."

"कुठे आहे ती? आय् वॉण्ट टू सी हर इमिजिएटली!" त्याच्या त्या बोलण्यावर ती क्षणभर अबोल होते. तिचा चेहरा रडवेला होतो. ती एक एक अक्षर मोजून बोलल्यासारखी बोलते–

"सॉरी! व्हेरी सॉरी! शी इज् नो मोअर नाऊ! आम्ही व खुद्द डॉक्टरांनी खूप प्रयत्न केलेत तिला वाचविण्याचे! पण– गॉड इज ग्रेट...सर्वांनाच ती हवीशी वाटत होती. इव्हन गॉडलाही."

आणि एकाएकी आनंदच्या डोळ्यात अंधारी येते. त्याचा बांध फुटतो. तो जवळ जवळ कोसळतोच. परंतु अरविंद त्याला सावरतो. छातीशी घट्ट धरून त्याच्या डोक्यावर थोपटतो... त्याचे सांत्वन करतो.

आणि आनंद मात्र स्वतःचेच प्राणोत्क्रमण होत असल्यासारखा तडफडतो. विद्ध झालेल्या मरणोन्मुख पाखरासारखा!

–बाहेर धुवांधार पाऊस कोसळत असतो. ■

मनोहर तल्हार

६, 'माणूस,' रवीन्द्रनगर, नागपूर ४४००२२.

खेळी

टोन्या व सोन्या दोघंही खेळता खेळता वस्तीच्या बाहेरील शहरगाव चौकातल्या वगीच्यात आली. बगीच्यात किरिंगकोसा, पाळणा, घस्सरपाटी खेळायला म्हणून ती मुद्दाम आली नाहीत. मुद्दामकरून सहसा येत नसत. आली लहर कधी तर येत. हां, पोरं काय आपली–आपून 'राजे' होती. गेलंच पाह्यजेल म्हणून ती ना वगीच्याची गुलाम होती ना कोण्या वगीच्यावाल्याची ! त्यांच्या मर्जीची बात होती.

सोन्याचं मन तसंही करत नौतं जायाचं. कारण पोटात त्याच्या कवाची जोराची भूक लागली होती. भुकीनं खेळातलं लक्ष उडवलं होतं न् तो घराच्या लयनीकडं वळलावी. पण आभाळाकडं पाहून तो आता पोटाला हात लावत दोस्त टोन्याला मनला–

"इच्या मायले, सूर्व्या डुवाले लइ टेमाय रे आजुक ! मगान्ची भूक लागून आह्य, पोटात. लम्ची ठकुमायवी सांजपायरीलेच कामावून येल घरी, दारीची !. . . रे टोन्या, मंग कसं ?"

"का ?"

"आह्य का तुस्पाशी काइ खुर्चनपानी ?"

"नायरे. पन मलेवी–"

टोन्याच्यावी पोटात भूक को–को कोंबडीवाणी वोंबलत होती. काय कराव् . . . तो डोस्कं खाजवू लागला. शकूनवाईनं कॉलीजात जातानी स्कॉलरशीपीतला रुपया दिला होता. पण मांगंकून भडव्या आज़ानं खेडुचानं तो हिंदाळून घेऊन पराला होता; चौकाकडं. . . . आता कसं ? एक टचकण् याद आली टोन्याला.

"बरं चाल, पाहू एक्या ठिकाणी. अजमावूनस् पाहू." तो त्याचा हात धरून वोलला.

"कुटं ?"

"च्या मारीरे ! चालनं बे, गप्प् मास्संगं." टोन्या कातावला. सामोर होऊन बगीच्याकड्ला रस्ता धरला. तवा सोन्यानं हटकलं.–

"तेथंसा काय जावाचं रे ! ते काय बाग हाय . . . निस्तं रान ! अबे, राती कोले–कुत्रे, डुकरंगी येतंत न् रम्दाळा मचवतंत, मने !" टोन्या हासला, "अबे, हट्वे, कायबी बोलतंस !"

"काय बी नाय, हां ! आप्ली अमीबाय मने, त्याले साजरा कराचा आह्य, चांग्ला--मान्सासाटी मने बाग !"–सोन्या.

"अमीवाय मने तं होईल वी. ख्ररंस ! पन झग्ळा आह्य नं दिसऱ्या समाजवाल्यायशी आपल्या लोकायचा, चालला !. . . अरे नायतं का, वस्ती आप्ली न् वस्तीच्या वगीच्यात वावासायवाचा पुतला होऊ देल्ला नाइ दिसऱ्या लोकानं. का मने–"

"ते मन्तंत, हामच्या पुढाऱ्याचा वसवू. हे हामच्या. आला नं वांदा ! खरा हक् आप्ला असून वी–"

"तसंस् आह्य. पुतल्यासाठी रेती–विटा–गिट्टी गी आन्ल्याहारची तशीच पडून आह्य, वायाविर्ती"

"पर अमीबाय नित्राळा लावल्याविगर सोडाची नाय !. . . बरं, चालरे, चाल गद्नं."

"मले भूक लाग्ली आह्य नं वे, खूबस ! आ ऽ ऽ य . . ." सोन्या 'वावस्या' देत बोलला.

"त्यास्साटी तं मन्तो !"

"बगीच्यामत्री ?–येडा आह्य का, काय रे !"

– असं सोन्याचं मन बगीच्यात जायाचं करत नव्हतं.

आन् बगीचातरी कोण घड होता ! जसा देश तसा भेस, ह्या परमान्–जशी वस्ती तशी ही बाग ! नावाचीच ! अख्ख्या झोपडवस्तीच्या कयाहीण रुपाला बरावर साजेसं सगळं. लोक् जसा–तसा भोग !. . . ही वस्ती म्हणजे नेहरूबाग, गांधीबाग, सरस्वतीनगर, लक्ष्मीनगर थोडीच आहे . . . उच्ची !

पण हे सगळं नसलं, तरी या सगळ्या झोपडपट्टीच्या वस्तीत अस्मिता होती. अस्मिता पैदा

झाली न् एक चमत्कार घडावा, तसं तेथील घुटमळं, शिळं नि अगतिकउदास वातावरण नव्या उल्हासानं–उत्साहानं उचंबळून उठलं. नव्या आकांक्षा–उर्मीनं सळसळलं.

'अमी' होतीही तशीच–सुंदर गोड पोरगी! तरुण–तेजतरार. अस्मिता म्हणजे अस्मिता! वस्तीत तिचं नाव होतं. ती वस्ती तर तिचं जन्मगावच होतं. आता आता वाढलेली. उंच सरसरी. तरुण. जेथे जेथे गडबड–घापला, अन्याय–उत्तोपात उभा व्हायचा, तेथे तेथे ती नेमून गेल्यासारखी जायची. न्यायासाठी झटायची. अन्यायाविरुद्ध शूरमर्दिनी बनून लढायची व लढायला लावायची. तिच्यासाठी माणसं मरायला तयार होत... साऱ्या वस्तीला ती अशी जीव की प्राण झालेली. तिची इज्जत ती वस्तीची इज्जत होती.... डोळ्या–डोळ्यात लखलखत होती. मनामनात–जिथे कुठे नवा विचार चालायचा–परिवर्तनाचा माणुसकीचा तिथे अस्मिता असायचीच. किंवा अस्मितेशिवाय असा विचार व्हायचाही नाही. तोंडोतोंडी अस्मिता! पोरं तिला थोरल्या वहिणीच्या वा मायेच्या आदरानं अमी–अमीवाय म्हणत. मोठी माणसं अमिता ... अस्मिता म्हणत. अशी ती वस्तीची लाडकी लेक बनली होती. ती सामान्यात एक असामान्यच! वस्ती कशीही असली तरी—

गांधीनगर–नेहरूनगराप्रमाणे ही झोपडवस्ती देखावाबाज, सुंदर कुठून राहील? पण अस्मितेच्यामुळे ती आता नव्या रसायनानं भरत–सुंदर होत होती. बाहेरून मात्र डबक्या–डबक्यात, कुडीखातेऱ्यावर ... हागघाणीत वसलेली आन् अशा या वस्तीसाठी उभारलेला तो बगीचाही तसाच. काहीच्या बाही.... एक बुजाडणंच!

— नाहीतर तो 'मुन्सिपाल्टीचा' शिवाजीपार्क बघा. बगीचा म्हणता बगीचा! येथे तर धड फुलं नाही–झाडं नाही. खेळायचा सरंजामा नाही. सिंगल–डबलरिंग नाही. झुला नाही. चक्री नाही. आन् एक वाघ नाही, का चित्तर नाही. निस्त्या झुडुपांचं न् गवताचं विंगट रान! वैराण. भयाण! हां, सर्प राहतात म्हणे, दबा धरून, दडून.

एक–अर्धे कोणी जातात वेडेपिसे; कोणी दु:खी जीव–डोईवर हात देऊन बसायला. बाकी फंटूस गुंड पोरांचा वारा वारा मेळाच फार. आणि नाहीतर तेथे काळ्या कारवायांचा कळजोगी गुप्त अड्डा चालतो, म्हणे!

... शहाण्या सोन्याच्या मनात त्या बगीच्याबद्दल वस्तीच्या तोंडून ऐकलेल्या वाताचिता 'गोष्टी' अशा खेळत असतानाच चालता–चालता टोन्या कसली तरी याद येऊन त्याला म्हणाला–

"अजचा शनिचर नं रे–?"

"हो, वाट्टे"

"मंग जमलं. चाल जलदीनं."

"पर काय जमलं मंतंस?"

"सांगतो, ठईर–"

तो शनिवार. अर्ध्या दिवसाचं कॉलेज होतं... शकूनबाई कालीजातनं गांधीनगरच्या बसनं आली. आन् बगीच्यामागंच्या मशानखटीच्या बसथांब्याला उतरली. तेथनं वस्ती सिदी पडते, तर चालू लागली. बसीतनं एक टोळकंबी उतरलं होतं. ते शकूनबाईच्या मांगं मांगं रेंगाळत जाऊ लागलं. भर दुपारीची वेळा. त्या बाजूनं सामसूमच होती. तिनं हेरलंन्. सगासप् चालू लागली. बापा, टोळकं सामोर होऊन एकाएकी तिले आडवंच झालं. घेरलं. बाई आयकेना पाहून त्यायच्या दादानं बापा, चाकूच काहाडला. आन् संगात्यान्ले आजूबाजूला पाहाऱ्यावरतं लावून मंग चाकूच्या नोकीवर त्यानं तिला बगीच्यात मांगंच्या झुडूपझाडोऱ्याच्या गुंफाटचामधी नेलं. आन् एकादमी साडीलेच हात धरला. आत्ता? आता जिवावर बितलीच हाय म्हणून ती जिवाच्या आकांतानं ओरडली. गहाज गुंजला. घडीकभर दोघायची चांगलीच ओढझिक्कर चालली. ती त्याच्या कवचीत जखमी वाघीणीवाणी तडफडू लागली. पण तो कसाच उगारे चाकू...त्या भेवानं बाई बेंबरेजून गेली. बोल फुटेना. एवढ्यामधीच कोणी धाडधिश्शाड माणूस तुफानावाणी तेथंसा धावतस् आला. त्या बदमास् गुंड्याले अशी 'फाईट' दिली न् पिदळवलंन् का त्याले काही सुधरलंस् नाही. त्या माणसाची बंफाट छाती न् रुबाब पाहूनच तो चिरकला अन् गांडीले पाय लावतस

जो तो पराला, बेपत्तास झाला. त्याचे साथीदार आग्दोरच गायब् झाल्ते.

"वारे वा ! अबे हे तं पिक्चरची 'इस्टोरी' होये, यार !"

"गोली मार ! ..साला, माह्या शकून-बाईचा जीव गेला अस्ता, तवा खरं मनला असतास ! साल्या, तो मानूश त्या दिशी बागीतल्या चवुतऱ्यावर खरंस येऊन बसला होता. दिसऱ्या सनवारीबी तो तेथंस् दोनचार मोठ्ठ्या पांढऱ्याझक् लोकायची मिटिंग घेत बसला होता."

"यप्पाडच्या, साला ! तुले कसं मालूम रे हे समदं ?"

"च्या मारी रे ! अरे, म्या खुद उशीर झाल्ता मनून त्या दिशी बाईले पाहाले गेल्तो तेथोरी. तवा त्या माणसाले शकूनबाईले घेऊन येतानी पाह्यलो. ... पायजो, अजबी असनस् तो !"

"बरं, असन तं आता काय कराचं मन्तस् त्यासकड् ?"

"तू ज्यासाटी मन्तंस, त्यासाठी ... भूक लागली नं–?"

"साला, पग्ला आह्य का तू ?"

"अरे, तुले मालूम नाही, कित्ती चांग्ला मानूश ... देवावाणी तो–!"

– टोन्यानं सांगितलंन्–

"शकूनबाईची साडी त्या गुंडयानं टरकवली होती, त्या पठ्ठ्यानं बाईला तवाच्या तवा नवीन साडी घेऊन दिली न्. तसाच आपल्या 'इस्कूटर'-वर लहान बयनीवाणी घरी पोहचतं करून दिलंन्. घटना आयकूनशानी न् शकूनबाई स्यंकटातून वाचून आल्याली पाहून आमचा घरलोकानं त्या सायबाले लई–लई आभार दिले. न् सांगू, आपून त्याचं पान–सिगरेट आणाचं जराकसं काम केलं नं, तं–पाच कलदार खळाखळ मोजून मस 'इमान' दिलेन्. बडा दिलवाला ... कोणी शिरिमान मानूश असल रे तो ... खरंस !"

"तं–काय आत्ताबी देल मन्तास् ? घडी घडी देवाले काय फुकटचा माल आला काय बे, त्यास्पाशी !"

"तू पायला नाइनं ! ... पाहाशीन तं दणाऊन जाशीन् !"

"नायतं चोर दिऊन आवरा घेशील !"

"चल बे, वकू नोक्को !–तुयापाशी काय सेटकूळ आह्य तं घेईन ? ... तुह्यावाणी काय बे, मायची डोच्की पाहातंसून अल्लकस 'आपल्या केसाची 'ऊ' तिच्या हातावर ठिवून चवन्नी, बखरतस !"

दोघंहीजण हासले. ... "आपल्यावाणीस् गिन्शीन् सगळे !"

–टोन्याला असा इश्वास होता का तो भेटन तं–त्याचंवालं एखादं काम आयकून आप्लवालं पोटाचं काम फत्ते होणार म्हणून. म्हणून सोन्याचा हात धरून घाईघाईनं चालत ... दोघंही पोरं बोलत बोलत बगीच्यात जाऊन पोहचली.

टोन्यानं त्याचावाला हात सोडला न् आपल्या फाटक्या हॉफपॅन्टीत घातला. आन् लगबग सावरतच तो कोनट्यात कुपापाशी गेला. . .चूळ–चुऽऽळ . . . जोराची लागली होती.

"अबे–अबे कुटं मुतंस ?"

"कावून् तं रे ?"–तो न आवरणारी धार मारतच बोलला.

"अबे, तेतंसा देव आह्य नं–!"

"देव–?"

"बाप्पा, असली नांग–धा आकडयाचा–निंगाला होता मने नं बे, तेथंसा–कुपातन् !–तं तेती तो देव बसविला. तो–तो पायनं–लाल लाल !–चोवत नाई ?"

"हो रे हो ! इच्चा मायले ! वस्तीतले त सर्वे उगडून फेकले नं बे, कवाच ! एखांदा थोस् असल येथं येऊन पल्ला ! माह्यं लक्ष नाइ पल्डं रे, तिकडं. मी मुतलोबी. पयली धार उडली खरी ! अं, आतं उडली तं उडली, आता काय कराचं, चाल "–टोन्या पाहात पाहात मांगं येत बोलला.

बागे अंदरच्या दुसऱ्या भागाला कुपाकाठी एक ढवळी स्कुटर उभी होती. पाहून टोन्याला त्या माणसाचा असल्याचा भरोसा वाटू लागला. तो उत्सुक, दोघंही अंदर शिरली.

मधल्या जागी वाढलेल्या बागडीचे गोलाकार कुंपण. त्यात टोंगळा टोंगळा गवत. त्यामधून पायवाट. पोरं ओलांडून पलीकडे गेली. पल्याडच्या खुल्या भागात एका बाजूला न बांधलेल्या

पुतळ्याची गिट्टी-रेती व मुरमाचा खरबट ढीग. सडावडा लडबडलेला. दुसऱ्या भागाला एक चक्री. एक सिंगल बार. एक मळकट मोडकी घसरपाटी पाचसहा पोरं तेथं खेळत होती. काही झुलपेदार बावळट वाटणारी आडजवान पोरं घेर करून, पत्ते पिसत बसलेली, टोन्या पाहात पाहत जात होता. त्या माणसाला शोधत...इकडे-तिकडे.

"सोन्या, आह्य रे आह्य ! थोऽ-थो पाय. आह्य का नाय सायेब चवुतऱ्यावर बसला ! मनलो नं-"

"थो होय ? चाल, पाहू बरं त्याची !"

"एकादमी नाय रे, आपून खेळत-माळत त्याचंवालं लक्ष पडलं, असं जावाचं, म्हंजे"- टोन्या हिकमती खरा !

दोघंही जाऊन चवुतऱ्याच्या बाजूचा 'किरिंग-कोसा' खेळू लागली.

तो 'सायेब' आज एकटाच मधल्या वुडाला टेकून चवुतऱ्यावर बसला होता. गोरागोमटा. रुबाबदार. किंचित चिंतित चेहरा. कोण्या विचारात. कुणाची वाट पाहत असल्यासारखा. हातात सिगरेट. त्या धुव्व्याच्या धुक्यातून अधून मधून बाहेर गेटकडे नजर टाकत. आपला आपणात, आणि एकाएकी त्याचं लक्ष गेलं. क्षणभर निरखून पाह्यलं.

"अरे टोनू ऽ-एऽ टोनूऽ-" सायबानं पुकारलं. त्याचा करडा आवाज आयकून टोन्या झटपटा जवळ जात म्हणाला-

"जी साब ! सायब ... अरे, तुमी होवा का !"

-टोनूनं नाटक बरोब्बर वठविलं. सोन्याही मागोमाग आल्ता.

"तू कसा रे इकडे ?"

"असाच."-टोन्या डोक्यावर आलेले केसं उजव्या बाजूला सारत अदबीनं बोलला-"पन .., म्हंजे आलो, तवा तं तुमची मुलाकतबी झाली, बहू दिसाची !"

"बडा हुशार आहेस् रे, तू ! बरं, तुझी शकूनबाई बरी आहे ना ?"

"होजी."

"हा कोणांय ?"

"माह्य दोस्त, सोन्या ... सायेब, अं, ... याले का नाही-" तो क्षणभर संकोचाने गटपटला. मग हिंमत आणून बोलला-

"सायेब, ह्य लय भूक लागली मन्तो जी. मंगापासून कोकलून रायला."

"असं ! न् तू-?-" चतुर टोन्याचा मतलब सायबाच्या लक्षात आला. त्याने पोरांचं निरीक्षण केलं. टोन्या सरसरा नि चलाख चतरा ... तर सोन्या थोडा सौम्य. समंजस. त्याचा चेहरा खरोखर भुकीने काळवंडल्यासारखा. सायबाने खिशातून दोन रुपये काढून टोन्याच्या हाती दिले. आजूबाजूला नजर टाकली - अन् डोक्यात एक आयडिया ठेवून म्हणाला-

"जा चौकातून काही खाऊन या. या इकडे हं. मग एक जम्मत सांगतो तुम्हाला. फायद्याची आहे बरं तुमच्या. काय येता नं ?"

दोघांनीही मान हलविली.

"अरे एक मिनिट, हं, हे घे. एक ब्रिस्टाल सिगारपॅकेट आण, काय ? जा-"

मान लववून ती धावत पळतच सामोरच्या चौकाकडे गेली. एका होटलात. टोन्याने उमऱ्यावर पाय ठेवला आन् तसाच विंचू चावल्याप्रमाणे चटकण् मागंच सरकला ... साला, बुढा आज्या अंदर खात बसला आह्ये, -मचामच-डोळे लावून. त्याचावालाबी ताल वेगळाच ! डोक्सीवर पिकल्या-भुभुक जटांचा टोपलीभर भारा घेऊन लंगलंग ईरभर फिरत राह्यतो. पिस्यावाणी न् भेटल तेथं खातो. मंगानचे दोन रुपये हिस्कावलंन ते हे रिचवून राहिला. अवतार आह्य निस्ता ! आंगात तेस् एक फाटकी कमीज न् कमरीले चिदळल्याली रंगीबेरंगी लुंगी. चित्तर आह्य चित्तर ... झालं ! टोन्यानं सोन्याला सांगितलंत्-

"तूस् जाय वे अंदर. नायतं तो पुना हिंदाळल पैसे न् आम्चं पोट मारल. जाय-जाय हां, एक रुपाची गरमागरम् मिरचीभजी न् एक रुपयाची जिल्बी घिऊन ये, काय ? जाय-"

सोन्या गेला न् थोडयाच वेळाने दोन हातात दोन लहान लहान पुडके येऊन बाहेर आला. येताच जिलेबीचा पुडा फोडला. अन् एकेक जिलेबी गट्टम करत दोघंही हॉटेलच्या बाजूच्या एका झाडाखाली

गले. वुडाला बसली. भजी काढली. गोड तोंडात तिखट भज्यांचा स्वाद चरचरत गेला. तोंडाला चव आली. मोठ्या मजेत येऊन त्यांनी मिन्टामध्ये भज्यांचा फडशा पाडला. तोंड चुरूचुरू झालं

पाच वाजेचा सुमार. बाजूचा एक बेवारस नळ 'फुस्स्-फुस्स्-फर्रर्र' करत होता. पाणी खळ-खळत झुरंकत होतं. दोघंही जाऊन पाणी पिऊन आली. अन् पुन्हा बागेकडे–

टोन्या म्हणाला–"सोन्या पोटात काऊनतं खुळबुळाय लागलं रे!"

"मिरची भज्जा होय नं तिक्कट! चाल, काइ–नाइ होत."

आता त्या 'सायबाचे' तीनचार तरुण साथी-दारपण आलते. त्या लोकायची आपसात काही मिटिंग चालली होती. बगीच्यात आता संध्याकाळची आणखी काही पोरं–माणसं आलती. ती बहुतेक नजिकच्या झोपडयावरलीच होती.

मघा पत्ते खेळणाऱ्या पोरांमध्ये आता भांडण जुंपले होते, पैश्यावरून. बाचाबाची वाढत गेली. काही तर हमरीतुमरीवर आली. शिवीगाळ, कॉलर पकड. आणि चबुतऱ्यावरील ते सभ्य साहेब लोकं पोरांची मजा पाहत होते. त्यांना हसत होते

तेवढ्यात सोन्या–टोन्याही तेथे आले. चबुतऱ्या-वरील सुबक सायबी पोषाखातली ती माणसं पाहून पोरं अचपली. पण सायबानं आपणास बोलावलंय म्हणून ती हिंमतीनं जवळ गेली. आपसात काही विचार–घोळात मग्न असलेल्या सायबाचं क्षणभर लक्ष गेलं नाही, लक्ष गेलं तेव्हा सोन्याटोन्याकडे वळून तो म्हणाला–

"हां, तुम्ही आला नं–छान! थांबा हं"–सायबाने साथीदारांच्या कानात काही सांगितलं आणि तो उठला.–"चला तेथे. तुम्हाला एक जम्मत सांगतो." तो पोरांना घेऊन त्या मुरुम–गिट्टीच्या बाजूला पडलेल्या रेतीच्या ठिकाणी आला. आणि सभोवती खेळत–भांडत असलेल्या किंवा इकडे तिकडे बसलेल्या माणसा–पोरांना ऐकू जाईल एवढ्याने तशाच गोड शब्दात त्याने 'ऐलान' केले–

"बरं का, बालमित्रांनो हे युवक वर्ष. क्रीडा वर्ष देशभर साजरं केलं जात आहे. त्यानिमित्तानं आम्ही तुम्हा लोकांनाही संधी देण्याचं ठरविलं आहे. तुम्ही एक करायचं, काय, ... करणार?"

"काय–काय?" टोन्या–सोन्या दोघांनीही उत्सुक होऊन विचारलं.

"तुम्ही दोघं अगोदर ... बरं का, टोनू–सोनू, तुम्ही ह्या रेतीवर कुस्ती खेळायची!"

"कुस्ती खेळायची? आमी–?" दोघंही पोरं नवलाने सायबाच्या तोंडाकडे पाहात राहिली.

"होय चीतपटची कुस्ती. जो जिंकेल त्याला व जो हरेल त्यालासुद्धा आम्ही बक्षीस ठेवले आहे. अर्थात, जिंकणाऱ्याला हरणाऱ्याच्या दुप्पट रुपये. नकद पैस्याचं बक्षीस बरं का! कुस्ती महत्त्वाची. टोनू–सोनूच्या नंतर ज्यांना कोणाला खेळायचं असेल, त्यांनी आपापल्या जोडीदारासह तय्यार राहावं."

"हो जी, हो सायेब. आम्ही सर्व्यात पयलं नं–" टोन्या पैस्याच्या लोभानं उल्हासात उतू जात म्हणाला. आंगातला गंजीफाक काढून तय्यार झाला. शायना सोन्या काढून तं मनात जरा हिचकिचत होता. 'ह्या सायेब येडा का काय! आम्हासनी काहून खेळवत असल? अन् पैसेबी लुटवून देतो! वारे सायेब...वा!' क्षणभर तो अशा घोळात आहे, तोच टोन्यानं त्याला 'जलदी ये' करत अल्लकच डोळा मारला. टोन्याच्या डोळ्यापुढे गरम गरम भजी दिसत होती. त्या मिरची–भज्यानंच पोटात खुलबूळ मचवली न् अणखीन् आग पेटवली होती. तीच गत सोन्याचीबी. दोघांच्याही पोटात रमदाळणाऱ्या भुकेच्या जनावरानं त्यांना कुस्तीच्या टकरीला जुंपवलं...

आणि कुस्तीचं त्यांना काय मोठंसं! हाणमार; दुशम्‌ढाशम् तर रोजचा त्या पोरांचा सहज खेळ होता. आता दोघंही दोस्त पहिलवानाच्या पवित्र्यात आपल्या आपल्या मांडीवर थाप मारून भिडली. प्रथम हातापायांची झिकराझिक्कर. एकमेकास कवचीत पकडण्याचा प्रयत्न. अंगाशी झटापट. हातपाय, कंबर–मान पकड, उलथ पालथ, खालीवर–वरखाल पलटघा न् आदळ आपट करता करताच ताठेर देहाच्या टोन्यानं सोन्याला आखरीस चीत केलं. सगळ्यांनी टाळ्या पिटल्या.

'शाब्बास पठ्ठे !'–म्हणून साहेब पुढे झाला. आणि टोन्याला पाच व सोन्याला दोन रुपये 'इनाम' दिले. दोघंही पोरं कपडे सावरीत लगेच चौकाकडे पळाली...जिलेबी–भज्यांकडे.

आतापावेतो बागेतल्या कोना–कोपऱ्यातली बरीच माणसं–पोरं कुस्तीची जम्मत बघायला जमली होती. तेथे आखाड्याचं स्वरूप आलेलं. आणि आता ह्या सभोवताल गर्दीतून 'आम्ही खेळतो–आम्ही खेळतो–'चे तरुण किशोर–लहान मोठे 'आवाज' उठले. सायबापाशी पोचले. त्याने एका जोडीचा नंबर लावला. पण जोडी थोडी विजोड असल्याने मजा आला नाही. बारक्याला चटपट पटकणी मिळाली. तो लेकाचा फेसावाणी फक्कण् हासत उठला...दुसऱ्या एका जोडीनं थोडी रंगत आणली खरी, पण लवकरच विरली. तिलाही सुखासुखीच 'इनाम' द्यावे लागले, साहेब मंडळींच्या अपेक्षेप्रमाणे आतापावेतो काही विशेष असं घडलं नाही.

जोड्या न सांगताच आता एकेक तय्यार होत होत्या. पण आता साहेबांनी त्यातून हवी तशी निवड सुरू केली. अधिक वेळ लागणार म्हणून त्यांनी तेथे बिजलीची 'खास' व्यवस्था करून ठेवली. आता अंधारू लागले म्हणून दोनतीन अधिकचे तेज बल्बही पेटले होते. आणि—

टोन्या–सोन्या पुन्हा होटलातून खाऊन आले, तोवर दुसरे दोन समवयस्क आडदांड तब्येतीचे जवान मोठ्या ईर्षेनं 'आखाड्यात' दंड थोपटत उतरले होते. सायबानं त्यांची नावं विचारून जाहीर केली. एक झेल्या. दुसरा पांड्या. जोडास पाड होते. शिवाय वस्तीमधील ते एकमेकांचे प्रतिस्पर्धी टोळक्यांचे म्होरके होते. त्यामुळे ही कुस्ती अपेक्षेबाहेर रंगली. अगदी खरीखरी, 'सायबांना' हवी होती तशी.

...रंग भरतच गेला...डावपेच. उठापठक. तिरपी–कलती, कसरती फेकाफेक...कोणी कोणास सहजपणे हात देईना. चीत होईना. दोघंही जिद्दी कोंबडे. नाटानाटात कातळघासारख्या मार. इरेस पेटले. दातओठ खाऊन हातपाय धर. पिरड. मान मुरड, गुद्दे दे. आदळ न् फेक. असे किती वेळा एकमेकाला चकवत...झकोला देत...मुका मार देत धत असतानाच पांडू झेलूच्या 'कवचीत' सापडला अन् कटरेल्या करंट शरीराच्या झेल्याने त्याला चीत फेकले...'इनाम' घेतले.

कुस्ती चांगलीच निकराईची झाली होती.

पांडू जो फेकला गेला तो थोडावेळ उठलाच नाही. दम घेत पडून राहला. त्याला चांगलाच मुका मार लागलेला. गिट्टीवर तोंडावर पडल्या-मुळे तोंडनाक खरचटले. ओठाला रक्तपण लागले. त्याने हात फिरवला तर हाताला जे रक्त आले, ते पाहून पांडू खूप दुखावला. हार–अपमानाच्या दुःखाने पेटला. आणि झेल्याकडे घूरघूर अंगार डोळ्याने पाहू लागला...टोन्या पांडूच्या पार्टीचा म्हणून तोही झेल्याकडे डोळे वटारून पाहत राहिला. पण सोन्या तसा अलिप्त, तरी झेल्याचा शेजारसंबंध म्हणून आता दोस्त–टोन्याच्या रागीट नजरीचा त्याला 'हीरस' वाटला. दोस्तीची जागा ईर्षेनं घेतली.

इकडे झेल्या विजयाच्या उन्मादात सारखा इतरावून राहला होता. तो पांड्याचे खिजरेजून पाहणे पाहून आता त्याला डोळ्यांनी हिणवून हासला. आणि हासून त्याला आणखीन् डिवचले... झाले, मस्तकात गिरमीट फिरले आणि कडाकड दातओठ खात पांड्या करंट लागल्यावाणी नजर घुमवीत झर्कन् उठला. अन् झुंडीच्या हेल्यासारखा गर्कन् वळून झेल्याला काही सुधरण्याआधीच त्याच्या छातीवर अशी जोराची मुसंडी मारली की तो चारपाच हातावर उडून दाणकन गिट्टी–विटांच्या ढिगाऱ्यावर उताणाच जाऊन पडला. पुन्हा पांड्याने त्याच वेगाने वरून तीनचार लाथाही दिल्या म्हणून तोच आता झेल्याच्या पार्टीची पोरं–माणसं पांड्यावर दातओठ खात तुटून पडले, पांड्याकडील रघ्या–दिग्या–टोन्यासह बाकीचे साताठ जणं झेल्या आणि कंपनीबरोबर झडप घेऊ लागले. तेथे आता एक यादवी युद्धच पेटले...ढुशम्–ढाशम्...गुद्दागुद्दी...मारहाण, बोंबला बोंबली. एकच धांदल मचली. शेवटी ह्या गड-बडीची वार्ता गेली तशी वस्तीची आणखी काही माणसं–पोरं तेथे येऊन झगड्यात सामील झाली. आता हाहाःकारच मचला. तशातच–

तेथे काय झालं त्या गोंधळात, कुणाला काही

समजले नाही–त्या सडावंडा वाळूतून धगधग विस्तवाप्रमाणे पायांना आता चटके वसू लागले. जणू आत वाळूखाली विजेच्या नग्न तारा पसरुन ठेवाव्यात त्याप्रमाणे जीवघेणे चटके. शरीरातील शक्ती खिचणारे शॉक्स...आग–आग ! चटक्यावर चटके. मग ही आग एकाची दुसऱ्यावर–आतली बाहेर काढ. हाणमार, रक्तबंबाळ कर. नरडी दाब. या हाताने या हाताची. आपण आपलीच!... शुद्ध कुणाला ?

आणि तो साहेब व साथीदार आता तो भडकलेला–ऐन निकराईला पोचलेला झगडा एकीकडे मेणाप्रमाणे घट्टपणे उभे राहून 'खडी गंमत' पाहावी तसे पाहत होते. त्यांच्या सावध डोळयात जणू वीज चमकत होती, लखलख–एवढी तीक्ष्ण सावध नजर. बेमालूम हालचाल. सारं आपलं नियंत्रित. तटस्थ.

आणि इकडे तो पेटलेला बेकाबू बखेडा. त्यात अनावर झालेली मारपीट, झोडाझोडी, सारी बेभान हिंसक धांदल...साहेब मंडळी निमूट पाहत होती. तो पेटलेला बखेडा विझविण्याचा त्यांच्यापुढे प्रश्न नव्हता. त्याचा प्रश्न वेगळाच होता.

आतापर्यंत पुतळयाच्या त्या गिट्टी–रेतीवर रक्ताचे लाललाल धब्बे पडले होते. पाहून शहाणी माणसे चुकचुकत होती, फक्त चुकचुकत. आणि साहेबांच्या तोंडाकडे मूट मूट पाहत होती. साहेबांचे डोळे भयंकर चमकत होते...ती रणधुमाळी पाहत...

'थांबा–थांबाऽऽ–'

एकाएकी एक तीक्ष्ण आवाज वातावरणाला चिरत 'धुमाळी'च्या कानावर जाऊन आदळला. आणि काय, मारापिटी होती तिथेच तटस्थ पावली. पुढे झेपावलेले हात वरचेवर मागे झाले. आणि मागचे–'कोण' म्हणून दचकले. वळून पाहलं. आणि थांबले, चित्रासारखे.

एवढा धाक...एवढा मान...एवढा आदर तो कुणाचा ?...कोण आलं होतं ?

'अरे अमीवाय !'

'आपली अमी ?'

'हो, आपली अमिता...अस्मिता...अस्मिताच !'...सगळी माणसं–पोरं आपसात पुटपुटली. काही तोंडं फुसफुसतच राहिली आणि खालच्या मानेनं मुकाट ऐकू लागलो.

"हे–हे काय चालवलंय तुम्ही इथं ? या वगीच्यात ? इथंही हा जीवघेणा खेळ, कोणी लावून दिलाय ? आणि तुम्ही कुणाचं ऐकलंच का–का ऐकता ? कुठवर ऐकत राहणार आहात न् आपल्या हातांनी आपलीच डोकी फोडून घेणार आहात ? तुम्ही निर्बुद्ध मेंढरं तर नाही !... मला कळलंय की तुम्ही लोकानं खुद होऊन हा झगडा आरंभिलेला नाही. हा बखेडा मुद्दाम तुमच्यामध्ये लावून देण्यात आलाय, खरं ना ?"

अस्मिता आवेशाने बोलत होती. तिच्या गळयाच्या शिरा ताणल्या गेल्यामुळे आतली रक्तवर्णी झाक गळयावर–चेहऱ्यावर उमटून दिसत होती. त्या पांढऱ्याफेक कपडयातली 'साहेब' मंडळी आता तिच्या तेजस्वी चेहऱ्याकडे व गळयाकडेच दिपून गेल्याप्रमाणे पाहत होती. त्यांच्यावर तलवारीप्रमाणे तीक्ष्ण नजरेचे पाते फेकत ती वस्तीच्या माणसा–पोरांना रोख समज देत होती–

"–एक सहज खेळ म्हणून. जशी कोंबडयांची झुंज. एकेक जखमी करायचा न् मारून खायचा त्या झुंजणाऱ्या कोंबडयाचं बक्षीस काय ?–तर त्याचंच रक्त !...अरे हे कसं लक्षात येत नाही तुमच्या ?–अगोदर खूपमोठा भलेपणा–देवपणा दाखवायचा कैवार घ्यायचा, अन् मग हळूच एकेक 'खेळी' सुरू करायची ! हा बघितला ना जीवघेणा खेळ ! अरे हा डाव विलंदराचा–तुमच्या पिळवणुकीचा न् गुलामीचा नवा मोहक पिंजरा आहे, हे तुमच्या लक्षात कसं येत नाही ? तुम्ही अखेर भांडत आहात तरी कुणाशी ? ज्यांनी कधीच नुकसान केलं नाही–करत नाही त्या आपल्याच माणसांशी ! खरे बदमाश सोडून सावाशी ! अरे–"

अस्मितेच्या धारदार शब्दबाणांनी सगळयांची मनं छेदून गेली. त्यांच्या डोक्यात आत्ता खरा प्रकाश पडला. घडलेला प्रकार लक्षात आला. ते मनात पस्तावू लागले...आणि इकडे या झोपडवस्तीच्या अस्मितेनं मध्येच येऊन आपला 'खेळ' उधळला–उघडा पाडला, हे पाहून साहेब

मंडळी आतून गडबडली. त्यांच्या बंद खिडकीची काच खळकन् फोडणारा अस्मितेचा एकेक 'वार' खाऊन ते लोक हैराण झाले खरे. पण पक्के होते. त्यांनी आपली 'नेट' अद्याप सोडली नव्हती जाता जाता आखरीचा 'गोल' मारायचाच, अशा एका वेगळयाच जाळीदार विचाराचा चेंडू मंडळी आता कसत होती. त्यांनी बेमालूम हालचाल सुरू केली. अस्मिताच्या गळयावर लकाकत्या झाकीकडे त्यांचे सारखे लक्ष लागले होतेच.

अस्मिता त्या मंडळीला चांगली ओळखत होती. तिला उद्देशून ती आपल्या भावड्या लोकांना समज देत होती-"आता मूट मूट पाहुता काय, चला. यापुढे तरी डोकं शाबूत ठेवा न् डावखोरांच्या 'खेळीला' असे बळी पडू नका. वेळीच उघळून देत चला. च–ला–"

–असे म्हणत ती वळली नाही, तोच एकदम तिच्या अंगाभोवती गराडाच पडला. आणि वाऱ्यावरोवर तत्क्षणी तिला उचलून–

"अरे अरे, पाहा–आपल्या अस्मितावर घाला पडलाय ! ती पहा–ती पहा–दुष्मनानं तिला नेलंय रे–"

"अरे घात झाला–घात झाला ! पाहुता काय धावा धावा–धावाऽऽऽ–! अमीवायला सोडवा रे ! आपल्या अस्मिताला वाचवा रे, वाचवा ! धावा–"

–लोकं आभाळ कोसळल्याप्रमाणे ओरडले. आपल्या जीव की प्राण अस्मितासाठी ते प्राणाचीही पर्वा करणार नव्हते. तत्क्षणी त्यांनी 'दुष्मनाचा' पाठलाग सुरू केला. काहींनी बागेच्या चौफेर होऊन गिट्टी, फत्तरं, विटांचा वर्षाव चालू केला. 'दुष्मान' वेढयात सापडला. वाट मिळालीच नाही. 'मार' खाल्ला. जेर झाला आणि नाइलाजाने अस्मिताला तिथेच सोडून पळाला. बगीच्याच्या बाहेर अंधारात नाहीसा झाला.

अस्मिता वाचली !...

तिची इज्जत जाता जाता वाचली होती. पण तिच्या आपल्या लोकांच्याच हातांनी–गिट्टी–फत्तरांच्या माऱ्यामध्ये ती जखमी झाली.

आणि श्रांत मुखाने हसत सगळया लोकांकडे कनवाळू नजरेने पाहत होती...लोकांच्या चेहऱ्यावरील अपराधी भावना हळूहळू विरत गेली.

झेल्या व पांड्या आता दोस्त बनले. अस्मिताला आता मधोमध घेऊन वस्तीकडे जाताना त्यांना अभिमान वाटत होता.

आणि प्रत्यक्ष अस्मितावरोबर चालताना टोन्या व सोन्याला तर अस्मान ठेंगणेच झाले.

पोरं आपली भूक विसरून गेले. ■

डॉ. योगेन्द्र मेश्राम
१३४, नागसेन नगर
नागपूर–१७

.....युगवाणी प्रतिभेत भेद करणार नाही.
प्रतिभा जुनी–नवी अशी नसतेच.
अशा धारणांच्या लेखकांची युगवाणीस गरज आहे.

काव्यसोहळा '89
व
काव्यलेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबिर

विदर्भ साहित्य संघाची सांस्कृतिक समिती व युगवाणी यांचे वतीने एका द्विदिवसीय काव्यसोहळ्याचे आयोजन करण्यात यावयाचे असून या उपक्रमाचा एक भाग म्हणून काव्यलेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबिर देखील आयोजित करण्यात यावयाचे आहे.

या द्विदिवसीय काव्यसोहळ्यात गेल्या शतकातील मराठी कवी, कवितालेखन, काव्य-समीक्षा, काव्यप्रवाह, कविताप्रकाशन, वितरण, काव्यास्वाद, कवितेचा वाचक व त्याचे अस्तित्व, कवितेचे अध्ययन–अध्यापन, कविसंमेलनांचे प्रयोजन व कवितावाचन–गायन यांचे कवितेवरील परिणाम, कवीचे व कवितेचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक नातेसंबंध, सांस्कृतिकतेच्या संदर्भातील कवितेचे स्थान, भूमिका व वास्तव, समाजातील विविध संस्थांची कवितेकडे बघण्याची दृष्टी व त्याची कारणमीमांसा, मराठी कवितेचे भारतीय व जागतिक कवितेच्या संबंधातील स्थान, यापैकी अथवा तत्सम, अनुषंगिक विषयांवरिल नामवंतांचे निबंधवाचन व त्या त्या निबंधावरील नंतरची चर्चा, परिसंवाद, गटचर्चा नामवंतांची व नवोदितांची काव्यवाचने, कविसंमेलने, कवितांची पोस्टर्स, कवितासंग्रहांचे प्रदर्शन, काव्ययात्रा याचा समावेश असेल.

काव्यलेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबिर

याच उपक्रमाचा भाग म्हणून मराठीत अमाप लिहिल्या जाणाऱ्या कवितेच्या नवलेखकास व काव्यविषयक उत्सुकता असणाऱ्यांना देखील काव्यलेखकीय व्यक्ति-मत्वासंबंधाने तसेच कवितेची भाषाशैली, काव्यलेखन, काव्यआकलन व काव्यास्वाद या संबंधाने आवश्यक ते मार्गदर्शन उपलब्ध करून देणाऱ्या अभ्यासक्रमाचा समावेश असलेल्या व तज्ञांचे मार्गदर्शन असलेल्या शिबिराचेही आयोजन करण्यात यावयाचे आहे.

या उपक्रमातील सहभाग निःशुल्क असून हा उपक्रम केवळ युगवाणीच्या त्रैवार्षिक वर्गणीदारांकरिता आयोजित करण्यात येत आहे. युगवाणीचे त्रैवार्षिक वर्गणीदार असणे एवढीच अट या सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांना पूर्ण करावी लागेल. ती पूर्ण करण्यात त्यांना आनंदच वाटेल अशी खात्री आहे.

युगवाणीची वार्षिक वर्गणी ३५ रु. असून त्रैवार्षिक वर्गणी मात्र रु. ९० असेल.

या उपक्रमाकरिता त्रैवार्षिक वर्गणीदार म्हणून सहभाग नोंदविणाऱ्यांना त्यामुळे वर्गणीत रु. १५ ची भरघोस सूट प्राप्त होईल, आपला सहभाग नोंदवू इच्छिणाऱ्यांनी कृपया युगवाणीची त्रैवार्षिक वर्गणी विदर्भ साहित्य संघाकडे पाठवून या उपक्रमातील त्यांच्या सहभागार्थ आपले नाव, व पत्ता, आवड, इतर व्यक्तिगत माहिती, प्रकाशित लेखनाची माहिती व युगवाणीची त्रैवार्षिक वर्गणी भरल्याचा पावती क्र. व तारीख ही माहिती प्रबंध संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२ या पत्त्यावर पाठवावी.

आपला असा सहभाग नोंदविणाऱ्यांना या उपक्रमाच्या तारखा व सविस्तर कार्यक्रम याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात यावयाचे आहे.

टिपण

आजची मराठी कथा : शोधाच्या दिशा

प्रिय श्रीपाद भालचंद्र जोशी,
सप्रेम नमस्कार वि. वि.

तुमचे दि. 8 मे 1989 चे पत्र पावले. वाचून बरे वाटले; याचे एक कारण असे की कथेवर आज अगदी वेगवेगळ्या अंगांनी आक्रमण होत आहे : एक म्हणजे कथाकथन. कथाकथनाच्या प्रथेवर कथाकार शांताराम यांनीच अध्यक्षीय भाषणातून प्रतिकूल अभिप्राय नोंदविला हे चांगले झाले. नवकथेने मराठी कथेलाच नव्हे तर मराठी वाचकाच्या कथाभिरुचीलाही सूक्ष्मता दिली होती; कथाकथनाच्या चालीमुळे अभिरुचीची ही सूक्ष्मता कमी कमी होत आहे की काय अशी मला भीती वाटत आहे. एका मानसिक-वाङ्मयीन आलस्यातून तर मराठी समाज आज टी. व्ही.-नाटक-कथाकथन-कविसंमेलन याकडे वळत नाही ना ? प्रौढ वयातील कलास्वाद हा केवळ कलाकृतीच्या लौकिकातील कालप्रत्ययापुरताच मर्यादित नसतो; त्यानंतर कितीतरी काळ मन त्या आस्वादात बुडून गेलेले असते. असे आज कितीजणांचे होते ? इकडे साधारण नागरिक करमणुकीसाठी चटावलेला, तिकडे विद्यार्थी परीक्षोपयोगी उपयुक्तवादी दृष्टीने नाडलेला आणि हे समीक्षक आस्वादहीन समीक्षालेखनात तरंगणारे-कथेचा कलाकृती म्हणून आस्वाद घेऊन त्या धुंदीत बुडून जाऊन त्या कथाकृतीचा अणूरेणू प्रतीत करून घेणारे आज कितीजण आहेत ?

टी. व्ही. वाल्यांना मधूनच लहर येते आणि मग एकदमच 'कथास्तु', 'दर्पण', 'कथासागर' असे कथा-कार्यक्रम सुरू होतात. ही दृश्यकथा मराठी कथाभिरुचीवर काय परिणाम करीत असेल ? एकतर अशा कार्यक्रमांत घटनाप्रधान कथा निवडल्या जातात किंवा कथेतील घटनेलाच अप्रस्तुत महत्त्व दिले जाते; त्यामुळे मूळ कथेवर तर अन्याय होतोच शिवाय दर्शकाची अभिरुचीही त्यामुळे नाट्य

विठ्ठल होते; अशा दृश्यकथांत हळवेपणा आणि बोधवाद असला म्हणजे मग विचारावयासच नको. आधीच टी. व्ही. मुळे आपल्या साऱ्यांचे वाचन सीमित झाले आहे; मराठी आणि विदेशी कथा अशा छोट्या पडद्यावर पाहून आणि कथास्वादाचे व्याजसमाधान मिळवून आपल्या साऱ्यांचे कथावाचन आणखी आखूड होणार आहे का? आपली अभिरुची आणखी ढोवळ होणार आहे का? येथे एक निरीक्षण मात्र अवश्य नमूद केले पाहिजे; टॉलस्टॉय किंवा मोपांसा यांच्यासारख्या विश्वविख्यात कथाकारांच्या कथा टी. व्ही. वर पाहताना, दिग्दर्शकाच्या मर्यादांइतकेच, या कथाकारांचे मोठेपणही सतत जाणवत राहते–अनुवाद, माध्यमान्तर, अभिनय–दिग्दर्शन यांच्या मर्यादा या साऱ्यावर मात करून या प्रतिभावंतांची बावनकशी प्रतिभा आपल्याला खुणावून जाते.

कथेवर खरोखर लोकोत्तर प्रेम करणाऱ्या राम कोलारकरांना हे सारे पाहून काय वाटत असेल? माझ्या मनात आणखी एक प्रश्न येतो : जी. एं. च्या कथेचे जे अंधश्रद्धेच्या पातळीवर कौतुक चालू आहे त्याबद्दलही कोलारकरांना काय वाटते ते एकदा विचारावयास हवे आहे. मराठी नवकथेने भावकविता–लघुनिबंध गद्यकाव्य–नाटचच्छटा–एकांकिका–प्रवासचित्रण इत्यादी लघुवाङ्मयप्रकारांचे वळ आत्मसात केले होते; पण तिला कादंबरीचे वळ आत्मसात करणे साधले नव्हते; जी. एं. नी आपल्या दीर्घ कथांतूनच नव्हे तर लघु–कथांतूनही कादंबरीची व्यामिश्रता आत्मसात करावयाचा प्रयत्न केला–हे त्यांचे कार्य मराठी कथेच्या संदर्भात ऐतिहासिक मोलाचे आहे; परंतु व्यामिश्रतेबरोबरच कादंबरीचे दुसरे एक वैशिष्टय आहे : वस्तुनिष्ठता. अनुभवाची ही वस्तुनिष्ठता मात्र जी. ए. क्रमाने गमवीत गेले–प्रथम अस्तित्ववादाच्या व नंतर अज्ञेयवादाच्या आहारी जाऊन. त्यांच्या कथा 'पात्रांच्या कथा' न होता नेहमीच 'लेखकाच्या कथा' झाल्या आहेत. गद्याकडे आपण वळतो ते या भौतिक वास्तवाच्या नाना कळा जाणून घेण्यासाठी त्या गद्यानेच जर वास्तवाच्या नाना कळांकडे पाठ फिरविली तर आपण कुणाच्या तोंडाकडे पाहावयाचे? जी. एं. च्या कथा वाचताना सतत जी. एं. चे तोंड दिसत राहते. त्याची पुढे पुढे चीड यायला लागते. चेकॉव्ह, टॉलस्टॉय, मोपांसा यांच्याबाबत असे घडत नाही. मात्र जी. एं. यांच्या कथेने मराठी एकांकिकेवर जो परिणाम केला आहे, त्यात जी. एं. चा विजय व मराठी एकांकिकेचा पराजय आहे हे मात्र खरे !

मराठीतील कमल देसाई, गौरी देशपांडे, आशा बगे यांच्या कथालेखनातही, एका वेगळया अर्थाने, त्या त्या लेखिकेचे लौकिक

व्यक्तित्वच प्रतिबिंबित होत असते व त्यांच्या कथामाध्यमाला सीमित करीत असते. कितीतरी दिवसांपासून मी स्वतः मोठ्या आवडीने राजेंद्र वनहट्टी यांचे सगळे कथासंग्रह जमविले आहेत. त्यांच्या कथांमध्ये कथाप्रकाराचे वैभव ठरणारी, व्यामिश्रता आणि वस्तुनिष्ठता ही दोन्ही वैशिष्टचे फार मोठ्या प्रमाणात दृष्टिगोचर होतात. त्यांच्यावर एकदा विस्ताराने लिहावयाचे आहे.

लेखकाच्या लौकिक व्यक्तित्वाने आणि लौकिक जीवनदृष्टीने मराठी कथासाहित्यास जशी मर्यादा पडली आहे तशीच वास्तवाच्या फॅशनेबल व तर्कशील आकलनानेही मराठी कथासाहित्य भुंडे होऊन गेले आहे : जीवनात तर्काच्या पलीकडच्या घटना रात्रंदिवस घडत असतात; वर्तमानविज्ञानाच्या आकलनाच्या त्या पलीकडच्या असतात. वास्तवाचा एक अंश म्हणून त्याचा स्वीकार मराठी कथाकारांनी करावयास हवा की नको ? त्यासाठी अगदी गूढकथा-भयकथाच लिहिली पाहिजे असे नाही; पण अशा घटनांना आपल्या आकलनात जागा दिली तर आपण प्रतिगामी, अंधश्रद्ध ठरू असे भय या प्रतिभावंतांना वाटत असावे ! आणि जोशी, अद्‌भुत हा वास्तवाचा अपरिहार्य अंशच नाही तर त्याबद्दलचे आकर्षण ही मानवाची एक उत्कट सहज प्रवृतीही आहे. हरिभाऊ आणि त्यांचे समकालीन मराठी कादंबरीकार वास्तवातील अद्‌भुताकडे दुर्लक्ष करतात व त्यामुळेही मराठी कादंबरी जागतिक कादंबरीच्या तुलनेने तिसऱ्या दर्जाची ठरते अशी काहीशी तक्रार इतिहासाचार्य राजवाडे यांनी केल्याचे मला अंधुकसे आठवते. हे वास्तवातील अद्‌भुत वाचकास पुरविले गेले नाही म्हणजे मग तो स्वाभाविकच चांदोवा, रामायण–महाभारत, स्टार-ट्रेक यांच्याकडे अवास्तव आणि अकलात्मक दृष्टीने आकर्षित होतो. वास्तवातील अद्‌भुताचे, अवास्तवाचे हे भान आर्ष महाकाव्ये, लोकसाहित्य यांना पूर्वी होते; समकालीन कथासाहित्यात त्याची वानवाच आहे. यास एक अपवाद म्हणजे श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांचे ललित लेखन. त्यांच्या लेखनातील लालित्य, निसर्गप्रेम आणि बालभाव यांच्याकडे जेवढे आपण लक्ष देतो तेवढे या घटकाकडे काही देत नाही; याला काय म्हणावे ? असो.

कथाविषयक लेख लिहू शकणार नाही हे कळविण्याच्या हेतूने लिहावयास बसलो आणि हे पत्रात्मक टिपण लिहून गेलो. तुम्हाला बरे वाटल्यास हे पत्रच तुमच्या अंकात समाविष्ट करा.

अधिक काय लिहू ?

आपला

डॉ. द. भि. कुळकर्णी

दलित कथेचा उगम

: डॉ. प्रकाश खरात

आधुनिक भारतातील दलितांच्या इतिहास व संस्कृतीचा उदय डॉ. आंबेडकरांच्या चळवळी-सोबतच झाला आहे. त्याचप्रमाणे दलित साहित्याचाही जन्मारंभ त्यांनी सुरू केलेल्या मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध–भारत या साप्ताहिकातील कथा, कविता, निबंध या निर्मितीवरूनही स्पष्ट होतो.

१९६७ नंतर दलित साहित्य चळवळीने मराठी साहित्य ढवळून काढले आणि वाङ्मयीन मूल्यांना अधिक गतिमानता दिली. त्याचप्रमाणे १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' व १९३० मध्ये 'जनता' या नियतकालिकांनी नवलेखकांना प्रेरणा दिल्या, व नंतर प्रबुद्ध–भारत हे नाव धारण करून मराठी कथासाहित्याला भरपूर योगदान दिले आहे. परंतु या कथासाहित्याची समीक्षकाकडून फारशी दखल घेतली गेली नाही.

जनता व प्रबुद्ध भारत या साप्ताहिकातून विविध लेखकांची दलित कथा विखुरलेली आढळते. मूकनायक, बहिष्कृत भारत हे अंक अभ्यासावयास मिळाले नाही. त्यामुळे त्यामधून कथा आहेत किंवा नाहीत ? हे सांगता येत नाही. परंतु १९३३ ते १९५८ या काळातील जनता व प्रबुद्ध भारत या साप्ताहिकातून एकशे पंधरा कथा आढळतात. या सगळ्या कथा निरनिराळ्या लेखकांनी लिहिल्या आहेत. या काळातील दलित कथेचे स्वरूप व मराठी पारंपरिक लेखकाकडून घडणाऱ्या कथेचें स्वरूप यांच्यामध्ये आशयाच्या दृष्टीने मूलभूत असा फरक आहे.

दलित लेखकांनी आपल्या कथालेखनाचा आरंभच माणसाचे दुःख, त्याचे जगणे व त्याचे संवेदनाविश्व यांना मध्यवर्ती केंद्र म्हणून केला आहे. आणि आश्चर्य असे की दलित कथा घडत असतांना मराठी नवकथाकारांनी आपली कथा-लेखनाची सुरवात प्राण्यांचे दुःख व त्यांचे भावविश्व उलगडून सांगण्यापासून केली आहे. अरविंद गोखले यांनी 'मांजराचा पोर' ही आपली पहिली कथा लिहिली. व्यंकटेश माडगूळकर यांनी 'काळ्या तोंडाची' या कथेतून कुत्र्याची भावना सुंदर सांगितली. गंगाधर गाडगीळ यांनी 'प्रिया आणि मांजर' या नावाने पहिली कथा प्रसिद्ध केली. त्या काळात जनता व प्रबुद्ध भारतातील कथा सामाजिक समतेसाठी लिहिणाऱ्या व्यक्तिजीव-नाचे कथारूप घेऊन प्रकट होत होती.

मराठीतील पहिली अंशतः सुसह्य कथा 'एका मांजराचे शहाणपण' ही १८१८ मध्ये आढळते. असे राम कोलारकर म्हणतात.[१] ही मराठी भाषेची आधुनिक कथा मांजरावर असावी हे सुद्धा वाचकाला गंमतीदार धक्का देणारीच घटना नाही का ? मराठी कथासृष्टी मानवी दुःखाबद्दल इतकी उदासीन कां ? असा प्रश्न पडतो. आणि ही मानवी दुःखाची एक बाजू जी नैसर्गिक व सामाजिक, मानवनिर्मित बाजूला कथात्मरूप देण्याचे कार्य दलित कथा करताना दिसते. मराठी कथासाहित्याला सामाजिक जाणिवेच्या बाजूने रेखाटून, दलित कथेने निश्चितच कथेचे दालन या अंगाने समृद्ध करण्यात हातभार लावला आहे.

१९३३ च्या काळात मराठी कथा मध्यमवर्गीय जाणीव घेऊन विकसित होत होती. फडके, खांडेकर व वामनराव चोरघडे मराठी कथेला घडवीत होते. त्याच काळात जनता व प्रबुद्ध भारतातून दलित लेखक शोषित मनाची व्याकुळता मांडत होता. आपली स्वतःची एक वेगळी वाट धुंडाळत होता.

१९३० नंतर डॉ. आंबेडकरांचे आंदोलन गतीमान झाले होते. त्यांच्या विचाराचा व कार्याचा प्रभाव समाजमनावर पडत होता. याच

१. राम कोलारकर, सर्वोत्कृष्ट मराठी कथा खंड १ प्रस्तावना पृष्ठ २२.

काळात महात्मा गांधीच्या विचारांचा प्रभावही मराठी कथालेखकांच्या मनावर पडला होता. त्यातून मराठी कथा जन्म घेत होती. तसेच डॉ. आंबेडकरांचेही तत्वज्ञान घेऊन अनेक व्यक्तिरेखा दलित कथेतून बोलत होत्या. आजच्या दलित साहित्यातून प्रकट होणारा विद्रोह, नकार, वेदना हे दलित साहित्यातील वाङ्मयीन मूल्य; जनता व प्रबुद्ध भारतातील कथेतूनही आविष्कृत होत होते. असेच त्या काळातील कथेचे स्वरूप आहे.

नवी वाट,[1] वैत्याचा बैल[2], बंदा गुलाम[3], महार जन्माची चित्तरकथा[4], शिळारी भाकरी[5], सारं आभाळ फाटलंय[6], आम्हीही माणसं आहोत[7], देव झोपला आहे.[8] इत्यादी अनेक कथा १९५६ च्या काळात लिहिल्या जात होत्या. या कथेतून प्रामुख्याने डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या विरोधात उभा केलेला संघर्ष आहे. संघर्षात उतरलेल्या व्यक्तिमनाच्या भावना आहेत. मेलेल्या गुरांचे मांस खाऊन जगणारी माणसं स्वाभिमानाने उभी राहण्यासाठी कशी धडपडतात, त्याचे या कथांतून चित्र आहे. काळाराम मंदिराचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह, यामधून अस्पृश्य व सवर्ण यांच्यामधील तणावाचे, भाव-भावनांचे व समाजमनाचे आंदोलन या कथांमधून प्रकट झाले आहे. हा संघर्ष दोन व्यक्तिमधील संपत्तीचा नाही. हा संघर्ष दोन राज्यामधील जमिनीचा अथवा इस्टेटीचा नाही. या संघर्षाचे महाभारत मानवी समतेच्या मूल्यांची स्थापना करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनामधील आंदोलनाचे आहे. (म्हणूनच ते कथालेखकांच्या लेखणीचा कथाविषय झाले आहे.)

जनता व प्रबुद्ध भारतातील कथा वाचल्यानंतर असे वाटते की ही माणसं जगली कशी? इतका क्रूर खेळ दलित स्त्री, पुरुष, बालक यांच्यासोबत या संस्कृतीने का खेळला? अशा त्या माणसांच्या संवेदनेला वाङ्मयीन कथारूप देण्याचे महान कार्य या काळातील बंधुमाधव या लेखकाने केले आहे.

बंधु माधव हे जनता व प्रबुद्ध भारतातील श्रेष्ठ कथाकार आहेत. या लेखकाने सातत्याने कथालेखन केले असते तर दलित कथा व मराठी कथा अधिक समृद्ध झाली असती. त्यांच्या कथेचे स्वरूप मानवी मनाचे दुःख मांडण्यात यशस्वी झाले आहे. सर्वहारा माणसाचा इथे कसा छळवाद होतो; त्याचे जीवन कसे पशूपातळीवरचे आहे, त्यांना संस्कृतीने कसे गुलाम करून राबविले, अशा विविध व्यतिरेखा त्यांच्या कथेतून येतात. त्यांच्या कथेची शैली इतर कथालेखकांपेक्षा वेगळी, व्याकुळ करणारी आहे. कथा भावनेला हेलावून सोडते. मनावरील पकड घट्ट करते, त्यामुळे दलित कथा, विकासाचा प्रारंभ त्यांच्या कथेपासूनच होतो. एकीकडे बंधुमाधव यांना समकालीन असलेले कथालेखक नवकथा घडवीत, मराठी कथा प्रयोगाच्या पातळीवर विकसित करीत होते, अभिव्यक्तीच्या पातळीवरून मराठी कथेला नवे रूप प्रदान करीत होते. तर दुसरीकडे जनता, प्रबद्ध भारतातील कथा भौतिकवादी, जडवादी, चिंतनाच्या पातळीवरून आशयाची संपन्नता मराठी कथेला प्रदान करीत होती.

पौर्णिमेची रात्र[1], हुंबरडा[2], सौख्याचा चंद्रमा[3], सुकलेली वेणी[4], या सारख्या कथातून दलित लेखकांनी प्रेमभावना रेखाटली आहे. सामाजिक विषमतेचे दुःख भोगत असताना प्रीतीचा स्पर्श, अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी बळ देतो. विषम समाजरचनेचा अंत करण्यासाठी प्रेम हे सुद्धा एक महत्त्वाचे हत्यार आहे. हे या दलित कथेतून प्रकट झाले आहे. या प्रेमातील नायक हा प्रामुख्याने अस्पृश्य व नायिका सवर्ण तरुणी अशी रचना दलित लेखकांनी केली आहे. 'चंदनवाडी'

१. बंधु माधव, प्रबुद्ध भारत, २५ मे १९५७
२. बंधु माधव, प्रबुद्ध भारत, ६ जुलै १९५७
३. बंधु माधव, प्रबुद्ध भारत, ३१ ऑगस्ट १९५७
४. बंधु माधव, प्रबुद्ध भारत, २९ सप्टेंबर १९५७
५. बंधु माधव, प्रबुद्ध भारत, ९ नोव्हेंबर १९५७
६. बंधु माधव, प्रबुद्ध भारत, २३ नोव्हेंबर १९५७
७. बंधु माधव, प्रबुद्ध भारत, १८ जानेवारी १९५६
८. एकनाथ बापू रणपिसे, प्रबुद्ध भारत, २४ जानेवारी १९५८.

१. के. अ. घेगडे, जनता, १५ आक्टो. १९३८
२. एस. व्ही. गायकवाड, जनता, ९ सप्टें. १९३९
३. पा. तु. कांदळगावकर, जनता, ९ डिसें. १९५०
४. पा. तु. कांदळगावकर, जनता, ५ मे १९५१

या कादंबरीत ग. त्र्यं. माडखोलकर यांनी तसेच 'दोन मने' या कांदबरीतून वि. स. खांडेकर यांनी अस्पृश्य तरुणी नायिका व सवर्ण तरुण नायक दाखविला आहे. या काळातील कथा-लेखकांनी हा क्रम उलट दाखवून एक नवा प्रयोग केला. हे या काळातील कथेचे महत्त्वाचे वैशिष्टच आहे.

ध्येयवादी विवाह[१], अपुरे पत्र[२] प्रेमाचे पिशाच्च[३] या सारख्या कथातूनही सामाजिक विषमतेवर कोरडे ओढले आहेत. स्त्री–पुरुष या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून एक नवी जाणीव रुजविण्याचा प्रयत्न केला आहे.

संघाचा पुढारी[४], स्वतंत्र प्रजापूर[५], निवडणूकीचा बळी[६], हुतात्म्याचं रक्त[७], या सारख्या राजकीय जाणीवेची कथा सुद्धा जनता व प्रबुद्ध भारत या साप्ताहिकातून प्रकट झाली. राजकीय सत्ता हे समाजप्रबोधनाचे हत्यार आहे. त्यामाध्यमातून एक जागृती व विकास साधता येतो अशा आशय या कथांतून प्रकट झाला आहे.

दारिद्र्य भोगणारी ही माणसे या काळातील कथातून भरपूर आली आहेत. हे अनेक स्त्री, पुरुष वृद्ध, तरुण, बालक, यांच्या जीवनाचे दु:ख तळ-मळीतून आविष्कृत झाले. त्यामुळे या कथांची शैली वेगळी भावव्याकुळ रूप घेऊन आली आहे. आशयाला एक वेगळी अभिव्यक्ती मिळाल्यामुळे या कथेचा घाट दलित कथेचा झाला आहे. दलित कथेतील जाणीव व तत्त्वज्ञान आंबेडकरी असल्यामुळे त्याला भौतिकवादी चिंतनाची दिशा मिळाली आहे. या काळातील कथेची भाषा बोली भाषा आहे. शब्दकळा सर्वसाधारण माणसांच्या व्यवहारातील आहे. कथांमधील अनुभव स्वत: लेखकांचेच आहेत त्यामुळे त्यांच्या कथेला आत्मगर्भता, आत्मनिष्ठा प्राप्त झाली आहे.

या काळातील दलित कथेने अस्पृश्यता विरोधी समतेचे मानवी तत्त्वचिंतन दिले आहे. बौद्ध सांस्कृतिकतेची एक ऐतिहासिक कथा दिली आहे. सरंजामशाही शोषणव्यवस्थेला विरोध करणाऱ्या अनेक व्यक्तिरेखा कथांमधून मांडल्या आहेत. त्यामुळे या कथेचे स्वरूप मराठी पारंपरिक कथेपेक्षा वेगळे ठरले आहे. दलित साहित्य चळवळीने निर्माण केलेली वाङ्मयीन मूल्य जनता व प्रबुद्ध भारतातील कथांतून निश्चितच आविष्कृत झाली आहेत. त्यामुळे दलित कथेचा उगम जनता, प्रबुद्ध भारतातील कथासृष्टीतच आहे. अशा या कथेने दलित कथेला व मराठी कथेला समृद्ध असे योगदान दिले आहे. ■

२७९, लक्ष्मीनगर, नागपूर

१. चांगदेव गोदाजी मालेराव, जनता, १९५१
२. आप्पा वाविस्कर, जनता, १६ फेब्रु. १९५२
३. नामदेव गोदाजी मालेराव, जनता, १९५१
४. वी. के. गायकवाड, जनता २० जुलै. १९५०
५. सी. आ. कांबळे, जनता, १२ डिसें. १९५०
६. निरंजन, जनता, २५ नोव्हें. १९५०
७. पा. त. कांदळगावकर, जनता १५ सप्टें. १९५१

अस्तित्वाच्या दरवळीत

उघड कर
माझे अंतर्गत संदर्भ
ज्यांतून उलगडेल
गंध
अमृतानुभवी फुलांचा;
अथवा
स्मरण सर्पदंशाचे.

त्या सत्य अंधारगुहा
अन् माझ्यालगत उजळ इतिहास
: करुणामय प्रतिभा स्पर्शून गेलीय्....

तुझ्या अस्तित्वाच्या दरवळीत
सामावून घे
माझे मृत्यूभान.

थांबवा घणघणारी मृत्यूघंटा

काळोखकातळावर धडका देत
रग जिरवतोय्.

हे प्रदुषण सर्वदूर
प्राचीन काजळी
आधुनिक रूपांत वावरतेय्.

हे गरळ वादळ
नि संसर्गजन्य मृत्यू वळसेदार सरपटतोय्

थांबवा घणघणारी मृत्यूघंटा
हटवा मर्तिकांचे ढीग
कोलाहलात
अन् मृत्यूदर्पात
कसं करू साजरं हक्कदार मैथुन ?

मध्यान्हशिखराच्या वाटा कुणी रोखल्यायत?

प्रेषिताला फुलं वहाणार नाहीय्

झाकोळून गेलोय्
ही तर मनस्वितेची सुरवात आहे.

स्मृती जाग्या होतायत अन्
तीव्र उजळ युद्धाच्या
इतिहासाच्या कबरीतून जन्मलोय्;
बाळमुठीत माझ्या पारदर्शी प्रकाश.

ओहोटणार नाहीय् पूर्वापार
अथवा प्रेषिताला फुलं वहाणार नाहीय्
मिटल्या डोळ्यांनी...

: माझ्या प्रलयंकारी पौरुषत्वाचे दर्शन घ्या !

: प्रकाश खरात
५/५ प्रथमेश, अपना डेव्हलपमेंट
हौसिंग सोसायटी, जनकल्याण नगर,
खारोडी, नार्वे रोड, मालाड (पश्चिम),
मुंबई–४०००९५.

आम्ही

माझे हे म्हणणे कदाचित
तुम्हाला पटणार नाही
परंतु हे सत्य आहे की
अख्खं आयुष्य आम्ही चालत आलो आहोत
प्रश्न आले की
माणसाने पाऊलं पुढे टाकायचे असतात
आणि म्हणून आम्ही चालतो
आम्ही चालतो तेव्हा
दिशांचे संदर्भ बदलतात
आम्ही चालतो तेव्हा
रस्तेही माय–बाप म्हणतात
आम्ही चालतो तेव्हा
वादळही शरमेने खाली मान घालते
आम्ही चालतो तेव्हा सरकार बेचैन असते
आम्ही चालतो तेव्हा रस्त्यांच्या कडेला
पोलिसांचे ताफे असतात.
आम्ही चालतो तेव्हा गंज लागलेल्या
बंदूकांना साफ केल्या जातं.
आणि तरीही आम्ही चालतो
बिनधास्तपणे चालतो
त्यांच्या छातीवरून चालतो
कधी लेखणी घेऊन
तर कधी मशाली घेऊन ॥

देशद्रोही

कालची पहाट वेगळीच होती
सूर्य आला तेव्हा
नामांतरात शहीद झालेल्यांच्या
आया–बहिणी
ढस–ढसा रडत होत्या.
आणि आपल्याच आसवांना
प्रश्न करीत होत्या.
कुठे आहे दिलीप–कुठे आहे रोशन
हा देश त्यांच्या प्रश्नांची उत्तरे
देऊ शकत नाही
हा देश परत देऊ शकत नाही त्यांचं
कौटुंबिक सुख
तसा हा देश नेहमीच उध्वस्त करीत
आला आहे
त्यांचे स्वप्न–त्यांच्या योजना
पण आता एकच वाक्य
तुमच्या धर्मग्रंथावर लिहून घ्या.
नवीन पोचीराम कांबळे कडे हात जर
तुमचे आलेत
तर मग मराठवाडा आम्ही पेटवू
हिन्दुस्थानची राखरांगोळी करू
मग उद्या देशद्रोही ठरलो तरी चालेल ॥

: अमर रामटेके
जयभीम नगर
नागपूर–२७

माझा मित्र राजीव जवळेकर : एक गूढ

तू दोन टोकाचं सुवर्णमध्य
तू मुम्बई ते पुणे चढत जाणारा घाट
घाटावरचं घनदाट जंगल
अनेक कडा, झुडपं.
तू म्हणजे रंगाच्या छटा
भरधाव धावणारी शहरातील गर्दी
गर्दीला चेहरा असतो कां ?
तू म्हणजे प्रश्नांचं मोहोळ
सुरक्षित कप्पा शोधणारा.
तुझा उगम तुझा शेवट
वर्तुळासारखा अशाश्वत.
तू म्हणजे वसंतात झडणारं झाड नव्हे
तू वळवाचा पाऊसही नव्हे
लक्ष्मी रोडची गर्दी ?
तू गूढ म्हणजे काळाकुट्ट अंधार
किंवा भयपटाची कथाही नव्हे
तू म्हणजे जपानचा जिवंत ज्वालामुखी
पुणे–तळेगाव लोकल विद्युत वाहक
किंवा जीएंच्या गूढ कथातील नियतीत
गुरफटलेला गूढनायक
उदाहरणार्थ, भालचंद्र नेमाडेंचा
पांडूरंग सांगवीकर.

तू तिठ्यावर उभा
तू असतो एकाच वेळी विचारक /उध्वस्त
करणाराही
तू असतो आतून धगधगत
हळूहळू विझत जाणारा, हत्यारहीन
व्यवस्थेचाच शिकार होत जाणारा
मग मात्र तू लोकलच्या गर्दीतील एकबिंदू
अधिकच लहान लहान होत जाणारा
उदाहरणार्थ, उगाचच कोसल्यातील
सांगवीकरासारखा
सिंहगडावर चढून उतरताना भरकटणारा.
होस्टेलच्या खोलीत मांजरावर टाकण्यासाठी
पाणी उकळणारा.

प्रभू राजगडकर
पं. स. आमगाव

वेद पुराणांची भिन्नता

वरील शीर्षकात "यातील" हा शब्द वापरला आहे पण तो वेद व पुराणे यांना सारखाच लागू नाही. कारण वेदवाङ्मय हे मुख्यतः कथारूप नाही. वेदातील मंत्र या विविध देवतांना उद्देशून केलेल्या प्रार्थना आहेत. या प्रार्थनामध्ये मंत्रकाळी प्रचलित असलेल्या कथांचे नुसते संदर्भ आहेत, स्वयमेव कथा दिलेल्या नाहीत. त्या कथा मंत्रांचे श्रवण करणाऱ्यांना माहीत आहेत असे गृहीत धरलेले आहे. वेदांचा ब्राह्मण नावाचा जो भाग आहे त्यात कथा आहेत पण त्यांचा उद्देश कोणत्या संदर्भात कोणत्या ऋचा म्हटल्या गेल्या हे सांगण्याचा आहे. ब्राह्मणांचाच उपनिषदे म्हणून ओळखला जाणारा जो भाग आहे त्यात मुख्यतः तत्त्वज्ञानपर वचने आहेत व तत्त्व स्पष्ट करण्यासाठी काही त्रोटक कथा आल्या आहेत. तात्पर्य, वेदवाङ्मयाचा कथा हा गौण भाग आहे, त्यामुळे "वेदातील कथा" हा शब्दप्रयोग पूर्णांशाने सार्थ आहे.

पण "पुराणातील कथा" म्हणताना "राहूचे शिर" असे म्हणण्याचा प्रकार होतो. कारण पुराणांचे मुख्य स्वरूपच मुळी कथा हे आहे. या कथांपैकी पुष्कळशा कथा ऐतिहासिक सत्यावर आधारलेल्या आहेत असे सर्वसाधारण मत आहे. पुराणांनी (१) सृष्टीची उत्पत्ती; (२) प्रलय, (३) वंश, (४) मन्वन्तर व (५) वंशानुचरित यांची चर्चा करावी असा दंडक आहे. हे पाचही विषय मानवी व ब्रह्मांडविषयक इतिहासाशी संबद्ध आहेत. उपलब्ध पुराणे, पुराणांच्या वरील व्याख्येत काटेकोरपणे बसत नाहीत, तरी सर्वसाधारणपणे प्राचीन काळी घडलेल्या घटनांचे पुराणात वर्णन आहे शिव, विष्णू वगैरे अमानवी देवतांच्या कथा मानवी इतिहासाशी संबद्ध नसून सर्ग व प्रतिसर्ग म्हणजे उत्पत्ति व लय या ब्रह्माण्डविषयक घटनांशी संबद्ध आहेत असे मानले पाहिजे. मन्वन्तर म्हणजे एक समाजव्यवस्था बदलून दुसरी समाजव्यवस्था सुरू होणे. वंश व वंशानुचरित म्हणजे निरनिराळ्या राजांचे वंश व त्यांची कृत्ये.

वेदातील ओझरत्या कथा

पुराण कथांचा विषय या प्रमाणे इतिहास हा असला तरी इतिहास ही संज्ञा फक्त रामायण व महाभारत या ग्रंथांना लावण्याची चाल आहे. रामायणात रामाचे चरित्र अत्यंत विस्ताराने सांगितले आहे व महाभारतात शन्तनूपासून परीक्षितापर्यंतच्या सहा पिढ्यांचा तपशीलवार वृत्तान्त आहे. शंतनूपासून परीक्षितापर्यंतचा इतिहास या मुख्य विषयाबरोबर महाभारताने पुराणात आलेल्या कथांचाही संग्रह केला आहे. शिवाय रामायण/महाभारताची शैली देखील पुराणासारखीच आहे. म्हणजे गतकालीन गोष्टी सांगण्याचा उद्देश असला तरी कल्पनाशक्ती स्वैर सोडून त्यात मालमसाला भरणे गैर मानलेले नाही. तेव्हा प्रस्तुत लेखात पुराणकथांची चर्चा करताना रामायण/महाभारताची चर्चा अप्रस्तुत मानलेली नाही.

वर सांगितलेच आहे की वेदातील मंत्रवाङ्मयात कोणतीही कथा विस्ताराने सांगितली नाही. केवळ तत्कालीन लोकांना माहीत असलेल्या कथांचे संदर्भ आहेत. यापैकी काही कथा या ऐतिहासिक घटना आहेत. उदाहरणार्थ, दाशराज्ञ युद्ध. दाशराज्ञ युद्ध हे सुदास व दहा राजे यांच्यात झालेले युद्ध होते. त्यात इन्द्राच्या कृपेने सुदासाचा जय झाला. या युद्धात काही संशोधक आर्य/अनार्य युद्धाचा पुरावा शोधू जातात. पण हा खटाटोप व्यर्थ आहे. कारण सुदास वा त्याचे प्रतिस्पर्धी दहा राजे यापैकी कोणीही अनार्य असल्याचा वा विजयी सुदास किंवा दुसरा कोणताही "आर्य" भारताच्या बाहेरून आल्याचा उल्लेख नाही.

ऋग्वेदात उल्लेखिलेली दुसरी ऐतिहासिक कथा तुग्राचा पुत्र भुज्यु याची आहे. तुग्र हा सम्राट होता. त्याने समुद्रपार दिग्विजय करण्यासाठी आपला पुत्र भुज्यु याला एक नौसेना देऊन स्वारीवर पाठवले. भुज्यु स्वतः शंभर वल्ह्यांनी चालणाऱ्या एका नावेत बसला होता. ही नाव समुद्रात इतकी दूर गेली की तिच्या शिडांना धुळीचा एक कणही लागू शकत नव्हता. नांगर टाकण्यास कुठे जागा नव्हती. अशा अथांग समुद्रात भुज्यूला वादळाने गाठले. तेव्हा त्याने अश्विनीकुमारांचा धावा केला. अश्विनीकुमार प्रसन्न होऊन त्यांनी तीन रात्री व तीन दिवस भुज्यूची नाव समुद्रावरून तारून नेली.

वेद, पुराणे इत्यादींतील कथा

: नी. र. वऱ्हाडपांडे

सरमा व पणि

ऋग्वेदातील वरील सारख्या कथा ऐतिहासिक असल्या तरी ऋग्वेदात उल्लेखिलेल्या बहुतेक घटना मानवी इतिहासातील घटना नसून प्राकृतिक घटनांवर व्यक्तित्वारोप करून रचलेल्या आहेत. उदाहरणार्थ पणि व सरमा यांच्या कथेचा उल्लेख पहा. पणींनी इंद्राच्या गाई चोरल्या व त्या दूर दुर्गम ठिकाणी लपवून ठेवल्या. या गायींचा शोध लावण्यासाठी इंद्राने सरमा नावाच्या कुत्रीला पाठवले. या कुत्रीने रसा नदी ओलांडून त्या गायींचा शोध लावला व "गायी परत करा नाही तर इंद्र तुमचा निःपात करील" अशी पणींना जरब दिली. तेव्हा पणींनी सरमेला लालूच दाखवली : "तू आता इतकी दूर आली आहेस तर परत जाऊच नकोस. येथेच रहा. या गायींपैकी काही आम्ही तुला देऊ व आणखीही धन देऊ." पण सरमा या आमिषांना भुलली नाही.

काही विवेचक या कथेत पणि म्हणजे फोनीशियन नावाचे पश्चिम आशियात राहणारे व्यापारी व सरमा म्हणजे इंद्राची मानवी दूती असा मानवी इतिहास पाहतात. पण पणींच्या इतर वर्णनाशी हे जुळत नाही. पणींनी गायींच्या स्तनात तीन प्रकारचे घृत लपवून ठेवले हे वर्णन मानवी व्यापाऱ्यांना लागू होईल काय ? शिवाय एखाद्या सन्माननीय स्त्रीला कुणी कुत्री कां म्हणावे ?

या कथेचा अर्थ सरळ आहे. सरमा जी नदी ओलांडून गेली ती नदी रसन म्हणजे नाद करणारी म्हणजे मेघपंक्तीरूपी नदी आहे असे सायण म्हणतो. रसा म्हणजे मेघपङ्क्ती असे मानले तरच पणींचा "हे सरमे, रसेसारखी नदी उल्लंघून तू कशी येऊ शकलीस ?" हा प्रश्न उपपन्न ठरतो. रसा म्हणजे सिंधूला मिळणारी या नावाची क्षुद्र नदी असे म्हटले तर अशी नदी रोजच लोक तरून जातात, त्यात एवढे अचाट काय आहे ? दुसरे, चोरांचा तपास करण्यास शिकारी कुत्री पाठवतात या दृष्टीने देखील गायींचा शोध लावण्यास इंद्राने सरमेला पाठवले हे युक्त ठरते. ही सरमा म्हणजे Canis Majic & Canis Mirior अशी ज्यांना श्वानांची नावे आहेत त्या व्याधाच्या तारका असाव्या. पणींनी लपविलेल्या गायी म्हणजे पाणी. अनेक महिन्यापासून पाऊस पडत नाही कारण पणी नावाच्या दुष्ट राक्षसांनी हे पाणी दडवून ठेवले असते. इंद्र ते शोधून काढण्यासाठी सरमेला म्हणजे व्याधाच्या तारकेला पाठवतो. मग ही तारका पाण्याचा शोध लावून पाऊस पाडते, अशी कथेमागची कल्पना दिसते. "गो" शब्दाचा एक अर्थ पाणी असा देखील आहे.

पणी–सरमा संवाद अत्यंत नाट्यमय आहे. पुढील नाट्यवाङ्मयाची बीजे त्यात आहेत असे काही लोक सुचवितात.

ब्राह्मणातला वेगळाच हरिश्चंद्र

आता आपण वेदमंत्रावर प्रकाश टाकण्यासाठी जे ब्राह्मण ग्रंथ लिहिले गेले त्यातील कथांचे स्वरूप पाहू. ऐतरेय ब्राह्मणातील शुनःशेपाची कथा प्रसिद्ध आहे. या शुनःशेपाने निरनिराळ्या देवतांना उद्देशून लिहिलेल्या ९७ ऋचा ऋग्वेदात आहेत. या शुनःशेपाची कथा अशी–

इक्ष्वाकुवंशात हरिश्चंद्र नावाचा राजा होऊन गेला. त्याला पुत्र होत नव्हता म्हणून त्याने पुत्रप्राप्तीसाठी वरुणाची प्रार्थना केली व "तुझ्या कृपेने झालेला पुत्र मी तुलाच अर्पण करीन" असे वचन दिले. वरुण प्रसन्न झाला व हरिश्चंद्राला पुत्र झाला. त्याचे नाव त्याने रोहित असे ठेवले. कराराप्रमाणे वरूण रोहिताची मागणी करू लागला तेव्हा "मुलाला दात निघू दे, त्याला बोलू लागू दे, मग मी माझे वचन पूर्ण करीन" वगैरे प्रमाणे हरिश्चंद्र चालढकल करू लागला.

तेव्हा वरुणाचा कोप झाला व त्याने हरिश्चंद्राला जलोदर जडविला. यावर उपाय म्हणून रोहिताच्या ऐवजी दुसऱ्याच कुणाला बळी देण्याचा बेत हरिश्चंद्राने योजला व अजीगर्ताचा शुन:शेप नावाचा पुत्र विकत घेतला. शुन:शेपाला बळी देण्यासाठी यज्ञाच्या यूपाला बांधण्यात आले. पण त्याला ठार मारण्यास कोणी तयार होईना. तेव्हा त्याचा बाप अजीगर्त, हरिश्चंद्राकडून आणखी काही धन घेऊन त्याला कापण्यास तयार झाला. यज्ञाचा पुरोहित विश्वामित्र होता. त्याला हा सर्व प्रकार पाहून घृणा वाटली व शुन:शेपाची दया आली. त्याने शुन:शेपाला देवतांची प्रार्थना करण्यास सांगितले. त्या अनुसार त्यावेळी शुन:शेपाने निरनिराळ्या देवतांच्या प्रार्थनापर १०० ऋचा म्हटल्या. या ऋचांनी देव प्रसन्न झाले व त्यांनी ज्या पाशाने शुन:शेपाला यूपाशी बांधले होते तो पाश तोडून टाकला. या चमत्कारामुळे शुन:शेपाची वाहवा झाली व विश्वामित्राने त्याला आपला पुत्र म्हणून स्वीकारले. विश्वामित्राला दुसरे शंभर पुत्र होते, त्यांना हे आवडले नाही. तेव्हा विश्वामित्राने त्यांना शाप दिला. तेव्हा ते दस्यू व पतित झाले.

आपल्या पुत्राचे दैवी कर्तृत्व पाहून अजीगर्ताला पश्चात्ताप झाला व तो त्याला विश्वामित्राचा पुत्र न होता परत आपला बाप म्हणून स्वीकार करण्यास विनवू लागला. तेव्हा शुन:शेप म्हणाला, "तू मला पैशासाठी विकले व पैशासाठी मला ठार मारण्यासही तयार झालास. साऱ्या याज्ञिकांनी पुत्राची हत्या करण्यास सुरा उगारणाऱ्या बापाला पाहिले. आता मी तुझा पुत्र कदापि होणार नाही."

या पुढे शुन:शेप विश्वामित्राच्या भौतिक व आध्यात्मिक वैभवाचा उत्तराधिकारी झाला.

शिथिल जातिबंधने

वरील कथेतील इक्ष्वाकुवंशीय हरिश्चन्द्र व पुढे पुराणांनी प्रसिद्ध केलेला तोच हरिश्चन्द्र यातील फरक एकदम लक्षात येण्यासारखा आहे. पुराणातील हरिश्चन्द्र स्वप्नात दिलेले वचन पुरे करण्यासाठी सर्वस्वाची होळी करतो, उलट ऐतरेय ब्राह्मणातील हरिश्चन्द्र जागेपणी दिलेल्या वचनालाही जागत नाही. एकीकडे हरिश्चन्द्र वास्तवाला अधिक जवळचा दाखवला आहे तर दुसरीकडे धनलोभासाठी पोटच्या गोळ्याचा बळी देण्यास तयार होणारा अजीगर्त हा भौतिक अध:-पाताच्या बाबतीत सामान्य बापाहून अगदी वेगळा आहे. पण असे बाप सामान्याहून दूर असले तरी दुर्लभ नाहीत हे फाळणीच्या हाहाकाराच्या वेळी स्वत:च्या मुली विकणारे बाप भारतात दिसले होते यावरून स्पष्ट होईल. एकूण वैदिक कथा पौराणिक कथांपेक्षा वास्तवाशी अधिक जवळ आहेत.

या कथेवरून दुसरी एक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे काही वन्य जमाती विश्वामित्राच्याच वंशातील आहेत असे सांगून त्यांना वैदिक संस्कृतीत सामावून घेणे. या वन्य जमाती विश्वा-मित्राच्या वंशातल्या होत्या हे कदाचित् ऐतिहासिक सत्य देखील असेल. पण या सत्याची आठवण जागी ठेवून पतितांना समाजाच्या प्रधान स्रोता-पासून दूर जाऊ न देण्याची या कथेत प्रवृत्ती आहे हे लक्षणीय आहे.

वेदातील कथानंतर आपण उपनिषदादि ग्रंथात व पुढील तत्त्वज्ञानपर वाङ्मयात एखादा सिद्धांत विशद करण्यासाठी सांगितलेल्या कथांकडे वळू. उपनिषदांमध्ये सत्यकाम जाबालीची कथा आहे. सत्यकाम जाबालीला त्याच्या गुरूने बापाचे नाव विचारले. तेव्हा तो म्हणाला, "आई म्हणते की माझा अनेक पुरुषांशी संबंध आल्यामुळे मला तुझा बाप कोण हे सांगता येत नाही." हे ऐकून गुरूने त्याच्या सत्यवादित्वाचे कौतुक केले व त्याला गुरूकुलात घेतले. श्वेतकेतूच्या बाबतीतही अशीच कथा आहे. श्वेतकेतूची आई त्याला व त्याच्या बापाला सोडून दुसऱ्या पुरुषाबरोबर निघून गेली. यामुळे श्वेतकेतूला अतोनात दु:ख झाले व त्याने चळवळ करून स्त्रीला एकच पती असावा अशी व्यवस्था स्थापित केली. वरील कथांवरून असे दिसते की उपनिषत्काली विवाह बंधने कडक झाली नव्हती व गुणांचा विचार करून जाती ठरवण्याची पद्धत मान्य होती.

तत्त्वज्ञानपर कथा

तत्त्वज्ञानपर कथांमध्ये प्राण व इंद्रिये यांच्या स्पर्धेची कथा आहे. एकेक इंद्रिय गेले तरी प्राण

राहिला पण प्राण गेल्यावर एकही इंद्रिय राहू शकले नाही यावरून प्राणाचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले. या सारखीच दुसरी एक कथा पोट व कर्मेंद्रिये यांच्या स्पर्धेबद्दल आहे. ती कोणत्या ग्रंथात आहे हे शोधावे लागेल पण त्यामुळे तिचे महत्त्व कमी होत नाही. पाय म्हणाले, "आम्ही हिंड हिंड हिंडावे व फळे, मुळे, शिकार इत्यादी अन्न मिळाले तर ते मात्र या हातांनी लुबाडून घ्यावे हा अन्याय आहे." हातांनी उत्तर दिले "बावारे, मी हस्तगत केलेले अन्न माझ्याजवळ राहते कुठे? हे तोंड काहीच करीत नाही, मी मिळवलेले अन्न मात्र मला याच्या स्वाधीन करावे लागते." तोंड म्हणाले, "का मला दोष देतोस? मी अन्न चावण्याचे एवढे कष्ट घेतो, पण ते सारे अन्न या पोटात जाते हे पोट नुसते ऐतखाऊ आहे." इतर इंद्रियांप्रमाणे पोटाने आपल्यावरील आरोपाला काहीच उत्तर दिले नाही. तेव्हा पाय, हात व तोंड यांनी संपावर जायचे ठरवले. या ऐतखाऊ पोटाला काहीच मिळाले नाही तर त्याची चांगली जिरेल असे त्यांना वाटले. संप सुरू झाला व पोटाला बरेच दिवस काहीच मिळाले नाही. त्यामुळे पायांची शक्ती क्षीण होऊन ते चालेनासे झाले, हातांच्या काडचा झाल्या व त्यांना स्वतःवर चालणारी मुंगीही झटकता येईना, तोंडाचे बोळके झाले व त्याला बोलण्याचेही त्राण उरले नाही. अशी अवस्था झाल्यावर सर्व कर्मेन्द्रिये पोटाला शरण गेली व म्हणाली, "आता आम्हाला आमची चूक कळली. तू आहेस म्हणून आम्ही आहोत."

"भांडवलदार मजुरांचे शोषण करतात, त्यांना नष्ट केले की मजुरांचे कल्याण होईल." असे मानणाऱ्या मार्क्सवाद्यांना या कथेत पुष्कळच शिकण्यासारखे आहे.

पौराणिक कथांकडे पाहण्याची योग्य दृष्टी

मंत्र, ब्राह्मणे व उपनिषदे यात प्रसंगोपात्त कथासंदर्भ आले असले तरी हे कथाप्रधान ग्रंथ नाहीत. कथाप्रधान ग्रंथांत सर्वांत महत्त्वाचे स्थान पुराणांचे आहे. पुराण म्हणजे फार प्राचीन इतिहास असा अर्थ आहे. त्या मानाने अर्वाचीन असलेल्या घटनांचे वर्णन रामायण व महाभारत या ग्रंथात आहे.

आजकाल काही लोक पुराणे व रामायण महाभारत यात वर्णिलेल्या घटना सर्वस्वी काल्पनिक आहेत असे मानतात. याचे कारण (१) हे ग्रंथ अद्भुत व अशक्य घटनांनी भरलेले आहेत व (२) या ग्रंथाव्यतिरिक्त त्यात वर्णिलेल्या घटनांबद्दल त्या घटनांच्या समकालीन असा काहीच पुरावा सापडत नाही.

एखादा ग्रंथकार स्वतःच्या ग्रंथाला इतिहास मानीत असला तरी वरील दोन कारणास्तव त्याचा सारा ग्रंथ काल्पनिक मानणे समर्थनीय मानले तर 'न्यू टेस्टामेण्ट' व त्यात वर्णिलेले ख्रिस्ताचे चरित्र तसेच त्रिपिटके व त्यात वर्णिलेले बुद्धाचे चरित्र काल्पनिक मानावे लागेल. एवढेच नव्हे तर अलेक्झाण्डरबद्दलचे समकालीन उल्लेख सापडत नाहीत. त्याचा गुरु अरिस्टॉटल याने त्याचा उल्लेख देखील केला नाही यावरून अलेक्झाण्डर देखील काल्पनिक मानावा लागेल.

दुसरे असे की सर्वस्वी काल्पनिक असे कुणी काही लिहूच शकत नाही. अगदी कल्पितच लिहिण्याची प्रतिज्ञा केली तरी, ना. सी. फडक्यांनी बोलून चालून कादंबऱ्याच लिहिल्या पण त्यांच्या कादंबऱ्यात त्यांच्या काळी प्रत्यक्षात वावरणाऱ्या व्यक्तींची पात्रे आली आहेत. तेव्हा इतिहास लिहिण्याच्या बुद्धीने लिहायला बसलेला लेखक सर्वस्वी काल्पनिक असे काही लिहील हे संभवत नाही.

अरेबियन नाइट्स व बायबल

अतः रामायण / महाभारत / पुराणे यातील प्रमुख कथाभाग ऐतिहासिक आहे असे मानले पाहिजे. रामायणातील रामवनवास, सीताहरण व रामरावणयुद्ध आणि महाभारतातील पाण्डववनवास व कौरवपांडव युद्ध या घटना ऐतिहासिक असाव्यात.

पण या मुख्य घटनांच्या भरीला, उपकथानके व अद्भुत घटना वर्णिलेल्या आहेत त्यात कवीला काव्य रूपाने इतिहास सांगायचा आहे, इतिहासाचे

छायाचित्रण करायचे नाही हे लक्षात ठेवल्यास समर्थनीय ठरतात. काही कल्पित कथा Euphemism म्हणजे अवगुण्ठनोक्तीच्या स्वरूपाच्या आहेत. सीतेचे भूमिकन्यत्व व द्रौपदीचा यज्ञवेदीतून जन्म म्हणजे उघडपणेच कुणीतरी टाकून दिलेल्या अपत्यांची कथा आहे.

अस्त्रांच्या वर्णनावरून, कुलगुरुपदावर राहिलेले काही लेखक देखील त्या काळी आजच्या वैज्ञानिक युगातली अस्त्रे होती असे मानतात. असेच मानायचे तर Arabian Nights मध्ये हवेत उडणाऱ्या जादूच्या सतरंजीचे व अंगठी आणि दिवे घासून क्षणार्धात नवी जगे निर्माण करण्याची वर्णने आहेत. यावरून प्राचीन अरब लोकांना आजच्या पेक्षाही प्रगत विज्ञानाचे ज्ञान होते असे का म्हणू नये? तसेच बायबलात मोझेसला समुद्र वाट करून देतो व त्याचा शत्रु पाठलाग करीत आला असताना त्याला बुडवून टाकतो असे वर्णन आहे. यावरून प्राचीन ज्यू लोकांना समुद्र आटवण्याच्या व भरण्याच्या विद्या अवगत होत्या असे का म्हणू नये? ■

गौरव ग्रंथ सूची

माग्रसचा नवा प्रकल्प

महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर ग्रंथरसिक मिळविण्याचे १९६८ पासून कार्य करीत असलेली माग्रस योजना 'गौरव-ग्रंथ-सूची' तयार करण्याचा प्रकल्प जाहीर करीत आहे. या सूचीत शासन, संस्था, योजना, प्रतिष्ठान, व्यक्ती आदींतर्फे दरवर्षी गौरवित करण्यात आलेल्या ग्रंथांचा समावेश करण्यात येणार आहे. ग्रंथ, लेखक, प्रकाशक यांची नावे, गौरव प्राप्त वर्ष, साहित्य प्रकार, ग्रंथाचे मूल्य आदि माहिती वर्षानुक्रमाने देण्यात येईल.

या एकत्रित माहितीची पुस्तिका प्रसिद्ध करण्यात येईल व साऱ्यांकरिता ती उपलब्ध राहील. दरवर्षी पुरवणीही प्रसिद्ध करण्यात येईल.

याशिवाय या गौरवप्राप्त ग्रंथांचे नियमित प्रदर्शन गावोगावी भरविण्याचा विचार आहे त्यामुळे मराठीतील गौरवित साहित्य ग्रंथरसिकांच्या नजरेत येत राहील. तरी गौरव जाहीर करणाऱ्या संस्था, योजना, प्रतिष्ठान, व्यक्ती आदींनी त्यांच्या गौरवित ग्रंथांची सविस्तर माहिती व प्रकाशकांनी गौरवित ग्रंथांची एक-एक प्रत "प्रदर्शनाकरिता" असा शिक्का लावून-" अवार्डेड बुक्स सेंटर " (एबीसी) द्वारा माग्रस योजना, प्रिय, ४१ व्यंकटेश नगर, खामला रोड, नागपूर ४४० ०२५ या पत्यावर पाठवावी.

ज्या ग्रंथरसिकांना या प्रकल्पात निःशुल्क सहकार्य करण्याची इच्छा असेल त्यांनी लिहावे, किंवा प्रत्यक्ष भेटावे.

मराठी कथेचे भवितव्य

: डॉ. आशा सावदेकर

१९४० च्या आसपास नवकथेचा जन्म झाला. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगुळकर, शांताराम, दि. बा. मोकाशी यांनी आशय आणि अभिव्यक्ती दोहोंच्या दृष्टीने नवता आणली. त्या आधी कुसुमावती देशपांडे आणि वामनराव चोरघडे यांनी मानवी मनाच्या गुंतागुतीवर लक्ष केंद्रित केले होते. हळू-हळू कथा वरवर दिसणाऱ्या दृश्यांखाली दडलेल्या खोल अर्थांचा आणि अर्थशून्यतेचा, संगतींचा आणि विसंगतीचा शोध घेऊ लागली.

आजच्या कथेने तर अनेकपदरी अनुभव तेवढ्याच ताकदीने पेललेला आहे. लघुकथेचे रूप हळूहळू १९६० नंतर याच व्यामिश्रतेमुळे दीर्घ-कथेकडे झुकू लागलले आहे. नवकथाकार पु भा. भाव्यांनी 'मादाम विशी', 'वैरी' यासारख्या काही दीर्घकथा लिहिल्या होत्या. त्यात कथेचा आवाका मोठा म्हणून कथा मोठी असा प्रकार नव्हता. कथेच्या टोकदारपणामुळे तिच्यात दीर्घत्व येऊ लागले होते. ही दीर्घता पुढे जी. ए. कुळकर्णी यांच्या कथेने प्रथम मराठी कथेत नव्या अर्थाने रुजविली. लघुकथा अशीच वि. सी. गुर्जरांमध्ये प्रकटली, ना. सी. फडक्यांनी रुजवली. नवकथा चोरघडे, कुसुमावती यांच्यात प्रकटली. गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर यांनी रुजवली. 'दीर्घ-कथा' भाव्यांपासून प्रकटली पण रुजवली जी ए. कुळकर्णी यांनी. आजच्या कथेने कादंबरीची सगळी गुंतागुंत दीर्घत्वात पेलून धरलेली आहे. भारत सासणे, आशा बगे, राजेंद्र बनहट्टी, गौरी देशपांडे यांची कथा यामुळे दीर्घकथा होते आहे.

नवकथा प्रतिमांची भाषा बोलत होती. त्या प्रतिमा आशयाशी एकरूप होणाऱ्या होत्या आणि त्यामुळे कथेने भावकाव्य व लघुनिबंध आपल्यात सामावून घेतले होते. आजची कथा तात्कालिकाच्या गुंत्यात अडकून पडत नाही. तो मानवी मनाचा सूक्ष्मदर्शी वेध घेत जीवनाशी अनेकविध परींचे नाते सांगत राहते लघुकथेचा आशय एकसुरी होता, नवकथेचा आशय अनेक-पदरी होता. तर आजच्या दीर्घकथेचा आशय हा बहुपेडी, व्यामिश्र आणि गुंतागुंतीचा आहे.

ह्या कथेचा ध्यास हा एक संमिश्र ध्यास आहे. त्यात व्यक्तिमन, सांस्कृतिक संदर्भ, समकालीन जीवन आपल्या ताकदीनिशी एकवटलेले आहे. दीर्घकथा ही पात्रप्रसंगांपुरती मर्यादित राहत नाही. तिचा पट विशाल असतो. जी. एं. च्या कथेबद्दल बोलताना म. द. हातकणंगलेकरांनी गालिच्याच्या वीणीचो उपमा दिलेली आहे "जी. एं च्या कथांची वीण साध्या सणंगासारखी नसते. रात्रंदिवस खपून एकाच ठिकाणी घातलेल्या अनेक टाक्यांनी जाड थराचा आणि वरच्या बाजूला खानदानी, टिकणारे, ऐश्वर्य-संपन्न रंग आणि आकृती जमवीत, जोडीत जसा एखादा गालिचा विणणारा मनुष्य परंपरेने हातात आणि नजरेत उतरलेले कसब टाक्याटाक्यागणिक उमटवीत जातो. तशीच त्यांच्या कथेची वीण बसत जाते." (म. द. हातकणंगलेकर, प्रस्तावना; 'डोहकाळिमा' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९८७ पृ. ५) दीर्घकथा ही सूक्ष्म, विस्तारपूर्ण असते. त्याबरोबर तिच्यात आशयसमृद्ध असे गच्च मांडलेले तपशील असतात. त्यातून ती कथा सखोल जीवनानुभवालाच स्पर्श करीत असते या जीवनातील विविध अर्थ आणि अर्थरहितता यांच्या अनेक पातळ्या तिला मांडावयाच्या असतात. त्यामुळे ही दीर्घकथा एका प्रचंड भोवऱ्यासारखी गरगरत असते.

आशा बगे यांची 'नवस', 'रुक्मिणी', भारत सासणे यांची 'डफ', 'चिरदाह', आनंद विनायक जातेगावकर यांची 'गुलमोहोर', बाबुराव बागूल यांची 'सूड', राजेंद्र बनहट्टी यांची 'लांडगा', 'किनारा' या दीर्घकथा ही

आजच्या कथेची महत्त्वाची रूपे आहेत. या समकालीन कथांमध्येच उद्याच्या कथेची बीजे आहेत.

आशा बगे यांची 'नवस' ही कथा (दीपावली, दिवाळी १९८६) अनेक वर्तुळे मनात निर्माण करते. तिचे केंद्र एकच असते. प्रत्येकाच्या वाट्याला येणारा अपरिहार्य एकटेपणा, परंपरा, संस्कार यातून जीवनाला आलेला अनेकपदरीपणा, जीवघेणी गुंतागुंत आणि तरीही मनाला खुणावणारे संस्कार यांची अनेकस्तरी रस्सीखेच ती कथा आपल्यासमोर साकार करते. आईच्या आग्रहाखातर मुलासाठी रेवतीने केलेला नवस, मुंजीच्या वेळीही पॉपम्युझिक ऐकणारा मुलगा, अलिप्त नवरा तरीही चंद्रभागेचा गार स्पर्श, मंत्र ऐकताना अंगावर येणारे रोमांच यांचा व्यामिश्र अनुभव या छोट्या वर्तुळातून कथा वाढत वाढत, संस्कारांच्या सान्निध्यात पंढरपूरला राहणारे, तीन मुले असूनही एकाकी असलेले मामा, मामी, त्यांच्या जीवनातील अर्थ यांच्या प्रचंड, न पेलणाऱ्या गुंतागुंतीपर्यंत पोचते आणि सतत प्रश्नांच्या गुंतवळीतून अस्तित्वविषयक अनेक प्रश्नांचे अस्तर जपत चढत वाढत राहते. मामा–मामींच्या आयुष्यात गोवलेले वारकऱ्यांचे जाणे येणे आणि रेवतीच्या आयुष्याचे एका क्षणापुरते विठ्ठलमूर्तीपाशी बेभान थबकणे यातील गोवणूक कुणी केली ? का केली ? अशा प्रश्नांमधून अनुभवाच्या सोलीव गाभ्यापर्यंत ती कथा अलगद घेऊन जाते. प्रत्येकाची एक आखलेली चौकट, ती क्षणापुरती निसटते तिथेच जीवनाचा होणारा अनंत, अथांग साक्षात्कार आहे ! यांत्रिक जगात हरवलेले भावनिक नातेसंबंध, संपणाऱ्या श्रद्धा, निसटून गेलेली संस्कृती आणि संस्कृतीच्या चौकटी जपून वा तोडूनही वाट्याला येणारे अगतिक, अपरिहार्य एकटेपण अशा काटेरी अनुभवचक्रात ही कथा भिरभिरत राहते.

दीर्घकथा जीवनाला चिमटीत धरू पाहत असते. व्यक्तीव्यक्तींच्या स्वभावाचे विभिन्न पीळ आणि अनुभवाच्या अनेकविध संमिश्र पातळ्या यातून जीवनाची गुंतागुंत ही दीर्घकथा साकार करू बघते. भारत सासणे यांची 'डफ' ही दीर्घकथा याच कुळातील आहे. मशिदीच्या खिडारात राहणारा, अलीफ, डफ शिकण्यासाठी त्याचे 'पगलेपन', त्याला डफ देणारा रहीमचाचा, अलीफने जगवलेला, महारोगाने बोटे झडलेला अंबादास, रहीमचाचाची तरणी बायको...तिची चमकणारी मोरणी...झुलणारे झुमके आणि अतर्क्य जीवनाच्या एका लाटेबरोबर अनामिक वाटेने फेकला गेलेला एकाकी अलिफ असे विश्व त्या दीर्घकथेत साकारलेले आहे. अलीफच्या बोटात जादू आहे पण त्याचे मन तिच्या मोरणीत अडकले आणि तो रिकामा झाला. खुदाने दिलेली जादू पार नाहिशी झाली. नियतीने गळ्यात दोरी बांधून त्याला गरागरा फिरवले. आता रेडिओतला डफ ऐकता ऐकता त्याच्या एकाकी मनात पुन्हा चंद्रप्रकाश फाकतो, त्याच्या सर्वांगाला कसलीशी बेभान लाट वेढून जाते, एक अनाकलनीय आकाश त्याच्या मनात उतरते.

राजेंद्र बनहट्टी यांच्या 'लांडगा'मध्येही भाऊरावांच्या सार्वजनिक कार्याच्या विश्वात धमकीच्या पत्राने होणारी उलथापालथ हे एक बाह्य वर्तुळ आहे. स्वतःच्या कार्यावर, जीवनमूल्यांवर भाऊरावांचा अभंग विश्वास होता. ते कधी डगमगले नव्हते. लोकांच्या दृष्टीने भाऊराव हे एक निडर व्यक्तिमत्व होते. पण त्या एका पत्रानिशी सगळे विश्व बदलले होते. भाऊरावांच्या मनाचा सूक्ष्म वेध म्हणजे ही दीर्घकथा आहे. कुणी गॉगलवाला पाहून भाऊरावांचे मन विचलित होते, फोन येऊन गेला...बोलणारा हिंदीत बोलत होता ... या घटनेने भाऊरावांचे बंदिस्त विश्व ढवळले जाते. तो म्हातारपणाचा परिणाम असतो ? की माणूस नावाच्या यंत्राचे ते आतले चित्र असते ? मृत्यूशी तोंडओळख झाल्यामुळे हे असे आतून हलणे उन्मळले असेल काय ? या प्रश्नांच्या मोहोळातून ही अप्रतिम दीर्घकथा साकारली आहे. तिच्यात छोटी छोटी, खोल डोहाकडे ओढून नेणारी अनेक वर्तुळे सामावली आहेत. मृत्यूचा लांडगा येणार म्हणून बावरलेले भाऊराव, फसगत झाली म्हणून आनंदाने कधी नव्हे ते मोहरणारे आणि शेवटी अनिवार संशयाने वेढलेले भाऊराव, असा हा संवेदनांचा प्रवास या दीर्घकथेने साकार करून दाखविलेला आहे.

कालचे नवकथेचे संपन्न रूप, त्याचाच प्रतिसाद उमटवत पंधरा वर्षे फुलणारा कथावाङ्मयाचा प्रवाह, नंतरची जी एं. ची वळणावरची कथा, त्यातून आकारणारे आजच्या कथेचे रूप यातून कथेचे भवितव्य स्पष्ट आहे. उद्याची कथा दीर्घकथा आणि प्रदीर्घकथा राहणार आहे. गौरी देशपांडे यांची 'पाऊस आला मोठा', लक्ष्मण लोंढे यांची 'आरण्यक', याच जातीचे रूप उद्याची कथा लेऊन उभी राहणार आहे. कारण उद्याच्या कथेचे केंद्र 'माणूस' राहणार आहे. त्यात अस्वस्थ मनाचे सारे कंगोरे, नात्यागोत्यांच्या साऱ्या रीती स्पष्ट होत जाणार आहेत. रत्नाकर मतकरी यांच्या गूढकथा, निरंजन घाटे, जयंत नारळीकर यांच्या विज्ञानकथा यांच्यावरही दीर्घतेची सावली जाणवू लागली आहे. कथा हा वाङ्मयप्रकार आता 'टॉर्च'सारखा उरला नाही. मानवी मनाच्या दृष्टीने एखाद्या सर्चलाइटचे रूप तिला प्राप्त झालेले आहे. नवे जनसाहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य यातूनही आता मानवी मन हेच केंद्र उलगडत चालले आहे असे स्पष्ट दिसेल. अस्तित्व आणि माणसा–माणसातील संबंधाचे ताणयुक्त दर्शन, विसंगतीच्या अगम्यतेचे आकलन आणि मनात रुजलेल्या संस्कृतिसंदर्भात होणारे जीवनमंथन यातून उद्याच्या कथेला हा आकार प्राप्त होईल.

या उद्याच्या लेखकांचा सम्यक् सूर हा निश्चितपणे गंभीर धारणेचा सूर आहे. प्रगाढ अशा जीवनानुभवातून आणि अगम्य दुःखसंभवातून ही गंभीरता निर्माण झालेली असेल. तिचे रूप स्वकाळाने मंत्रित झालेले असेल. अंतर्मनातील संस्कारांची पाळेमुळे आणि विज्ञानयुगातील बुद्धिनिष्ठा यामुळे तिचे रूप हे प्रश्नांना सामोरे जाणारे असले तरी हे प्रश्न केवल तात्कालिक नसतील. व्यक्तीची कुटुंबापासून होणारी फारकत आणि असहाय, दबले, पिचले जीवन यातून फुत्कारणारी अस्मिता हे उद्याच्या कथेचे भवितव्य आहे. उद्याची कथा हे त्या काळाचे चैतन्ययुक्त असे भासचित्र असेल. म्हणूनच ती कथा लघुकथा वा लघुत्तम कथा असणार नाही. तिचे रूप दीर्घकथेचे वा प्रदीर्घकथेचे राहील ! ■

सी–२, हेमराज अपार्टमेन्टस्
१२२, शिवाजीनगर
नागपूर १०

[२ जानेवारी १९८८ रोजी ठाणे मुक्कामी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील परिसंवादात मांडलेल्या विचारांचे निबंधात्मक रूप.]

युगवाणीला खालील विषयांवर टिपणे हवी आहेत.

५७. महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर सामाजिक आंदोलनांचे मराठी साहित्यावरील परिणाम
५८. साहित्य संमेलनांचे राजकीय लागेबांधे
५९. दलित साहित्य संमेलने
६०. जिल्हा साहित्य–नाट्य संमेलने : भूमिका व कार्य
६१. आदिवासींची अस्मिता आणि वाङ्मय कलाभिव्यक्ती
६२. शैलीशास्त्रीय समीक्षा : आत्मनिष्ठेकडून वस्तुनिष्ठ तपासणीकडे
६३. वि. वा. शिरवाडकर : मराठीचे ताजे ज्ञानपीठ
६४. भाषाशास्त्र : एक अपरिहार्य अध्ययन
६५. भाषाशास्त्र : अध्ययन–अध्यापनाची दशा आणि दिशा
६६. संवादशास्त्राचे अध्ययन आणि अध्यापन
६७. भाषेतील अर्थमीमांसा
६८. सौंदर्यशास्त्राचे अध्यापन
६९. कलावंत आणि सौंदर्यशास्त्र
७०. अनुवादित वाङ्मय
७१. अनुवाद आणि निर्मितीक्षमता
७२. परदेशस्थ मराठी भाषिकांचे मराठी लेखन
७३. बृहन्–महाराष्ट्रातील मराठी लेखन
७४. अमराठी लेखकांचे मराठी लेखन

: अनुवाद :

साहित्य भांडार

व्यंग्य लेखन हे हिंदीत आज जेवढ्या प्रमाणावर वाङ्मयीन दृष्ट्या दर्जेदार व अभिरुचीसंपन्न तसेच विपुल प्रमाणावर निर्माण होऊ लागले आहे तसे ते मराठीत नाही, किंबहुना मराठीची ती प्रकृतीच नाही. हिंदी व्यंग्य लेखनाचा मराठीतून परिचय घडविण्याचा प्रयत्न सौ. शोभा उबगडे यांनी केलेला आहे.

जायस्वाल शेठ...शहरातील मान्यवर, धनाढ्य, सन्माननीय व्यक्ती. शेठजी गरीब कुटुंबातलेच. पण गेल्या काही वर्षात जादू झाली आणि ग्रहदशा पालटली. हो, जायस्वालचा एक बालमित्र मंत्री झाला. मग काय विचारता ? 'शिक्याचं तुटलं अन् मांजराचं फावलं.' मंत्री महोदयांच्या कृपेनं लाचलुचपत न देता विनासायास जायस्वालला विदेशी दारूच्या दुकानाचा परवाना प्राप्त झाला. लक्ष्मीनी गृहप्रवेश केला. अल्पावधीतच जायस्वाल शेठ झाला. नवश्रीमंताच्या पंक्तीत जाऊन बसला. स्वाभाविकच शेठजींना उच्चभ्रू समाजाची संस्कृती आत्मसात करणं क्रमप्राप्त झालं. हो, शेठजींकडे आता समाजातील विविध स्तरातील लोकांची उठ–बस होऊ लागली. त्यातच कलाकार आणि साहित्यिकही आपली वर्णी लावत.

शेठजींचा एक सल्लागार मंत्री मित्र शेठजींना म्हणाला —"सगळ्या राजकीय पक्षांना तू उदार देणग्या देत असल्याने राजकीय वर्तुळात तुझं नाव बहुचर्चित आहे. आता तू साहित्यक्षेत्रात घुसून नाव कमाव. आता...तू कलाकार किंवा साहित्यिक नाहीस ही गोष्ट अलाहिदा...पण, सगळेच काही 'तानसेन' नसले, तरी 'कानसेन' तर बनू शकतात, तेव्हा तू साहित्यिक असल्याचा देखावा सहज करू शकतोस."

"मित्रा, तुझा काय विचार आहे तो मला नीट समजावून सांग–" जायस्वाल म्हणाला.

मंत्री महोदय म्हणाले–"प्रथम तुझ्या घराला 'मॉडर्न' कर. त्यासाठी 'अँटिक्स' जमव. आधुनिक चित्रशैलीने घराच्या भिंती सजव. महिन्यातून एकदा–दोनदा आपल्या घरी 'साहित्यास्वाद', 'साहित्यिक गप्पा' किंवा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम आयोजित कर. हो, महत्त्वाची गोष्ट म्हणजे एखाद्या साहित्यप्रेमी स्त्रीशी विवाह कर."

शेठजींनी आपल्या प्रिय मित्राचा सल्ला अंमलात आणण्याचं ठरवलं. प्रथम विवाह! त्यांच्या जातीत साहित्यप्रेमी मुलगी उपलब्ध नसल्याने त्यांनी आपल्या घरी 'साहित्यिक गप्पात' नेहमी सहभागी होणाऱ्या शहरातल्याच एका कवयित्रीशी विवाह केला. शेठजींची पत्नी गरीबाघरची होती. शेठजींची कला व साहित्याभिरुची ती जाणून होती. तिने विचार केला की आपण एकमेकांस पूरक तर होऊ शकतोच. पत्नीजवळ साहित्य होतं पण धन नव्हतं आणि शेठजींवर सरस्वतीचा वरदहस्त नसला तरी लक्ष्मी त्यांच्या घरी पाणी भरत होती.

शेठजींची पत्नी सुलभा 'सुमन' या टोपण नावाने काव्यलेखन करीत असे. लक्ष्मी-सरस्वतीचं साहचर्य कसं टिकावं? काही काळ त्यांचा संसार ठीक चालला. पुढे आपल्या पतिदेवांची साहित्य अ-रुची पाहून 'सुमन' देवी पतिदेवांना टोमणे मारू लागल्या. शेठ आपल्या पत्नीला अनेकदा समजावत-'लाडके, ह्या जगात लक्ष्मीचंच साम्राज्य आहे. पैशानी साहित्य कधीही विकत घेता येतं.'

काही वर्षांनी त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. रूपाच्याबाबतीत बापाचा वारसा घेऊन जन्मलेल्या या बालकाच्या नामकरणाची वेळ आली. शेठजी पत्नीला म्हणाले-'माझ्या वडिलांनी माझं नाव छन्नीलाल ठेवलं. खरंच, सी. एल. या अवगुंठनात माझ्या नावाची विद्रुपता झाकणाऱ्या त्या इंग्रजांना शतशः धन्यवाद! आपण मात्र आपल्या मुलाचं छानसं नाव ठेवू. सुलभादेवींनी पुत्ररत्नाच्या नावासाठी डझनभर शब्दकोश धुंडाळून अखेरी नाव ठेवले 'कुशाग्र'.

साहित्यिकांच्या सहवासामुळे शेठजींनाही वाटू लागलं आपण साहित्यिक असतो तर? साहित्यिक नसल्याची खंत त्यांना अस्वस्थ करून लागली. बायकोच्या टोमण्यांनी तर खंत शतगुणित झाली. बायकोसमोर जरी शेठजी मान्य करीत नसले तरी साहित्यिक होण्याची बाब त्यांच्या मनात घर करून बसली आणि मानवी स्वभावानुसार आपल्या जीवनातील अपूर्ण इच्छा माणूस आपल्या मुलाबाळांत साकार झालेल्या पाहण्याची इच्छा मनात धरतो. त्याला शेठजी तरी अपवाद कसे असणार? कुशाग्रला साहित्यिक करण्याचं स्वप्न ते उराशी बाळगून होते. त्यासाठी ते सुरुवातीपासूनच प्रयत्नशील होते. खरं तर सुलभाही काही उच्चकोटीची साहित्यिक नव्हती. तिला त्याची जाणीव होती. आपलं अपूर्णत्व आपल्या मुलांत पूर्णत्वास गेलेलं पाहण्याची तिचीही मनीषा. परंतु...'नाव सोनुबाई हाती कथिलाचा वाळा' अशी कुशाग्रची गत. त्याला साहित्यातच काय पण कोणत्याच विषयात रुची नव्हती.

अभ्यासातही सामान्य असलेला 'कुशाग्र' कसाबसा तृतीय श्रेणीत बी. ए. झाला. तो साहित्यिक कसा होईल ह्या चिंतेने माता-पित्यांना घेरले होते. अशा प्रेचप्रसंगाच्या वेळी नेमका कृष्णासारखा शेठजींचा मंत्री-सखा अमोल संदेश घेऊन उपस्थित होत असे.

मंत्री महोदय म्हणाले-"मित्रा, आजकाल पैशाच्या जोरावर काय होत नाही? अरे, कॅनडा-अमेरिकेत कथा-लेखन, काव्य-लेखनाचे विविध अभ्यासक्रम आहेत. पाठवून दे कुशाग्रला तिकडे. मित्राचा सल्ला मानून दुसऱ्याच महिन्यात कुशाग्रला कॅनडाला पाठविले गेले. तीन वर्षे कॅनडा, अमेरिकेतील विभिन्न विश्वविद्यालयातून काव्य आणि कथालेखनाची प्रमाणपत्रे गोळा करून कुशाग्र आज भारतात परत येत होता. माता-पित्याचा आनंद गगनात मावत नव्हता. सगळ्या मित्रांनी, नातेवाईकांनी विमानतळावर कुशाग्रचं भव्य स्वागत केलं. शेठजींच्या मित्राने तियेच त्यांना सल्ला दिला की श्रीमंत व उच्चभ्रूंनी पार्टी देण्याची एकही संधी घालवू नये; जेणे करून आपल्या श्रीमंतीचं प्रदर्शन तर होतंच शिवाय पार्टीत विविध स्तरातील लोकांशी ओळखी-पाळखी होऊन वर्षोगणती जे प्रश्न रेंगाळलेले असतात ते पटकन् मार्गी लागतात. शेठजींना मित्राचा सल्ला पटला.

परदेशाहून आलेल्या कुशाग्रच्या आगमनाप्रित्यर्थ शेठजींनी मोठ्या स्वागत-समारोहाचं आयोजन केलं. स्वागत-समारंभाला अनेक मंत्री, कलावंत, साहित्यिक उपस्थित होते. समारंभात तऱ्हेतऱ्हेची विदेशी दारू आणि विविध प्रकारची व्यंजने होती. जशजशी विदेशी दारू कंठाखाली उतरू लागली तसतशी शेठजींची स्तुती

बहराला आली. गायन-वादनादीने युक्त असा हा स्वागत समारोह रात्री दोन वाजेपर्यंत चालला.

दुसऱ्या दिवशी शेठजींनी आपल्या मंत्री-मित्राला विचारलं की आता मी कुशाग्र-कडून काय करवून घेऊ ? मंत्री महोदय गंभीर मुद्रा करून म्हणाले- "तू एक कुशल व्यापारी आहेस आणि भाभी साहित्यिक आहेत. तुम्ही कुशाग्रकडून साहित्याचा व्यापार करवून घेतला तर त्याला तुम्हा उभयतांच्या अनुभवाचा लाभ घडेल."

विचार-विनिमयानंतर शहरात 'साहित्य-भांडार' काढण्याचं निश्चित झालं. 'साहित्य-भांडारा'च्या रूपरेषेवर विस्तृत चर्चा लवकरच करण्याचं आश्वासन देऊन मंत्री गेले.

मंत्रीमहोदयांच्या कृपेनी शहरातल्या एका प्रसिद्ध वस्तीत एक दुकान कुशाग्रला मिळालं. पुढच्या महिन्याच्या एक तारखेला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन निश्चित झालं. शेठजींनी आपल्याकडे येणाऱ्या समस्त नव्या-जुन्या साहित्यिकांना सहयोगाचं आवाहन केलं. साहित्यिकांनाही जाणवलं की वर्षानुवर्ष शेठजी आपल्याला फुकटात मदिरा-पान घडविताहेत तेव्हा त्यांना सहकार्य करणे आपलं कर्तव्यच आहे. आपण 'साहित्य भांडार'च्या सफलतेसाठी कुशाग्रला सहाय्य करायलाच हवं.

मित्रांच्या सल्ल्यानुसार दुकानाचं नाव 'निराला साहित्य भांडार' ठेवण्यात आलं. मोठ्या अक्षरांत पाटी लागली. त्यात खाली उपशीर्षकात लिहिलं होतं- 'येथे समयानुकूल सर्व प्रकारचे साहित्य योग्य मूल्यात उपलब्ध होईल.'

त्यांच्या एका मित्राने फुकटात काढून दिलेल्या पत्रकांत विनंती होती-

बंधु-भगिनींनो,

नागरिकांसाठी सुवर्ण-संधी, आपल्या शहरातील थोर समाजसेवक शेठ सी. एल्. जायस्वाल यांच्या सुपुत्राने जनहितार्थ 'साहित्य-भांडार' उघडले आहे. पुढील महिन्याच्या एक तारखेस मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'साहित्य-भांडार'चा उद्घाटन समारोह संपन्न-होत आहे. साहित्यिकगण आणि सामान्य नागरिकांनी निमंत्रणाचा स्वीकार करून करून समारंभाची शोभा वृद्धिगत करावी. या प्रसंगी सर्वांसाठी 'स्वल्पाहारा'ची व्यवस्था करण्यात आली आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणाच्या प्रसारामुळे लोकांची साहित्याभिरुचीही विकसित झाली आहे. समाजात सुसंस्कृत म्हणून प्रतिष्ठा मिळविण्यासाठी प्रत्येकाची साहित्यक्षेत्रात शिरण्याची धडपड असते. आजचा जमाना असा आहे की वाढदिवसानिमित्त काव्य-गायनाचा कार्यक्रम ठेवावा असं लोकांना वाटतं. श्रीमंत-उच्चभ्रूंना वडिलांच्या मृत्यू-प्रसंगी शोकगीतं गायली जावीत असं वाटतं. विवाहादी मंगल प्रसंगी शेरो-शायरीसारखे कार्यक्रम करावेसे वाटतात. एखादा शेठ जेव्हा मोठा ठेका किंवा परवाना प्राप्त करण्याच्या खटपटीत असतो तेव्हा त्याला वाटतं की मंत्री महोदयांच्या स्वागतप्रीत्यर्थ स्वागत-गीत असावं. हे विविध प्रकार एका छत्राखाली आपल्याला कोठे उपलब्ध होतील ? अर्थात-'निराला साहित्य-भांडार'-आपल्या सर्व गरजांची पूर्ती करण्यांचं एकमेव ठिकाण. आपल्या शहरातच नव्हे तर भारतात प्रथमच असा नाविन्यपूर्ण प्रयोग केला जात आहे. आपण सहकार्य देऊन आम्हास उपकृत कराल ही आशा.

आपला सेवक

सी. एल. जायस्वाल

आज–काल शेठजी स्वतः 'निराला–साहित्य भांडार'मध्ये जातीनं बसत. त्यांनी भांडाराची पुनर्रचना करून प्रत्येक साहित्य प्रकारासाठी 'इनचार्ज' नियुक्त केले. 'निराला साहित्य भांडारा'त जन्मोत्सव, विवाहोत्सव, शोकसभा आदी विविध विभाग पाडण्यात आले. प्रत्येक काऊंटरवर 'प्रसन्नवदने'ची नियुक्ती झाली. मागील कक्षात विभिन्न कवी, साहित्यिक नोकरीस ठेवले गेले. हे साहित्यिक विविध प्रकारची काव्यरचना करून लोकांची आवश्यकता पूर्ण करीत.

कुशाग्र जायस्वालांच्या या समाजकार्याचा लोक पुरेपूर उपयोग करून घेत होते. ज्या कवी–कवियत्रींना दोन वेळच्या पोटापाण्याची भ्रांत होती त्यांच्या कवितांचं वेळ-प्रसंगानुरूप वाचन–गायन होऊन अर्थार्जनही होऊ लागलं. आपल्या ग्राहकांच्या सुविधे-साठी शेठजींनी प्रसंगानुकूल घरपोच कवी पाठविण्याची सोयही उपलब्ध करून दिली. परंतु घडणाऱ्या गोष्टी कोण टाळू शकतं ? 'निराला साहित्य भांडार' परमोत्कर्षावर असतानाची घटना-शेठजी आपल्या कुटुंबियांसह लग्नासाठी परगावी गेले होते. दुकानाचा कारभार एका विश्वासू नोकरावर सोपविला होता. नोकराला समजावून सांगितलं होतं की मागणीप्रमाणे संबंधित कवीला ग्राहकाकडे पाठवावयाचे.

रजिस्टरमध्ये नोंद केल्याप्रमाणे एक कवी महाशय आपल्या रचना घेऊन ग्राहका-कडे गेला आणि शोकगीते म्हणू लागला. प्रथम आयोजक आणि श्रोते आश्चर्यचकित झाले. त्यांनी मग विचार केला की काव्याचा शेवट स्वागतपर असेल. पण छे... आयोजकांनी कवीची मानगूट पकडून म्हटले. आम्ही तुम्हाला स्वागतगीत गाण्यासाठी खरेदी केलं, त्यासाठी पैसे मोजले. शोकगीतांसाठी नव्हे. आता कमीत कमी स्वागत-गीताच्या काही ओळी तरी ऐकवा."

कवी म्हणाला– "मी केवळ शोकगीत–विशेषज्ञ आहे. मला स्वागतगीत येत नाही. मला माझ्या मालकाने शोकगीते म्हणण्यासाठी पाठविले होते. आपली काही तक्रार असेल तर मालकाला भेटा." असं म्हणून एकूण रागरंग पाहून कवीराजांनी तेथून काढता पाय घेतला. शोकसमारंभ ज्या व्यक्तीकडे होता ती व्यक्ती विरोधी पक्षाचा नेता होती. शोकसभेतील लोकांचा समज झाला की सत्ताधारी पक्षाला वश होऊन जाणूनबुजून आयोजकांनी ही गडबड केली. मारझोड करण्याच्या बेतात आलेल्या लोकांना स्पष्टीकरण देताना आयोजकांनी सांगितलं की ह्या कवीला निराला साहित्य भांडारांतून भाड्यानं आणलं होतं. लगेच लोकांनी शंका व्यक्त केली की जायस्वाल हा सत्ताधारी पक्षाचा असल्याने मुद्दाम त्यानी शोकसभेत स्वागतगीत गायला लावून आमच्या नेत्याचा अपमान केला. बघता–बघता चर्चेला जोर चढला आणि सगळा जमाव निराला भांडारा'च्या दिशेनी चालू लागला. उद्देश– 'साहित्य भांडारा'ला आग लावायची.

झाले असे की शेठजींच्या नोकराने रजिस्टरमध्ये ग्राहकाचं नाव बरोबर नोंदवलं होतं. परंतु चुकीनं ज्यांच्याकडे शोकगीतासाठी कवी पाठवायचा त्यांच्याकडे स्वागत गीत गाणारा कवी पाठविला गेला आणि ज्यांच्याकडे स्वागतगीत हवे होते त्यांच्याकडे शोकगीत गाणारा पाठविला. परिणामी दोन्ही ग्राहकांचा जमाव चिडून 'निराला साहित्य भांडार' बेचिराख करण्यास निघाला.

'निराला साहित्य–भांडार'समोर अभूतपूर्व दृश्य साकारलं. दोन्ही ग्राहक–जमाव समोरासमोर आल्यावर प्रथम आग कोणी लावायची ? या प्रश्नावर जुंपलीच. लठ्ठालठ्ठी

होऊन हाणामारी झाली. थोड्यावेळाने तेथे पोलीस आले. जमावाला काबूत आणण्यासाठी पोलिसांनी अश्रूधूर सोडला-लाठीमारही केला. जमाव पांगला, तमाशा पाहणाऱ्या प्रेक्षकांनी धूम ठोकली, 'निराला साहित्य भांडारा'चे कर्मचारी घाबरून पळाले. उरले फक्त पोलीस आणि 'निराला साहित्य भांडारा'त साहित्याचा व्यापार करणाऱ्या शेठजींना, त्याचा उपभोग घेणाऱ्या जनतेला आणि त्यांचं रक्षण करणाऱ्या पोलिसांना— अविचल राहून उपहासाने न्याहाळणारी 'निराला साहित्य भांडारा'ची पाटी. ■

मूळ हिंदी लेखक
डॉ. राम प्रकाश सक्सेना

अनुवाद
सौ. शोभा उबगडे
२१९, 'अरूण शोमा', धरमपेठ, नागपूर.

साभार पोच

विसाव्या शतकातील महाराष्ट्र : य. दि. फडके / श्रीविद्या प्रकाशन, पुणे [पृ. ३८३] रु. ९० /-

इंदूवासून हिंदू : ग. वा. कविश्वर / कविश्वर-इंदोर [पृ. ४३] रु. १० /-

आता होऊन जाऊ द्या : लोकनाथ यशवंत / मुक्तछंद प्रकाशन, चंद्रपूर [पृ. ७५] रु. २५/-

प्राचीन मराठी वाङ्मयातील लोकतत्व : सौ. अनिता मुजुमदार / मंगलप्रभा प्रकाशन, औरंगाबाद [पृ. २७४] रु. ८० /-

साठवण : नारायण लोहारेकर / मंगलप्रभा प्रकाशन, औरंगाबाद [पृ. १११] रु. ३५ /-

मराठी दलित कथा : अविनाश डोळस / सविता प्रकाशन, औरंगाबाद [पृ. ७४] रु. २५ /-

मिथक आणि नाटक : तारा भवाळकर / सविता प्रकाशन, औरंगाबाद [पृ. १९४] रु. ७० /-

अंधारवड : श्री. कडू / मयूर प्रकाशन, रावेर [पृ. २६] रु. २० /-

विसरु म्हणता विसरेना : विजया काळे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे [पृ. १४२] रु. ५० /-

खूणगाठी : नीलिमा भावे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे [पृ. ७०] रु. ३५ /-

कोण्या एका स्वप्नकाळी : आशा दामले / श्रीविद्या प्रकाशन, पुणे [पृ. ११४] रु. ४५ /-

एका स्वामियाने : सदानंद दळवी / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर [पृ. १२३] रु. ३६ /-

प्रेरणा : वसंत राजस / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर [पृ. ६४] रु २० /-

रूपाली : प्रा. शं. ना. पाटील / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर [पृ. १५०] रु. ४० /-

भावकवी तुकाराम : डॉ. स. ग. यादव, प्रा. टी. ए. गवळी / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर [पृ. ६६] रु. २० /-

श्रीमद्भगवद्गीता योग रत्नप्रकाश अर्थात श्रीमद् भगवद्गीतेच्या अर्थाची एक दिशा : स. स. म. गो. ल. कसवेकर / रा. स. भट प्रकाशन [पृ. १५०] रु. ३० /-

उत्सव : वसंत वऱ्हाडपांडे / इंदिरा प्रकाशन, नागपूर [पृ. १५५] रु. ४० /-

मनुच्या वारसदारांनो : प्रल्हाद खरे / पानफूल प्रकाशन, जळगाव [पृ. ८८] रु. ७ /-

दासोपंत विरचित गीतार्णव ८ वा अध्याय / एक भाविक अभ्यास : डॉ. गो. मु. माहोळकर / मुकुंदराज प्रकाशन, उमरगा [पृ. २९४] रु. १०० /-

अकल्पित : नामदेव चं कांबळे / ज्ञानेश प्रकाशन, नागपूर [पृ. ६४] रु ९ /-

पानपट्टी : जयवंत काकडे, सुचित्रा जयवंत काकडे प्रकाशक वगैरा [पृ. ९३] रु. २० /-

निखाऱ्यातील फुले : रमेश पाटील / संघमित्रा प्रकाशन, नागपूर [पृ. ९६] रु. ३० /-

संतसाहित्याची संकल्पना : डॉ. व. दि. कुळकर्णी / मराठी साहित्य परिषद, हैदराबाद [पृ. ७०] रु. २० /-

महात्मा फुले यांची बदनामी : एक सत्यशोधन

: यदुनाथ थत्ते

विश्वनाथ वैजनाथ गांगल नामेकरून एक मराठी विद्वान लेखक असून येनकेन प्रकारेण प्रसिद्धी पावण्याचा त्यांना हव्यास आहे की काय, असे वाटायला लावणाऱ्या शंकास्पद लिखाणाचा रतीब वृत्तपत्रांतून ते घालत असतात. त्यांचा हा रतीब ग. वा. बेहेरे संपादित 'सोबत'मधूनच बव्हंश चालू राहिला. विद्वत्तेच्या नशेत बेभान होऊन लिहिण्याच्या त्यांच्या प्रतापामुळे त्या दोघांवर एक तोहमत नुकतीच येऊन गेली.

महात्मा फुले यांना निराधार दूषणे देणारी एक लेखमाला त्यांनी 'सोबत'मधून लिहायला घेतली पण मग 'सोबत'कार आणि मशारनिल्हे बाळ गांगल यांना लोकक्षोभापुढे पळता भुई थोडी झाली ! 'सोबत'कारांनी आपल्या नेहमीच्या कातडी बचावू धोरणाप्रमाणे पड खाल्ली. त्यांचे शौर्य गळून पडले. पण त्याच्या आडून वार करणारे गांगल सफाईने निसटले !

विचारांचा मुकाबला क्षुब्ध अवस्थेत करण्यापेक्षा ह्या कथित विद्वानाच्या विद्वत्तेचा जाहीर पंचनामाच एकादा करावा आणि त्यांनी पांघरलेले कातडे काढून घ्यावे अशा निश्चयाने तरुण आणि अभ्यासू वृत्तीचे श्री. हरी नरके पुढे सरसावले आणि त्यातून सिद्ध झाले हे पुस्तक ! बाळ गांगल यांचा सवंगपणा, उथळ आणि मतलबी संशोधन यांचा सज्जड पुराव्यांनिशी त्यांनी पंचनामा मराठी जनतेला ह्या पुस्तकाद्वारे सादर केला आहे. अनेकदा विद्यापीठातून कशा प्रकारची विद्वत्ता पिकते, त्याचा हा एक नमुना आहे !

श्री. हरी नरके हे एक तरुण कर्ते सुधारक आणि व्यासंगी अभ्यासक आहेत. बाळ गांगल यांच्या तोडीचे शैक्षणिक यश त्यांनी संपादन केले आहे, एवढेच नव्हे तर अत्यंत विपरित परिस्थितीत जीवन जगत असताना त्यांनी ते मिळवले, हे ध्यानी घेतले पाहिजे. संपत्ती–संस्कृती असा कोणताही पैतृक वारसा त्यांना मिळालेला नसताना त्यांनी हे यश संपादन केले आहे ! पुणे विद्यापीठाची एम्. ए. पदवी पहिल्या वर्गात पहिले येऊन त्यांनी मिळवली आहे. एम्. फिल्. साठी महात्मा फुले आणि आगरकर यांचे स्त्री सुधारणाविषयक विचार, या विषयावरील प्रबंधिका ते तयार करत आहेत. त्यामुळे संशोधनाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करून त्यांनी हे पुस्तक लिहिले आहे.

कुठल्याही तात्कालिक विकाराच्या आहारी न जाता अत्यंत विवेकाने त्यांनी हे लिखाण केले आहे. त्यांनी हे लेखन करताना जी पथ्ये पाळली त्यांचा निर्देश त्यांनी आपल्या मनोगतात केला आहे. "वैचारिक लेखनाचा निषेध वैचारिक पातळीवरच व्हावा असे मला वाटते." असे ते सांगतात आणि पुढे म्हणतात, "चिकित्सा आणि पुनर्मूल्यमापन यासाठी समाजात खुले वातावरण असले पाहिजे. विभूतिपूजेचा जुनाट विकार जडलेल्या आपल्या समाजात सातत्याने मूल्यमापन करत राहाणे गरजेचे आहे. महात्मा फुलेच काय, परंतु कोणाही महापुरुषाचे संशोधकीय मूल्यमापन करण्याचे अभ्यासकांचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे, असा माझा आग्रह आहे." अशी नरके यांची निकोप भूमिका आहे. बाळ गांगल यांचे लिखाण या भूमिकेशी पडताळून पाहाता किती हिणकस ठरते, ते सहज ध्यानी येते.

महाराष्ट्रातील एक चिकित्सक अभ्यासक आणि लेखक प्रा. य. दि. फडके यांनी पुस्तकाला प्रस्तावना लिहिली असून त्यात ते म्हणतात. "संशोधनपर लेखमाला किंवा पुस्तक लिहिणाराने काही प्राथमिक नियम पाळावयाचे असतात, तेही गांगलांनी कसे धाब्यावर बसवले आहेत ते नरके यांनी उदाहरणे देऊन सिद्ध केले आहे. अवतरण अस्सल ग्रंथातून मुळाबरहुकूम घ्यायला हवे. अवतरण देताना ते संदर्भापासून तोडणे, खोटे संदर्भ देणे, अवतरणातील अर्थ, निर्णायक शब्द

वळगळणे, अवतरण उद्धृत करताना पाळावयाची शिस्त न पाळणे, हा श्री. नरके म्हणतात त्याप्रमाणे ज्ञानाच्या क्षेत्रातील आत्मवंचना आणि परवंचना करणारा गुन्हा आहे....लेखातील बेजबाबदार आणि भडक भाषा ही संशोधनपरलेखाची भाषा ठरू शकत नाही, हा नरके यांनी घेतलेला आक्षेप रास्तच आहे. खुद्द सोबतकार वेहेऱ्यांनी लेख छापल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करताना-या लेखातील भाषा व मांडणी आक्षेपार्ह आहे, हे विधान कुणी केले तर ते मुळीच चूक नाही-अशी कबुली दिली आहे, हे विसरून चालणार नाही."

श्री. हरी नरके यांच्या पुस्तकात प्रस्तावना, मनोगत, कृतज्ञता वगळून परिशिष्टांसह एकूण नऊ प्रकरणे आहेत. बाळ गांगल यांच्यावर अन्याय झाला असे चुकूनसुद्धा कोणाला म्हणता येऊ नये अशी दक्षता त्यांनी घेतली आहे गांगल यांचा आव संशोधनाचा असला तरी हेतू फुले यांच्या वदनामीचा कसा आहे, ते नरके यांनी सप्रमाण सिद्ध केले आहे. एका प्रकरणात स्वतःला संशोधक म्हणवणाऱ्या आणि नीतीच्या गोष्टी करणाऱ्या संघटनेशी आपण चाळीस वर्षे संबंधित आहोत असा दावा करणाऱ्या गांगलांनी किती उचलेगिरी केली आहे, ते दाखवून दिले आहे. सदहू बाळ गांगल यांचा अल्पपरिचय त्यांनी पुस्तकात दिला आहे. त्यात नरके म्हणतात. "डॉ. गांगल यांनी म. फुले विषयक लेखनाबाबत अद्यापपावतो लेखी स्वरुपात कुठेही दिलगिरी व्यक्त केलेली नाही, ही गोष्ट मान्य करून त्यांनी प्रस्तुत लेखकाकडे तोंडी दिलगिरी व्यक्त केली. मात्र त्यांनी तसे लेखी दिलेले नाही." अशा या बाळ गांगल नामक व्यक्तीच्या वागण्यात नरके यांच्या या पुस्तकामुळे काही फरक पडेल किंवा त्यांच्या अंध चाहत्या-पुरस्कर्त्यांमध्ये बदल होईल अशी आशा करण्यात अर्थ नाही. कितीही वेळा नळीत घातली तरी कुत्र्याची शेपटी काही सरळ व्हायची नाही क्वचित भीतीने मागच्या दोन पायांत ती खाली जाईल इतकेच! पण संशोधनाचा आव आणणाऱ्या व विचारक्षेत्रात सौदेगिरी करणाऱ्या या नावाला इतर माणसे ओळखू लागतील आणि संपादक त्यांचे लिखाण प्रसिद्ध करताना दहा वेळा विचार करतील, एवढे ह्या पुस्तकामुळे साधले जाईल आणि नव्या पिढीत विवेकी, अभ्यासू, संशोधनाची शिस्त काटेकोरपणे पाळणारे लेखक निर्माण होत आहेत हे पाहून लोकांना समाधान मिळेल. परिशिष्टांतील गांगलांचे मूळ लेख आधी वाचून नंतर पुस्तक वाचणे इष्ट ठरेल. नरके यांनी दिलेली संदर्भ सूची त्यांच्या व्यासंगाची व मेहनतीची ग्वाही देईल.

नरके यांनी या आपल्या पहिल्याच पुस्तकाने मोठी आशा निर्माण केली आहे. ते तरुण वक्ते म्हणून गाजले आहेत, संशोधक-लेखक म्हणूनही त्यांना तशीच कीर्ती लाभावी ही सदिच्छा. ■

महात्मा फुले यांची बदनामी : एक सत्यशोधन
लेखक : हरी नरके
सुगावा प्रकाशन, पुणे, ४११०३०
रु. २५-००

परिक्रमा + वेध : व्यक्तित्वांचा

: रजनी कोलारकर

अलीकडे नवोदित लेखकांच्या कलाकृती साजेसे देखणे मुखपृष्ठ व स्वच्छ सुबक मुद्रणासह प्रकाशित करण्याचा एक चांगला उपक्रम श्रीविद्या प्रकाशनाने हाती घेतलाय. याच प्रकाशनाची 'परिक्रमा' आणि 'वेध : व्यक्तित्वांचा' ही दोन पुस्तकं साझ्या पुढ्यात आहेत. पैकी लता राजेंचं 'परिक्रमा' गत वर्षी (१७ मे १९८८) तर ज्योती दातेंचं 'वेध : व्यक्तित्वांचा' अगदी अलीकडे (१४ मार्च १९८९) प्रकाशित झा-

ही दोन्ही पुस्तकं वर्तमान पत्री 'कॉलम'च्या माध्यमातून तयार झालीत. अर्थात् दोन्हींचा उद्देश मात्र अगदी भिन्न आहे, आणि म्हणूनच त्यांचे स्वरूपही भिन्न आहे. वाचकांना काही तरी चुरचुरीत, खुसखुशीत वाचायला मिळावं हा 'परिक्रमे'चा उद्देश तर आपल्या अवतीभोवतीच्या गुणी व्यक्तींचा परिचय वाचकांना घडवून देणं हा 'वेध : व्यक्तित्वांचा'चा उद्देश !

बहुतांश 'परिक्रमा' ही भारताबाहेर घडलेली आहे. परकीय रोचक घटना आणि त्या घटनांच्या अनुषंगानं गाजलेल्या व्यक्तींचा परिचय करून देण्याचं काम 'परिक्रमे'नं केलय् तर 'वेध : व्यक्तिवांचा' ने तुम्हा-आम्हाला नित्य टी. व्ही. वर नाहीतर चित्रपटात भेटणाऱ्या व्यक्तींचा गौरव केलाय्, क्वचित् अजून प्रसिद्धीच्या लख्ख प्रकाशात न झळकलेल्या व्यक्तींचाही यात समावेश आहे; तसेच 'आमच्या (सासू) बाई : माणिक बाई दाते' आणि 'अदम्य सेनानी : माझे बाबा-वसंत वरखेडकर' हे दोन आप्तांचा आठव करणारे लेखही आहेत.

'परिक्रमा' वाचत असताना बाईंच्या इंग्रजी साहित्याच्या दांडग्या व्यासंगानं थक्क व्हायला होतं, परदेशीय बारीकसारीक पण चुरचुरीत, खुसखुशीत घटनांची एवढी अद्ययावत् माहिती मिळवणं ऐशातैशाचे काम नव्हेच, याची सामान्य वाचकाला जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. पुस्तकं वाचत असताना 'लोकसत्ते'चा कॉलम जागा होतो आणि पुन्हा एकदा चर्विष्ट आनंद देऊन जातो. 'ब्रिटिश सम्राज्ञी व्हिक्टोरिया, हेन्री फोर्ड, ली आयकोका, सोराया-अदनन खशोगी, माओत्से तुंगची पत्नी, डचेस ऑफ विंडसर, अॅव्हरल हॅरिमन, ओलेफ पामे, इत्यादी अनेक नामवंतांच्या हकीगती या पुस्तकात सामावलेल्या आहेत. एकंदर ५९ विषय लता राजेंनी हाताळले आहेत. विषयानुरूप त्यांच्या शैलीनं सुंदर घाट घेतला आहे. पुस्तक वाचताना त्यांच्या जबरदस्त व्यासंगाचे, चाणाक्ष, चपखल आणि चोखंदळ वृत्तीचे मनोरम दर्शन घडते. असे असले तरी या पुस्तकाचा दीर्घकालीन ठसा वाचकांच्या मनावर उमटत नाही. अनेक विषय चांगले हाताळले असले तरी वाचक तिथे रमत नाही. हे असे का घडते ? याला जबाबदार पुस्तकातील लेखांची मांडणी आहे. यातील लेखांची मांडणी थोडी शिस्तबद्ध हवी होती; तसेच वर्तमान-पत्रातील रकाने तिथे उतरवायला नको होते. वर्तमान-पत्रात दोन विषय एकाच रकान्यात वाचता येतात. पुस्तकात तसे वाचायला वाचक तयार नसतो. कारण त्या विषयांना वर्तमानपत्रात जो तत्कालीन संदर्भ प्राप्त होतो तो पुस्तकरूपात प्राप्त होत नाही. मग पुस्तकाचे पुस्तकरूप बिघडते आणि वर्तमानपत्राचा कॉलमच शिल्लक राहतो. 'परिक्रमे'ची एकूण शिस्त बिघडते आणि ती भटकंती होते. त्यातील तपशीलाला मग फक्त रूचकर गप्पांचे रूप प्राप्त होते. असे 'वेध : व्यक्तित्वांचा' यात होत नाही. त्या पुस्तकाला आपले केंद्र सापडलेले आहे. यातील प्रत्येक व्यक्तीरेखा कलेत मुरलेली आहे. सोनाली बाजपेयी, हरेंद्रनाथ चटोपाध्याय, रोहिणी भाटे, शोभा गुर्टू, कल्याणजी आनंदजी, सलीम जावेद, जावेद जाफरी, मालती तांबे-वैद्य आदी सव्वीस कलावंतांचे 'मूड्स' लेखिकेने वेधक शैलीत टिपलेले आहेत. इथे कुठेही वाचकाने थक्क व्हावे असे प्रसंग नाहीत, अनुभव नाहीत. पण लेखिकेच्या लेखणीचा विषय झालेल्यांविषयी नितांत जिव्हाळा आहे. त्या जिव्हाळाचे लोभस दर्शन इथे घडते आणि तेच वाचकाला हवेहवेसे वाटते. यांतून प्रकटणारी लेखिकेची गुणग्राहक वृत्तीही वाचकाला आवडून जाते. मुलाखतीतून व्यक्तिविशेष वाचकांपर्यंत पोहचवणं हा सगळ्यात अवघड प्रकार लेखिकेला उत्तम साधला आहे. मार्मिक प्रश्न विचारून लेखिका त्या व्यक्तिमत्त्वांची सुंदर उकल करते. सहज सुंदर शैली, ओघवती भाषा आणि विषयाबद्दलची आपुलकी याने लेखनाला आपसूकच समृद्धपण लाभते. पुस्तकाच्या मलपृष्ठावरील प्रकाशचित्रातून ज्योती दात्यांचं विकल्पविरहित सतेज रूप दिसतं; त्यांच्या वृत्तीचं नेमकं हेच रूप त्यांच्या लेखनातूनही डोकावतं. आप्तांबद्दल लिहिताना भल्याभल्यांची लेखणी शिणते पण ज्योती दाते त्यांच्या सासूबाई आणि वडिलांबद्दल त्यांना जाणवणाऱ्या सर्व जाणिवा लेखातून प्रकट

करून देखील अतिभावुकतेकडे झुकत नाही. वस्तुनिष्ठ चित्रण चितारण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत असेच म्हणावे लागेल.

